मध्यप्रदेश संशोधन मंडळ प्र

संशोधनमुक्तावलि

[सर पहिला]

या ग्रंथांत कालिदास, भवभूति, सर्वसेन, प्रवरसेन इत्यादि संस्कृत व प्राकृत कवींविषयी आणि सातवाहन, गुप्त, वाकाटक, कलचुरि इत्यादि प्राचीन राजघराण्यांविषयी नवीन माहिती आढळेल.

"महामहोपाध्याय प्राचार्य मिराशी हे इतिहाससंशोधक म्हणून हिंदुस्थानभर प्रसिद्ध आहेत. ताम्रपट व शिलालेख यांचें पद्धतशीर वाचन व संपादन करण्यांत त्यांचा हातखंडा आहे. त्यांचे संशोधनविषयक लेख रूक्ष न वाटतां चटकदार वाटतात हा त्यांचा महनीय विशेष आहे."

—'युगवाणी'मध्ये

श्री. वा. ना. देशपांडे

किंमत चार रुपये

लेखक

वा. वि. मिराशी

मध्यप्रदेश संशोधन मंडळ ग्रंथमाला, क्रमांक ५

संशोधनमुक्तावलि

[सर पहिला]

लेखक

महामहोपाध्याय वासुदेव विष्णु मिराशी, एम्. ए.

माजी प्राचार्य, मॉरिस कॉलेज, नागपूर
व विदर्भ महाविद्यालय, अमरावती;
संस्कृत, पाली व प्राकृत विभागाचे माजी अध्यक्ष,
नागपूर विश्वविद्यालय.

मध्यप्रदेश संशोधन मंडळ, नागपूर.

प्रथमावृत्ति] किंमत चार रुपये. [१९५४

प्रकाशक :

देवीदास गोविंद लांडगे, बी. ए. एल्‌एल्. बी.,
चिटणीस, मध्यप्रदेश संशोधन मंडळ,
नागपूर.

मुद्रक :
पां. ना. बनहट्टी, बी. एससी.,
नारायण मुद्रणालय, धनतोली,
नागपूर.

कै. रावबहादूर काशिनाथ नारायण दीक्षित, एम्. ए.

बंगाल एशियाटिक सोसायटीचे फेलो,

हिंदुस्थान सरकारच्या

पुराणवस्तुसंशोधन विभागाचे

मुख्य संचालक,

यांच्या पूज्य स्मृतीस

सादर समर्पण

अनुक्रमणिका

प्राचीन भारतीय इतिहास

परिशिष्ट

पुरस्कार

मध्यप्रदेश संशोधन मंडळाच्या विद्यमाने म. म. प्रा. वा. वि. मिराशी यांच्या निवडक संशोधनपर लेखांचा संग्रह 'संशोधनमुक्तावलि' या नांवाने प्रकाशित होत आहे. प्रा. मिराशी यांचें संशोधनकार्य किती विशाल व गहन आहे हें या 'मुक्तावलीं'त ग्रथित केलेल्या लेखांवरून व तिला जोडलेल्या परिशिष्टांवरून स्पष्ट होईल. प्रा. मिराशी यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांत झाला व त्यांचें शिक्षण आरंभीं कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये व नंतर पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये झालें. त्यानंतर ते नागपुरांतील मॉरिस कॉलेजमध्ये १९१९ सालीं संस्कृत विषयाचे प्राध्यापक नेमले गेले. तेव्हापासून ते मध्यप्रदेशाचे कायमचे रहिवासी झाले आहेत. विद्यार्थीदशेंत त्यांनी कुशाग्र बुद्धि व उद्योगशीलता यांच्या बळावर मुंबई विश्वविद्यालयाच्या अनेक शिष्यवृत्त्या व पारितोषिकें मिळविलीं होतीं. अशा सुपीक भूमीवर स्फूर्तीचें बीज पडून व त्यावर कै. प्रा. गो. के. गर्दे यांच्यासारख्या अष्टपैलू विद्वानांच्या जवळ केलेल्या पातञ्जल महाभाष्याच्या अध्ययनाचें व प्राचीन ताम्रपट, शिलालेख, नाणीं, पाली व प्राकृत भाषा इत्यादि विषयांच्या अभ्यासाचें खत पडून, त्यांच्या दीर्घोद्योगाच्या वर्षावाने अंगीकृत कार्याचा वृक्ष फोफावून तो फलसंपन्न व्हावा हें स्वाभाविक होतें. या फळाचें स्वारस्य सामान्य माणसांस कळणें कठीण आहे. जे मर्मज्ञ आहेत तेच तें जाणूं शकतात. डॉ. विंटरनिट्झ, डॉ. बार्नेट, डॉ. रमेशचंद्र मुजुमदार प्रभृति प्रसिद्ध युरोपीय व एतद्देशीय प्राच्यविद्याविशारदांनी प्रा. मिराशींच्या संशोधनात्मक लेखांसंबंधाने गौरवपर उद्गार काढले आहेत. भारत सरकारच्या पुराणवस्तुसंशोधन खात्यातर्फे त्यांचा 'भारतीय कोरीव लेखांचा संग्रह, भाग ४' हा ग्रंथ प्रसिद्ध होणार आहे त्यावरून प्रा. मिराशी यांनी केलेलें संशोधन किती उच्च प्रकारचें आहे हें स्पष्ट होतें. या गोष्टी त्यांनी संपादलेल्या यशाची साक्ष देतात.

प्रा. मिराशी यांच्या लेखांतील मर्म तदन्तर्गत काटकोर व वस्तुनिष्ठ अशा संशोधनपद्धतींत आहे. अर्वाचीन काळीं इतिहासाचा अर्थ

बदलला आहे. प्राचीन व मध्ययुगामध्ये इतिहास म्हणजे सुरस व मनोरंजक कथानक असें समजत असत. इतिहासामध्यें गाजलेल्या एखाद्या थोर पुरुषाचें वर्णन करावयाचें असलें म्हणजे त्याला अद्‌भुत व अलौकिक अशा घटनांच्या प्रभावळींत बसवून त्याचें चित्र रंगविण्यांत येत असे. परंतु भौतिक शास्त्रांचा उदय झाल्यानंतर प्रत्येक विषयाचा अभ्यास शास्त्रीय म्हणजे वस्तुनिष्ठ अशा पद्धतीने होऊं लागला. त्यांत लेखकाच्या कोणत्याहि सिद्धांताला व पूर्वग्रहाला जागा मिळणें अशक्य झालें. यामुळे इतिहासलेखनाला शास्त्राचें रूप आलें. इतिहासशास्त्राचा आद्य प्रवर्तक लिओपोल्ड् फॉन रँके हा समजला जातो. याच्या काळापर्यंत इतिहास-लेखनाचें कार्य धर्मगुरूंकडेच असे, व ते इतिहासाच्या नांवाखाली अद्‌भुतरम्य कथानकें ऐतिहासिक व्यक्तींसंबंधाने रचून आपल्या धर्म-तत्त्वांच्या प्रसाराकडे त्यांचा उपयोग करीत असत. अशा एका तथाकथित इतिहासकाराने रँकेला 'अहो, आमचे इतिहासक्षेत्रांतील सवंगडी !' असें म्हटलें. त्याला रँकेने पुढील शब्दांत उत्तर दिलें, "You are in the first place a Christian; I am in the first place a historian. There is a gulf between us." पूर्वग्रहाने ग्रस्त झालेली दृष्टि व शास्त्रीय वस्तुनिष्ठ दृष्टि यांमध्ये असलेली खाडी किती रुंद आहे हें यावरून स्पष्ट होतें.

आपल्या भारतांत अजून अशी आधुनिक शास्त्रीय दृष्टि निर्माण झाली नाही. आपल्या इतिहासाचा अभ्यास वस्तुनिष्ठ म्हणजे चिकित्सक पद्धतीने झाला तर जीवनामध्ये आस्था उत्पन्न होईल व त्यांतूनच जीव-नाच्या विकासाला लागणारी स्फूर्ति मिळेल. आपल्या मनाचा कल साधारणपणे डोळ्यापुढे उभें असणारें जग सोडून कल्पित सृष्टींत विहार करण्याकडे अधिक असतो. चंद्रगुप्त मौर्याच्या काळीं मेगॅस्थेनीसने भारतीयांबद्दल असें विधान केलें होतें—'Their belief is in a great measure based upon fables.' अजून भारतीयांची वृत्ति साधारणपणें अशी आहे.

आधुनिक इतिहासाचीं साधनें ताम्रपट, शिलालेख नाणीं, इमारतींचे किंवा माणसांचे अवशेष अशीं अनेकविध आहेत. त्यांपैकी कोणत्या

साधनापासून कसा शोध लागतो हें लक्षांत आणलें म्हणजे त्या साधनांचें महत्त्व चटकन लक्षांत येईल. उदाहरणार्थ, सेनार्टने बुद्ध हा केवळ कल्पनेचा पुतळा आहे असें विधान केलें होतें. इतरांनीहि कांही काळपर्यंत त्याचीच री ओढली व बुद्ध म्हणजे सूर्यावर बसविलेलें एक प्रकारचें रूपक आहे असें भासविलें. परंतु जेव्हा त्याच्या अस्थि उपलब्ध झाल्या तेव्हा तो खरा चालता बोलता पुरुष होता हें निर्विवाद ठरलें. असो.

या बाबतींत आपल्याला पाश्चात्य विद्वानांचें गुरुत्व पत्करलें पाहिजे. त्यांनी घालून दिलेल्या पायंड्यानेच आपल्याला पुढील मार्ग आक्रमण करावयाचा आहे. प्रा. मिराशी यांच्यासारखे आधुनिक शास्त्रीय संशोधन पद्धति अवगत करून त्यांत तरबेज झालेले संशोधक प्रत्येक विश्वविद्यालयांत तयार केले पाहिजेत. आयुर्वेद, ज्योतिष, भूगोल, खगोल, रसायन, भूगर्भशास्त्र इत्यादि विविध विषयांवरचे हजारो संस्कृत ग्रंथ अद्यापि अप्रकाशित आहेत. त्यावरून संशोधनाचें क्षेत्र किती अफाट आहे व त्यांत काम करण्यास किती माणसें तयार करणें अवश्य आहे हें सहज दिसेल. अशा विशाल व अवघड क्षेत्रांत ज्यांनी परिश्रम केले त्यांत प्रा. मिराशी यांचें नांव चिरायु होईल यांत शंका नाही. त्यांनी केलेलें कार्य जसें तज्ज्ञांस प्रशंसनीय वाटलें तसें तें लोकादरास पात्र होईल अशी आशा आहे.

मध्यप्रदेश संशोधन मंडळाने प्रकाशनास घेतलेल्या या ग्रंथाकरितां मध्यप्रदेशाचे माननीय राज्यपाल डॉ. पट्टाभिसीतारामय्या यांनी उदारपणें खास देणगी दिली त्याबद्दल मंडळ त्यांचें अत्यंत ऋणी आहे. सरकार व जनता यांचें या प्रकारें साहाय्य होत गेल्यास मंडळास अशा प्रकारचे ग्रंथ प्रकाशित करणें शक्य होईल. तसें साहाय्य प्राप्त होईल अशी आशा प्रकट करून मी या 'संशोधनमुक्तावली'चा पुरस्कार करतों.

नागपूर
१८-२-१९५४

भवानीशंकर नियोगी
अध्यक्ष,
मध्यप्रदेश संशोधन मंडळ.

लेखकाचें हृद्गत

सन १९२८ सालची गोष्ट. त्यावर्षी मॉरिस कॉलेजच्या स्नेहसंमेलनाकरिता डॉ. श्री. व्यं. केतकर नागपुरास आले होते. त्या वेळीं मॉरिस व हिस्लॉप कॉलेजांमधील मराठी मंडळांतर्फे त्यांना मानपत्र देण्याकरितां भरलेल्या सभेचें अध्यक्षस्थान मला देण्यांत आलें. त्या प्रसंगीं डॉ. केतकरांनी आपला ' कालिदास आणि विदर्भ ' हा निबंध समग्र वाचला. ' मालविकाग्निमित्र ' नाटकाचें मंथन करून डॉक्टर साहेबांनी कालिदासाचा स्वभाव, त्याचें राजकारणाचें व भूगोलाचें ज्ञान, उज्जयिनी व विदर्भ यांचे परस्पर संबंध इत्यादींविषयी अशीं विलक्षण विधानें केलीं की त्यामुळे इतर श्रोत्यांप्रमाणे मीहि अगदी थक्क झालों. डॉ. केतकरांचें संशोधन विलक्षण वाटलें तरी त्याचें खंडन करणें सोपें काम नव्हतें. केवळ कल्पनेवर विसंबून एखाद्याच्या ज्ञानावर व चारित्र्यावर आक्षेप घेणें सोपें असतें, पण त्यांचें साधार खंडन करणें अत्यंत कठीण जातें. शिवाय कालिदासाच्या काळाला दीड हजार वर्षे झालेलीं. त्या काळची राजकीय व सामाजिक परिस्थिति, कालिदासाचें चरित्र इत्यादिविषयी आज आपलें ज्ञान अत्यंत अल्प. यांमुळे डॉ. केतकरांचीं विधानें खोडून काढणें कठीण होतें. तथापि त्यावेळींहि माझा प्राचीन इतिहासाचा थोडाबहुत व्यासंग होता व कालिदासाच्या सुदैवाने त्यापूर्वी नुकताच शिलालेखादिकांचा अव्वल दर्जाचा पुरावा उपलब्ध झाला होता तो मला माहीत होता. म्हणून माझ्या अध्यक्षीय भाषणांत मला डॉ. केतकरांच्या विलक्षण संशोधनाचें सप्रमाण खंडन करतां आलें. माझें भाषण त्या सभेस उपस्थित असलेल्या अनेक विद्वानांना आवडलें. त्यांपैकीं कांहींच्या सूचनेवरून पुढे डॉ. केतकरांच्या निबंधाला उत्तर देण्याकरितां

मी सहा लेखांकांची विस्तृत लेखमाला नागपूरच्या 'महाराष्ट्रां'त लिहिली. हेच माझे मराठींतील पहिले संशोधनात्मक लेख. वास्तविक पाहतां प्राचीन भारतीय इतिहास हा माझा विषय नव्हे. माझ्या अध्ययनकाळीं तो मुंबई विश्वविद्यालयांतील कोणत्याहि कॉलिजमध्ये शिकविला जात नसे. तेव्हा प्राचीन इतिहासाच्या अभ्यासाकडे माझें कसें लक्ष गेलें हें सांगणें या प्रसंगीं अप्रस्तुत होणार नाही असें वाटतें.

मी शिक्षण संपवून पुण्याच्या डेक्कन कॉलेजांतून बाहेर पडलों तेव्हा डॉ. रामकृष्णपंत भांडारकर, डॉ. का. बा. पाठक यांच्या संशोधनाचे आदर्श माझ्या दृष्टीपुढे होते. सन १९१७ मध्ये पुण्यास भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंडळाची स्थापना होऊन त्याने महाभारताची संशोधित आवृत्ति काढण्याचें प्रचंड काम हातीं घेतलें होतें. १९१९ मध्ये पुण्यास प्राच्यविद्यापरिषदेचें पहिलें अधिवेशन भरलें तेव्हा मध्यप्रांत सरकारने आपला प्रतिनिधि म्हणून मला पाठविलें होतें. त्या प्रसंगीं अनेक संशोधकांशीं परिचय होऊन त्यांचें कार्य जवळून पाहतां आलें. अशा परिस्थितींत आपल्याहि हातून कांही संशोधनकार्य व्हावें अशी इच्छा होणें स्वाभाविक होतें. प्राच्यविद्यासंशोधनाकरितां जर्मन व फ्रेंच भाषांचें सामान्य ज्ञान आवश्यक आहे हें माहीत असल्याने त्यांचा अभ्यास मी घरींच चालू केला होता, तथापि कोणत्या विषयांत आपणांस संशोधन करतां येईल याची स्पष्ट कल्पना त्या वेळेला आली नव्हती. एम्. ए. परीक्षेकरितां माझा ऐच्छिक विषय वेदान्त होता व त्या विषयांतील नैपुण्याबद्दल 'सुज्ञ गोकुळजी झाला वेदान्त पारितोषिक' हें मला दोनदा मिळालें होतें. नागपुरास आल्यावर व्याकरणाचें खोल अध्ययन व्हावें म्हणून कै. प्रा. गो. के. गर्दे यांच्याजवळ पातञ्जल महाभाष्य वाचलें होतें. पुढे मुंबई विश्वविद्यालयाच्या 'विश्वनाथ नारायण मंडलिक सुवर्णपदका'करितां नेमलेल्या 'धर्मसूत्रें व स्मृतिग्रंथ यांचा परस्पर संबंध व त्यांत दिसून येणारी हिंदु कायद्याची उत्क्रान्ति' या विषयावर लिहिलेल्या संशोधनपर निबंधाबद्दल तें सुवर्णपदकहि मला मिळालें होतें. तथापि वेदान्त, व्याकरण किंवा धर्मशास्त्र या विषयांत माझ्या हातून

संशोधन होतां दुसऱ्याच एका विषयाकडे माझें लक्ष गेलें व पुढे त्यांतच माझें मन रममाण होऊं लागलें.

सन १९१९ मध्ये नागपुरास मॉरिस कॉलेजमध्ये संस्कृताध्यापक म्हणून माझी नियुक्ति झाली त्यावेळीं प्रयाग विश्वविद्यालयाच्या एम्. ए. परीक्षेकरितां नेमलेल्या संस्कृत विषयाच्या अभ्यासक्रमांतील एक प्रश्नपत्रिका 'प्राचीन भारतीय संस्कृति' या विषयावर असे. तत्पूर्वी मॉरिस कॉलेजांत हा विषय शिकविला जात नसे. विद्यार्थ्यांस त्याचा अभ्यास घरींच करावा लागे. ही परिस्थिति ठीक नव्हती म्हणून मीच तो विषय शिकविण्यास घेतला. या विषयाच्या अभ्यासाकरितां इंपीरियल गॅझेटीयरच्या दुसऱ्या विभागांतील प्राचीन कोरीव लेख, पुराणवस्तुशास्त्र, स्थापत्यशास्त्र, शिल्पशास्त्र, नाणकशास्त्र इत्यादि विषयांवरील डॉ. फ्लीट, व्हिन्सेंट स्मिथ, बर्जेस इत्यादिकांचे संदर्भांनी खच्चून भरलेले लेख नेमले होते. या लेखांतील विषय विद्यार्थ्यांस समजावून देण्याकरितां अनेक ग्रंथ जमवून अभ्यासावे लागत. त्या वेळीं या विषयांच्या अभ्यासाकरितां आवश्यक ग्रंथ असलेलें सुसमृद्ध पुस्तकालय या प्रांतांत नव्हतें. तथापि नागपूरच्या सचिवालयाच्या पुस्तकालयांतून व कलकत्त्याच्या इंपीरियल लायब्ररींतून मूळ ग्रंथ मिळवून त्यांतील माहिती मी आपल्या विद्यार्थ्यांस देत असे. या अभ्यासाने या विषयांविषयी माझ्या मनांत गोडी उत्पन्न झाली. त्यानंतर मी प्रकाशित कोरीव लेखांचा अभ्यास करूं लागलों. या अभ्यासामुळे मागे उल्लेखिलेल्या प्रसंगीं मला डॉ. केतकरांच्या विधानांचें खंडन करतां आलें.

सन १९२१ मध्ये हिंदुस्थान सरकारच्या पुराणवस्तुसंशोधन खात्याचे डेप्युटी डायरेक्टर जनरल रा. ब. काशिनाथ नारायण दीक्षित हे मध्यप्रांत–वऱ्हाडांतील उत्खननयोग्य जागांची पाहणी करण्याकरितां नागपूरला आले होते. त्यांनी माझा प्राचीन इतिहासाचा व्यासंग पाहून मला प्राचीन कोरीव लेख प्रकाशित करण्याविषयी आग्रह केला, इतकेंच नव्हे तर कांही लेखांचे छाप मजकडे पाठवून व अन्यप्रकारेंहि मदत करून मला उत्तेजन दिलें. त्यानंतर अनेक कोरीव लेख व नाणीं

प्रकाशनाकरितां मजकडे आलीं. त्यांवर आणि संस्कृत व प्राकृत वाङ्मयांतील विविध प्रश्नांवर मला लिहितां आलें. हे लेख तज्ज्ञांच्या दृष्टीस पडावे म्हणून इंग्रजींत लिहिले आहेत. मराठी वाचकांसहि महत्त्वाच्या प्रश्नांवरचें संशोधन माहीत व्हावें म्हणून कांही लेख मधून मधून मराठी वृत्तपत्रांत, मासिकांत, भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकांत व संमानग्रंथांत प्रकाशित केले आहेत. कांही मित्रांच्या सूचनेवरून या दोन्ही प्रकारच्या लेखांच्या याद्या संदर्भांसह या लेखसंग्रहाच्या शेवटीं जोडल्या आहेत.

गेल्या पंचवीस वर्षांत विवाद्य प्रश्नांवर अनेकांशीं माझे वाद झाले आहेत. डॉ. केतकर यांच्या 'कालिदास आणि विदर्भ' या लेखमालेला दिलेल्या उत्तराचा निर्देश मागे केला आहेच. याशिवाय 'कालिदास आणि ऋतुसंहार', 'कालिदास आणि अश्वघोष', 'कालिदासाचा काळ' 'गाथासप्तशतीचा काळ', 'मेघदूतांतील रामगिरि' या विषयांवर कै. दु. आ. तिवारी, श्री. अ. ज. करंदीकर, प्रा. कृ. मो. शेंबवणेकर, कै. म. म. कृष्णशास्त्री घुले इत्यादिकांच्या लेखांतील विचारसरणी मान्य न झाल्यामुळे त्या विषयांची दुसरी बाजू मी माझ्या लेखांत मांडली होती. मध्यप्रदेश संशोधन मंडळाने माझ्या निवडक संशोधनपर लेखांचा संग्रह प्रसिद्ध करण्याचें ठरवून मला लेखांची निवड करण्यास सांगितलें, तेव्हा या प्रकारचे वादविषयक लेख त्यांत घालावेत काय हा प्रश्न उपस्थित झाला. मूळ लेख छापले नसतां त्यांना दिलेलीं उत्तरें छापणें योग्य नव्हे असें एकदा वाटलें. पण हे वादविषय महत्त्वाचे असून त्यांवर जुनीं मतें पुनः पुनः मांडण्यांत येतात. त्यांना दिलेलीं उत्तरें वर्तमानपत्रांच्या किंवा मासिकांच्या जुन्या अंकांत लुप्त झालीं असल्याने त्या प्रश्नांची दुसरी बाजू वाचकांपुढे येत नाही असें आढळून आलें. याचीं एक दोन उदाहरणें येथे देतों. डॉ. केतकरांच्या 'कालिदास आणि विदर्भ' या लेखांतील विक्षिप्त विधानांना दिलेल्या उत्तराचा निर्देश मागे आला आहे. 'त्यांच्या (डॉ. केतकरांच्या) मनावर या वाग्युद्धाचा फार परिणाम झालेला होता' असें प्रा. बनहट्टी यांनी एके ठिकाणीं लिहिलें आहे ('एकावळी,' पृ. १३४). तथापि त्यानंतर प्रकाशित झालेल्या

आपल्या 'प्राचीन महाराष्ट्र, विभाग पहिला' या ग्रंथांत डॉ. केतकरांनी तींच विधानें पुनः केलीं आहेत. मी त्यांच्या निदर्शनास आणलेल्या तत्कालीन शिलालेखाच्या प्रबळ पुराव्याने नाइलाज झाल्यामुळे 'पुष्यमित्राने अश्वमेध केला नव्हता व गादीवर आल्यावरहि त्याला 'सेनापति' म्हणण्यांत कालिदासाने आपल्या सदसद्विवेकबुद्धीस चूप बसविलें होतें' यासारखीं कांही विधानें मात्र गाळलीं आहेत. तरीहि त्यांनी 'प्रो. मिराशी यांच्याकडून माझ्या कोणत्याही मुद्द्याचें खंडन झालें नाही' अशी शेखी मारली आहे. (प्राचीन महाराष्ट्र, विभाग १, पृ. ३९१.) 'महाराष्ट्र' वृत्तपत्राचे सन १९२८ चे अंक वाचकांस सहज मिळण्याचा संभव नसल्यामुळे त्यांस डॉ. केतकरांच्या म्हणण्यांत किती तथ्य आहे हें समजण्यास साधन उपलब्ध होणार नाही. या कारणास्तव त्यांच्या लेखांना दिलेलें उत्तर पुनः छापणें अवश्य वाटलें. दुसरें उदाहरण प्रा. शेंबवणेकरांचें. 'प्रसाद' मासिकांत प्रसिद्ध झालेल्या 'कालिदास आणि अश्वघोष' या लेखांत त्यांनी 'कोणत्याहि ब्राह्मण पंडिताने कोणत्याहि जैन किंवा बौद्ध कवीच्या काव्याचा अभ्यास केल्याचा यत्किंचितहि पुरावा नाही' असें विधान ठासून केलें होतें. त्याच मासिकांत या लेखाला दिलेल्या उत्तरांत कांही ब्राह्मण आलंकारिक व टीकाकार यांच्या ग्रंथांतील संदर्भ देऊन हें विधान कसें निखालस खोटें आहे तें मी दाखविलें होतें. माझा लेख प्रा. शेंबवणेकरांच्या दृष्टीस पडला नसेल असें वाटत नाही. त्यांनी माझ्या प्रमाणांचें खंडन केल्याचेंहि मला माहीत नाही. तरीहि कांही महिन्यांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या The Glamour about the Guptas (p. 65) या ग्रंथांत त्यांनी तेंच विधान पुढील शब्दांत केलें आहे—'Aśvaghosha's works, moreover, do not seem to have been noticed by orthodox Brāhmaṇ writers, as anything like a reference to them is entirely wanting in anthologies or alaṅkāra works.' यामुळे त्यांच्याहि लेखाला दिलेलें उत्तर या लेखसंग्रहांत घ्यावें लागलें. कालिदासाच्या काळाचा विचार

करतांना अश्वघोषाशीं त्याच्या पौर्वापर्याचा प्रश्न नेहमी उपस्थित होतो. म्हणून श्री. अ. ज. करंदीकरांच्या तद्विषयक लेखाला दिलेलें उत्तर येथे घेणें जरूर वाटलें. प्रस्तुत संग्रहांत वादविषयक असे तीनच लेख आहेत. उत्तर देतांना पूर्वीच्या लेखांतील विवाद्य विधानें शक्य तो लेखकांच्या शब्दांत देण्याचा माझा नेहमींचा प्रघात आहे. त्यामुळे त्यांना अन्याय होण्याचा संभव नाही. मूळ लेखांत व माझ्या उत्तरांत आलेल्या व्यक्तिविषयक उल्लेखांना मात्र चिरकालिक महत्त्व नसल्यामुळे ते पूर्णपणें गाळून फक्त महत्त्वाच्या मुद्द्यांना दिलेलें उत्तर ठेवलें आहे. त्यावरून वाचकांस विवाद्य विषयांच्या दोन्ही बाजू समजून आपलें मत बनविण्यास मदत होईल.

प्रस्तुत लेखसंग्रहांत संस्कृतवाङ्मयविषयक सात, प्राकृतवाङ्मयविषयक चार व प्राचीन-भारतीय-इतिहासविषयक पांच लेखांचा अन्तर्भाव केला आहे. त्यांत कालिदास, भवभूति व राजशेखर हे संस्कृत कवि, आणि गुणाढ्य, हाल, छप्पणय, प्रवरसेन व सर्वसेन हे प्राकृत कवि यांचा काळ, जन्मस्थान, चरित्र, ग्रंथ इत्यादिकांविषयी नवीन माहिती आढळेल. यांत सातवाहन, शक, गुप्त, वाकाटक, राष्ट्रकूट आणि कलचुरि या प्राचीन राजवंशांच्या इतिहासावर थोडाबहुत नवीन प्रकाश पाडलेला दिसेल. याशिवाय रामगिरि, पद्मपुर, प्रवरपुर इत्यादि स्थलांचा शोध, शालिवाहन शकाची उत्पत्ति व प्रसार, महाराष्ट्र देशाचा सर्वांत प्राचीन उल्लेख असलेला कोरीव लेख, वाकाटककालीन शिल्पें, इत्यादि विषयांवर संशोधनाने प्राप्त झालेली नवीन माहिती मिळेल. सारांश, या लेखसंग्रहांत वाचकांस विषयांच्या महत्त्वाबरोबर विविधताहि आढळेल असा मला भरवसा आहे.

प्रस्तुत लेख वृत्तपत्रांतून व मासिकांतून भिन्न भिन्न काळीं प्रसिद्ध झाले होते. शिवाय ते संशोधकांकरितां नसून जिज्ञासु सामान्य वाचकांसाठी लिहिले होते. अशा वाचकांना संशोधनाची अद्ययावत् प्रगति माहीत नसते. म्हणून प्रत्येक लेखांत ती थोडक्यांत सांगून संशोधनाने प्राप्त झालेली नवीन माहिती दिली होती. यामुळे या लेखांत क्वचित्

पुनरुक्ति झालेली आढळेल. कांही ठिकाणीं नवीन टीपा देणें आवश्यक वाटलें. त्या कंसांत माझ्या नांवाच्या आद्याक्षरांनी दाखविल्या आहेत. या पुस्तकांतील शुद्धलेखन महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नियमांनुसार आहे.

हे लेख पुनर्मुद्रित करण्यास खालील वृत्तपत्रांच्या व नियतकालिकांच्या संपादकांनी अनुज्ञा दिली त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों--'महाराष्ट्र', नागपूर; 'तरुणभारत', नागपूर; 'सह्याद्रि', पुणें; 'प्रसाद', पुणें; 'युगवाणी', नागपूर; 'भारत इतिहास संशोधक मंडळाचें त्रैमासिक', पुणें; 'शारदाश्रम वार्षिक', यवतमाळ, आणि 'नवभारत', पुणें. पवनार येथील शिल्पांचे ब्लॉक भारत इतिहास संशोधक मंडळाच्या कृपेने मिळाले त्याबद्दलहि मी मंडळाचा ऋणी आहे.

माझ्या संशोधनपर मराठी लेखांचा संग्रह प्रसिद्ध व्हावा अशी इच्छा नागपूरच्या 'युगवाणी'चे संपादक श्री. वा. ना. देशपांडे यांनी आठ वर्षांपूर्वी व्यक्त केली होती. पण आर्थिक दृष्ट्या तें फायदेशीर होण्याचा संभव नसल्याने तसें करण्यास कोणी प्रकाशक पुढे येणें शक्य नव्हतें. मध्यप्रदेश संशोधन मंडळाने माझ्यावरील प्रेमाने हें कार्य हातीं घेतलें याबद्दल मी मंडळाचा अत्यंत ऋणी आहें. मध्यप्रदेशाचे राज्यपाल डॉ. पट्टाभिसीतारामय्या यांचें भारतीय संस्कृति, संस्कृत वाङ्मय व संशोधन या विषयीचें प्रेम सर्वश्रुत आहे. त्यांनी या प्रकाशनकार्याकरिता खास देणगी मध्यप्रदेश संशोधन मंडळाला उदारपणें दिली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. मंडळाचे अध्यक्ष डॉ. सर भवानीशंकर नियोगी यांनी अत्यंत कार्यव्यापृत असतांहि या लेखसंग्रहाला आपल्या पुरस्काराने भूषविलें याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों. 'नारायण मुद्रणालया'ने नेहेमीप्रमाणे हें पुस्तक शुद्ध व सुबक रीतीने छापून दिलें याबद्दल त्याचे संचालक श्री. पां. ना. बनहट्टी यांचे आभार मानले पाहिजेत.

१५ फेब्रुवारी १९५४ वा. वि. मिराशी

संशोधनमुक्तावलि

कालिदास आणि विदर्भ*

डॉ. केतकर यांस उत्तर

लेखांक पहिला

‘नामूलं लिख्यते किंचित् नानपेक्षितमुच्यते ।’

प्रास्ताविक

‘महाराष्ट्रीय ज्ञानकोशा’चे विद्वान् संपादक डॉ. श्री. केतकर यांनी गेल्या दीड महिन्यांत ‘विदर्भ व कालिदास’ या विषयावर एक विस्तृत लेखमाला लिहून कालिदासाचा काल, कृति व स्वभाव यांवर नवीनच प्रकाश पाडण्याचा प्रयत्न केला आहे. डॉक्टरसाहेबांनी सध्या प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास लिहिण्याचें काम अंगावर घेतलें आहे. त्या इतिहासाच्या साधनांची जुळवाजुळव करीत असतांना साहजिकच त्यांचें लक्ष कालिदासाच्या मालविकाग्निमित्र या नाटकाकडे गेलें. कारण, त्या नाटकांत इ. स. पूर्वी दुसऱ्या शतकांत विदिशा (सध्याचें भिलसा) व विदर्भ येथे राज्य करणाऱ्या राजांच्या परस्परसंबंधाचा

* नागपूरच्या ‘महाराष्ट्र’ साप्ताहिकांत ता. २८–१०–१९२८ पासून आलेल्या डॉ. श्री. व्यं. केतकर यांच्या पांच लेखांस उत्तर. यांतील पहिला लेखांक ता. २ डिसेंबर १९२८ ला ‘महाराष्ट्रां’त प्रसिद्ध झाला.

उल्लेख आला आहे. परंतु खोल विचार करतां या नाटकाची ऐतिहासिक दृष्टीने काडी इतकीहि किंमत नाही; यांत कालिदासाने ऐतिहासिक गोष्टींचा विपर्यास करून स्वकालीन परिस्थितिच वर्णिली आहे, असें त्यांचें मत झालें; व त्यावर एक विस्तृत लेख लिहून, दोन महिन्यांपूर्वी ते नागपुरास आले होते त्यावेळीं हिस्लॉप कॉलेजमध्ये त्यांस मानपत्र देण्याकरितां भरलेल्या हिस्लॉप व मॉरिस कॉलेज यांतील मराठी वाङ्मय-मंडळातर्फे भरलेल्या सभेंत तो त्यांनी वाचला. लेखांतील विचार-सरणी अगदीच नवीन व प्रस्तुत लेखकाच्या मतें अत्यंत भ्रामक अस-ल्यामुळे त्याने त्याच सभेंत त्यांतील मुख्य मुद्यांचें साधार खंडण केलें होतें. तथापि, त्यावेळीं डॉ. केतकरांनी आपला निबंध समग्र वाचला नव्हता. त्याप्रमाणेच त्यांच्या विधानांस दिलेलें उत्तरहि तात्कालिक दिलें असल्याने सविस्तर नव्हतें. त्यानंतर 'महाराष्ट्रां'त त्यांचा निबंध सविस्तर प्रसिद्ध झाला आहे. त्यांत प्रदर्शित केलेल्या विचारांस लागलीच उत्तर न दिलें, तर डॉक्टरसाहेबांच्या 'प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासां'त त्यांचा अन्तर्भाव होऊन, कविकुलगुरु कालिदासाच्या विमल यशावर त्यांनी टाकलेले शिंतोडे मराठी वाचकांपुरते तरी वज्रलेप होण्याची भीति आहे. शिवाय, त्यांनी या लेखांत जी विचारसरणी अवलंबिली आहे, तीच पुढे अनुसरिली तर प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासाचें अत्यंत विकृत व भ्रामक स्वरूप मराठी वाचकांपुढे मांडलें जाण्याचा संभव आहे. या कारणांकरिता कांही विद्वान् मित्रांच्या सूचनेवरून प्रस्तुत लेखक या विषयाची दुसरी बाजू पुढे मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. हें काम प्रस्तुत लेखकापेक्षा विद्वान् व प्राचीन इतिहासाचें सम्यग्ज्ञान असलेल्या गृहस्थांनी हातीं घ्यावयास पाहिजे. शिवाय, नागपूरसारख्या ठिकाणीं एखाद्या विषयावर सांगोपांग विचार करण्याकरितां जरूर अस-लेल्या साधनांची वाण पदोपदीं भासते. तेव्हा अशा परिस्थितींत डॉक्टर-साहेबांची विधानें खोडून काढण्याचें काम बरेंच कठीण होणार आहे. डॉक्टरसाहेबांप्रमाणे केवळ कल्पनाशक्तीवरच विश्वास ठेऊन उत्तर देऊं म्हटलें तर तें अर्थातच कठीण होणार नव्हीं; पण तशा लेखनाचा विचारी वाचकांवर मुळीच परिणाम होणार नाही. तेव्हा या लेखांत

शक्य तों 'नामूलं लिख्यते किंचित् नानपेक्षितमुच्यते' या पद्धतीस अनुसरूनच उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे कालिदासाच्या विमल कीर्तीवरचा डॉक्टरसाहेबांनी उत्पन्न केलेला डाग अल्पांशाने जरी धुतला गेला अथवा त्यामुळे इतर अभ्यासकांस आपले विचार पुढे मांडण्याची इच्छा झाली, तरी प्रस्तुत लेखकाच्या श्रमाचें साफल्य होईल!

केतकरांनी काढलेलें 'मालविकाग्निमित्रा'चें सार

कालिदासाच्या मालविकाग्निमित्र नाटकाचें परीक्षण करून डॉ. केतकरांनी पुढील सार काढलें आहे:—"मालविकाग्निमित्र हें नाटक ऐतिहासिक दृष्ट्या विश्वसनीय नाही. कारण कथानकाच्या कालापासून पांच साडे-पांचशें वर्षांनी इ. स. ३५०-४५० च्या सुमारास कालिदास होऊन गेला असल्यामुळे त्याला शुंगकालीन माहिती फारच थोडी होती. त्याचें भौगोलिक व ऐतिहासिक ज्ञान नाट्यकाव्यादि वाङ्मयावरूनच तयार झालें असावेंसें दिसतें. त्याचें भांडवल म्हणजे बृहत्कथा असावें. उदयनाच्या दिग्विजयाच्या हकीकतीवरून रघूच्या दिग्विजयाची हकीकत बनविल्याचें स्पष्ट दिसत आहे. त्यास बौद्धजैनांचें वाङ्मय देखील ठाऊक असेलसें वाटत नाही. त्याने पुराणें वाचलीं होतीं; त्यांवरून पुष्पमित्र, अग्निमित्र व वसुमित्र यांचीं नांवें त्यास माहीत झालीं असावीं. त्याने पतंजलीचें महाभाष्य घोकलें होतें. त्यावरून त्यास पुष्पमित्राने यज्ञ केला हें माहीत होतें. पण तो यज्ञ अश्वमेध होता यास पुरावा नाही. कालिदासाचा हेतु शुंगकालीन ऐतिहासिक परिस्थिति वर्णन करण्याचा नसून, स्वकालीन परिस्थिति प्रतिबिम्बित करण्याचा होता. म्हणून त्याने आपल्या नाटकांत मुद्दाम खोटा मजकूर दडपून दिला. कारण, विदिशा देशाचें राज्य शुंग घराण्याकडे कधीं होतें याला पुरावा नाहीं. कालिदासानें या नाटकांत सत्याचा अपलापहि केला आहे. कारण, मौर्य सम्राटाशीं पुष्पमित्र शुंग याने विश्वासघात करून त्याचा वध केला याबद्दल कालिदास कांहीच राग दाखवीत नसून, उलट स्वामिद्रोहाचा व राजवधाचा उल्लेख कालिदासाने वगळला आहे; आणि आपली सहानुभूति निमकहराम सेनापतीस देऊन आपली हलकट

वृत्ति दाखविली आहे. पुष्पमित्रास सोज्वल करण्याकरिता सेनापतिपणांतच असलेला व राजवधाचें रक्त हातावर न सांडलेला असा काल्पनिक स्थितींतील पुष्पमित्र घेऊन कालिदासाने आपल्या सदसद्विवेकबुद्धीस गप्प बसविलें आहे. त्याने पुष्पमित्र सेनापतिपदावर असतांनाच अश्वमेध करतो व अग्निमित्र आपल्या बापाचा अंकित होता तरी त्याच्या संमतीची वाट न पाहतां मौर्यसचिवास मुक्त करीत आहे असें दाखवून, आपलें राजकारणविषयक अज्ञान प्रकट केलें आहे. अग्निमित्राच्या खलित्यास विदर्भराजाने पाठविलेल्या पत्रांत जी भाषा योजिली आहे, तीवरूनहि त्याचें अज्ञान दिसून येतें. वर्धा नदीच्या योगें विदर्भ देशाचे उत्तर दक्षिण असे दोन भाग पडतात असें कालिदासाने म्हटलें आहे त्यावरून त्याचें भौगोलिक अज्ञानहि सिद्ध होतें. इतक्या ऐतिहासिक चुका असलेलें नाटक तत्कालीं कसें पसंत पडलें याबद्दल आश्चर्य वाटण्याचें कारण नाही. कारण, उज्जयिनींतील त्याचे श्रोते म्हणजे व्याकरण शिकलेले पण्डित व माळव्याच्या दरबारांतील खुळे लोक. तेव्हां अशा नाटकास ऐतिहासिक मानणारे डॉक्टर भांडारकरादि संशोधक अगदीच भोळसट, एवढेंच नव्हे तर कालिदासाच्या कृतीचें मर्म न समजण्याइतके काव्यरसज्ञताहीन होत. मालविकाग्निमित्र नाटक रचण्यांत कालिदासाचे मुख्य दोन उद्देश होते. पहिला हा कीं विदर्भ देशाचा हीनपणा उजैनीच्या लोकांपुढे मांडून त्यांस खूष करणें. या दोन राज्यांमध्ये कालिदासकाळीं वैर होतें. त्याचें कारण असें की मालव राज्य अगर उज्जयिनी यांची कालिदास व त्याचा आश्रयदाता विक्रमादित्य यांच्यामुळे जरी प्रसिद्धी झाली, तरी कालिदासाच्या अगोदर वाङ्मयांत उज्जयिनीस स्थान नव्हतें. त्यामुळे उज्जयिनीच्या लोकांस विदर्भाविषयी मत्सर वाटत असे. त्यांस खूष करण्याकरितां कालिदासाने आपल्या नाटकांत विदर्भ देशच्या राजाचें हीनत्व व उद्दामपणा, नंतर विदिशेच्या राजाने–अग्निमित्राने–केलेला त्याचा पराभव हीं दाखविलीं आहेत. कारण अवंतीच्या लोकांस विदिशा राज्याचा विदर्भापेक्षां दर्जा वरचा आहे असें दाखविलें तर आनंद होणार. कारण विदिशा म्हणजे माळवा व अवन्ति म्हणजेहि माळवाच ! राज्यें दोन, राजधान्या दोन, पण राष्ट्र एकच.

कालिदासाचा दुसरा उद्देश स्वकालीन जिवंत व्यक्तींवर टीका करून लोकांची करमणूक करणें हा होय. याकरितां त्याने आपला नायक कर्त्यासवरत्या मुलाचा बाप व बिजवर असा कल्पिला आहे; व त्याने राजकारणासाठी केलेलें लग्न प्रेमाखातर केलें असें दाखविलें आहे. नाटकांत धारिणीचा भाऊ वर्णावर म्हणजे लेकावळा असा दर्शविला आहे; याचें कारण स्वकालीन राजश्यालकावर एखादा शिंतोडा टाकतां आला तर यावा, हें होय. कालिदासकालीन राणीच हलक्या कुळांतली असावी. केवळ सौंदर्याच्या जोरावर ती राणी झाली असावी. राजा आपल्या हातांत नाही, आपल्या उरावर राजाने दुसरी सवत केलीच की नाही अशा भावनांची व विचारांची थोरली राणी (धारिणी) दाखविली असून, दुसरी राणी (इरावती) मात्र आपण विजयी व्यक्ति आहोंत अशा भावनेची दर्शविली आहे. यांतहि स्थानिक महत्त्वाचे उल्लेख असावेत. इरावती राणीस झिंगलेली अशी रंगभूमीवर आणण्यांत राणीची चेष्टा करून लोकांत हशा पिकवावा व राणीची देखील तिला दारू पिण्यास ऐतिहासिक आधार आहे अशी समजूत करून देऊन दोन्ही बाजूंची शाबासकी मिळविणें असा कालिदासाचा उद्देश होता. कालिदासाच्या दृष्टीने अग्निमित्रासारखी व्यक्ति म्हणजे आदर्शभूत राजत्वाचें उदाहरण होती. राजकारणासाठी नवीन बायको करण्यांत राजाची वैषयिक वृत्ति व्यक्त होत नसून सोशिकपणा व्यक्त होत आहे."

मालविकाग्निमित्र नाटकाचें हें सार (त्यांतील शेलक्या विशेषणांसह) शक्य तों डॉ. केतकरांच्या शब्दांत दिलें आहे. हेतु हा की, तें देण्यांत त्यांच्या म्हणण्याचा विपर्यास होऊं नये. आता या साराचें सत्यासत्यत्व उपलब्ध असलेल्या पुराव्याच्या कसोटीवर घासून ठरवूं.

कालिदासाविषयी आजपर्यंतची समजूत

कालिदासाचें जन्मस्थान, काल व चरित्र यांविषयीं आजपर्यंत अनेकांनी अनेकविध तर्क केले आहेत. संप्रदाय व दंतकथा जाणणारे

लोक तो उज्जयिनी येथे राज्य करणाऱ्या विक्रमादित्याच्या आश्रयास होता असें म्हणतात; तर बंगाली लोक तो बंगालचा रहिवासी होता असें प्रतिपादितात. दोन वर्षांपूर्वी एका विद्वानानें तो काश्मीरांत होऊन गेला असें सिद्ध करण्याकरिता एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. (पंडित लक्ष्मीधर कल्ला यांचें दि बर्थप्लेस ऑफ कालिदास, १९२६, पाहा.) त्याच्या कालाविषयीहि असेंच मतवैचित्र्य आढळतें. इ. स. पूर्वी पहिलें शतक (रा. चिंतामणराव वैद्य), इ. स. चें सहावें शतक (प्रो. मॅक्समूलर), इ. स. चें पांचवें शतक (प्रो. पाठक), इ. स. च्या चौथ्या शतकाचा उत्तरार्ध (डॉ. सर रामकृष्णपंत भांडारकर) इत्यादि विविध मतें कालिदासाच्या कालाविषयी आतापर्यंत व्यक्त झालीं आहेत. कालिदास लहानपणीं मंदबुद्धीचा होता अशीहि दंतकथा आहे. पण तो पुढे अत्यंत विद्वान् झाला याविषयी केवळ भारतीयच नव्हे तर युरोपीय विद्वानांचेंहि मतैक्य आहे व ज्यांनी त्याच्या ग्रंथांचा खोल अभ्यास केला आहे, त्या सर्वांनी त्याच्या अष्टपैलू बुद्धीबद्दल त्याची मुक्तकंठानें स्तुति केली आहे. त्यानें शिक्षण, संगीत, चित्रकला इत्यादि विषयांवर आपल्या ग्रंथांत जे विचार प्रकट केले आहेत, त्यांवरून त्याचें त्या विषयांसंबंधी अगाध ज्ञान व्यक्त होतें, असेंही अभ्यासकांनी दाखविलें आहे. (रा. के. ल. ओगले यांचे 'लोकमान्य' दैनिकाच्या १९२४ सालच्या 'हिंदुस्थान' अंकांत व 'विविधज्ञानविस्तार', वर्ष ५७, अं. ५, यांत आलेले लेख व सरदार मुजुमदार यांचा भांडारकर इन्स्टिटट्यूच्या ॲनाल्स्, पु. ७, भाग १-२ यांत आलेला लेख पहा.) त्याच्या ग्रंथांतील भूगोल-विषयक उल्लेखांवरून त्यानें दीर्घ काल प्रवास केला असला पाहिजे, निदान त्यानें प्रवासी लोकांकडून दूरदूरच्या देशांविषयी अगदी बारीक-सारीक माहिती मिळविली असली पाहिजे, असें डॉ. भगवानलाल इंद्रजी, रा. चिंतामणराव वैद्य इत्यादि प्रसिद्ध संशोधकांचें मत आहे. या सर्व गोष्टींवरून कालिदास मोठा विद्वान्, कल्पक, चतुरस्र व माहितगार कवि होऊन गेला, असा सर्वसाधारण समज आहे. डॉ. केतकरांनी मात्र त्याच्या ग्रंथसागरांत अवगाहन करून, कालिदास हा केवळ पढिक वैयाकरण व पुराणिक होता, त्यास राजकारणाचा गंधहि

नव्हता, स्वतःच्या निवासस्थानापासून (उज्जयिनीपासून) जवळच असलेल्या विदर्भ देशाच्या भूगोलाविषयीं त्याचें ज्ञान हल्लीच्या एखाद्या प्राथमिक शाळेंत शिकणाऱ्या शेंबडया पोराच्या ज्ञानाइतकेंहि नव्हतें, त्याचा स्वभाव दुर्जनांच्या दुष्कृत्यावर पांघरुण घालण्याइतका व राजदरबारांतील व अन्तःपुरांतील व्यक्तींच्या खाजगी वर्तनावर सार्वजनिक ठिकाणीं टीका करण्याइतका हलकट होता, असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे! व आपल्या पूर्वीच्या डॉ. भांडारकरादि संशोधकांस कालिदासाने चकविलें; आपण मात्र त्याचें हृद्गत ओळखून त्याचा नीचपणा चव्हाटयावर मांडीत आहों, असा आव आणला आहे! व या मतमतांतरांच्या गलबल्यांत आम्हांस तर प्रसिद्ध आंग्ल टीकाकर मॅथ्यू आर्नोल्ड याने आंग्लकविसम्राट् शेक्सपीयरविषयी जे उद्गार काढले आहेत त्याची आठवण होते.

Others abide our question. Thou art free !
We ask and ask–Thou smilest and art still,
Outtopping knowledge !

भवभूति, बाण, बिल्हण इत्यादि कवींस त्यांचें जन्मस्थान, काल, विद्वत्ता, इत्यादिकांविषयीं प्रश्न विचारा, त्यांचीं निदान अल्पस्वल्प उत्तरें तुम्हांस मिळतील; पण कालिदासास तसलेच प्रश्न विचारून कोंडींत धरण्याचा प्रयत्न करा की तो तुमच्या हातावर तुरी देऊन निसटलाच म्हणून समजावें. तुमचे प्रश्न व त्याचा स्वभाव, विद्वत्ता इत्यादि जाणण्याविषयींची तुमची धडपड पाहून तो खदखदा हसतो व पुनः मुग्धता धारण करतो असें चित्र आमच्या मनश्चक्षूंपुढे दिसत आहे. कालिदासाने डॉ. भांडारकरादि संशोधकांस चकविलें म्हणून डॉ. केतकर त्यांस हसतात, पण आपल्या धडपडीकडे पाहून कालिदासाचा स्वर्गस्थ आत्मा (देहधारी असेल तर) हसत असेल हें डॉक्टरसाहेबांच्या लक्षांत आलें नाही. पण पुढील विवेचन वाचून तें वाचकांच्या ध्यानांत येईल, अशी आशा आहे.

लेखांक दुसरा

कालिदासाचा काळ ठरविण्याची आवश्यकता

डॉ. केतकरांच्या या नवीन संशोधनाची इमारत कल्पनेच्या पायावर उभारली आहे. त्यांनी आपल्या विधानांस आधार देण्याचा प्रयत्न केला नाही; व कालिदासकालीन परिस्थितीचे जे उल्लेख सुदैवाने अद्यापि अवशिष्ट आहेत, त्यांचा अभ्यास करण्याचीहि काळजी घेतली नाही. त्यामुळे त्यांची इमारत पत्त्यांच्या इमारतीसारखी डळमळीत झाली आहे; व किंचित् विचाराचा धक्का दिल्याबरोबर जमीनदोस्त होणार आहे. शुंगकालीन माहिती आपणास फार थोडी आहे, तितकीच ती कालिदासासहि असावी अशी त्यांची विचारसरणी आहे !

या बाबतींत प्रथम लक्षांत घेण्याची गोष्ट ही की, या प्रश्नाचा विचार करण्यास कालिदास कोणत्या काळीं होऊन गेला, हें निश्चित करणें अवश्य आहे. कारण रा. चिंतामणराव वैद्य म्हणतात त्याप्रमाणे तो इसवी सनापूर्वी पहिल्या शतकांत होऊन गेला असें मानलें तर डॉक्टरसाहेबांची सर्व कल्पना सूर्यापुढे धुक्यासारखी वितळून जाण्यास वेळ लागणार नाही. कारण सुमारें शंभर वर्षांच्या अवधींतच कालिदासकालीं शुंगकालीन इतिहास अज्ञात झाला असें मानावें लागेल. कालिदासाने जाणून बुजून त्याचा विपर्यास केला असला तर तत्कालीन लोक इतके भोळे व मूर्ख होते की त्यांनी त्यास तसें करूं दिलें, असें समजावें लागेल. कालिदासाच्या नाटकांच प्रेक्षक केवळ व्याकरणाभ्यासजड पंडित अगर 'माळव्याच्या दरबारांतील खुळे लोक' होते, असा उल्लेख नाही. उलट तो आपलीं नाटकें विद्वत्परिषदेपुढे दाखविलीं गेलीं असें सांगत आहे (अभिरूपभूयिष्ठा परिषदियम्—शाकुंतल). माझ्या नाटकांची पूर्वीच्या नाटकांशीं तुलना करून सरस ठरतील तर त्यांचा स्वीकार करा, केवळ दुसरे लोक एखादें नाटक चांगलें म्हणतात म्हणून त्याची प्रशंसा करूं नका, असें त्याचें स्वकालीनांसच नव्हे तर उत्तरकालीन टीकाकारांसहि सांगणें आहे (मालविकाग्निमित्र–प्रस्तावना). तेव्हा ऐतिहासिक सत्याचा अपलाप

करणारें नाटक कालिदासकालीं सर्वमान्य झालें असतें, असें दिसत नाही. कालिदासाचा काल इ. स. पूर्वी पहिलें शतक मानल्यास ही अडचण येते म्हणूनच की काय डॉ. केतकरांनी त्यास इ. स. ३५०–४५० या कालांत ठेवलें आहे. कारण त्यांनी या मताच्या सिद्ध्यर्थ कांही प्रमाणें मांडलीं नाहीत. या कालांत कालिदास होऊन गेला असल्यास तो द्वितीय चंद्रगुप्त विक्रमादित्य (इ. स. ३७५–४१३) याच्या आश्रयास असावा असें मानण्याचा प्रघात आहे. कालिदासाचा काल ठरविण्याचें हें स्थल नव्हे. तेव्हा पुढील विवेचनांत डॉ. केतकरांनीं घेतलेलाच कालिदासाचा काल मान्य करून परीक्षण केलें आहे.

कालिदासाच्या कालचें वाङ्मय व दंतकथा

५००–५५० वर्षांनंतर होऊन गेलेल्या कालिदासास सध्या आपणांस आहे त्यापेक्षा जास्त माहिती नव्हती असें डॉ० केतकर सांगतात. पण हें सिद्ध करण्याकरिता कालिदासकालीन सर्व वाङ्मय जसच्या तसेंच आजपर्यंत चालत आलें आहे हें आपण दाखवून दिलें पाहिजे, हें त्यांच्या ध्यानांत आलेलें दिसत नाही. हिंदुस्थानांतील प्राचीन वाङ्मयाचा ज्याने थोडातरी अभ्यास केला आहे त्यास हें सांगणें नको की, उपलब्ध असलेल्याच्या किती तरी पट विविध विषयांवरील वाङ्मय कालाच्या उदरांत गडप झालें आहे. यांपैकी कांहींचे केवळ नामनिर्देश तर कांहींचे लहान लहान उतारे इतर पुस्तकांत आढळतात. कांहींचीं भाषांतरें चिनी व तिबेटी भाषेंत झालेलीं उपलब्ध आहेत. पण मूळ संस्कृत अगर पाली ग्रंथ सध्या उपलब्ध नाहीत. तेव्हा एकादा ग्रंथ सध्या उपलब्ध नाही म्हणून तो पूर्वींहि उपलब्ध नव्हता असें सिद्ध होत नाही हें वाचकांच्या लक्षांत येईल. दुसरी गोष्ट ही की, प्राचीनकाळीं राजांच्या वंशावळीच नव्हे तर त्यांच्या कारकीर्दींत होऊन गेलेल्या महत्त्वाच्या गोष्टींचें टाचण करून ठेवण्याचा प्रघात होता. अशा प्रकारचें एक कलिंगदेशच्या खारवेल नांवाच्या राजाच्या कारकीर्दीचें सविस्तर वर्णन हाथीगुम्फेमध्ये खडकावर कोरलेलें प्राचीन इतिहासाच्या अभ्यासकांस माहीत आहे. अशा प्रकारचे शुंगराजांच्या कारकीर्दीचे वृत्तांत कालिदास-

कालींही शुंगराजे व कालिदासाचा आश्रयदाता चंद्रगुप्त विक्रमादित्य या दोहोंचीहि राजधानी असलेल्या पाटलिपुत्र शहरीं असणें असंभवनीय नाही. वादाकरिता क्षणभर सध्या उपलब्ध आहेत त्यापेक्षा जास्त ऐतिहासिक पुस्तकें अस्तित्वांत नव्हतीं असें गृहीत धरलें, तरी कालिदासाने आपल्या नाटकांत दिलेली माहिती तिसऱ्याच एका साधनावरून मिळविली असणें शक्य आहे. तें साधन म्हणजे दंतकथा अगर पूर्वपरंपरेने चालत आलेल्या गोष्टी हें होय. कालिदासकालीं दंतकथा होत्या याबद्दल पुरावा पाहिजे असेल तर त्याच्या मेघदूतांतील उज्जयिनीचें वर्णन पहा. (श्लोक ३० व ३२). त्यांत 'प्रद्योतराजाच्या प्रिय कन्येला (वासवदत्तेला) येथून वत्सराज (उदयन) हरण करून घेऊन गेला, येथे त्याचें सोनेरी तालवृक्षांचें वन होतें, येथे त्याचा नलगिरि हा हत्ती आपला स्तम्भ उपटून सैरावैरा धावूं लागला, अशा गोष्टी सांगून उज्जयिनीचे पुरातनकथा जाणणारे लोक परकी गृहस्थांची करमणूक करतात.' असें वर्णन आलें आहे. विदिशेवर शुंग राजांचें राज्य होतें हें आम्ही पुढे सिद्ध करणार आहों; व तसें तें असल्यास शुंग राजांच्यापूर्वी तीनचारशें वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या प्रद्योत व उदयन यांच्या गोष्टी उज्जयिनीस कालिदासकालीं माहीत होत्या, पण त्याच काळीं विदिशेस मात्र शुंग राजांच्या कथा लोकांस माहीत नव्हत्या असें आपणांस म्हणतां येईल काय व त्या विदिशेस माहीत असल्यास त्या कालिदासास माहीत नव्हत्या असेंही विधान करणें शक्य आहे काय, याचा वाचकांनी विचार करावा. मेघदूतावरून (श्लो. २४–२६) कालिदासास विदिशेची चांगली माहिती होती असें दिसतें. तेथील वेत्रवती नदी व 'नीचैः' नामक टेकडी यांचा त्याने निर्देश केला आहे; व ती नगरी दशार्ण देशाची राजधानी म्हणून चारी दिशांस प्रसिद्ध आहे असें त्याने म्हटलें आहे. पश्चिम माळवा जिंकण्यापूर्वी विदिशा ही चंद्रगुप्ताची पाटलिपुत्रासारखीच एक राजधानी होती असें कांही विद्वानांचें म्हणणें आहे (जर्नल ऑफ इंडियन हिस्टरी, व्हॉ. ६, भा. २, पुरवणी मधील प्रो. कृष्णस्वामी ऐयंगार यांचा द्वितीय चंद्रगुप्तावरील लेख, पृ. ५६ पहा).

तसें असल्यास आपल्या आश्रयदात्याबरोबर विदिशेसही कांही काल कालिदासाचा मुक्काम असून त्या नगरीच्या पुरातन कथांची त्यास चांगली माहिती होती असें म्हणण्यास हरकत नाही. उदयनकालीनच कथा विशेष रम्य असल्याने लोकांच्या स्मरणांत राहिल्या, शुंगांच्या गोष्टी मात्र लोक विसरून गेले असण्याचा संभव आहे, असेंही म्हणतां येणार नाही. याला पुरावा कालिदासानंतर दोन अडीचशें वर्षांनी होऊन गेलेल्या बाणाच्या हर्षचरिताचा देतां येईल. सध्या उपलब्ध असलेल्या सर्व पुराणांत सेनापति पुष्यमित्रानें बृहद्रथ मौर्यास ठार मारून गादी बळकावली असा उल्लेख आहे. पण त्यास केव्हा व कसें मारलें याविषयीं कांहीच माहिती मिळत नाही. ती माहिती बाणाने हर्ष दिग्विजयास निघाला असतां त्यास गजसैन्याधिपति स्कंदगुप्त याने जो उपदेश केला त्यांत पुढीलप्रमाणे दिली आहे:—सैन्याची पहाणी करण्याच्या मिषाने मूर्ख बृहद्रथ राजाला बोलावून सेनापति पुष्यमित्राने त्यास ठार मारिलें. (हर्षचरित, षष्ठ उच्छ्वास, निर्णयसागर प्रत, पृ. १९९ पहा). सारांश, कालिदासकालीं अशा प्रकारच्या कथा प्रचलित असणें व त्या त्यास माहीत असणें अशक्य नाही. शुंगमौर्यांचीं नांवें कालिदासास कदाचित् दंतकथांवरून कळलीं असतील, असें डॉ. केतकर एके ठिकाणीं म्हणतात. यावरून दंतकथांचें तत्कालीं अस्तित्व त्यांस मान्य आहेसें दिसतें. पण तसें असल्यास दंतकथांवरून कालिदासास शुंगमौर्यांचीं नांवेंच कळलीं, इतर कांहीच माहिती मिळाली नाही, असें डॉक्टरसाहेब कोणत्या पुराव्यावरून म्हणतात तें समजत नाही.

अभावात्मक प्रमाण व त्याचा उपयोग

मालविकाग्निमित्र नाटकाचें संविधानक कपोलकल्पित आहे हें सिद्ध करण्यास डॉ. केतकर यांनी दुसरें एक प्रमाण पुढे मांडलें आहे. त्याकडे आता वळूं. ते म्हणतात, "विदिशेवर अग्निमित्राचें राज्य होतें यास पुरावा काय ? पुराणांत तसा उल्लेख आढळत नाही. पुष्यमित्राने अश्वमेध यज्ञ केला होता हें कशावरून ? कारण पतंजलीच्या महाभाष्यांत 'इह पुष्यमित्रं याजयामः' असा फक्त यज्ञाचा उल्लेख आहे, अश्व-

मेधाचा नाही, तेव्हा पुष्यमित्राने अश्वमेध केला नाही व अग्निमित्रहि विदिशेस राज्य करीत नव्हता." या प्रकारचे उल्लेख कोठे आढळत नाहीत हें गृहीत धरलें तरी या अभावात्मक प्रमाणावरून वरील गोष्टी कशा सिद्ध होतात तें समजणें कठीण आहे. अभावात्मक प्रमाणावरून (argumentum ex silentio) अनुमान काढणें पुष्कळदा धोक्याचें असतें. एखाद्या पुस्तकांत अमुक एका गोष्टीचा उल्लेख नाही यावरून ती गोष्ट तें पुस्तक लिहिण्यापूर्वी घडली नव्हती असें अनुमान काढण्यापूर्वी ती गोष्ट घडली असती तर त्या पुस्तकांत तिचा उल्लेख होणें स्वाभाविक व अपरिहार्य होतें, असें प्रथम दाखविलें पाहिजे. उदाहरणार्थ हल्ली लिहिल्या जाणाऱ्या प्रत्येक पुस्तकांत गेल्या युरोपीय महायुद्धाचा उल्लेख येत नाही. असें एकादें १९२८ सालीं प्रसिद्ध झालेलें पुस्तक शंभर वर्षांनी एखाद्या संशोधकाच्या हातीं लागलें व त्यावरून तो १९२८ च्या पूर्वी महायुद्ध झालें नाही, असें अनुमान करूं लागला तर तें किती सयुक्तिक होईल बरें ? या कालच्या इतिहासाच्या पुस्तकांत मात्र असा निर्देश नसल्यास तसें अनुमान करणें वाजवी होईल. संस्कृत तत्वज्ञान्यांनी सुद्धा अनुपलब्धि हें एक प्रमाण मानलें आहे. पण ती योग्या अनुपलब्धि असली पाहिजे. एखाद्या वस्तूच्या ज्ञानाला सर्व गोष्टी अनुकूल असूनहि तिचें ज्ञान होत नसेल तर त्यावरून तत्कालीं व तत्स्थलीं तिच्या अस्तित्वाचा अभाव सिद्ध करणें यास योग्या अनुपलब्धि असें म्हणतात. उदाहरणार्थ, दिवसा स्वच्छ प्रकाश पडला असतां दृष्टि शाबूत असलेल्या मनुष्यास एखादे ठिकाणीं घट दिसत नसेल तर तो तेथे नाही असें अनुमान करण्यास हरकत नाही. पण हेंच अनुमान तो मनुष्य एका अंधाऱ्या खोलींत जाऊन करूं लागला अगर एखादा आंधळा मनुष्य दिवसाउजेडींहि तसलें अनुमान करूं लागला तर तो त्या घटावर अडखळल्याशिवाय रहाणार नाही. पुराणांत राजांच्या फक्त वंशावळी व फारच क्वचित् ते जेथे राज्य करीत होते त्या देशांचीं नांवें येतात. पतंजलीचा तर उद्देश ऐतिहासिक गोष्टींचें वर्णन करण्याचा नसून डॉ० भांडारकरांच्या संस्कृत पुस्तकांत नियम समजण्याकरितां जशीं वाक्यें दिलेलीं असतात, तशाच रीतीने पाणिनीच्या सूत्रांवरच्या चर्चेस उदा-

हरणें देण्याचा आहे, हें महाभाष्याच्या अभ्यासकांस माहीत आहे. तेव्हा पतंजलीच्या महाभाष्यांत अश्वमेधाचा उल्लेख नाही, यावरून पुष्यमित्राने अश्वमेध यज्ञ केला नव्हता हें सिद्ध होत नाही. वास्तविक पाहतां पतंजलीचा उल्लेख अश्वमेध यज्ञाच्या विरुद्ध जात नाही. पुष्यमित्राने कोणताच यज्ञ केला नाही असें पतंजली म्हणत नाही तर 'आम्ही येथे पुष्यमित्राकडून यज्ञ करवितों' असें म्हणत आहे व अश्वमेध हाहि एक यज्ञच आहे.

पुष्यमित्राचा यज्ञ अश्वमेधच असावा

पुष्यमित्राने जो यज्ञ केला तो अश्वमेध असण्याचा बराच संभव आहे हें थोडासा विचार केला असतां कोणाच्याहि लक्षांत येईल. पुष्यमित्रापूर्वी मौर्यांचें हिंदुस्थानावर साम्राज्य होतें. मौर्य सम्राट् अशोक हा बौद्धधर्माचा पक्का अभिमानी व पुरस्कर्ता असल्याने त्यानें आपल्या साम्राज्यांत पशुवधास बंदी केली होती व ती त्यानंतरच्या राजांनीहि तशीच चालू ठेविली असावी. हल्ली हिंदुधर्मांचें स्वरूप फार बदललें असल्याने अशा नियंत्रणाचें आपणांस कदाचित् कांही वाटणार नाही. पण त्याकाळीं लोकांच्या धार्मिक भावना निराळ्या होत्या. यज्ञानें स्वर्ग मिळतो ही त्या पूर्वीच्या कालची समजूत तेव्हाहि प्रचलित होती. तेव्हा मौर्य राजा बृहद्रथ यास ठार मारून गादी बळकावल्यावर शेवटच्या मौर्यांच्या कारकीर्दीत पशुवधनियंत्रणामुळे त्रस्त झालेल्या हजारों आर्यधर्मानुयायी लोकांचीं अंतःकरणें आपणांकडे वळवून घेण्याकरिता पुष्यमित्रानें पशुवधात्मक यज्ञ करण्याचा निश्चय केला असावा. शिवाय आपणांस अनुकूल कोणते राजे आहेत व आपला अंमल कोठपर्यंत चालू शकेल हेंहि जाणण्याची त्याची इच्छा असली पाहिजे. हे दोन्ही उद्देश साध्य होण्यासाठी कोणत्या यज्ञाची त्याने निवड केली असेल हें समजणें कठीण नाही. तेव्हा पतंजलीने ज्याचा उल्लेख केला आहे तो पुष्यमित्राचा यज्ञ अश्वमेधच असला पाहिजे हें उघड आहे.

आतापर्यंत शुंगाचें विदिशेवर राज्य व पुष्यमित्राचा अश्वमेध याग या दोन गोष्टींवर डॉ. केतकरांनी घेतलेले आक्षेप अत्यंत निर्बल

असून कालिदासाने वर्णिली त्याप्रमाणें परिस्थिति असणें अशक्य नाही हें दाखविलें. डॉ. केतकरांचा या मुद्द्यांवर विशेष जोर असल्याने या दोन बाबतींत केवळ अनुमानांवर विश्वासून न राहतां बळकट पुरावा असल्यास तो पुढे मांडला जावा अशी वाचकांची अपेक्षा असणार. तेव्हा याकरिता कालिदासाच्या सुदैवाने जो थोडासा तसा पुरावा उपलब्ध आहे तो पुढील लेखांत मांडूं.

लेखांक तिसरा

अग्निमित्र विदिशेस राज्य करीत होता यास पुरावा

पुष्यमित्राच्या कालाला आज दोन हजारांवर वर्षें झालीं. इतक्या वर्षांपूर्वीचे कागदपत्र सध्या मिळणें अर्थातच शक्य नाही व शुंग राजांचे शिलालेखहि परवापर्यंत उपलब्ध नव्हते. तथापि शुंग नांवाचे राजे मगध देशांत होऊन गेले हें पुराणांवरून माहीत होतें. प्रयागच्या नैऋत्येस १००।१२५ मैलांवर भरहूत म्हणून गांव आहे. तेथे फार प्राचीन स्तूप वगैरे अवशेष आढळतात. तेथें पूर्वी असलेल्या (परंतु आता कलकत्त्याच्या अजबखान्यांत ठेवलेल्या) स्तंभावर शुंगांच्या राज्यांत (प्राकृत, सुगनं रजे)वात्सीपुत्र धनभूति याने व दुसऱ्या एकाने तें तोरण उभारलें अशा अर्थाचे दोन शिलालेख आहेत. (एपिग्राफिया इंडिका, व्हॉ. १० मधील प्रोफेसर ल्यूडर्सच्या कोरीव लेखांच्या यादींतील लेख नं. ६८७ व ६८८ पहा.) त्यांवरून सध्याचा संयुक्तप्रांत शुंगांच्या अंमलाखाली होता यांत शंका नाही. विदिशा ही नगरी भरहूतपासून बरीच अंतरावर आहे. तेथें शुंगांचें राज्य होतें याला पुरावा नाही, असें डॉ. केतकर पुन्हा पुन्हा ठासून सांगतात. त्यांना आम्ही पुराणांतील एक उल्लेख नजर करतों. मत्स्य, वायु व ब्रह्मांड पुराणांत विदिशेच्या राजांची वंशावळ देतांना प्रथम तेथील नागवंशांतील राजांचीं नांवें सांगितल्यावर खालील ओळ आली आहे. (पार्जिटरकृत 'कलियुगांतील राजवंश' पृ. ४८-४९ पहा.)—

शुंगानां तु कुलस्यान्ते शिशुनन्दिर्भविष्यति।

यांत अधोरेखांकित शब्द महत्त्वाचे आहेत. कारण त्यावरून विदिशेस शुंगांचें कांही काल राज्य होतें हें सिद्ध होतें. प्रो. ऐयंगार यांचे मतें तर शुंग राजे पूर्वीचे विदिशेचेच असावे. (जर्नल ऑफ इंडियन हिस्ट्री, व्हॉ. ६, भाग २, पुरवणी, पृ. २ पहा.) तें जरी आपण मान्य केलें नाही तरी विदिशेवर शुंगराजांचें राज्य होतें हें मानण्यांत कांहीच अडचण नाही. शिवाय या भागांत खुद्द अग्निमित्राचीं नाणींहि सापडलीं आहेत. (बॅ. जयस्वालांचा आक्टोबर १९२४च्या मॉडर्न रिव्ह्यूमधील लेख पहा.)

पुष्यमित्राने अश्वमेध केला याबद्दल तत्कालीन पुरावा

पुष्यमित्राने अश्वमेध याग केला होता याबद्दल तर पुरावा तत्कालीन व म्हणून अत्यंत विश्वसनीय असा नुकताच ४ वर्षांपूर्वी उपलब्ध झाला आहे. मॉडर्न रिव्ह्यूच्या ऑक्टोबर १९२४ च्या अंकांत पाटण्याचे प्रसिद्ध संशोधक बॅरिस्टर काशीप्रसाद जयस्वाल यांनी एक शिलालेख प्रसिद्ध केला आहे. तो अयोध्येंतील एका देवळाच्या दरवाजावर कोरलेला आहे. तो रा. जयस्वाल यांनी पुढीलप्रमाणें वाचला आहे.

> [कोस]लाधिपेन द्विरश्वमेधयाजिनः सेनापतेः पुष्यमित्रस्य षष्ठेन कौशिकीपुत्रेण धन...धर्मराज्ञः पितुः फल्गुदेवस्य केतनं कारितम्।

> (भाषांतर–दोनदां अश्वमेधयाग करणाऱ्या सेनापति पुष्यमित्राचा सहावा, कोसल देशावर राज्य करणारा, कौशिकीपुत्र जो धन[देव] त्याने धर्मराजाच्या पित्याचें म्हणजे फल्गुदेवाचें हें प्रतिमागृह बांधलें आहे.)

रा. जयस्वाल यांचे मतें फल्गुदेव हा पुष्यमित्राचा बाप असावा. पुराणांत पुष्यमित्राच्या बापाच्या नांवाचा उल्लेख आला नसल्यामुळे या बाबतींत निश्चित कांही सांगतां येत नाही. धनदेवास ते पुष्यमित्राचा भाऊ समजतात परंतु पुढे त्यांनी कबूल केल्याप्रमाणे मुलगा मानणेंहि शक्य आहे. रा. जयस्वाल हे प्रसिद्ध पुरातनेतिहाससंशोधक आहेत.

त्यांनी लिहिलेलें 'भारतीय शासनपद्धति' (Hindu Polity) हें पुस्तक प्रसिद्ध आहे. या पुस्तकाच्या आधारेंच दोन वर्षांपूर्वी बाबू बिपिनचंद्र पाल यांनी नागपुरास हेमंत व्याख्यानमालेंत व्याख्यानें दिलेलीं नागपूरकरांच्या स्मरणांत असतील. तेव्हा त्यांनी वाचलेल्या या शिलालेखाच्या पाठामध्ये सहसा चुका असणार नाहीत, असें गृहीत धरण्यास हरकत नाही. तज्ज्ञांनी मॉडर्न रिव्ह्यूमध्ये त्या लेखाचें छायाचित्र दिलें आहे तें पहावें.

हा शिलालेख शुंग घराण्याच्या इतिहासास व आपल्या प्रस्तुत विवेचनासही अत्यंत महत्त्वाचा आहे. यावरून पुष्यमित्राने आपल्या एका म्हणजे सहाव्या मुलास कोसल देशावर व्हाइसरॉय अगर राजा म्हणून नेमलें होतें असें दिसतें. वायुपुराणाच्या एका प्रतीवरून पुष्यमित्रास ८ मुलगे होते व ते एकाच वेळीं राज्य करीत होते असें दिसतें. (पुष्यमित्रसुताश्चाष्टौ भविष्यन्ति समा नृपाः।) व पुष्यमित्र त्या मुलांचे द्वारें राज्य करीत होता असें सर्व पुराणांतील 'पुष्यमित्रस्तु सेनानीरुद्धृत्य स बृहद्रथम् । कारयिष्यति वै राज्यम्' (सेनापति पुष्यमित्र बृहद्रथाला पदच्युत करून राज्य करवील) या श्लोकांतील 'कारयिष्यति' या प्रयोजक क्रियापदावरून दिसत आहे. मुख्य महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुष्यमित्राने एक नव्हे तर दोन अश्वमेध केले असा स्पष्ट निर्देश या शिलालेखांत केला आहे ही होय. जयस्वाल यांचे मतें दोन अश्वमेध करण्याचें कारण पहिला अश्वमेध केल्यावर कलिंग देशचा राजा खारवेल याने त्याचा पराभव केला होता. त्यामुळे झालेली अपकीर्ति धुऊन काढण्याकरित त्याने दुसरा अश्वमेध केला असावा. मालविकाग्निमित्रांत उल्लेखिलेला अश्वमेध हा पहिला असावा. कारण त्यापूर्वी पुष्यमित्राने अश्वमेध केल्याचें पांचव्या अंकांतील पुष्यमित्राच्या पत्रावरून दिसून येत नाही.

पुष्यमित्राची सेनापति ही पदवी

दुसरी एक लक्षांत ठेवण्याची गोष्ट ही की, यांत दोन अश्वमेध केल्यावरहि पुष्यमित्राने आपली पूर्वीची सेनापति हीच पदवी कायम ठेविली होती. एवढेंच नव्हे तर सर्व लोकांनीहि आपणास सेनापतिच

म्हणावें अशी त्याची इच्छा दिसते व त्याप्रमाणे मालविकाग्निमित्राच्या पांचव्या अंकांत कंचुकी व राणी धारिणी (पुष्यमित्राची सून) पुष्यमित्राचा 'सेनापति' असाच उल्लेख करतात. थोडा विचार केला असतां यांत अस्वाभाविक असें कांहीच नाही. कोणाचेंहि एकदा एखादें नांव अगर पदवी लोकांत प्रसिद्ध झाली म्हणजे तिचें कारण गेल्यावरहि ती चालू राहाते व त्या व्यक्तीसहि त्याचें कांही वाटेनासें होतें. याला इतिहासांतून अनेक उदाहरणें देतां येतील. अर्थशास्त्रकर्ता विष्णुगुप्त आपल्या ग्रंथांत कौटिल्य नांवानेच आपल्या मतांचा निर्देश करतो. इ. स. च्या सातव्या शतकांत काठेवाडांत वलभी येथे राज्य करणाऱ्या मैत्रक राजांच्या पहिल्या दोन पुरुषांनी राज्यपद प्राप्त झाल्यावरहि सेनापति ही पदवी टाकली नाही असें त्यांच्या वंशजांच्या कोरीव लेखांवरून दिसतें. मराठ्यांच्या इतिहासांतील प्रसिद्ध शूर पुरुष महादजी शिंदे यांस पाटीलबुवा म्हटल्याबद्दल राग येत नव्हता. हैद्राबादचे नवाब दिल्लीच्या बादशहांची सत्ता खालावल्यावरहि अद्यापपर्यंत आपणांस निजाम म्हणवून घेतात. असो. तेव्हा डॉ. केतकर यांनी कालिदासाने पुष्यमित्रास सेनापति असतांच अश्वमेध यज्ञ करावयास लावलें यावरून त्याच्या दुष्कृत्यांवर त्यास पांघरुण घालावयाचें होतें व त्यास राजकारणाचा गंधहि नव्हता अशीं जीं दोन अनुमानें काढलीं आहेत, तीं किती फोल आहेत हें आता वाचकांच्या ध्यानांत येईल. कालिदासाच्या राजकारणविषयक ज्ञानाबद्दल पुढे सविस्तर लिहूं. सध्या रा. जयस्वाल यांचे या बाबीसंबंधी खालील उद्गार मननीय आहेत—

> 'Kalidasa must have had contemporary records before him to note the intimate reference to him (Pushyamitra) as Senapati by the family members of the first Shunga.'

(पहिल्या शुंगराजाच्या कुटुंबांतील मंडळी पुष्यमित्रास सेनापति म्हणून सलगीने उल्लेखित असत हें समजण्यास कालिदासास शुंगकालीन लेख उपलब्ध असले पाहिजेत.)

संस्कृत वाङ्मयांतील ऐतिहासिक उल्लेखांची विश्वसनीयता

वास्तविक रीतीने पाहतां कालिदासाच्या नाटकांत आलेल्या ऐतिहासिक उल्लेखांबद्दल स्वतंत्र पुरावा पुढे आला नाही तर ते उल्लेख बनावट असा जो डॉ. केतकर अट्टाहास करतात तो आमच्या मतें बरोबर नाही. हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाचीं साधनें इतकीं अल्प आहेत की संस्कृत वाङ्मयांतील उल्लेख, उपोद्बलक स्वतंत्र प्रमाण मिळाल्याशिवाय, विश्वसनीय मानले जाऊं नयेत, असा नियम स्वीकारला तर पुराणेतिहाससंशोधनाची वाढ खुंटल्याखेरीज राहणार नाही. तेव्हा इतर प्रबळ प्रमाणांचा विरोध नसेल तर वाङ्मयांतील उल्लेख प्रमाण मानण्याचा संशोधकांचा प्रघात आहे. पुराण ग्रंथांमध्ये राजे लोकांच्या कारकीर्दीचा काळ, अनुक्रम वगैरे बाबतींत परस्पर एकवाक्यता बरीच कमी आढळते व पुष्कळदा तत्कालीन कोरीव लेखांशीं त्यांचा विरोध आढळतो. पण असें असलें तरी पुराणें सर्वस्वीं त्याज्य मानलीं जात नाहीत. कालिदास, बाण इत्यादि ग्रंथकार जेव्हा कांही ऐतिहासिक माहिती देतात तेव्हा ती त्यांस उपलब्ध असलेल्या साधनांचा योग्य उपयोग करून देतात असेंच मानणें योग्य होईल. केवळ स्वकपोलकल्पित कांही तरी लिहितात असें प्रबल प्रमाणाभावीं मानणें योग्य नव्हे. 'मालविकाग्निमित्र नाटक लिहिण्यांत कालिदासाचा हेतु प्राक्कालीन इतिहास देण्याचा नव्हता. त्या नाटकाकडे ललितवाङ्मयांतील एक रमणीय कृति अशा दृष्टीने पाहिलें पाहिजे' हें डॉ. केतकरांचें म्हणणें आम्हांस कबूल आहे व त्या नाटकाच्या संविधानकांत–कालिदास इ. स. ३५०–४५० या कालांत होऊन गेला असल्यास–प्राचीन कथांचें व कदाचित् स्वकालीन परिस्थितीचेंहि प्रतिबिंब पडलें असल्याचा संभव आहे हेंहि आम्हांस मान्य आहे. तथापि कालिदासाने नाटकांत आपल्या कालचेंच चित्र रंगविलें असें सिद्ध करण्यापुरता स्वतंत्र पुरावा डॉ. केतकरांनी पुढे मांडला नाही ही आमची तक्रार आहे. एवढेंच नव्हे तर त्यांनी जीं अनुमानें काढलीं आहेत तीं गुप्तकालांतील ज्या थोडया गोष्टी आम्हांस माहित आहेत त्यांच्याविरुद्ध असल्यामुळे त्याज्य आहेत असें आमचें मत आहे.

कालिदासाच्या शीलावर शिंतोडे टाकण्यांत डॉ. केतकर यांचा हेतु

कोणत्याहि देशांत पुराव्याची विश्वसनीयता साक्षीदारांच्या केवळ संख्येवरून ठरवीत नाहीत. सज्जनाची साक्ष–तो एकटा असला तरी–शेंकडों दुर्जनांच्या साक्षीपेक्षा जास्त विश्वासार्ह मानली जाते. यामुळे हुशार वकील उलट तपासणींत एखादा साक्षीदार आपल्या विरुद्ध जाऊं लागला म्हणजे त्याच्या शीलावर शिंतोडे टाकून त्याची साक्ष खोटी आहे असें ठरविण्याचा प्रयत्न करीत असतात. अशा प्रकारचा अधिकार सध्याच्या पुराव्याच्या कायद्याच्या १४६ व्या कलमाने वकिलास हल्लीच्या न्यायव्यवस्थेंत दिला आहे; पण त्या अधिकाराचा उपयोग वकिलाने फार जपून व तसे प्रश्न विचारण्यास सबळ कारणें असतील तरच करावा असें कलम १५० मध्ये ठरविलें आहे. कालिदासाने शुंग-कालीन जी माहिती दिली आहे ती खोटी ठरविण्याकरिता अशाच मार्गाचा डॉ. केतकरांनी अवलंब केलेला दिसतो. मालविकाग्निमित्राचें संविधानक ऐतिहासिक दृष्ट्या कुचकामाचें कां, तर कालिदासाने पुष्य-मित्राने जो स्वामिद्रोह केला त्याबद्दल कांहीच राग न दाखवितां उलट आपली सहानुभूति निमकहराम सेनापतीस देऊन आपली हलकट वृत्ति दाखविली आहे म्हणून. थोडा विचार केला असतां डॉक्टरसाहेबांनी गरीब बिचाऱ्या कालिदासावर जी ही आग पाखडली ती किती अन्याय्य आहे हें दिसून येईल. कालिदासाने पुष्यमित्राच्या कृत्याचा बाणाप्रमाणे धिक्कार केला नाही, ही गोष्ट खरी; पण त्याचें कारण मालविकाग्निमित्र ह्या नाटकाचें संविधानक बृहद्रथाची पदच्युति अगर पुष्यमित्राचें राज्यारोहण हें नसून पुष्यमित्राच्या मुलाच्या म्हणजे अग्निमित्राच्या अन्तःपुरांतील प्रेमकथा आहे हें होय. सेनापतीचा उल्लेख नाटकाच्या शेवटीं म्हणजे पांचव्या अंकांत आला आहे. तेथे कालिदासाने त्याचा धिक्कार करणें अप्रस्तुत झालें असतें. कालिदासाने त्याचा धिक्कार केला नाही, पण त्यास सहानुभूतीहि दाखविलेली आम्हांस कोठे दिसत नाही. त्यास सेनापति म्हणण्यांत कालिदास ऐतिहासिक सत्यास अनुसरत होता

हें वर दाखविलेंच आहे. तेव्हा त्याच्या शीलाला मुद्दाम काळिमा लावण्याचा हा अश्लाघ्य प्रयत्न डॉ. केतकरांनी सर्व उपलब्ध माहिती गोळा करून प्रबळ कारणामुळे केला की काय हें वाचकांनीच ठरवावें.

लेखांक चवथा

मालविकाग्निमित्र नाटकाचें संविधानक गुप्तकालीन होतें काय ?

मालविकाग्निमित्र नाटकाचें संविधानक वस्तुतः शुंगकालीन नसून गुप्तकालीन असावें, कालिदासकालीं राजश्यालक हीन कुळांतला असावा, राणीहि हीन कुळांतील असून केवळ आपल्या सौंदर्याच्या जोरावर राणी झाली असावी, इत्यादि आश्चर्यकारक विधानें डॉ. केतकरांनी केलीं आहेत; पण हें सिद्ध करण्यास जरूर त्या पुराव्याचा बोजा स्वतःवर असतांही त्याच्या पुष्ट्यर्थ त्यांनी एकहि प्रमाण पुढे मांडलें नाही. शुंगकालीन माहिती आपणास फार थोडी असल्यामुळे नाटकाचें संविधानक शुंगकालीनच आहे असें सिद्ध करणें अर्थातच अशक्य आहे; पण तें गुप्तकालीनच असावें अशी जी डॉ. केतकरांची कल्पना आहे ती मात्र निर्मूल आहे असें दाखविणें सोपें आहे, शेक्सपीयरप्रमाणेच आपल्या नाटकांचीं कथानकें कालिदास स्वतः कल्पित नसून तो महाभारत, पुराणें इत्यादिकांतून घेतो. मालविकाग्निमित्र नाटकाची ऐतिहासिक चौकट सत्य आहे हें आम्ही मागे दाखविलेंच आहे. बाकीचें कथानक शुंगकालाविषयी त्यावेळीं प्रचलित असलेल्या दंतकथांवरून किंवा गुणाढ्याच्या बृहत्कथेवरून त्याने घेतलें असेल. ही बृहत्कथा मूळ पैशाची भाषेंत होती. ती सध्या उपलब्ध नाही. पण तिचीं सारांशरूपाने दोन रूपांतरें—सोमदेवाचा कथासरित्सागर व क्षेमेंद्राची बृहत्कथामंजरी—हीं सध्या उपलब्ध आहेत. त्यांत पुढील गोष्ट आली आहे. (कथासरित्सागर, कथामुखलम्बक, तरंग ६, निर्णयसागर प्रत, पृष्ठ ५६)—

"अवन्ती अथवा उज्जयिनी येथील राजा महासेन याच्या मुलीचा-वासवदत्तेचा-विवाह वत्सदेशाचा राजा जो उदयन त्याच्याशीं झाला होता. वासवदत्तेच्या पालक नांवाच्या भावाने आपण स्वतः जिंकून आणलेली एक बन्धुमती नांवाची राजकन्या आपल्या बहिणीस भेट म्हणून पाठविली. ती अत्यंत रूपवती असल्यामुळे वासवदत्तेने तिला मञ्जुलिका असें नांव ठेवून गुप्त ठेविली. पुढे एके दिवशीं उद्यानलतागृहांत वसंतक नांवाच्या आपल्या प्रियमित्र विदूषकास घेऊन फिरत असतां उदयनाने तिला पाहिली व तिच्याशीं गुप्तपणें गान्धर्व विवाह केला. हें तेथेच लपून असलेल्या वासवदत्तेने पाहिलें व त्यामुळे तिला क्रोध येऊन ती वसंतकाला बांधून घेऊन गेली. तेव्हा राजा तिच्या माहेरच्या सांकृत्यायनी नामक परिव्राजिका मैत्रिणीला शरण गेला व तिच्या साहाय्याने त्याने वसंतकास सोडवून आणलें. राणीच्या अनुमतीने परिव्राजिकेने बन्धुमती राजास अर्पण केली."

डॉ. केतकरांनी आपल्या लेखांत मालविकाग्निमित्राचें कथानक दिलें असल्याने तें वाचकांच्या परिचयाचें आहे. तेव्हा त्यांत व वरील कथेंत असणारें साम्य त्यांच्या लक्षांत आलें असेलच. दोहोंतहि नायिका प्रथम गुप्तरूपाने असणें, विदूषकाच्या साहाय्याने उद्यानलतागृहांत भेटणें, नंतर बंदिवास व शेवटीं परिव्राजिकेच्या साहाय्याने नायिकेशीं राजाचा विवाह या गोष्टी समान आहेत. दोन्ही कथांत फरकहि अर्थात् पुष्कळच आहे. तथापि कथानक कोठून तरी घेऊन त्यांत जरूर ते फरक करण्याची कालिदासाची सवय लक्षांत घेतां मालविकाग्निमित्राचें संविधानक बृहत्कथेंतून घेतलें असणें असंभवनीय नाही. त्यावरून कालिदासकाळींहि अशीच परिस्थिति होती हें अनुमान, अन्य पुरावा असल्याशिवाय, काढणें मात्र योग्य होणार नाही. कारण इ. स. च्या ७ व्या शतकांत होऊन गेलेल्या सम्राट् हर्षाच्या प्रियदर्शिका व रत्नावलि या नाटिकांचेंहि संविधानक या रीतीचेंच असल्यामुळे त्यांच्या बाबींतही तसेंच अनुमान करावें लागेल व तें हास्यास्पद होईल हें सांगणें नकोच.

उज्जयिनीस विदर्भांचा मत्सर वाटत होता याचीं (डॉ. केतकर यांच्या मतें) कारणें

मालविकाग्निमित्र नाटक लिहिण्यांत कालिदासाचा जो दुसरा हेतु होता असें डॉ. केतकर म्हणतात त्याचें आता परीक्षण करूं. त्यांच्या मतें या नाटकांत विदिशेच्या राजाने विदर्भ राज्याच्या राजाचा पाडाव केला असें दाखविलें, त्याचा हेतु उज्जयिनीच्या लोकांस खूष करणें होय. कारण उज्जयिनी व विदिशा हीं राज्यें व राजधान्या दोन असल्या तरी राष्ट्र (माळवा) एकच. तेव्हा विदिशेबद्दल उज्जयिनीच्या लोकांस आपलेपणा वाटत होता. विदर्भ देशाची पूर्वीपासून वाङ्मयांत प्रसिद्धि होती; पण कालिदासापूर्वी उज्जयिनीस वाङ्मयांत स्थान नव्हतें. तेव्हा उज्जयिनीच्या लोकांस विदर्भाविषयी मत्सर वाटत असे. त्यांस खूष करण्याकरितां विदर्भराजाचें हीनत्व व उद्दामपणा कालिदासाने दाखविला आहे.

वरील कारणांचें परीक्षण

वरील विधानांतील प्रत्येक वाक्य खोडून काढतां येईल. आधी उज्जयिनी व विदिशा येथे दोन स्वतंत्र राज्यें होतीं असें डॉ. केतकरांनी सिद्ध केलें नाही. उज्जयिनी ही चंद्रगुप्त विक्रमादित्याची राजधानी होती हें त्यांनी मान्य केलेंच आहे. विदिशाहि द्वितीय चंद्रगुप्ताच्याच अमलाखाली होती हें विदिशेपासून वायव्यदिशेस दोन मैलांवर उदयगिरि नांवाच्या टेकडीवरील गुहांत द्वितीय चंद्रगुप्ताच्या मांडलिक राजाने आणि अमात्याने कोरलेले दोन लेख उपलब्ध झाले आहेत (फ्लीट, गुप्त इन्स्क्रिप्शन्स्, नं. ३ व ४ पहा) व जवळच सांची येथेहि चन्द्रगुप्ताच्या काळचा शिलालेख आहे (गु. इ., नं. ५ पहा) त्यावरून सिद्ध होईल. उज्जयिनी व विदिशा येथे दोन राज्यें होतीं असें कबूल केलें तरी मालविकाग्निमित्राचें कथानक विदिशा येथे घडलें असें दाखवून विदिशेविषयी उज्जयिनीच्या लोकांस आपलेपणा वाटत असल्यामुळे आपणच विदर्भदेशाचा पाडाव केला असें त्यांस वाटावयास लावावयाचें एवढा द्राविडी प्राणायाम करण्यापेक्षा उज्जयिनीसच कथानक घडलें असें दाखविलें असतां चाललें नसतें काय? कारण डॉ० केतकरांच्या मतें विदिशेस अग्निमित्राचें राज्य

होतें हें कालिदासास माहीत नव्हतें. तेव्हा उज्जयिनीच्या राजाने विदर्भांचा पराभव केला असें दाखविण्याने कालिदासाचा हेतु साध्य झाला असता व 'व्याकरणाभ्यासजड पंडित व माळव्याच्या दरबारांतील भोळे लोक' यांच्या कल्पनाशक्तीसहि ताण बसला नसता.

उज्जयिनी विदर्भांपेक्षा कोणत्याहि बाबतींत कमी नव्हती

विदिशेच्या राजाने विदर्भांचा पराभव केला असें दृश्य पाहून उज्जयिनीच्या लोकास हर्ष होण्याचें कारण त्यांस विदर्भांच्या कीर्तीबद्दल मत्सर वाटत होता हें जें डॉ. केतकर यांचें विधान आहे त्याचें आता परीक्षण करूं. या मत्सराचें जें कारण त्यांनी दिलें आहे तें हें की, विक्रमादित्य व कालिदास यांच्यापूर्वी विदर्भांची वाङ्मयांत प्रसिद्धि होती व उज्जयिनीची नव्हती. या विधानास नेहेमीप्रमाणेच त्यांनी कांही आधार दिले नाहीत. विदर्भ देशाची 'सारस्वती जन्मभूः' म्हणून राजशेखराने स्तुति केली आहे खरी व वैदर्भी रीति ही सर्व रीतींत श्रेष्ठ गणली जाते हेंहि खरें. पण कालिदासाच्या पूर्वी विदर्भांत होऊन गेलेल्या ग्रंथकारांची आपणास माहिती नाही; वैदर्भी रीतीचा उल्लेखहि प्रथम इ. स. ६०० च्या सुमारास (म्हणजे कालिदासानंतर १५०–२०० वर्षांनी) होऊन गेलेल्या दण्डीच्या काव्यादर्शांत प्रथम आढळतो; त्यामुळे त्याचाहि प्रस्तुत बाबतींत उपयोग करणें योग्य होणार नाही. विदर्भ हें रुक्मिणीचें माहेर म्हणून वाङ्मयांत प्रसिद्ध होतें असें म्हटलें तर उज्जयिनी ही बुद्धकालीन चण्डमहासेन राजाच्या काळापासून वासवदत्तेचें माहेर म्हणून तितकीच प्रसिद्ध आहे. इतकेंच नव्हे तर पाली वाङ्मयावरून बुद्धकालीन 'अवन्तिदक्षिणापथ' या देशांत विदर्भांचा अंतर्भाव होत असे असें दिसतें. (डॉ. देवदत्त भाण्डारकर यांचीं कारमायकेल लेक्चर्स, १९१८, पृ. ४५ पहा.) कालिदासाच्या पूर्वी उज्जयिनीची अतिशय भरभराट होती. तेथे राज्य करणाऱ्या क्षत्रप रुद्रदामन् प्रभृति परकी राजांनीही संस्कृत विद्येस उत्तेजन दिलें होतें, हें सध्या उपलब्ध असलेल्या रुद्रदामन् याच्या गिरनार येथील खडकावरील इ. स. १५० च्या संस्कृत कोरीव लेखावरून सिद्ध होत आहे. विस्तृत हिंदुस्थ नच्या

पश्चिम किनाऱ्यावरील बंदरांचा व्यापार या शहरामार्फतच चालत असे. (व्हिन्सेंट् स्मिथ्, अर्ली हिस्टरी ऑफ इंडिया, पृ. २९१ पहा.) क्षत्रपांचा पराभव केल्यावर चंद्रगुप्ताने उज्जयिनी ही आपली राजधानी केली. त्यावेळीं तर तिची अत्यंत भरभराट होत असली पाहिजे. उज्जयिनींत परीक्षा दिल्यावरच कालिदास, मेंठ, अमर, भारवि इत्यादि कवि प्रसिद्धि पावले असें राजशेखरच्या काव्यमीमांसेंत (पृष्ठ ५५) उद्धृत केलेल्या एका श्लोकावरून दिसतें. विदर्भांत रामगिरि (रामटेक)-सारखीं तीर्थें असल्यामुळे उज्जयिनीच्या लोकांस मत्सर वाटत असेल असें म्हणावें तर फार प्राचीन कालापासून उज्जयिनीची मोक्षदायक पुरी म्हणून कीर्ति आहे (अग्निपुराण, अ. १०९ पहा). तेथील महाकालेश्वराची द्वादश ज्योतिर्लिंगांत अद्यापि गणना करतात व कालिदासाच्या मेघदूतांतील वर्णनावरून तें देऊळ त्याच्या वेळींही फार प्रसिद्ध असावें असें दिसतें. तेव्हा कोणत्याहि बाबतींत उज्जयिनी विदर्भाच्या राजधानीपेक्षा कमी नव्हती. आपल्यापेक्षा वरचढ असलेल्या माणसांच्या ऐश्वर्याबद्दल आपणास हेवा वाटतो. समान अगर कमी प्रतीच्या माणसाबद्दल वाटत नाही. जो न्याय व्यक्तींस तोच शहरांसहि लागू आहे.

विदर्भराजाचें अग्निमित्रास उत्तर

'डॉ. केतकरांनी निर्दिष्ट केलेल्या कारणांहून निराळ्याच कांही कारणाने उज्जयिनीच्या लोकांस विदर्भाचा मत्सर वाटत असेल. कारण कांही असो; मालविकाग्निमित्र नाटकांत विदर्भाची हीनता व उद्दामपणा, नंतर त्याचा झालेला पराजय व त्या पराजयाचें कालिदासाने केलेलें रसभरित वर्णन हीं तरी दिसतातच की नाही ?' अशी वाचकांच्या मनांत शंका येण्याचा संभव आहे. तेव्हा डॉ० केतकरांनी जो हा भ्रम उत्पन्न केला आहे त्याचें निरसन करणें जरूर आहे. विदर्भराजाची हीनता दाखविण्यासाठी त्याने अग्निमित्राच्या खलित्यास पाठविलेल्या व मालविकाग्निमित्राच्या पहिल्या अंकांत दिलेल्या उत्तरांतील भाषासरणीवर डॉ० केतकरांनी जोर दिला आहे. अग्निमित्र आपणास अरेतुरे करतो

तरी विदर्भराजा त्यास पूज्य म्हणतो व त्यायोगें आपली हीनता दाखवितो असें डॉक्टरसाहेब म्हणतात. पूर्वीची पत्रलेखनपद्धति कशी होती हें सध्या समजण्यास मार्ग नाही. गायकवाड ओरिएंटल सीरीजमध्ये लेखनपद्धति म्हणून एक ग्रंथ अलीकडे प्रसिद्ध झाला आहे. पण त्याचा लेखक पुढे फार वर्षांनी म्हणजे इ. स. १५ व्या शतकांत होऊन गेला असल्यामुळे त्याचा आपणांस कांही उपयोग होणार नाही. संस्कृत वाङ्मयांत आधी फारच थोडीं—नऊ दहा पत्रें उपलब्ध आहेत. त्यांतहि संधिविग्रहाचीं तर अत्यल्प. त्यामुळे विदर्भ राजाच्या उत्तराची ज्याच्याशीं तुलना करतां येईल असें एकहि पत्र मिळत नाही. आम्ही मालविकाग्निमित्र नाटकांतील पत्र पुन्हा पुन्हा वाचलें पण त्यावरून विदर्भराजाची हीनता कशी व्यक्त होते तें आम्हांस समजलें नाही. विदर्भ राजाने अग्निमित्रास पूज्य म्हटलें आहे तर अग्निमित्रानेहि त्याचा एकदा 'भवतः' म्हणजे 'आपला' असा बहुमानद्योतक सर्वनामाने निर्देश केला आहे. पण आमच्या मतें अशा विशेषणावर फार जोर देणें योग्य नव्हे. तीं लेखकाचें हृद्गत क्वचितच व्यक्त करतात. सध्याहि आपल्या कट्टया दुष्मनासही लिहितांना आपण 'राजमान्य राजश्री' अगर 'श्रीयुत' म्हणून मराठींत संबोधतों व इंग्रजींत 'आपला आज्ञाधारक सेवक' असें स्वतःसंबंधाने लिहितों. पण त्यावरून एकाद्याने लेखकाच्या हीनतेचें अनुमान काढलें तर योग्य होईल काय ? कदाचित् शुंगकालीं विदर्भाचें राज्य शुंगसाम्राज्याच्या मानाने लहान असेल व त्यामुळे विदर्भाचा दर्जा कमीहि असण्याचा संभव आहे. तरीहि विदर्भराजाने जें सभ्यतापूर्वक पण स्पष्ट व निर्भीड उत्तर पाठविलें आहे त्यावरून अन्तःपुरांत रममाण होणाऱ्या बढाईखोर अग्निमित्रापेक्षा त्याच्याबद्दल आपणांस जास्त सहानुभूति वाटते. पुढे विदर्भ राजाचा पराजय झाला आहे हें खरें, पण त्या पराजयाच्या वर्णनांत विशेष कांही नाही. पराजित राजाच्या नगरींत अगर तिच्याजवळच्या नदीच्या तटावर भाट विजयी राजाचीं स्तुतिस्तोत्रें गातात ही कल्पना केवळ कालिदासाच्या इतर ग्रंथांतच नव्हे तर अन्य ठिकाणींही आढळते. (पहा रघु. ४. ७८, आदित्यसेनाचा अफसड येथील शिलालेख, श्लो. १४, फ्लीट–गुप्त इन्स्क्रिप्शन्स्, नं. ४२.)

कालिदासाची विदर्भाविषयी वृत्ति

बरें, कालिदासास विदर्भाविषयी इतका तिटकारा होता तर तो त्यानें इतरत्र दाखविला पाहिजे होता. पण तसें तर कांही दिसत नाही. कालिदासानें आपले ग्रंथ वैदर्मी रीतींत लिहिले असें मानलें जातें. (अवन्तिसुन्दरीकथा, पृ. २ पहा). रघुवंशांत विदर्भ राजकन्या इंदुमती हिचा विवाह व तिच्या निधनानंतर अजाचा शोक ज्यांत वर्णिला आहे ते म्हणजे सहावा व आठवा हे सर्ग उत्कृष्ट गणले जातात. पांचव्या सर्गांत 'ऋद्धां विदर्भाधिपराजधानीम् (५, ४०) सौराज्यरम्यान् अपरो विदर्भान् (५, ६०) अशी विदर्भांच्या समृद्धीविषयी व सुराज्याविषयी विधानें आलीं आहेत. कालिदासाचे समग्र ग्रंथ लक्षांत न घेतां एखाद्या ग्रंथाचा कीस काढून अनुमान करीत असल्यामुळे डॉ. केतकरांची स्थिति हत्तीच्या सोंडेला स्पर्श करून हत्ती अजगरासारखा आहे असें म्हणणाऱ्या आंधळ्यासारखी झाली आहे, हें यांवरून वाचकांच्या ध्यानांत आलें असेल.

लेखांक ५

विदर्भाचा थोडा प्राचीन इतिहास

कालिदासाच्या मनांत विदर्भाविषयी तिटकारा नव्हता हें मागे दाखविलें. पण याच्याहि पुढे जाऊन आपणास म्हणतां येईल की त्याला विदर्भाबद्दल अभिमान व आपलेपणा वाटत होता. याकरिता विदर्भाच्या इतिहासाचें अलीकडे झालेलें संशोधन ध्यानांत घेतलें पाहिजे. त्यावरून असें दिसतें की त्याकालीं विदर्भावर वाकाटकांचें फार समृद्ध असें राज्य होतें. गुप्तवंशांत महान् पराक्रमी राजे होऊन गेले पण त्यांनी विदर्भाचें सामर्थ्य ओळखून त्यांच्याशीं हातघाईचा प्रसंग टाळलेला आढळतो. द्वितीय चंद्रगुप्ताचा पिता समुद्रगुप्त याने जिंकलेल्या देशांची यादी प्रयागच्या किल्ल्यांत अद्यापि उभ्या असलेल्या अशोकाच्या शिलास्तंभावर उत्कीर्ण केलेली आहे. त्यांत कांची, कोसल, कालिंग इत्यादि

दक्षिण देशांचीं नांवें आहेत पण विदर्भाचें नांव नाही. कालिदासाचा आश्रयदाता द्वितीय चंद्रगुप्त–विक्रमादित्य यानें तर आपली मुलगी प्रभावतीगुप्ता ही वाकाटक घराण्यांतील राजा द्वितीय रुद्रसेन यास दिली होती. रुद्रसेन पुढे लवकरच मरण पावला. त्यास दिवाकरसेन व दामोदरसेन असे दोन (कांहींच्या मतें तीन) पुत्र होते. ते लहान असल्यामुळें त्यांच्या तर्फे प्रभावतीगुप्ता ही पुष्कळ वर्षें राज्यकारभार पाहत होती. त्यांपैकी एक मुलगा (द्वितीय) प्रवरसेन या नांवाने राज्य करूं लागला. परंतु त्याचें लक्ष राज्यकारभारापेक्षा काव्याभ्यासाकडे फार होतें. त्याने सेतुबंध किंवा रावणवहो (संस्कृत, रावणवध) नांवाचें प्राकृतभाषेंत एक मोठें काव्य लिहिलेलें प्रसिद्ध आहे. त्या काव्याचा कर्ता प्रवरसेन होता याबद्दल बाण (सातवें शतक) क्षेमेंद्र (अकरावें शतक) इत्यादिकांच्या ग्रंथांत उल्लेख आहेत.

कालिदास व विदर्भ यांचा संबंध

या ग्रंथावर सोळाव्या शतकाच्या शेवटीं होऊन गेलेल्या रामदास नांवाच्या राजाची टीका आहे. त्यांत आरंभींच 'इह तावन्महाराजप्रवरसेननिमित्तं महाराजाधिराजविक्रमादित्येनाज्ञप्तो निखिलकविचक्रचूडामणिः कालिदासमहाशयः सेतुबन्धप्रबन्धनं चिकीर्षुः'...इ. उल्लेख आहे. त्यावरून कालिदासाने प्रवरसेनाकरिता महाराजाधिराज (चन्द्रगुप्त) विक्रमादित्याच्या आज्ञेने तो सेतुबंध ग्रंथ तपासला असावा असें विद्वानांचें मत आहे. (भाण्डारकर इन्स्टिटयूटच्या ॲनल्स्, व्हा. ५, भाग १ व मिथिक सोसायटीचें जर्नल्, व्हॉ. १५, नं. २, पृ. १५३ यांतील प्रोफेसर ऐयंगार यांचे वाकाटकांवरचे लेख पहा. मराठी वाचकांस याबद्दल माहिती विविधज्ञानविस्तार, वर्ष ५८, अंक ३ यांत रा. य. रा. गुप्ते यांच्या लेखांत मिळेल. वर सांगितल्याप्रमाणें विदर्भाचा राजा (विक्रमादित्याचा नातु) कालिदासाचा प्रियशिष्य व मित्र होता. वाकाटक राजे रामटेकास जात येत असत हें श्री. य. रा गुप्ते यांनी संपादिलेल्या ऋद्धपूरच्या ताम्रपटावरून दिसतें. कालिदासहि तेथे वरचेवर जात असला पाहिजे. म्हणूनच त्याने आपल्या मेघदूत काव्यांत यक्षाचें निवासस्थान रामगिरि होतें असें वर्णिलें आहे.

वरील विवेचनावरून मालविकाग्निमित्र नाटक रचण्यांत कालिदासाचा उद्देश विदर्भाचें हीनत्व दाखविणें हा असणें शक्य नाही ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट झाली असेल असें वाटतें. राणीस अगर राजश्यालकास चिमटे घेणें हाहि उद्देश असणें शक्य नाही; कारण जरी विक्रमादित्याला अनेक स्त्रिया होत्या याबद्दल पुरावा आहे तरी त्यांतील कोणी हीन कुळांतील होती व आपल्या सौंदर्याच्या जोरावरच राणी झाली होती असें मानण्यास पुरावा नाही. तसेंच कालिदासाचा असा कुजका स्वभाव होता हेंहि सिद्ध झालें नाही. शिवाय अशा प्रकारचे सहज दिसणारे उल्लेख त्याच्या नाटकांत असते तर त्याची दरबारांतून लवकरच उचलबांगडी झाली असती. तेव्हा डॉ. केतकरांची ही कल्पनेची इमारत पार कोसळून पडली आहे.

मालविकाग्निमित्र रचण्यांत कालिदासाचा उद्देश

मालविकाग्निमित्र नाटक रचण्यांत कवीचा काय उद्देश असावा याचा विचार करण्यांत वेळ घालविणें व्यर्थ होईल. तथापि कल्पनाच करावयाची तर कालिदासाचे काळीं जसा चंद्रगुप्त–विक्रमादित्याने शकांचा पराभव केला, साम्राज्य स्थापिलें व संस्कृतविद्येस उत्तेजन दिलें, त्याप्रमाणेच पूर्वी शुंगराजांनीही केलें होतें व प्रभावतीगुप्ता व रुद्रसेन यांच्या विवाहामुळे माळवा व विदर्भ यांचा जसा संबंध जोडला गेला तसाच तो पूर्वीहि जोडला गेला होता हें दाखविण्याचा कालिदासाचा उद्देश असावा. असो.

कालिदासाचें राजकारणविषयक ज्ञान

येथवर डॉ. केतकर यांच्या लेखमालेंतील मुख्य विधानांचें खंडण केलें. याशिवाय अनेक विधानें त्या लेखांत विखुरलेलीं आहेत. त्या सर्वांचा समाचार घेऊं म्हटलें तर एक मोठाच ग्रंथ होईल. तथापि लेखणी खाली ठेवण्यापूर्वी एकदोन विधानांचा विचार करणें जरूर आहे. पुष्यमित्र सेनापति असतांच यज्ञ करतो त्यावरून व विदर्भ देशचा राजा पत्रांत जी भाषा योजतो त्यावरून कालिदासास राजकारणाचें ज्ञान नव्हतें

असे जे डॉ. केतकरांचे दोन आक्षेप आहेत त्यांस वर उत्तर आलेंच आहे. तिसरा आक्षेप हा की विदिशेवर राज्य करणारा अग्निमित्र आपल्या बापाचा अंकित होता तरी आपल्या बापाच्या संमतीची वाट न पाहतां तो मौर्य सचिवास मुक्त करतो असें कालिदासाने दाखविलें आहे. यावर उत्तर देण्याकरिता मालविकाग्निमित्राचें जरा बारीक निरीक्षण केलें पाहिजे. पहिल्या व शेवटच्या अंकावरून ज्या मौर्यसचिवाच्या सुटकेची अट विदर्भराजा घालत आहे तो अग्निमित्राच्या कैदेंत विदिशेस होता, पाटलिपुत्रास नव्हता असें दिसतें. व म्हणूनच 'आपण मौर्यसचिवास सोडाल तर मी माधवसेनास मुक्त करीन' असें विदर्भराजा म्हणत आहे. 'सोडवाल तर' असें म्हणत नाही. पत्राचें उत्तर विदर्भराजाकडून आल्याबरोबर अग्निमित्र आपल्या बापाच्या संमतीची वाट न पाहतां सैन्यासह वीरसेनास विदर्भावर चालून जाण्यास आज्ञा करतो यावरूनही परराष्ट्राशीं संधिविग्रहाच्या बाबतींत देखील अग्निमित्रास हल्लीच्या भाषेंत बोलावयाचें तर पूर्ण प्रांतिक स्वायत्तता होती असें दिसतें. शिवाय 'मनांतील राग दूर करून सर्व स्त्रियांसह तूं विलंब न करतां (पाटलिपुत्रास) यज्ञाकरितां ये' असें पुष्यमित्राने लिहिलें आहे, त्यावरून अग्निमित्र कांही कारणाने बापाशीं फटकून वागत होता असें दिसतें. अयोध्येंतील मागे दिलेल्या शिलालेखावरून पुष्यमित्रास निदान ६ मुलगे होते व त्यांपैकी सहावा अयोध्येजवळच्या प्रदेशांत राज्य करीत होता असें सिद्ध होतें. पूर्वीच्या उत्तर पांचाल (हल्लीचा संयुक्तप्रांत) देशाची राजधानी अहिच्छत्र या शहरच्या आसपास शुंगांचीं बरींच नाणीं सापडलीं आहेत त्यावरून तेथेहि शुंगांचें राज्य होतें यांत शंका नाही (व्हि. स्मिथ्‌चा कलकत्त्याच्या इंडियन् म्युझियम्‌मधील नाण्यांचा कॅटलाग, व्हॉ. १, पृ. १८४ पहा). पुष्यमित्राचा ज्येष्ठ मुलगा अग्निमित्र विदिशेस राज्य करीत होता. या सर्व प्रमाणांवरून पुष्यमित्राने आपले पुत्र साम्राज्याच्या निरनिराळ्या प्रांतावर राजे म्हणून नेमले होते व तो त्यांच्याकडून आपल्या वृद्धपणीं राज्य करवीत असे, असें दिसतें व हेंच पुराणांतील 'सेनापति पुष्यमित्र अमुक वर्षें राज्य **करवील**' अशा प्रयोजक क्रियापदाच्या प्रयोगावरून सिद्ध होत आहे. तेव्हा यावरून

अग्निमित्राने आपल्या बापाची संमति न घेतां मौर्यसचिवास सोडून दिलें या आक्षेपांत कांहीच तथ्य राहात नाही. कालिदासाचें राजकारण-विषयक ज्ञान किती होतें हें त्याच्या ग्रंथांतील पुराव्यावरून सिद्ध करूं म्हटलें तर मोठाच लेख लिहावा लागेल, तो पुढे केव्हा तरी लिहूं. पण केलेल्या विवेचनावरून संगीतादि कला, शिक्षण इत्यादि विषयांत निपुण असलेला कालिदास केवळ राजकारणांतच जडबुद्धि ठरेल असें वाटत नाही.

कालिदासाचें भौगोलिक ज्ञान

वर्धा नदीच्या योगाने विदर्भांचे उत्तर दक्षिण विभाग होतात असें कालिदास नाटकांत म्हणतो यावरून त्याचें भौगोलिक अज्ञान व्यक्त होतें असें डॉक्टरसाहेब म्हणतात त्याचा आता विचार करूं.

कालिदासाने आपल्या ग्रंथांत अनेक देशांचीं, नगरांचीं, पर्वतांचीं व नद्यांचीं वर्णनें दिलीं आहेत. मेघदूतांतील मेघाच्या अलकेपर्यंतच्या मार्गाचें वर्णन, रघूच्या दिग्विजयाचें ४ थ्या सर्गांत केलेलें वर्णन, कुमारसंभवांतील हिमालयाचें वर्णन इत्यादिकांवरून त्याचें भौगोलिक ज्ञान बिनचूक होतें अशी प्रचलित समजूत आहे. रघुवंशाच्या सहाव्या सर्गांत पांड्य राजाच्या राजधानीचें वर्णन आलें आहे, त्यावरून कालि-दासाचा काल ठरविण्याचा रा. चिंतामणराव वैद्यांनी प्रयत्न केला आहे तो एरव्ही त्यांनी केला नसता. (भां. इ. ॲनाल्स, व्हा. २, भाग १.) कालिदास विदर्भात आला असावा असें आम्ही वर सप्रमाण म्हटलें आहे. त्यावरून विदर्भाच्या भूगोलाविषयी तो चूक करील असें वाटत नाही.

वर्धा नदीच्या प्रवाहाचा हा उल्लेख कसा बरोबर आहे हें रा. यादवराव काळे यांनी 'महाराष्ट्रा'च्या ता. ९ डिसेंबरच्या अंकांत उत्तम रीतीने दाखवून दिलें आहे. कोणत्याहि नदीच्या प्रवाहाची दिशा आरंभा-पासून अखेरपर्यंत एकसारखी राहात नसल्यामुळे तिच्या तटाचा उल्लेख करितांना दक्षिण (उजवा) व उत्तर (डावा) या शब्दांचा प्रयोग करतात. कालिदासाने आणखी एके ठिकाणीं असाच एक उल्लेख केला आहे. त्याच्याकडे आम्ही डॉक्टरसाहेबांचें लक्ष वळवितों. मालवि-

काग्निमित्रांतील पुष्यमित्राच्या पत्रांत 'सुमित्राने सिंधुनदीच्या दक्षिण तीरावर यवनसेनेचा पराभव केला', असा उल्लेख आहे. ही सिंधुनदी सिंधमधील प्रसिद्ध सिंधुनदी नसून विदिशेच्या उत्तरेस सुमारें ५० मैलांवर उगम पावणारी राजपुतान्यांतील संस्थानें आणि बुदेलखंड यांस विभागणारी व शेवटीं यमुना नदीस मिळणारी सिंधुनदी असली पाहिजे असें विद्वानांनी दाखवून दिलें आहे. (व्हिन्सेंट् स्मिथ्–अर्ली हिस्टरी ऑफ इंडिया, पृ. २०१ पहा.) ही नदी नैऋत्येकडून इशान्येकडे वाहत जाणारी आहे तरी तिच्या तीराचा 'दक्षिण' असाच उल्लेख कालिदासाने केला आहे. उज्जयिनीपासून बऱ्याच अंतरावर असलेल्या वर्धा नदीच्या प्रवाहाची दिशा कालिदासास बरोबर माहीत नव्हती असें घटकाभर कबूल केलें तरी उज्जैनीपासून जवळच उगम पावणाऱ्या सिंधुनदीचीहि त्यास बरोबर माहिती नव्हती असें डॉक्टरसाहेब म्हणणार नाहीत असें वाटतें. तेव्हा रा. यादवराव काळे यांनी सुचविलेला अर्थच आम्हांस ग्राह्य वाटतो. डॉक्टरसाहेब करतात तसा दक्षिण व उत्तर या शब्दांचा अर्थ केला तरी कालिदासाचें वर्णन निर्दोष आहे हें दाखविणेंही कठीण नाही.

'त्याने वर्धा नदीने विदर्भाचे उत्तर दक्षिण विभाग होतात असें म्हटलें आहे तें कसें ?' या डॉक्टरसाहेबांच्या प्रश्नास उत्तर हें की त्यामुळे व्यवहारांत वऱ्हाडचे कोणते दोन भाग विवक्षित होते हें समजण्यास अडचण येत नाही. कालिदास कांही तहाचीं कलमें देत नाही. तसें असतें तर त्याने डॉ. केतकर म्हणतात त्याप्रमाणे वर्धा ही नदी वायव्येकडून आग्नेयेकडे वाहत जाते तिने होणारे भाग असें म्हटलें असतें. शिवाय हें ध्यानांत घेतलें पाहिजे की, विदर्भाच्या ह्या तुकड्यांचा निर्देश कालिदासाने एका श्लोकांत केला आहे व कवितेंत अशा बारीकसारीक गोष्टी येणें शक्य नसतें. डॉ. केतकर म्हणतात त्याप्रमाणे वर्धा नदीने विदर्भाचे पूर्व पश्चिम असे तुकडे होतात असें कालिदास म्हणता तरीहि तीच अडचण आली असती, कारण वर्धा अगदी बरोबर दक्षिण उत्तर वाहत नाही. नद्या कांही तह करणाऱ्यांच्या सोईकरिता वाहत

नाहीत तर तह करणार नदीचा प्रवाह देशाचे विभाग करण्यास सोईचा म्हणून तहनाम्यांत निर्दिष्ट करतात. तेव्हा कालिदासाच्या उल्लेखाचा साधारणतः बरोबर अर्थ लागत असेल तर तो जास्त खोलांत गेला नाही, व नदीच्या प्रवाहाची बरोबर दिशा त्याने दाखविली नाही याबद्दल त्यास दोष देणें योग्य नव्हे असें आम्हांस वाटतें. पण याहिपुढे जाऊन कालिदासाने वर्धा नदीच्या प्रवाहाचा निर्देश केला आहे तो बरोबर आहे असें म्हणतां येईल. कारण सध्या वऱ्हाड आहे त्याच्या खालचाहि भाग पूर्वी विदर्भांत मोडत असे (रा. या. मा. काळे यांचा वऱ्हाडचा इतिहास, पृ. २६ पहा) व यांतील कांही भाग वर्धा नदीच्या दक्षिणेसच येतो. शिवाय वायव्येकडून आग्नेयेकडे वाहत असणाऱ्या नदीच्या प्रवाहानें होणारे देशाचे भाग उत्तर दक्षिण असे उल्लेखिले जातात हें अर्वाचीन काळांतील एका तहाच्या कलमाचा उल्लेख करून दाखवितां येईल. इ. स. १७३१ मध्ये कोल्हापूरकर संभाजी व सातारकर शाहू यांच्या मध्ये जो तह झाला तो वारणेचा तह म्हणून इतिहासांत प्रसिद्ध आहे. त्याचें सहावें कलम पुढील आहे. "वारणेच्या व कृष्णेच्या संगमापासून **दक्षिण-तीर** तहत निवृत्तिसंगम तुंगभद्रेपावेतों दरोबस्त देखील गड ठाणीं तुम्हां-कडे दिलीं असत." (मराठी रियासत, मध्यविभाग, भाग १, पृ. २१२ पहा.) वारणा ही नदी लहान असल्याने लहान नकाशांत दाखविली नसते. पण ग्रँट डफच्या मराठ्यांच्या इतिहासास जोडलेल्या नकाशासारख्या विस्तृत नकाशांत पाहिलें असतां असें आढळून येईल की कृष्णावारणा-संगमापासून पुढे शंभर सवाशें मैल कृष्णेचा प्रवाह वायव्येकडून आग्नेये-कडेच वहात आहे. तरीहि वरील तहांत 'कृष्णेच्या दक्षिणतीरचीं सर्व गडठाणीं कोल्हापुरकरांस दिलीं' असा निर्देश केला आहे. ज्या मराठ्यांनी सदैव मुलुखगिरी केली त्यांसहि स्वतःच्या प्रदेशाच्या भूगोलाचें ज्ञान नव्हतें असें डॉ. केतकर म्हणणार नाहीत असें वाटतें. मग त्यांनी जर वायव्येकडून आग्नेयेकडे वाहणाऱ्या नदीच्या योगें होणाऱ्या देशाच्या भागांस तहनाम्यांत सुद्धा उत्तर दक्षिण असें म्हटलेलें चालतें तर कालि-दासाने ललितवाङ्मयांत व एका श्लोकांत तसाच उल्लेख केल्यास तो कां न चालावा?

लेखांक ६

कालिदासाचें बौद्ध धर्माचें व वाङ्मयाचें ज्ञान

कालिदासास बौद्ध व जैन धर्माचें ज्ञान नव्हतें असें डॉ. केतकर म्हणतात त्याचा आता विचार करूं. कालिदासाने बौद्ध अगर जैन ग्रंथ लिहिले नसल्याने या बाबतींत प्रबल प्रमाण देणें शक्य नाही. कोणाहि मनुष्यास असलेलें सर्व ज्ञान त्याच्या ग्रंथांत येत नाही. तसें झालें तर प्रत्येक ग्रंथ त्या माणसाचा ज्ञानकोशच झाला असता. तेव्हा कालिदासाच्या ग्रंथांत बौद्ध वाङ्मयाचे अगर धर्माचे उल्लेख नाहीत या अभावात्मक प्रमाणावरून त्याच्या अज्ञानाचें अनुमान करणें सयुक्तिक होणार नाही. पण थोडा विचार केला तर कालिदासास बौद्ध धर्माचेंहि ज्ञान असावें असें दिसेल. गुप्त राजे ब्राह्मण धर्माचे व संस्कृत विद्येचे पुरस्कर्ते होते; तथापि भारतीय राजांच्या संप्रदायास अनुसरून ते बौद्ध-धर्माचाही परामर्ष घेत असावे. त्यांच्या कालांतील अनेक भव्य बौद्ध विहार पुराणवस्तुसंशोधन खात्याने उजेडांत आणले आहेत. चिनी यात्रेकरी फा हायन् हा द्वितीय चंद्रगुप्ताच्या कारकीर्दींत इ० स० ४०५-४११ या अवधींत हिंदुस्थानांत प्रवास करून गेला. त्याने लिहून ठेवलेल्या प्रवास-वर्णनावरून त्यावेळीं हिंदुस्थानांत बौद्ध धर्म जोरांत होता असें दिसतें. (व्हिन्सेंट् स्मिथ्-अर्ली हिस्टरी ऑफ इंडिया, पृ. ३०७ पहा.) विदिशेच्या दक्षिणेस जवळच असलेल्या सांची येथील स्तूपाकरिता चंद्रगुप्ताच्या एका अधिकाऱ्याने २५ दीनारांचें दान केलें व त्याचें अर्धें पुण्य आपल्या राजास व अर्धें आपणास ठेवलें असा एक शिलालेख सांची येथे सापडला आहे. (फ्लीट्-गुप्त इन्स्क्रिप्शन्स्, पृष्ठ २९ पहा). त्यावरून बौद्ध धर्माचा चंद्रगुप्त द्वेष करत नव्हता असें दिसतें व कदाचित् त्याचाहि त्यास आश्रय असेल. तेव्हा कालिदासासारखा चौकस मनुष्य आपल्या देशांत आपल्या डोळ्यांसमोर भरभराटींत असलेल्या बौद्ध धर्माविषयी पूर्ण अज्ञानी राहील असें वाटत नाही. कालिदासाने स्वकालीन इतिहास अगर ऐतिहासिक गोष्टी यांस आपल्या ग्रंथाचे विषय केले नसल्यामुळे

अर्थातच त्यांत बौद्ध धर्मांचे उल्लेख नाहीत. कालिदासानंतर २००–२५० वर्षांनी होऊन गेलेल्या बाणाच्या काळांत कालिदासाच्या काळांत-ल्यापेक्षा बौद्धधर्मांची स्थिति जास्त अवनत झाली होती. तरीहि बाण आपल्या हर्षचरितांत वसुबंधूचा कोश व बुद्धजन्मकथात्मक जातकें यांचा निर्देश करतो. (हर्षचरित, निर्णयसागर प्रत, पृ. २३७.) यावरूनहि वरीलच अनुमान निघत नाही काय? जैन धर्माचा प्रसार मात्र माळवा व उज्जयिनी येथे होता की काय याबद्दल आम्हास माहिती नाही; त्यामुळे त्या बाबतींत आम्ही कांही निश्चित लिहूं शकत नाही.

अग्निमित्र हा आदर्शभूत राजा मानतां येईल काय?

येथवर कालिदाससंबंधी जीं अनुमानें अगर आक्षेप होते त्यांचें खंडन केलें. आता मालविकाग्निमित्र नाटकाचें परीक्षण करतांना डॉ० केतकरांनी त्यांतील पात्रांविषयी जे उद्गार काढले आहेत त्यांचा विचार करूं. अग्निमित्र हा तत्कालीन राजनीतीच्या दृष्टीने व कालिदासाच्या मतेंही आदर्शभूत राजा होता असें एक विधान डॉक्टरसाहेबांनी केलें आहे. नाटकांतील नायक नाटककर्त्यांच्या दृष्टीने आदर्शभूत पुरुष असतो अशी डॉ० केतकरांची समजूत दिसते पण ती खरी नाही. तसें असतें तर कालिदासाने अग्निमित्र, पुरूरवस् व दुष्यन्त हे निरनिराळ्या स्वभावाचे पुरुष एकाच विषयांत आदर्श मानले होते असें होईल. कारण तिघांचेंही नाट्यविषयक चरित्र प्रेमकथात्मकच आहे. कर्त्यासवरत्या मुलाचा बाप अन्तःपुरांत अनेक स्त्रिया असतां आणखी एका—तारुण्यांत जिने नुकतेंच पदार्पण केलें आहे अशा—बालिकेवर अनुरक्त होतो, तिच्याशीं चोरून लगट करतांना पकडला गेल्यावर आपल्या स्त्रीच्या पायां पडतो, पण पुनः आपला नाद सोडत नाही, बापाने अश्वमेध यज्ञ आरंभिला असून दिग्विजय करण्याकरिता अश्व सोडला असतां त्याच्या मागे स्वतः जाऊन त्याचें रक्षण करण्याचें स्वतःचें कर्तव्य सोडून आपल्या अल्पवयस्क कुमारास तें कार्य करण्यास पाठवितो, विदर्भ देशावरहि स्वतः स्वारी करीत नाही तर त्यावेळीं अंतःपुरांत प्रेमचेष्टा करण्यांत दंग असतो, अशा विलासी व कर्तव्यशून्य राजाला, आपल्या इतर ग्रंथांत

दिलीप, रघु, राम इत्यादि राजर्षींचीं उदात्त चरित्रें रसाळ वाणीने वर्णन करणारा व परकी क्षत्रप राजांचा पाडाव करून उत्तर हिंदुस्थानांत हिंदूंचें एकच्छत्री साम्राज्य चालविणाऱ्या द्वितीय चंद्रगुप्त-विक्रमादित्याचा आश्रित कालिदास आदर्श मानील असें आम्हांस वाटत नाही. अग्निमित्राचें चित्र पाहून तत्कालीन लोकांस 'राजकारणासाठी नवीन बायको करण्यांत राजाची वैषयिक वृत्ति व्यक्त होत नसून सोशिकपणा व्यक्त होत आहे' असें वाटे, असें जें डॉ. केतकर म्हणतात तें वाचून आम्हांस तर फार हसूं येतें. आधी अग्निमित्राने राजकारणासाठी लग्न केलें असा कोठे निर्देश नाही. माधवसेन आपल्या बहिणीस घेऊन विदिशेस तिचें अग्निमित्राशीं लग्न लावण्यासाठी जात होता असें पहिल्या अंकावरून दिसतें हें खरें. पण तें लग्न राजकारणासाठी कसें हें समजत नाही. माधवसेन विदर्भाच्या कोणत्याहि भागावर राज्य करीत होता असें नाटकावरून दिसत नाही. विदर्भाच्या गादीवर तो हक्क सांगत असावा, पण त्याचें कांही न चालून ती गादी दुसऱ्यासच मिळाली. तेव्हा तो अग्निमित्राचें साहाय्य मागण्याकरिता व त्यासाठी त्या विलासी राजाला आपली बहीण अर्पण करण्याकरिता जात होता; तेव्हा त्याच्या दृष्टीने तें लग्न राजकारणासाठी झालें खरें, पण अग्निमित्राला त्यापासून राजकारणविषयक फायदा झालेला दिसत नाही. नाही म्हणावयाला त्याला विदर्भावर स्वारी करावयास पाहिजे होती ती सबब मात्र मिळाली. आपल्या शेजारच्या राजास आपला शत्रु मानावें ही पुरातन नीति आहे व यामुळे अग्निमित्र 'विदर्भराजा माझा स्वाभाविक शत्रु (प्रकृत्यमित्र) आहे व त्यामुळे त्याच्यावर स्वारी करून त्याचा उच्छेद करण्याचें मी पूर्वीच ठरविलें होतें, तेव्हा त्यावर चालून जाण्यास वीरसेनास आज्ञा कर' असें अमात्यास सांगत आहे. विदर्भ जिंकण्यांत त्याला माधवसेनाचें साह्य झालेलें दिसत नाही व तो जिंकल्यावर माधवसेनास राज्य न देतां दुसऱ्या कोणाहि आपल्या हस्तकास त्यास तें देतां आलें असतें. तेव्हा राजकारणासाठी अग्निमित्राने लग्न केलें असें दिसत नाही. आता मालविकाग्निमित्र नाटकावरून कालिदासकालींहि वृद्ध राजाने राजकारणासाठी लग्न केलें असावें असें डॉक्टर-

साहेब म्हणतात त्याचा विचार करतां असें दिसतें की कालिदासकाळीं राजकारणाकरिता चन्द्रगुप्ताने आपली मुलगी विदर्भाधिपति वाकाटक राजास दिली होती हें खरें; पण स्वतः चन्द्रगुप्ताने आपल्या वृद्धापकाळीं दुसऱ्या राजाच्या अगदी तरुण मुलीशीं लग्न केलें होतें यास पुरावा नाही. तेव्हा अशीं अनुमानें काढण्यांत वेळ खर्च करणें व्यर्थ आहे. अशीं लग्नें करण्यांत राजे लोक सोशिकपणा दाखवितात हें डॉ. केतकरांचें विधान इतकें हास्यास्पद आहे की, त्याचें खंडण करण्याची आवश्यकता नाही.

इरावतीचें सुरापान

कालिदासाने इरावतीस मद्य पिऊन झिंगलेल्या स्थितींत स्टेजवर आणलें त्यांत राणीची चेष्टा करून लोकांत हशा पिकवावा व राणीसहि दारू पिण्यास ऐतिहासिक आधार आहे असें भासवावें व दोहींकडून शाबासकी मिळवावी असा कालिदासाचा उद्देश होता असें डॉ. केतकर म्हणतात. पण तें सयुक्तिक दिसत नाही. संस्कृत कवि तरुण पुरुष व स्त्रिया मद्यप्राशन करून विलास करतात असें वर्णन करतात हें खरें आहे. स्त्रियांच्या बाबतींत मद्य (अर्थात् माफक प्रमाणांतच) पिण्याने नेत्र चंचल होतात; भाषण मधुर व वक्रोक्तिपूर्ण होतें, गति विलासी दिसते व मुख आरक्त होतें–सारांश सौंदर्य जास्त खुलून दिसतें असा एक कविसंप्रदाय होऊन गेलेला दिसतो (काव्यप्रकाशांतील 'मीलित' अलंकाराचें उदाहरण पहा) व असें वर्णन कालिदासाच्या व इतर कवींच्याहि काव्यांत आढळतें. जें श्रव्यकाव्यांत वर्णन दिसतें तेंच दृश्यकाव्यांत म्हणजे नाटकांत कालिदासाने आणलें आहे. यांत दुसराहि कालिदासाचा उद्देश असावा. धारिणी व इरावती या दोन राण्यांच्या स्वभावांमध्ये फार फरक कालिदासाने दाखविला आहे. एक मध्यम वयाची व म्हणून पतीचे प्रेमविषयक चाळे पसंत नसतांहि मालविकेबद्दल जिला मत्सर वाटत नाही 'न मे एष मत्सरस्य कालः' असें म्हणणारी अशी, तर दुसरी तरुण, नृत्यगायनादि शिकणारी व राजाचें प्रेम आपल्यावरून उडून जाऊं नये म्हणून थोरल्या राणीला सांगून मालविकेला बंदिवासांत टाकणारी अशी दाखविली आहे व हा त्यांच्या वयांतील व स्वभावांतील फरक दिसून येण्याकरिता मद्यप्राशन केलेल्या इरावतीस रंगभूमीवर आणलें आहे. ज्यांचें तारुण्य

उलटून गेलें आहे त्या स्त्रिया मद्यप्राशन करीत असत असा कोठेहि उल्लेख नाही. तथापि इरावती झिंगलेल्या अवस्थेंत होती असें डॉक्टर-साहेबांचें म्हणणें अतिशयोक्तीचें आहे. तिसऱ्या अंकांतील तिच्या भाषणांत अगर वर्तनांत असंबद्धता दिसत नाही. झिंगलेल्या माणसाचें भाषण व वर्तन कसें असतें, हें व्यवहारांत रोज दिसणाऱ्या दृश्यांवरून कोणासहि कळेल व संस्कृत नाटकांत हें चित्र पाहावयाचें असल्यास तें इ. स. च्या सातव्या शतकाच्या प्रथमार्धांत होऊन गेलेल्या पल्लवनृपति महेंद्रविक्रम-वर्म्याच्या मत्तविलासप्रहसनांत दिसून येईल. मालविकाग्निमित्रांतील इरावतीच्या वारुणीमदाचें दृश्य प्रेक्षकांना हसविण्याइतकें उत्तान नाही व कालिदासकालीन राणीला मद्य प्यावयाचें होतें तर कालिदासाच्या नाटकांत प्राचीन आधार दिसेपर्यंत ती थांबली असेल असें आम्हांस वाटत नाही. तेव्हा या बाबतींतही डॉक्टर केतकरांचें अनुमान चूक आहे.

समारोप

डॉ० केतकर विद्वान् गृहस्थ आहेत. त्यांनी केलेल्या ज्ञानकोशाच्या प्रचंड कामाबद्दल प्रस्तुत लेखकास त्यांच्याबद्दल अतिशय आदर वाटतो. त्यांनी प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासाचें जें अत्यंत महत्वाचें व दीर्घ परिश्रमाचें काम अंगावर घेतलें आहे त्याबद्दल ते सर्वांच्या स्तुतीस व साहाय्यास पात्र आहेत. त्या कामांत त्यांस निरुत्साह करावें अगर विघ्नें आणावीं असा प्रस्तुत लेखकाचा उद्देश नाही. पण येन केन प्रकारेण नवीन संशोधन करण्याची सवय व थोर पुरुषांवर पुरेशीं कारणें नसतांहि शिंतोडे टाकण्याची आपली वृत्ति त्यांनी टाकली नाही, तर ते सध्या लिहीत असलेला प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास अत्यंत विकृत रूपानें बाहेर पडण्याचा संभव आहे. याबद्दल त्यांस वेळींच सूचना देणें आपलें कर्तव्य आहे असें प्रस्तुत लेखकास वाटत असल्यामुळे त्यानें ही विस्तृत लेखमाला लिहून वाचकांस शीण दिला आहे. यांत परीक्षणाच्या ओघांत अधिकउणा शब्द येऊन गेला असल्यास डॉक्टरसाहेबांनी त्यास क्षमा करावी. शेवटीं या प्रसंगानें कविकुलगुरूच्या कृतींचें जास्त परिशीलन करण्याचा योग डॉ० केतकरांनी आणून दिला याबद्दल त्यांचे आभार मानून लेखणी खाली ठेवतों.

कालिदास आणि अश्वघोष*
श्री. अ. ज. करंदीकर यांस उत्तर

'दृष्टपूर्वा अपि ह्यर्थाः काव्ये रसपरिग्रहात् ।
सर्वे नवा इवाभान्ति मधुमास इव द्रुमाः ॥ '

आनन्दवर्धन, ध्वन्यालोक, ४, ४.

कालिदास आणि अश्वघोष यांच्या पौर्वापर्याचा विचार करणारा श्री. अ. ज. करंदीकर याचा लेख 'सह्याद्री'च्या गेल्या जून महिन्यांत (१९४८, पृष्ठ २८२) प्रसिद्ध होऊन अनेक महिने झाले. पण तेव्हापासून अनेक कार्यांत व्यग्र असल्याने हें काम मागे पडलें; तथापि 'अकरणान्मन्दकरणं श्रेयः' असें वाटून येथे थोडक्यांत उत्तर देत आहें.

उचलेगिरी कां म्हणतां ?

कालिदास किंवा अश्वघोष यांपैकी कोणीहि दुसऱ्याची नक्कल केली असली किंवा त्याचे कांही शब्दप्रयोग घेतले असले, तरी त्या प्रकाराला 'उचलेगिरी' किंवा 'वाङ्मयचौर्य' म्हणणें योग्य होणार नाही. नाही तर या उचलेगिरीचा आरोप अनेक महनीय संस्कृत ग्रंथकारांवर लागू होईल. योगायोगाची गोष्ट ही की, श्री. करंदीकर यांचा वरील लेख 'सह्याद्रीं'त प्रसिद्ध झाला याच सुमारास प्राध्यापक पी. एस्. शास्त्री यांचा 'मॉडर्न् रिव्हयू' (मे, १९४८) च्या अंकांत 'संस्कृत वाङ्मयांतील उचलेगिरी' (Plagiarism in Sanskrit Litera-

* 'सह्याद्रि' पुणें, मार्च १९४९, पृ. ३०–३३

ture) या शीर्षकाखाली एक लेख प्रकाशित झाला. त्यामध्ये त्यांनी यास्काच्या 'निरुक्तां'तून 'महाभाष्य'कार पतंजलि व पूर्वमीमांसासूत्रकार जैमिनि यांनी कांही भाग घेतल्याचें दाखविलें आहे. याशिवाय कालिदासाचें भारवीने, भारवीचें माघाने, भारवि व माघ यांचें श्रीहर्षाने, अनुकरण केल्याचें त्यांनी सांगितलें आहे. तसेंच शास्त्रीय वाङ्मयांत मधुसूदनसरस्वतीने आपल्या भगवद्गीताटीकेंत विद्यारण्याच्या जीवन्मुक्तिविवेकांतून व नागोजीभट्टाने आपल्या काव्यप्रकाशटीकेंत रसगंगाधरांतून कित्येक उतारे उचलून घेतलेले अभ्यासकांना आढळतात. हे सर्व ग्रंथकार आपापल्या ग्रंथनिर्मितीने आपणांस आदरणीय झाले आहेत. त्यांना 'वाङ्मयचोर' म्हणणें योग्य होणार नाही. यासारखे समान उतारे आम्ही आपल्या विद्यार्थिदशेंत गुरुवर्य म. म. श्रीधरशास्त्री पाठक यांस दाखविले तेव्हा ते म्हणाले, "ग्रन्थस्य ग्रन्थान्तरं टीका ". याच आशयाचें 'सर्वोऽपि परेभ्य एव व्युत्पद्यते' असें राजशेखराचें वचन आम्ही आपल्या ग्रंथांत दिलें होतें. संस्कृत ग्रंथकारांना तात्त्विक विचारांचा किंवा कल्पनांचा मक्ता मान्य नव्हता. किंबहुना मूळ कल्पना तीच असली तरी तिला रसभावादिकांच्या योजनेने नवीनता प्राप्त होते असें सुप्रसिद्ध साहित्यशास्त्रकार सहृदयमूर्धन्य आनन्दवर्धन याने या लेखाच्या आरंभीं दिलेल्या कारिकेंत म्हटलें आहे व त्याचीं अनेक उदाहरणेंहि त्याने आपल्या 'ध्वन्यालोकां'त दिलीं आहेत. त्यांपैकी एक तर खुद्द कालिदासाच्या ग्रंथांतील 'एवंवादिनि देवर्षौ पार्श्वे पितुरधोमुखी । लीलाकमलपत्राणि गणयामास पार्वती ॥' (कुमारसंभव, ६, ८४) हा सुप्रसिद्ध श्लोक असून त्यांत तत्पूर्वीची कल्पना व्यङ्ग्यार्थामुळे अभिनव झाल्याचें दाखविलें आहे. आनन्दवर्धन म्हणतो, 'कवींच्या काव्यांमध्ये कल्पनासंवाद असणारच, पण त्यामुळे सर्वत्र त्या कल्पना एकच आहेत, असें शहाण्याने मानूं नये.' संवाद किंवा कल्पनासाम्य हें तीन प्रकारचें असतें—

(१) बिंबप्रतिबिंब रूपाचें, (२) वस्तु व तिचें चित्र या प्रकारचें, व (३) सारख्या दिसणाऱ्या भिन्न व्यक्तींचें. यांपैकी पहिलीं दोन त्याज्य असून तिसरें मात्र ग्राह्य आहे. त्या तऱ्हेचें कल्पनासाम्य कवीने टाकूं नये असा उपदेश आनंदवर्धनाने स्पष्ट शब्दांत केला आहे.

आनन्दवर्धन पुढे म्हणतो—

यदपि तदपि रम्यं यत्र लोकस्य किञ्चित्
स्फुरितमिदमितीयं बुद्धिरभ्युज्जिहीते।
अनुगतमपि पूर्वच्छायया वस्तु तादृक्
सुकविरुपनिबध्नन् निन्द्यतां नोपयाति ॥
ध्वन्यालोक, ४, १६.

[कवीने पूर्वीची कल्पना अंशतः घेतली असली तरी त्याच्या वर्णनामध्ये रम्य प्रतिभास्फुरणाची प्रतीति सहृदयांना होत असेल तर तो कवि दोषी होत नाही.] आनन्दर्धनाचें स्पष्ट मत असें आहे. आम्ही आपल्या ग्रंथांत अन्य पुराव्यांनी अश्वघोषाचें कालिदासपूर्वगामित्व सिद्ध केल्यावर अश्वघोष व कालिदास यांच्या काव्यांतील कांही समान स्थळें दिलीं आहेत. त्यांवरून 'कालिदासाने अश्वघोषाच्या काव्याचा चांगलाच अभ्यास केलेला दिसून येईल. या अभ्यासामुळे रमणीय कल्पना व कांही शब्दसमूह याप्रमाणेच अश्वघोषाच्या कांही विशिष्ट लकबाहि कालिदासाच्या काव्यांत आलेल्या दिसतात,' असें म्हणून त्यांचीं कांही उदाहरणेंहि दिलीं होतीं व 'अश्वघोषाचे दोष टाळून व मधुकर वृत्तीने त्याच्या काव्यांतील सुंदर असाच भाग घेऊन कालिदासाने आपले ग्रंथ रचले' असें म्हटलें होतें. यामुळे त्या कविवर्याची निंदा कशी होते तें आम्हांस समजत नाही.

अश्वघोष व कालिदास यांच्यांत फरक कोणता ?

पण 'अशा कल्पना व शब्दसमूह घेण्याची सवय परोपजीवि अश्वघोषाला होती, कालिदासाला नव्हती,' असें श्री. करंदीकर म्हणतात व तें सिद्ध करण्याकरिता 'ललितविस्तर' व 'बुद्धचरित' यांतील कल्पनासाम्य पुढे करतात. कालिदासाने मात्र व्यासवाल्मीकि वगळून दुसऱ्या कवींच्या उक्तींची उचलगिरी केलेली दाखवा असें आव्हान देतात. 'ललितविस्तर' व 'बुद्धचरित' यांचा विषय एकच असल्याने त्या दोन ग्रंथांत अनेक ठिकाणीं कल्पनासाम्य दिसलें तर नवल नाही. तसाच

प्रकार 'वाल्मीकिरामायण' व 'रघुवंश' या ग्रंथांत दिसतो. या दोन ग्रंथांतील विविध साम्य संशोधकांनी दाखविलें आहे व तें श्री. करंदीकरांनाहि मान्य आहे, म्हणून त्याचीं उदाहरणें येथे देत नाही. या विषयावर एक उत्कृष्ट लेख प्राच्यविद्यापरिषदेच्या नागपूरच्या अधिवेशनांत वाचला होता. त्यांत याचीं अनेक उदाहरणें जिज्ञासूंस सापडतील. कालिदासाने वाल्मीकीच्या ग्रंथांतून 'उक्तींची उचलेगिरी' केली तरी चालते, अश्वघोषाने मात्र 'ललितविस्तरां'तून अशी उसनवारी करणें अक्षम्य, हा कोठला न्याय? पण 'याशिवाय डॉ. विमलाचरणांनी भगवद्गीता, श्वेताश्वतर उपनिषद्, मज्झिमनिकाय, महानिद्देस, थेरीगाथा, दिव्यावदान इत्यादि ग्रंथांतून अश्वघोषाने केलेल्या उचलेगिरीची भरपूर उदाहरणें दाखवून दिलीं आहेत. तेव्हा अश्वघोष हा परोपजीवी लेखक होता हें सिद्ध करीत बसण्याची आता कांहीच आवश्यकता उरली नाही' असें श्री. करंदीकर म्हणतात. 'आमचा कालिदास त्या मानाने फारच सोज्ज्वळ! त्याने फक्त दोनच पूर्वगामी कवींच्या उक्तींची उचलेगिरी केली आहे' असें त्यांचें म्हणणें आहे. तें खरें आहे काय हें आपण पाहूं.

कालिदासाने उपनिषदें व भगवद्गीता यांचा चांगलाच अभ्यास केला होता. त्यामुळे त्याच्या ग्रंथांत त्यांतील पारिभाषिक संज्ञा व तत्त्वज्ञानाच्या कल्पना आढळतात हें आम्ही सविस्तरपणे 'कालिदास' ग्रंथांत (पृ. ७७ व २६५) दाखविलें होतें. याशिवाय कौटिल्याचें अर्थशास्त्र व वात्स्यायनाचें कामसूत्र यांतूनही कांही कल्पना व शब्दप्रयोग त्याने घेतले आहेत; असें संशोधकांनी दाखविलें आहे. उदाहरणार्थ, खालील उतारे पाहा—

कौटिल्य व कालिदास

(१) कौटिल्य–नवस्तु राजा...प्रकृतिष्वरूढः सुखमुच्छेत्तुं भवति।

अर्थशास्त्र, ८, २.

कालिदास—अचिराधिष्ठितराज्यः शत्रुः प्रकृतिष्वरूढमूलत्वात्। नवसंरोपणशिथिलस्तरुरिव सुकरः समुद्धर्तुम्॥ मालविकाग्निमित्र, १.

(२) कौटिल्य—तेजो हि सन्धानकारणम्। नातप्तं लोहं लोहेन सन्धत्त इति। अर्थशास्त्र ७, ३.

कालिदास—तप्तेन तप्तमयसा घटनाय योग्यम्।

विक्रमोर्वशीय, २, १६.

(३) कौटिल्य—आपन्नसत्त्वायां कौमारभृत्यो गर्भभर्माणि प्रजनने च वियतेत। अर्थशास्त्र, १, १६.

कालिदास—कुमारभृत्याकुशलैरनुष्ठिते भिषग्भिराप्तैरथ गर्भभर्मणि॥ रघुवंश, ३, १२.

(४) कौटिल्य—स्थिरकर्मा नासमाप्य कर्म उपरमते।

अर्थशास्त्र, ७,८.

कालिदास—न नवः प्रभुराफलोदयात् स्थिरकर्मा विरराम कर्मणः॥

रघुवंश, ८, २२.

(५) कौटिल्य—पुत्रीयं वा कर्म राजा साधयतीति अपदेशेन... प्रकृतीनां दर्शयेत्। अर्थशास्त्र, ५, ६.

कालिदास—बाढमेषु दिवसेषु पार्थिवः कर्म साधयति पुत्रजन्मने।

रघुवंश, १९, ५२.

वात्स्यायन व कालिदास

वात्स्यायन—श्वश्रूश्वशुरपरिचर्या तत्पारतन्त्र्यमनुत्तरवादिता।... भोगेष्वनुत्सेकः। परिजने दाक्षिण्यम्।...नायकापचारेषु किञ्चित्कलुषिता नात्यर्थं निवदेत्। कामसूत्र, पृ. २३९–२३६.

कालिदास—शुश्रूषस्व गुरून् कुरु प्रियसखीवृत्तिं सपत्नीजने
भर्तुर्विप्रकृताऽपि रोषणतया मा स्म प्रतीपं गमः।
भूयिष्ठं भव दक्षिणा परिजने भोगेष्वनुत्सेकिनी
यान्त्येवं गृहिणीपदं युवतयो वामाः कुलस्याधयः॥

शाकुन्तल, ४, १७.

वरील उताऱ्यांतील कल्पनासाम्य व उक्तिसाम्य श्री. करंदीकरांनी दाखविलेल्या अश्वघोष व कालिदास यांच्या काव्यांतल्या साम्यापेक्षा कमी आश्चर्यकारक आढळणार नाही. अर्थशास्त्र व कामसूत्र यांचे विषय अनुक्रमें राजनीति व स्त्रीपुरुषव्यवहार असल्याने त्या ग्रंथांच्या कर्त्यांनी कालिदासाच्या ग्रंथांतून त्या कल्पना व उक्ति घेतल्या असें कोणी सुज्ञ वाचक सहसा म्हणणार नाही. शिवाय यांपैकी कौटिल्य हा खिस्तपूर्व चौथ्या शतकांत होऊन गेला असें 'हिंदुनिंदक' पाश्चात्य विद्वान् म्हणत नसून भारतीय पंडित म्हणतात, तेव्हा हें 'देशी' संशोधकांचें म्हणणें श्री. करंदीकर मान्य करतीलच. वात्स्यायन इ. स. २५० च्या सुमारास होऊन गेला, हेंहि 'देशी' संशोधकांचेंच म्हणणें आहे. तेंहि मान्य केल्यास कालिदास गुप्तकाळांतील अर्थात् अश्वघोषानंतरचा ठरेल.

भास व कालिदास

पण, कौटिल्य व वात्स्यायन हे कांही झालें तरी कवि नव्हत. तेव्हा कालिदासाने व्यास–वाल्मीकि वगळून दुसऱ्या कवींच्या उक्तींची उचलेगिरी केली नाही, या आमच्या विधानाला वरील साम्यस्थळांनी बाध येत नाही, असें श्री. करंदीकर कदाचित् म्हणतील; तेव्हा त्यांना भास व कालिदास यांच्या ग्रंथांतील खालील साम्यस्थळें पाहण्याची विनंती करतो.

भास—कालक्रमेण जगतः परिवर्तमाना चक्रारपंक्तिरिव गच्छति भाग्यपंक्तिः ॥ स्वप्नवासवदत्त, १, ४.

कालिदास—कस्यैकान्तं सुखमुपनतं दुःखमेकान्ततो वा नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण ॥ मेघदूत, ११४.

भास—विस्रब्धं हरिणाश्चरन्त्यचकिता देशागतप्रत्ययाः ।
स्वप्नवासवदत्त, १, १२.

कालिदास—विश्वासोपगमादभिन्नगतयः शब्दं सहन्ते मृगाः ।
शाकुन्तल, १, १४.

भास—सकाम इदानीमार्ययौगंधरायणो भवतु । स्वप्न. १.

कालिदास—काम इदानीं सकामो भवतु येनासत्यसंधे जने सखी पदं कारिता । शाकुन्तल ४.

त्रिवेंद्रम् ग्रंथावलींतील इतर नाटकांच्या भासकर्तृकत्वाविषयी विद्वानांमध्ये ऐकमत्य नसलें तरी ‘स्वप्नवासवदत्त’ हें भासाचेंच याविषयी आता कोणी संशय घेत नाही. भास आपणापूर्वी पुष्कळ काळ होऊन गेला, असें स्वतः कालिदासानें आपल्या मालविकाग्निमित्रांत म्हटलें आहे, तेव्हा वरील उताऱ्यांतील उसनवारीबद्दल संशय राहूं नये.

आपल्या ग्रंथांतील कल्पनास्वातंत्र्याविषयी स्वतः कालिदासाची साक्ष घेतली तर तो काय सांगेल पहा—

अथवा कृतवाग्द्वारे वंशेऽस्मिन् पूर्वसूरिभिः ।
मणौ वज्रसमुत्कीर्णे सूत्रस्येवास्ति मे गतिः ॥ रघु. १, ४.

या श्लोकावरून कालिदासानें आपलें रघुवंश काव्य केवळ वाल्मीकीच्या रामायणावरून रचलें असें दिसत नाही. त्याला इतरहि प्राचीन ग्रंथांचे आधार असावेत. याविषयी विवेचन ‘कालिदास’ ग्रंथांत (पृ. १२६–२७) केलें आहे तें पाहावें.

अशा कल्पना कितीशा आहेत ?

पण ‘कांही झालें तरी कालिदासानें उचलेगिरी केली ती हिंदुग्रंथांतून. अश्वघोषानें तशी बौद्ध ग्रंथांतून केली असती तर आम्ही क्षम्य मानली असती. पण त्यानें हिंदुग्रंथांतून उसनवारी केली हें अत्यंत गर्ह्य !’ असें कदाचित् श्री. करंदीकर म्हणतील. शिवाय अश्वघोषानें कांही केलें असलें तरी ‘आमचा हिंदु कालिदास अश्वघोषासारख्या बौद्ध भिक्षूच्या दाराशीं तिष्ठत होता, ही कल्पना तरी आमच्या विश्वविद्यालयांतील आचार्यांस करवते कशी ?’ असें श्री. करंदीकर विचारतात ! पण बौद्ध झाले तरी भारतीयच ना ? प्राचीन काळीं बौद्ध व हिंदु हे अत्यंत भिन्नवंशी

व परस्परांचे शत्रु अशी द्विराष्ट्रवादाची कल्पना प्रचलित नव्हती. बुद्धाला 'सर्वश्रेष्ठ हिंदु' असें एका विद्वानाने म्हटलें आहे तें खोटें नाही. त्याने प्रतिपादिलेली अहिंसा जातिभेदोच्छेद इत्यादि तत्त्वें आता बहुजनसंमत झालीं आहेत. प्राचीन काळीं हिंदु राजांनी बौद्ध मठांस व बौद्ध राजांनी ब्राम्हणांस अनेक दानें दिलेलीं आढळतात. तेव्हा कालिदासाने अश्वघोषाचीं काव्यें वाचून त्यांतील कांही कल्पना व उक्ति आपल्या ग्रंथांत घेतल्या असल्यास आपण 'अब्रह्मण्यम्' म्हणूं नये! शिवाय या अशा कल्पना तरी कितीशा आहेत, की ज्या निर्विवादपणे उसनवारीच्या ठरतील ? त्याशिवाय या दोन कवींच्या काव्यांत कांही उत्कृष्ट भाग आहे किंवा नाही ? असल्यास या तथाकथित 'उचलेगिरी'बद्दल इतकी खळखळ कशाला !

अश्वघोषाच्या काव्यांत एकदोन ठिकाणीं रघुवंश व कुमारसंभव यांतील उपमा व प्रसंग—उदाहरणार्थ, श्रीशंकराच्या कटाक्षाने स्तंभित झालेला इंद्राचा बाहु (रघु., २, ४२) व मदनाच्या बाणामुळे झालेलें त्यांच्या चित्ताचें चंचलत्व (कुमार., ३, ६७)—उल्लेखिले आहेत, असें श्री. करंदीकरांनी दाखविलें आहे व त्यावरून अश्वघोषाला हीं काव्यें अवगत होतीं असें अनुमान केलें आहे. पण या उदाहरणांवरून उसनवारीचा आरोप सिद्ध होत नाही. 'बुद्धचरितां'त प्रसंगोपात्त इतके विविध प्राचीन कथासंदर्भ आले आहेत, की त्यावरून अश्वघोषाला अशा अनेक प्राचीन कथांची माहिती होती (बुद्धचरित, ४, १६–२०; ४, ७२–८०; ९, ६९–७०) याचा प्रत्यय येतो. तेव्हा दोन–चार संदर्भांकरिता त्याला कालिदासाचा ऋणी मानणें योग्य होणार नाही.

स्वतंत्र ऐतिहासिक प्रमाणें पाहिजेत

वास्तविक अश्वघोष व कालिदास यांचें पौर्वापर्यत्व अशा उताऱ्यांतील साम्यावरून निश्चितपणें ठरवितां येणें अशक्य आहे. त्याकरिता स्वतंत्र ऐतिहासिक प्रमाणांची आवश्यकता आहे. अशीं कांही प्रमाणें 'कालिदास' ग्रंथांत दिलीं आहेत. कालिदास गुप्तकालांत होऊन गेला

असें सिद्ध करणारा निर्विवाद तत्कालीन पुरावा अद्यापि मिळाला नसला—व तो कधीकाळीं मिळेल काय याची शंका आहे—तरीहि त्या मताला उपोद्बलक असा पुरावा दिवसेंदिवस जास्त उपलब्ध होत आहे. त्यामुळे त्या मताला अधिकारी विद्वानांत मान्यता मिळत आहे. हे सर्व विद्वान् परप्रत्ययनेय बुद्धीचे आहेत असें म्हणणें धाष्टर्याचें आहे. वास्तविक या बाबतींत पुणेरी व इतर विद्वान् असा भेद नसून परंपरावादी व ऐतिहासिक दृष्टीचे असा भेद आहे. उपलब्ध पुराव्याचें ऐतिहासिक दृष्टीने परीक्षण केल्यास त्यांचें योग्य महत्त्वमापन होतें. नाही तर ज्योतिर्विदाभरण व कथासरित्सागर यांतील भाकडकथा तत्कालीन प्राचीन कोरीव लेखांच्या पुराव्यापेक्षा जास्त विश्वसनीय वाटूं लागतात. तेव्हा या दृष्टीने निर्विकार मनाने या प्रश्नाचा विचार करावा अशी श्री. करंदीकरांस विनंती करून हा लांबलेला लेख पुरा करतों.

कालिदास आणि अश्वघोष*

प्रा. कृ. मो. शेंबवणेकर यांस उत्तर

'प्रसाद' मासिकाच्या गेल्या फेब्रुवारीच्या अंकांत प्रा. कृ. मो. शेंबवणेकर यांचा वरील विषयावर लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत आमच्यावर टीका असल्याने त्याला लागलीच उत्तर देणें जरूर होतें. पण इतर महत्त्वाच्या कामांमुळे व आमच्या प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे तें लांबणीवर पडलें. पण विलंब झाला तरी सत्यान्वेषणाकरिता प्रा. शेंबवणे-करांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांस उत्तर देणें अवश्य असल्यामुळे तें येथे थोडक्यांत देत आहों.

प्रा. शेंबणेकर म्हणतात की, 'अश्वघोषाचें काव्य किंवा नाटक बौद्ध लोकांपेक्षा इतर लोकांस माहीत असावें असें दिसत नाही. किंबहुना कोणत्याहि ब्राम्हण पंडिताने कोणत्याहि जैन किंवा बौद्ध कवीच्या काव्याचा अभ्यास केल्याचा यत्किंचितहि पुरावा नाही.' याला प्रमाण म्हणून त्यांनी असें म्हटलें आहे की, संस्कृत अलंकारशास्त्रकर्ते व सुभाषितसंग्रहकार यांच्या ग्रंथांत अश्वघोषाचें किंवा त्याच्या ग्रंथाचें नांवहि आढळत नाही किंवा त्यांनी त्याच्या ग्रंथांतून कांहीसुद्धा उदाहरण दिलेलें नाही.' हें प्रमाण त्यांना इतकें 'रामबाण' वाटतें की, 'प्रा. मिराशी जर या अडचणीचा समाधानकारक खुलासा करतील तरच त्यांच्या एतद्विषयक मताला कांही किंमत राहील' असें त्यांनी म्हटलें आहे. तेव्हा त्याचा जरा विस्तारपूर्वक विचार करूं.

*'प्रसाद', पुणें, जुलै, १९५०, पृ. २५–२८

प्रा. शेंबवणेकरांचें वरील विधान खरें असतें (तें तसें नाही हें आम्ही पुढे दाखविणार आहों) तरी त्यापासून अश्वघोषाचे ग्रंथ बौद्ध लोकांपेक्षा इतरांस माहीत नव्हते हें अनुमान काढतां आलें नसतें. हें प्रमाण अभावात्मक (argumentum ex silentio) आहे. वरील ग्रंथकारांनी अश्वघोषाचा किंवा त्याच्या ग्रंथांचा निर्देश केलाच पाहिजे होता असें दाखविल्याशिवाय या अभावात्मक प्रमाणावरून कोणतेंहि निश्चित अनुमान काढणें योग्य होणार नाही. कालिदासाचा नामनिर्देश इ. स. च्या सातव्या शतकापूर्वी आढळत नाही. तेव्हा तो त्यापूर्वी होऊन गेला नव्हता असें म्हणण्याइतकेंच वरील विधान हास्यास्पद होईल.

आम्हीं आपल्या लेखांत दाखविल्याप्रमाणे हिंदु व बौद्ध ग्रंथकार हे परस्परद्वेष्टे नसून एकमेकांचे ग्रंथ अभ्यासीत असत व त्यांवर क्वचित् टीकाहि लिहीत. सुप्रसिद्ध साहित्यशास्त्रकार आनंदवर्धन याने बौद्ध धर्मकीर्तीच्या प्रमाणविनिश्चय नामक ग्रंथावरील धर्मोत्तमा टीकेवर विवृत्ति लिहिली होती, अमरकोशकार बौद्ध होता तरी त्याच्या ग्रंथावर अनेक हिंदु टीकाकारांनी टीका लिहिल्या आहेत. व्याकरणशास्त्र, अलंकारशास्त्र, इत्यादि इतर शास्त्रांतील ग्रंथांवरूनहि हीच गोष्ट दिसून येते. अशी परिस्थिति असतां बौद्ध काव्यनाटकादिकांवर मात्र हिंदु कवि, आलंकारिक व सुभाषितकार यांनी कडकडीत बहिष्कार घातला असेल हें संभवनीय नाही असेंच कोणीहि म्हणेल.

पण या बाबतींत केवळ अनुमानावर अवलंबून राहण्याचें कारण नाही. कारण अश्वघोषाच्या ग्रंथांतील उतारे उत्तरकालीन ग्रंथकारांच्या ग्रंथांत थोडयाबहुत प्रमाणांत आढळतात. त्यावरून प्रा. शेंबवणेकरांचें विधान **निखालस खोटें** आहे हें दिसून येईल.

'कवींद्रवचनसमुच्चय' या सध्या उपलब्ध असलेल्यांपैकी अत्यंत प्राचीन श्लोकसंग्रहांत खालील श्लोक **अश्वघोषाच्या नांवावर** दिला आहे—

आबाहूद्गतमण्डलाग्ररुचयः संनद्धवक्षःस्थलाः
सोष्माणो व्रणिनो विपक्षहृदयप्रोन्माथिनः कर्कशाः ।

उत्सृष्टाम्बरदृष्टविग्रहभरा यस्य स्मराग्रेसरा
मारा वारवधूस्तनाश्च न दधुः क्षोभं स वोऽव्याज्जिनः ॥

'कवीन्द्रवचनसमुच्चय'कार हा स्वतः बौद्ध असल्याने त्याने आपल्या ग्रंथारंभीं बुद्धवर्णनपर श्लोक दिले आहेत, त्यांत हा प्रथम दिला असून तो अश्वघोषाने रचला असें स्पष्ट म्हटलें आहे. या श्लोकांत बुद्धाला मोह पाडण्याकरिता माराने पाठविलेल्या सैनिकांचें व वेश्यास्तनांचें श्लेषमय शब्दांत वर्णन केलें आहे. हा श्लोक अश्वघोषाच्या सध्या उपलब्ध असलेल्या काव्यांत सापडत नसला तरी त्याने रचलेल्या इतर काव्यांतून किंवा सुभाषितांतून तो घेतला असणें असंभवनीय नाही.

अश्वघोषाचा हा बुद्धस्तुतिपर श्लोक हिंदु आलंकारिकांच्या ग्रंथांत व सुभाषितसंग्रहांत घेतलेला आढळतो. उदाहरणार्थ, इ. स. च्या आठव्या शतकांत होऊन गेलेल्या वामनाच्या 'काव्यालंकारसूत्रवृत्तीं'त (अधि. ४, अ. ३, सू. ७) व त्यानंतरच्या वल्लभदेवाच्या 'सुभाषितावलीं'त (श्लो. ७४) तो किंचित् पाठभेदाने (उदाहरणार्थ, शेवटच्या पादांतील 'मारा' बद्दल 'योधा' घालून) दिला आहे. हे दोन्ही ग्रंथकार हिंदु किंवा, शेंबवणेकर म्हणतात त्याप्रमाणे, ब्राह्मणमतानुयायी होते, हें त्यांच्या ग्रंथारंभींच्या श्लोकांवरून स्पष्ट दिसतें. वल्लभदेवाने तर हा श्लोक 'भदन्त अश्वघोषाचा' आहे असें स्पष्ट म्हटलें आहे.

याशिवाय आणखी पांच श्लोक—कदर्थितस्यापि हि धैर्यवृत्तेः इ. (५२८), जयन्ति जितमत्सराः इ. (१९८), जातश्च नाम न विनङ्क्ष्यति इ. (५२९), नैवाकृतिः फलति इ. (३१००), व्यायस्यन्नपि कश्चिद् (३१४२) —'भदन्त अश्वघोषा'च्या नांवावर वल्लभदेवाच्या सुभाषितावलींत दिले आहेत. त्यावरून हिंदु सुभाषितकारांनी बौद्ध कवींच्या काव्यांवर बहिष्कार घातला होता हें प्रा. शेंबवणेकरांचें म्हणणें लटकें पडतें.

पण किती झालें तरी वरील श्लोक अश्वघोषाच्या उपलब्ध ग्रंथांत सापडत नसल्यामुळे अश्वघोषाचे ग्रंथ बौद्धांखेरीज इतर लोकांत प्रचलित नव्हते या आमच्या म्हणण्यास बाध येत नाही; असें प्रा. शेंबवणेकर

कदाचित् म्हणतील, म्हणून अश्वघोषाच्या 'बुद्धचरित' व 'सौन्दरनन्द' या उपलब्ध काव्यांतील उतारे हिंदु ग्रंथकारांच्या ग्रंथांत घेतलेले आता दाखवितों—

बुद्धचरितांत (सर्ग ८, श्लो. २५) खालील श्लोक सिद्धार्थ अरण्यांत निघून गेल्यावर अन्तःपुरांतील स्त्रियांच्या शोकवर्णनांत आला आहे.—

हतत्विषोऽन्याः शिथिलांसबाहवः
स्त्रियो विषादेन विचेतना इव ।
न चुक्रुशुर्नाश्रु जहुर्न शश्वसु-
र्न चेलुरासुर्लिखिता इव स्थिताः ॥

हा श्लोक राजशेखराच्या 'काव्यमीमांसें'त (गायकवाड संस्कृत सीरीज, पृ. १८) 'आख्यातकवी'च्या काव्याचें उदाहरण म्हणून थोड्या पाठभेदाने आला आहे. राजशेखर हा ब्राह्मण कवि इ. स. च्या दहाव्या शतकांत होऊन गेला. त्या काळापर्यंत तरी अश्वघोषाचे ग्रंथ केवळ बौद्ध लोकांच्याच नव्हे तर ब्राह्मण पंडितांच्याही वाचनांत येत होते हें यावरून स्पष्ट होईल.

पण वरील श्लोक राजशेखराच्या अलंकारग्रंथांत आला असला तरी तो अश्वघोषाच्या 'बुद्धचरितां'तूनच घेतला असें त्यांत म्हटलें नाही. तेव्हा राजशेखराला तो कोणा हिंदु कवीने रचला असावा असें वाटून त्याने त्याचा अंतर्भाव आपल्या ग्रंथांत केला असावा, असे प्रा. शेंबवणेकर कदाचित् म्हणतील; तेव्हा अश्वघोषाच्या ग्रंथांतून नामनिर्देशपूर्वक घेतलेले कांही उतारे दाखवितों—

अमरकोशावर वन्द्यघटीय-सर्वानन्द याची 'टीकासर्वस्व' नांवाची टीका प्रकाशित झाली आहे. तींत—

शाकवृक्षप्रतिच्छन्नं वासं यस्माच्च चक्रिरे ।
तस्मादिक्ष्वाकुवंश्यास्ते भुवि शाक्या इति स्मृताः ॥

हा श्लोक **सौन्दरनन्द काव्यांतील** म्हणून दिला आहे व तो त्या काव्याच्या प्रकाशित आवृत्तींत (सर्ग १, श्लो. २४) आढळतो. याशिवाय त्या टीकेंत बुद्धचरितांतून नामनिर्देशासह दोन श्लोकार्ध घेतले आहेत. अमरकोशांत (३, ३, ५) पुलाक याचा 'संक्षेप' असा एक अर्थ दिला

आहे. त्याचें उदाहरण म्हणून "तथा च बुद्धचरिते 'निबोध किञ्चित्तु पुलाकमात्रं वाक्यं मुनेर्वाक्यविदां वरस्य' इति" असें दिलें आहे. तसेंच अमरकोश (१, १,) यांत दिलेल्या दिवौकस् या शब्दाची व्युत्पत्ति देतांना द्यौरोकः स्थानं येषां ते दिवोकसः अकारान्तोऽपि दिवशब्दोऽस्ति तदा च दिवौकस इत्यपि स्यात्। तथा हि **बुद्धचरिते** 'न शोभते तेन हि नो विना पुरं मरुत्वता वृत्रवधे यथा दिवम्।' असा श्लोकार्ध दिला आहे व तो बुद्धचरितांत (८, १३) आढळतो. हाच श्लोकार्ध मल्लिनाथानेहि रघुवंश (सर्ग १०, श्लो.७) या श्लोकावरच्या टीकेंत **बुद्धचरितांतील** म्हणून दिला आहे. बुद्धचरिताचा बौद्धेतर लोकांत प्रचार नसता किंवा त्यांतील शब्दप्रयोगाला महत्त्व नसतें तर हे श्लोकार्ध सर्वानन्द व मल्लिनाथ ह्या हिन्दु टीकाकारांनी आपापल्या टीकांत उद्धृत केले नसते. तेव्हां अश्वघोषाच्या वरील ग्रंथांचा निदान सर्वानन्दाच्या काळापर्यंत (इ. स. चें बारावें शतक) तरी चांगलाच सूक्ष्म अभ्यास होत असे, हें स्पष्ट होईल.

'कालिदासानें व्यास–वाल्मीकि वगळून इतर कोणाचेंही अनुकरण केलें नाही' हें श्री. करंदीकरांचें विधान कसें असत्य आहे हें दाखविण्याकरिता आम्ही कालिदासाच्या ग्रंथांतील कांही उताऱ्यांचें कौटिल्याचें 'अर्थशास्त्र', वात्स्यायनाचें 'कामसूत्र' व भासाचें 'स्वप्नवासवदत्त' यांतील समानार्थक उताऱ्यांशी कसें शब्दसाम्य व अर्थसाम्य आहे हें सविस्तर दाखविलें होतें ('सह्याद्रि', मार्च १९४९, पृ.१८४ पहा). त्यावर प्रा. शेंबवणेकरांचें उत्तर मासलेवाईक आहे, व तें त्यांच्या सत्यान्वेषणप्रवृत्तीवर उत्कृष्ट प्रकाश पाडतें. अर्थशास्त्रांतील उताऱ्यांत दिसणाऱ्या विलक्षण शब्दार्थसाम्याविषयी ते म्हणतात, 'अहो, तें व्युत्पत्तिप्रदर्शन आहे!' पण व्युपत्तिप्रदर्शन असलें तरी तें त्याच शब्दांत असलें पाहिजे असा कोठे नियम आहे? अशा ठिकाणीं पूर्वीच्या ग्रंथांतील शब्दरचना अभावितपणें कालिदासाच्या ग्रंथांत आली असेल, तर त्यांमध्ये अश्वघोषाच्या काव्यांतूनही ती तशी क्वचित् ठिकाणीं आली असल्यास तिजबद्दल इतकी खळखळ कशाला?

वात्स्यायनाच्या कामसूत्रांतहि वरील प्रकारचेंच विलक्षण शब्दार्थसाम्य आढळतें. त्याविषयीं प्रा. शेंबवणेकर म्हणतात, 'वात्स्यायनाने

पूर्वीच्या ग्रंथकारांचीं वचनें व परिभाषा जशींच्या तशींच घेतलीं असावीं. पण वात्स्यायनाचीं उल्लिखित वचनें तशीं घेतलीं होतीं हें सिद्ध करण्याची जबाबदारी शेंबवणेकरांवर असूनही ते अशी पळवाट काढून ती टाळत आहेत हें सूक्ष्मदृष्टि वाचकांच्या लक्षांत आल्याशिवाय राहिलें नसेल.

भासाच्या स्वप्नवासवदत्तांतीलहि असेंच विलक्षण शब्दसाम्य व अर्थसाम्य असलेले कांही उतारे आम्हीं दाखविले होते. भास आपणापूर्वी होऊन गेला हें स्वतः कालिदासानेंच म्हटलें असल्याने या बाबतींत पौर्वापर्याचाहि वाद नव्हता. तेव्हा या उताऱ्यांत कालिदासाने केलेलें अनुकरण मान्य करणें कठीण जाऊं नये. पण तसें केलें तर शेंबवणेकरांचें मत कसें खरें ठरेल ! म्हणून ते म्हणतात, 'सध्यांचें स्वप्नवासवदत्त हें भासाच्या मूळ नाटकाची संक्षिप्त किंवा छाटाछाट केलेली आवृत्ति असावी !' छाटाछाट केलेल्या आवृत्तींत मूळच्या आवृत्तींतील कांही भाग गाळला जातो, जास्त भाग जोडला जात नाही, ही साधी गोष्टहि प्रा. शेंबवणेकरांच्या लक्षांत आलेली दिसत नाही.

प्रा. शेंबवणेकरांनी अनेक ठिकाणीं 'लघुकवि महाकवींचें अनुकरण करतात. अश्वघोष हा लघुकवि म्हणून त्याने कालिदासाचें अनुकरण केलें असावें' असें म्हटलें आहे. त्यांना डॉ. सुशीलकुमार दे यांचें पुढील मत नजर करतों—'To argue that Ashvaghosha is later than Kalidasa is to presume without sufficient reason a retrogressive phase in literaray evolution'. (History of Sanskrit Literature, p. 124.) (कालिदासानंतर अश्वघोष होऊन गेला असें म्हटल्यास वाङ्मयीन उत्क्रांतींत पुच्छप्रगति झाली असें पुरेसें कारण नसतांहि मानावें लागेल.)

येथवर प्रा. शेंबवणेकर यांच्या लेखनांतील प्रमुख मुद्यांस उत्तर दिलें. त्यांच्या लेखांत इतरही अनेक विवाद्य विधानें आहेत. पण त्यांचा प्रस्तुत विषयाशी साक्षात् संबंध नसल्यानें त्यांचा विचार न करतां हा लांबलेला लेख येथेच पुरा करतों.

'मेघदूतां'तील रामगिरि*

कविकुलगुरु कालिदासाने आपल्या मेघदूत नामक सुप्रसिद्ध खंडकाव्यांत शापित यक्ष अलकेंतून निर्वासित झाल्यावर रामगिरीच्या आश्रमांत येऊन राहिला असें वर्णिलें आहे. मेघदूताच्या आरंभींच्या कांही श्लोकांत तसेंच अलकेला जावयाच्या मार्गाच्या वर्णनांत जी कांही थोडीबहुत माहिती मिळते, तिच्यावरून या रामगिरीचें स्थान निश्चित करणें शक्य आहे. तथापि या बाबतींत पद्धतशीर प्रयत्न कोणी केलेला आमच्या पाहण्यांत आला नाही. या वर्षी विक्रमसंवताचीं दोन हजार वर्षें पूर्ण होत असल्याने हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं विक्रमद्विसहस्राब्दीचे उत्सव होणार आहेत. कालिदासाचें नांव विक्रमादित्याशीं संलग्न असल्याने या प्रसंगीं त्या कविश्रेष्ठाच्या ग्रंथांचें पुनर्मुद्रण, चर्चा वगैरे होत आहेत. या निमित्ताने रामगिरीच्या स्थलनिश्चयाची चर्चा प्रस्तुत लेखांत करण्याचें योजिलें आहे.

शाकुंतल, विक्रमोर्वशीय, रघुवंश वगैरे आपल्या इतर ग्रंथांतील कथानकें कालिदासाने प्राचीन वाङ्मयांतून घेतलीं असल्यामुळे त्यांतील स्थलांचा निश्चय करण्यास त्या त्या संस्कृत ग्रंथांची मदत होते. पण मेघदूताचें कथानक पडलें सर्वस्वीं काल्पनिक! तेव्हा येथे आपणांस प्राचीन संस्कृत ग्रंथांचें साह्य होणें शक्य नाही. रामगिरीचा स्थाननिश्चय करण्यास मुख्यत्वेंकरून मेघदूतांतील वर्णनावरच आपणास विसंबून राहिलें पाहिजे. तेव्हा मेघदूत काव्यावरून आपणांस रामगिरीविषयी काय माहिती मिळते तें पाहूं.

मेघदूतांतील माहिती

रामगिरी हा पर्वत फार पवित्र मानला जात असे. वनवासांत असतां तेथील जलाशयांत सीतादेवीने स्नान केल्यामुळे त्याचें जल पावन

* 'सह्याद्रि', पुणें, एप्रिल, १९४४, पृ. १९–२४.

झालें होतें (श्लो. १). त्या पर्वताच्या मेखलाभागावर कांही ठिकाणीं सर्व जनांना वंद्य अशीं श्रीरामचंद्राचीं पावलें उमटलीं होतीं (श्लो. १२). अशा त्या पुण्यक्षेत्रीं ऋषींचे अनेक आश्रम होते. रामगिरि पर्वत बराच उंच असल्यामुळे वर्षा ऋतूंत त्यावर मेघ आले असतां वप्रक्रीडा (टक्कर देणें) करण्याकरिता वाकलेल्या हत्तीसारखे ते दिसत (श्लो. २). त्यावर घनदाट छायेचे अनेक वृक्ष होते. तेथे सुंदर निचुल नामक स्थलवेतस होते (श्लो. १४). अशा त्या रामगिरीवर आपले शापाचे दिवस कंठीत असतां यक्षाला आषाढाच्या प्रथम दिवशीं एक मेघ दिसला. तेव्हा त्याला प्रियेचा विरह दुःसह झाला. आपल्या प्रियेचीहि तशीच अवस्था झाली असेल असें वाटून, तिच्या मनाला धीर देण्याकरिता त्या मेघालाच दूत म्हणून अलकेला आपल्या प्रियेकडे पाठविण्याचें त्याने ठरविलें. त्याने त्याला ताजीं कुटज पुष्पें अर्पण केलीं (श्लो. ४); व त्याची स्तुति करून अलकेचा मार्ग सांगण्यास सुरुवात केली. तो म्हणाला, "मेघा! येथून उत्तरेला जातांना प्रथम तुला जेथील शेतें नुकतीच नांगरल्यामुळे सुगंधित झालीं आहेत असें माल नामक पठार लागेल. तें ओलांडल्यावर तूं किंचित् पश्चिमेला वळून पुनः उत्तरेचा मार्ग आक्रमावा (श्लो. १६). नंतर प्रवासाने खिन्न झालेल्या तुला आम्रकूट नामक सानुमान् म्हणजे पर्वत आपल्या शिखरावर धारण करील (श्लो. १७). त्या पर्वतावर पक्व फलांनी शोभणारीं अशीं रानआंब्याचीं झाडें असल्याने त्यावर कृष्णवर्ण असा तूं आला असतां भूमीच्या स्तनासारखा दिसशील. तेथे जलवर्षाव केल्यावर तुला आपला मार्ग जलद आक्रमतां येईल. पुढे विंध्य पर्वताच्या पायथ्याशीं खडकाळ प्रदेशांतून वाहणारी नर्मदा हत्तीच्या अंगावर काढलेल्या वेलबुट्टीसारखी दिसेल (श्लो. १९). नंतर तुला दशार्ण देश लागेल. त्या देशाच्या सर्वत्र प्रसिद्ध असलेल्या विदिशा नामक राजधानीला पोचल्यावर तुला तेथील वेत्रवती नदीचें मधुर जल प्राशन करतां येईल (श्लो. २४). त्या ठिकाणीं नीचैर्गिरि नामक टेकडीवर विश्रांतीकरिता तूं बसावें. तेथील गुहांत वेश्यांनी उपयोग केलेल्या सुगंधि द्रव्यांच्या परिमलावरून तेथील नागर लोकांचें उद्दाम यौवन उत्कृष्ट रीतीने व्यक्त होत असतें (श्लो. २५)." यापुढचा मार्ग

आपल्या प्रस्तुत विवेचनाला उपयुक्त नसल्यामुळे तो देण्याची आवश्यकता नाही.

रामगिरीपासून विदिशेपर्यंत मेघमार्ग वर वर्णिला आहे. त्याचें उत्तर टोक जी विदिशा नगरी तिचें स्थान निश्चित आहे. ग्वाल्हेर संस्थानांतील भेलसा नामक गावाजवळ बेसनगर नांवाचें लहानसें खेडें सध्या दिसतें. ती प्राचीन विदिशा नगरी. हिच्या जवळच वेत्रवती किंवा बेटवा नदी वाहत आहे. उत्तरेस सुमारें दोन मैलांवर एक उदयगिरि नांवाची लहानशी टेकडी आहे तो प्राचीन नीचैर्गिरि. या टेकडीवर प्राचीन गुहा असून, त्यांत गुप्तकालीन शिल्पें व कोरीव लेख अद्यापि विद्यमान आहेत. तेव्हा विदिशा नगरीच्या स्थानाबद्दल संदेह नाही. हिच्या दक्षिणेस कोठे तरी रामगिरि असला पाहिजे. रामगिरीपासून विदिशेच्या मार्गावर प्रथम माल नामक पठार, नंतर आम्रकूट पर्वत व नर्मदा नदी लागते असें मेघदूतांतील वर्णनावरून स्पष्ट दिसतें. या भौगोलिक उल्लेखांवरून रामगिरीचें स्थान निश्चित करावयाचें आहे. नंतर मेघदूतांतील वर्णन त्याला कितपत लागू पडतें हेंहि पाहिलें पाहिजे.

प्राचीन टीकाकारांचें म्हणणें

प्रथम या बाबतींत आपल्या प्राचीन टीकाकारांचें काय म्हणणें आहे तें पाहूं. मेघदूताचा सर्वांत प्राचीन टीकाकार वल्लभदेव हा दहाव्या शतकाच्या आरंभीं होऊन गेला. याने मेघदूताच्या पहिल्या श्लोकावरच्या आपल्या टीकेंत म्हटलें आहे की, 'रामगिरिरत्र चित्रकूटः। न तु ऋष्यमूकः तत्र सीताया वासाभावात्।' म्हणजे रामगिरि हा चित्रकूट होय. तो ऋष्यमूक असणें शक्य नाही. कारण त्या ठिकाणीं सीतेचा वास झाला नव्हता. वल्लभदेवाचा जवळ जवळ समकालीन असलेल्या स्थिरदेव नामक टीकाकाराने 'रामगिरिर्दण्डकान्तः प्रसिद्धः।' (रामगिरि हा दण्डकारण्यांतील प्रसिद्ध पर्वत आहे.) असें म्हणून त्याचें स्थान निश्चितपणें सांगितलें नाही. त्यानंतरच्या दक्षिणावर्तनाथाने निचुल, दिङ्नाग यांच्याविषयी दंतकथा विस्तृतपणें दिल्या असल्या, तरी राम-

गिरीच्या स्थानाविषयी मूग गिळले आहेत. दक्षिणावर्तनाथानंतरचा सुप्रसिद्ध टीकाकार मल्लिनाथ याने रामगिरि म्हणजे चित्रकूट या वल्लभदेवाच्या मताचीच री ओढली आहे. यानंतरच्या विद्युल्लतादि टीकाकारांनी प्रायः मल्लिनाथाच्या विधानाचाच अनुवाद केला आहे. तेव्हा बहुधा सर्व संस्कृत टीकाकारांना रामगिरि म्हणजे चित्रकूट हें मत मान्य होतें असें दिसतें. या टीकाकारांच्या ठिकाणीं चौकस बुद्धि नसल्याने त्यांनी या प्रश्नाचा खोल विचार केला नसावा. रामगिरि हा चित्रकूट असावा असें त्यांना वाटणेंहि साहजिक आहे. कारण सबंध रामायणांत रामगिरीचा कोठेच उल्लेख आला नाही. मेघदूतांतील वर्णनावरून या गिरीवर श्रीरामचंद्र सीतेसह कांही काळ राहत होते, अशी कालिदासकाळीं परंपरागत समजूत होती असें स्पष्ट दिसतें. रामायणांत मुख्यतः दोनच पर्वतांवर श्रीरामचंद्रांचें कांही काळ वास्तव्य होतें असें वर्णिलें आहे. भरद्वाजाश्रमांतून निघाल्यावर रामचंद्र चित्रकूट पर्वतावर सीता व लक्ष्मण यांच्याबरोबर कांही काळ राहिले असें अरण्यकांड, सर्ग ५६ मध्ये म्हटलें आहे. पुढे दंडकारण्यांतून रावणाने सीताहरण केल्यावर तिच्या शोधार्थ रामचंद्र ऋष्यमूक पर्वतावर आले. तेथे त्यांचें हनुमान् व सुग्रीव यांच्याशीं सख्य जमून त्या ठिकाणीं त्यांनी कांही काळ वास केला, असें किष्किंधाकांडांत वाल्मीकीने वर्णिलें आहे. या वेळीं सीतादेवी जवळ नसल्याने 'जनकतनयास्नानपुण्योदकेषु' इत्यादि मेघदूतांतील वर्णन ऋष्यमूक पर्वतास जमत नाही, हें उघड आहे. तेव्हा चित्रकूट हाच रामगिरि असें टीकाकारांस वाटलें तर त्यांत आश्चर्य नाही. तथापि हें मत बरोबर असणें शक्य नाही, हें थोड्या विचाराअंतीं स्पष्ट होईल. भरद्वाजाश्रम प्रयागला होता. तेथे आल्यावर रामचंद्रांनी भरद्वाज ऋषीला प्रार्थना केली की, 'भगवन्, आम्हांला भेटूं इच्छिणारे लोक येथे येऊं लागतील. म्हणून या आश्रमांत राहणें मला प्रशस्त वाटत नाही. तेव्हा एकान्त असें एखादें आश्रमस्थान आम्हांला सांगा.' त्यावर भरद्वाज ऋषि म्हणाले, 'रामा, येथून दहा कोसांवर महर्षींनी सेविलेला चित्रकूट नामक पर्वत आहे. तें एकान्त स्थान असल्यामुळे तेथे तूं आपला वनवासाचा काळ

चालवावा.' त्यानंतर त्या संगमापासून निघून यमुना नदीच्या काठाने रामचंद्र सीता व लक्ष्मण यांसह कांही अंतर गेले व नंतर ती नदीपार करून ते पुढे चित्रकूट पर्वताला पोचले, असें रामायणांत वर्णिलें आहे. या वर्णनावरून चित्रकूट हा यमुनेपासून फार दूर नसावा, असें स्पष्ट दिसतें. हा चित्रकूट म्हणजे कामताजवळचा चित्रकूट होय* असें आता विद्वानांनी ठरविलें आहे. चित्रकूट व कालंजर हे प्राचीन काळीं दुर्भेद्य असे किल्ले गणले जात असत व ते आपल्या ताब्यांत ठेवण्याविषयी बलाढ्य राजांमध्ये अहमहमिका लागून राहत असे. दक्षिणेच्या राष्ट्रकूट राजांनीहि उत्तर हिंदुस्थानांत आपलें वर्चस्व राहावें म्हणून हे कोट आयल्या ताब्यांत ठेवले होते, असें कोरीव लेखांवरून दिसतें.† कालंजर हा बांदा जिल्ह्यांतील किल्ला सुप्रसिद्ध आहे. चित्रकूट त्याच्या उत्तरेस थोड्याच अंतरावर आहे. पुण्यस्थान म्हणून अद्यापि याची प्रसिद्धि आहे. येथे राम, सीता व लक्ष्मण यांच्या पादुकाहि दाखवतात. हें स्थान प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे, यांत संशय नाही. तथापि हा चित्रकूट रामगिरि असणें शक्य नाही; कारण रामगिरीहून उत्तरेस जातांना लागणारी नर्मदा, विदिशा, उज्जयिनी इत्यादि नद्या व नगरें चित्रकूटाच्या दक्षिणेस आहेत, उत्तरेस नाहीत. तेव्हा रामगिरि म्हणजे चित्रकूट हें मत बरोबर नाही.

---

* हा चित्रकूट पर्वत प्रयागापासून सुमारें ६५ मैलांवर आहे. त्यामुळे रामायणांत वर्णिलेला पर्वत हाच काय अशी शंका येते, तिचें निराकरण दोन प्रकारांनी करतां येतें. रामायणांतील अंतर अदमासानें दिलें असावें किंवा पार्जिटरसाहेब म्हणतात त्याप्रमाणे चित्रकूट ही एखादी विशिष्ट टेकडी नसून दोन नद्यांपासून प्रयागाच्या पश्चिमेस सुमारें २० मैलांपर्यंत पसरणारी पर्वतराजि असेल. यांपैकी पहिलें निराकरण जास्त संभवनीय दिसतें.

† राष्ट्रकूट सम्राट् तृतीय कृष्ण याच्याविषयी देवळीच्या ताम्रपटांत आलेला खालील श्लोक पाहा. 'यस्य परुषेक्षिताखिलदक्षिणदिग्दुर्गविजयमाकर्ण्य । गलिता गुर्जरहृदयात्कालंजरचित्रकूटाशा ॥' एपिग्राफिया इंडिका, पु. ५, पृ. १९४.

आधुनिक विद्वानांचीं मतें

यानंतर आपण आधुनिक विद्वानांच्या मतांकडे वळूं. एकशेंतीस वर्षांपूर्वी सन १८१३ सालीं होरेस हेमन विल्सन या सुप्रसिद्ध आंग्ल विद्वानाने मेघदूताची पहिली आवृत्ति इंग्रजी भाषांतरासह प्रसिद्ध केली. तिला जोडलेल्या टिप्पणींत "रामगिरि म्हणजे नागपूरच्या उत्तरेस कांही अंतरावर असलेलें रामटेक असावें. कारण तेथे रामचंद्राचीं अनेक देवालयें आहेत व यात्रेकरिता मधून मधून अनेक लोक येतात" असें त्याने म्हटलें आहे. हेंच मत पुढे मेघदूताच्या अनेक टिप्पणीकारांनी स्वीकारलें होतें. त्यांमध्ये सुप्रसिद्ध पुरातत्त्वज्ञ कै. प्रो. काशिनाथ बापुजी पाठक हेहि होते. त्यांनी मेघदूताच्या आपल्या प्रथमावृत्तींत (सन १८९४) याच मताचा अनुवाद केला आहे. पण पुढे मध्यप्रांताच्या सरगुजा संस्थानांतील रामगढ टेकडीवरील सीतावेंगा व जोगीमारा या गुहांतील प्राचीन लेखांकडे विद्वानांचें लक्ष गेलें. हे लेख ख्रिस्तपूर्व दुसऱ्या तिसऱ्या शतकांतले आहेत. त्यांवरून सरगुजा संस्थानांतील रामगढ हें स्थान प्राचीन काळीं प्रसिद्ध होतें यांत संशय नाही. येथे राम, लक्ष्मण व सीता यांच्या नांवाने गुहा आहेत. त्यांमध्ये भग्नावस्थेंत असलेल्या कांही मूर्तीहि दिसतात. पण त्या फार प्राचीन नसाव्यात. एका ठिकाणीं भिंतीवर दोन पावलांच्या आकृति दिसतात. या रामाच्या पादुका आहेत, अशी तेथील लोकांची समजूत आहे. या स्थानाचें वर्णन मॉडर्न् रिव्ह्यू (सन १९१५, पृ. ३७९–३८७) मध्ये प्रसिद्ध झालें. वाचून रामगढ हाच रामगिरि असावा, असें प्रो. पाठक ह्यांचें मत झालें व तें त्यांनी मेघदूताच्या आपल्या द्वितीयावृत्तींत (सन १९१६) नमूद केलें आहे. या मताचा उल्लेख त्यानंतर प्रकाशित झालेल्या कांही मेघदूताच्या आवृत्तींत आढळतो. तेव्हा त्याचें आपण परीक्षण करूं.

'सरगुजा संस्थानांतील रामगढ हाच रामगिरि' या मतावरील मुख्य आक्षेप हा की, हें स्थान मेघदूतांतील वर्णनाप्रमाणे आम्रकूट (अमरकंटक) व नर्मदा नदी यांच्या दक्षिणेस नसून ईशान्येस आहे. येथून अलकेस जातांना आम्रकूट, नर्मदा, विदिशा इत्यादि ठिकाणें

मार्गावर लागणार नाहीत. त्या ठिकाणीं मेघास न्यावयाचें असल्यास 'किंचित्पश्चाद्व्रज लघुगतिर्भूय एवोत्तरेण' (श्लो. १६) असें न म्हणतां 'तूं प्रथम उत्तरेस न जातां नैॠत्येस जा' असें यक्षाला मेघास सांगावें लागलें असतें. शिवाय हें ठिकाण अत्यंत बिकट ठिकाणीं निर्जन अशा प्रदेशांत आहे. तेथे हत्तीवरून जातांना आपणास किती श्रम पडले याचें सविस्तर वर्णन प्रसिद्ध बंगाली चित्रकार श्रीयुत असित हलदार यांनी मॉडर्न् रिव्ह्यूच्या वरील अंकांत केलें आहे. अशा ठिकाणीं यक्षाला राहावयाला लावण्यांत कालिदासाचा कोणता हेतु होता, हेंहि ध्यानांत येत नाही. तेव्हा रामगढ हा रामगिरि असणें शक्य दिसत नाही.

सर्वांत सयुक्तिक मत

आता राहिलेलें तिसरें मत, रामगिरि हें नागपूरच्या उत्तरेस २८ मैलांवर असलेलें प्रसिद्ध क्षेत्र रामटेक होय, याचा विचार करूं. हें मत सर्वांत सयुक्तिक दिसतें. रामटेकाहून अलकेला जाण्याचा मार्ग कोणी सांगूं लागेल, तर तो त्याला मेघदूतांतल्याप्रमाणेच सांगावा लागेल. येथून उत्तरेस जातांना प्रथम माल नामक पठार लागतें, असें मेघदूतांत म्हटलें आहे. रामटेकच्या जवळच सातपुडयाचें पठार सुरू होतें. या पठाराला पूर्वी माल देश म्हणत असावे; किंबहुना या बाबतींत अनुमान करण्याचीहि जरूरी नाही, कारण उत्तर चालुक्यांच्या द्वितीय आचुगि नामक मांडलिकानें माल देश जिंकून डाहलाधिपतीचा म्हणजे जबलपूर-जवळच्या त्रिपुरीच्या हैहयांचा पराभव केला, असा एका कोरीव लेखांत* उल्लेख आहे. तेव्हा या पठाराला माल हें नांव होतें हें उघड आहे. यानंतर आम्रकूटाचें बर्णन मेघदूतांत आलें आहे. हा आम्रकूट म्हणजे अमरकंटक असें कांही लोक मानतात, पण तें बरोबर दिसत

---

* एपिग्राफिया इंडिका, पु. १९, पृ. २२७ पहा. विल्सनसाहेबांना आम्रकूट हा अमरकंटक पर्वत असावा असें वाटत असल्यानें त्यांनी 'माल' हें छत्तीसगडांतील रतनपूरच्या उत्तरेस असलेलें मालडा असावें असें म्हटलें आहे. पण तें बरोबर दिसत नाही.

नाही. कारण अमरकंटक पर्वत ईशान्येस दूरवर राहतो; शिवाय अमरकंटकाचें प्राचीन नांव आम्रकूट नसून मेकल असें होतें. नर्मदा नदीचा उगम अमरकंटकला होतो व तिला मेकलसुता म्हणतात हें प्रसिद्ध आहे. तेव्हा अमरकंटक प्राचीन आम्रकूट असणें शक्य नाही. आमचे एक स्नेही डॉ. कठाळे हे आम्रकूट म्हणजे छिंदवाडा जिल्ह्यांतील अमरवाडा गाव असावें असें सुचवितात. अमरवाडा हें त्याच नांवाच्या तहसिलीचें मुख्य ठिकाण असून, रामटेकच्या उत्तरेस नागपूर व नरसिंगपूर यांना जोडणाऱ्या मुख्य रस्त्यावर आहे. आम्र याचा अपभ्रंश अमर होणेंहि शक्य आहे; तथापि अमरवाडा हें एक गाव आहे. पर्वत (सानुमान्) नाही. प्राचीन आम्रवाटकाचें तें अपभ्रष्ट रूप असावें. याच्या उत्तरेस सात–आठ मैलांवर सातपुड्याची रांग लागते. तिला आम्रकूट असें नांव प्राचीन काळीं असावें, असें अनुमान केल्यास बहुधा चूक होणार नाही. कै. डॉ. हिरालाल यांनी आपल्या एका लेखांत सातपुड्याच्या शिखरांना प्राचीन काळीं 'कूट' शब्दांत नांवें असत, असें दाखविलें आहे. उदाहरणार्थ, सालकूट म्हणजे बालाघाट जिल्ह्यांतील साले टेकडी व मधुकूट म्हणजे छिंदवाडा जिल्ह्यांतील मोहतूर. तेव्हा आम्रकूट हेंहि अमरवाड्याजवळचें सातपुड्याचें त्या काळीं प्रसिद्ध असलेलें एक शिखर असावें असें मानण्यास हरकत नाही.*

त्यानंतर लागणाऱ्या नर्मदा नदीचें वर्णन जबलपूर ते नरसिंगपूर या भागांत वर्षाकालारंभीं त्या नदीचें जें दृश्य दिसतें त्यासारखेंच आहे. ग्रीष्मऋतूंत पाणी आटल्यामुळे नर्मदा नदीचा प्रवाह अरुंद होऊन खडकाळ प्रदेशांतून वाहत असतो. तो पाहून कालिदासासारख्या प्रतिभासंपन्न कवीला हत्तीच्या अंगावर काढलेल्या चित्रविचित्र वेलबुट्टीची उपमा सुचली तर त्यांत आश्चर्य नाही. नर्मदा नदीचें हें दृश्य अमर-

---

* रामटेक हें नागपूर जबलपूर रस्त्यावर आहे अमरवाडा हें रामटेकच्या थेट उत्तरेस नसून, किंचित् पश्चिमेस नागपूर–नरसिंगपूर रस्त्यावर आहे. म्हणून माल देश ओलांडल्यावर 'किंचित् पश्चाद्व्रज लघुगतिर्भूय एवोत्तरेण' असें यक्षाने मेघास सांगितलें असावें.

कंटकाजवळ दिसणार नाही; शिवाय आम्रकूट पर्वत ओलांडून द्रुततर गतीने कांही अंतर गेल्यावर नंतर विंध्य पर्वताच्या पायथ्याशीं मेघाला नर्मदा नदी लागेल, हें मेघदूतांतील वर्णनहि नदीचें उगमस्थान जें अमरकंटक त्याला लागू पडणार नाही, हें उघड आहे.

पुण्यक्षेत्र म्हणून रामटेकची प्रसिद्धि आज निदान दीड हजार वर्षें अव्याहत आहे. सुप्रसिद्ध गुप्त-सम्राट् द्वितीय चंद्रगुप्त-विक्रमादित्य हा इ. स. च्या चौथ्या शतकाच्या अखेरीस होऊन गेला. याची मुलगी प्रभावतीगुप्ता ही विदर्भनृप द्वितीय रुद्रसेन यास दिली होती. वऱ्हाडांत उमरावतीजवळ ऋद्धपूर येथे प्रभावतीगुप्तेचा एक ताम्रपट सापडला आहे. तो तिने कार्त्तिक शुक्ल द्वादशीस रामगिरिस्वामीच्या पादुकांजवळून (रामगिरिस्वामिनः पादमूलात्) दिला असें म्हटलें आहे.* वाकाटकांचें राज्य विदर्भावर होतें. प्राचीन विदर्भात सध्याचा वऱ्हाड व मध्यप्रांताचे मराठी जिल्हे यांचा समावेश होत असे. वाकाटकांचे कांही ताम्रपट रामटेकच्याहि पूर्वेस बालाघाट व भंडारा जिल्ह्याच्या पूर्वसीमेपर्यंत सापडले आहेत. या प्रांतांत रामगिरि या नांवाचें दुसरें कोणतेंहि प्राचीन ठिकाण नाही. तेव्हा वाकाटकांच्या काळीं ही टेकडी रामगिरि या नांवाने प्रसिद्ध होती व तेथे श्रीरामचंद्राची पादुकारूपाने पूजा होत असे, असें स्पष्ट दिसतें. कालांतराने तेथे राम व सीता यांच्या मूर्ति बसविल्या व लक्ष्मणाचेंहि स्वतंत्र देऊळ बांधण्यांत आलें; तथापि अजूनहि श्रीरामचंद्राच्या देवळांत रामाच्या मूर्तीसमोर पादुका असून त्यांची पूजा होत असते.

वाकाटकांच्या काळापूर्वीहि रामटेक प्रसिद्ध असावें. कारण तेथून जवळच मनसर येथे एका विशाल स्तूपाचा अवशेष अद्यापि विद्यमान असून, उत्खननाची वाट पाहत आहे. कधी काळीं त्याचें उत्खनन झाल्यास या स्थानाची प्रसिद्धि यापूर्वीहि जाईल याविषयी आम्हांस संशय वाटत नाही. त्यानंतर यादवांच्या काळींहि रामटेकाची पुण्यक्षेत्र म्हणून प्रसिद्धि होती. रामटेकवरच्या लक्ष्मणाच्या देवळांत रामदेवराव

---

* भारत इतिहास संशोधक मंडळाचें त्रैमासिक, पु. ३, पृ. ९३ पाहा.

यादवाच्या काळचा एक भग्न शिलालेख अद्यापि विद्यमान आहे, तो आम्ही इतरत्र प्रसिद्ध केला आहे.* त्यावरून तेराव्या शतकांत रामटेकवर व त्याच्या सभोवार सध्याप्रमाणेच अनेक तीर्थें होतीं, हें स्पष्ट दिसतें.

मेघदूतांतील रामगिरीचें सर्व वर्णन रामटेकास लागू पडतें. तेथे अद्यापि सीतेची न्हाणी म्हणून एक कुंड दाखवतात. प्राचीन काळीं तेथे रामाच्या पादुका बसविल्या होत्या, हें मागे दाखविलें आहेच. वर्षाऋतूंत मेघ याच्या शिखरावर आला असतां एखाद्या कल्पनाचतुर कवीस तो वप्रक्रीडापरिणत गजाप्रमाणें दिसला असला, तर त्यांत आश्चर्य नाही. या पर्वतावर अद्यापि घनदाट छायेचे वृक्ष आहेत व वर्षाऋतूच्या आरंभीं येथे कुटजाचीं (कुड्याचीं) फुलें मुबलक आढळतात. या पर्वतावर सर्वत्र तांबुस रंगाचे दगड दिसत असल्याने यक्षाला आपल्या प्रियेचें चित्र शिलेवर काढण्याकरिता धातुराग मिळविण्यास मुळीच प्रयास पडले नसतील. असो.

रामटेक हाच रामगिरि मानल्यास रामायणांत कोठेहि याचा उल्लेख कसा आला नाही, अशी शंका उत्पन्न होईल. पण तिचें समाधान करणें कठिण नाही. रामायणाच्या अरण्यकांडांत (सर्ग. ११, श्लोक १४–२७) वर्णिलें आहे की, दण्डकारण्यांत असतांना निरनिराळ्या ऋषींच्या आश्रमांत कोठे तीन महिने, कोठे चार महिने, कोठे दहा महिने, कोठे वर्ष, याप्रमाणे राहत राहत रामचंद्रांनी दहा वर्षें घालविलीं. या आश्रमांचीं सविस्तर वर्णनें रामायणांत आलीं नसल्यामुळे या अवधींत ते रामगिरीच्या आश्रमांत येऊन राहिले नसतीलच, असें म्हणतां येणार नाही. रामगिरीचें नांव रामयणांत आलें नाही हें खरें; पण तें येणेंहि शक्य नव्हतें, हें सहज ध्यानांत येईल. कारण हें नांव श्रीरामचंद्र तेथे राहिल्यामुळे कांही काळाने प्राप्त झालें असावें. या टेकडीचें प्राचीन नांव शैवलगिरि होतें असें रामटेक माहात्म्यावरून दिसतें. हा शैवलगिरि शम्बूकाच्या तपश्चर्येचें स्थान म्हणून रामायणाच्या उत्तरकांडांत (सर्ग ७५) उल्लेखिला आहे. रामटेकास शम्बूक तपश्चर्या करीत होता, अशी

* सरदेसाई स्मारक ग्रंथ, पृ. ११५-१३४.

आख्यायिका आहे. ज्या ठिकाणीं त्याचा शिरश्छेद झाला, त्या ठिकाणीं शिवलिंग स्थापित करण्यांत आलें व तें अद्यापि धूम्रेश्वर* या नांवानें रामटेकवर प्रसिद्ध आहे. त्या प्रसंगीं शम्बूकानें प्रार्थना केल्यावरून श्रीरामचंद्रांनी या गिरीवर वास केला व तेव्हापासून या टेकडीस रामटेक म्हणूं लागले असें म्हणतात. रामायणांतील शम्बूकाच्या तपश्चर्येच्या स्थानाचें वर्णन रामटेकास जुळेल असेंच आहे. तेव्हा रामवनवासाच्या वर्णनांत रामगिरीचा उल्लेख नाही, या आक्षेपांत कांही तथ्य राहत नाही.

कालिदासानें रामटेकच कां स्वीकारलें ?

शेवटीं कालिदासानें आपल्या विरही यक्षास रामटेकासच कां राहावयास लावलें याचा विचार करूं. पुष्कळ विद्वानांच्या मतें कालिदास हा इ. स. च्या चौथ्या शतकांत द्वितीय चन्द्रगुप्त-विक्रमादित्याच्या दरबारीं होऊन गेला. गुप्त व वाकाटक घराण्यांचा अत्यंत घनिष्ठ संबंध चन्द्रगुप्ताच्या काळीं आला होता, कारण चन्द्रगुप्तानें आपली कन्या प्रभावतीगुप्ता वाकाटकनृपति द्वितीय रुद्रसेन यास दिली होती. या वाकाटक शाखेचा† सर्वांत प्राचीन ताम्रपट प्रभावतीगुप्तेचा असून, तो तिनें नन्दिवर्धनाहून दिला होता. त्या वेळीं ती आपल्या पतीच्या निधनामुळे अल्पवयी मुलाच्या नांवानें राज्य करीत होती. त्यानंतर तिचा मुलगा द्वितीय प्रवरसेन हा गादीवर बसला. त्याचे दोन ताम्रपट गेल्या पांच-सहा

---

*वर उल्लेखिलेल्या रामदेवरावाच्या काळच्या शिलालेखांतहि याचा उल्लेख धूम्राक्ष या नांवानें आला आहे. सरदेसाई स्मारक ग्रंथ, पृ. १२८ पहा. भवभूतीनें आपल्या उत्तररामचरितांत शम्बूकाच्या तपश्चर्येचें स्थान पंचवटीजवळ होतें असें दाखविलें आहे. पण मूळ रामायणकथेंत त्यानें इतर ठिकाणीं फेरफार केले आहेत. तसेंच याहि बाबतींत केलें असावें.

† वाकाटकांची दुसरी एक शाखा वत्सगुल्म (सध्याचें अकोला जिल्ह्यांतील वाशीम) येथे राज्य करीत होती, असें अलीकडील संशोधनावरून सिद्ध झालें आहे.

वर्षांत सापडले आहेत तेहि नन्दिवर्धनाहून दिले आहेत. हे ताम्रपट त्याच्या कारकीर्दीच्या आरंभींचे–एक दुसऱ्या वर्षाचा व दुसरा अकराव्या वर्षाचा असे–आहेत. यापुढचे मात्र त्याचे बहुतेक सर्व ताम्रपट प्रवरपुराहून दिले आहेत. त्यावरून नन्दिवर्धन ही वाकाटकांची आरंभींची राजधानी होती व पुढे आपल्या कारकीर्दीच्या अकराव्या वर्षानंतर प्रवरसेनाने आपल्या नांवाने प्रवरपुर नामक शहर वसवून तेथे ती नेली, असें स्पष्ट दिसतें. रामटेकजवळ सध्या नगरधन नांवाने ज्ञात असलेलें खेडें हेंच प्राचीन नन्दिवर्धन होय* अशी तेथे परंपरागत समजूत आहे. रामटेकमाहात्म्यांतहि ह्या ठिकाणाचा नन्दिवर्धन म्हणून उल्लेख आहे. नन्दिवर्धन राजधानी होती. तेव्हा रामटेकला राजधानीच्या सांनिध्यामुळे फार महत्त्व आलें असावें. वाकाटक व गुप्त यांचा संबंध लक्षांत घेतां कालिदास वाकाटक राजधानी नन्दिवर्धन येथे आला असावा असें अनुमान केल्यास तें बहुधा चूक होणार नाही. त्या वेळीं त्याचें रामटेकास सहजच जाणें झालें असेल. त्या टेकडीवर हिंडत असतां त्याला मेघदूत काव्याची कल्पना सुचली असावी व त्याने तें काव्य तेथेच लिहून पुरें केलें असावें. कालिदास कांही काळ वाकाटक दरबारीं राहिला असावा, असें दुसऱ्याहि एका आख्यायिकेवरून दिसतें. सेतुबंध नामक प्राकृत काव्य प्रवरसेनाच्या नांवावर आज जवळ जवळ दीड हजार वर्षें प्रसिद्ध आहे. या काव्याच्या कित्येक सर्गांच्या शेवटीं तें कालिदासाने रचलें असा उल्लेख आहे व त्याच्या एका टीकाकारानेहि हें काव्य कालिदासाने विक्रमादित्याच्या आज्ञेने प्रवरसेनाकरिता रचलें, असें म्हटलें आहे. तेव्हा कालिदासाने तें स्वतः रचलें असावें किंवा प्रवरसेनाला तें रचण्यांत पुष्कळ मदत केली असावी, असें दिसतें. तसें असल्यास या प्राकृत महाकाव्याकरिताहि तो कित्येक महिने या भागांत राहिला असावा.

---

*नन्दिवर्धनाचा उल्लेख राष्ट्रकूट-नृपति तृतीय कृष्णाच्या देवळीच्या ताम्रपटांत आला आहे. भोसल्यांच्या काळीं नन्दिवर्धन हेंच तहसिलीचें मुख्य ठिकाण होतें. अठराव्या शतकांत नागपुरांत रचलेल्या पुरञ्जनचरित नामक संस्कृत नाटकांतहि नन्दिवर्धनाचा उल्लेख आला आहे. सरदेसाई स्मारक ग्रंथ, पृ. १४८ पहा.

कालिदासाचें 'कुन्तलेश्वरदौत्य'*

कविकुलगुरु कालिदासाचे सात ग्रंथ सुप्रसिद्ध आहेत. त्यांमध्ये ऋतुसंहार, कुमारसंभव, मेघदूत व रघुवंश या चार काव्यांची आणि मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय व शाकुंतल या तीन नाटकांची गणना होते. याशिवाय सेतुबन्ध किंवा रावणवहो हें प्रवरसेनाच्या नांवावर प्रसिद्ध असलेलें प्राकृत काव्यहि विक्रमादित्याच्या आज्ञेवरून त्याने रचलें, अशी आख्यायिका आहे. हा प्रवरसेन वाकाटकवंशी द्वितीय प्रवरसेन मानल्यास या आख्यायिकेची उपपत्ति लावतां येते. कारण तो प्रवरसेन सुविख्यात गुप्तसम्राट् द्वितीय चन्द्रगुप्त-विक्रमादित्य याचा दौहित्र असून त्याच्या काळीं वाकाटकांच्या दरबारीं गुप्तांचें फार प्रस्थ होतें, हें वाकाटकांच्याच कांही ताम्रपटांवरून स्पष्ट दिसतें. द्वितीय चन्द्रगुप्ताचा आश्रित कालिदास हा गुप्तांच्या इतर अधिकाऱ्यांप्रमाणे विदर्भांत आला असावा व वाकाटकांच्या नन्दिवर्धन नामक तत्कालीन राजधानीच्या जवळच असलेल्या रामगिरीवर (नागपूरजवळच्या हल्लीच्या रामटेकावर) त्याने आपलें 'मेघदूत' काव्य रचलें असावें हें मी 'सह्याद्री'-च्या एप्रिल १९४४ च्या अंकांत दाखविलें होतें. त्या प्रसंगाने कालिदास कांही काळ विदर्भांत राहिला असल्यास, त्याने 'सेतुबंध' काव्य रचलें असणें किंवा द्वितीय प्रवरसेनास तें रचण्यांत मदत केली असणें अशक्य नाही.

याशिवाय 'कुन्तलेश्वरदौत्य' नामक आणखीहि अेक ग्रंथ कालिदासाने रचला होता असें दिसतें. हा ग्रंथ सध्या उपलब्ध नाही. त्यामुळे त्याची पूर्ण माहिती आपणांस देतां येत नाही. तथापि प्राचीन संस्कृत ग्रंथांतील कांही उताऱ्यांवरून व तत्कालीन ताम्रपटादि ऐतिहासिक साधनांवरून त्याचें स्वरूप अजमावतां येतें. तसा प्रयत्न प्रस्तुत लेखांत केला आहे.

---

* 'सह्याद्रि' पुणें, जुलै, १९४५, पृ. ४२-४८.

या ग्रंथाचा स्पष्ट उल्लेख काश्मीरचा सुप्रसिद्ध संस्कृत कवि क्षेमेन्द्र याने आपल्या 'औचित्यविचारचर्चा' नामक ग्रंथांत केला आहे. काव्यामध्ये औचित्याचें अत्यंत महत्त्वाचें स्थान असतें व तें औचित्य विविध प्रकारचें असतें, हें क्षेमेन्द्राने उदाहरणें देऊन स्पष्ट केलें आहे. त्या प्रसंगाने अधिकरणौचित्याचें उदाहरण म्हणून खालील श्लोक क्षेमेन्द्राने कालिदासाच्या कुन्तलेश्वरदौत्यांतून* उद्धृत केला आहेः—

इह निवसति मेरुः शेखरः क्ष्माधराणा-
मिह विनिहितभाराः सागराः सप्त चान्ये।
इदमहिपतिभोगस्तम्भविभ्राजमानं
धरणितलमिहैव स्थानमस्मद्विधानाम्॥

या श्लोकांतील स्थानवर्णनाच्या औचित्याचें विवेचन करतांना क्षेमेन्द्र म्हणतो-' महाराजाचा दूत माण्डलिक राजाच्या दरबारीं गेला असतां त्याला आपल्या प्रभूच्या पदवीला अनुरूप अशी मानाची जागा मिळाली नाही. तेव्हा तो कार्यवशात् जमिनीवरच बसला व (इतर मानकऱ्यांनी चेष्टा केली तेव्हा) धीरगंभीर स्वराने म्हणतो-' हें धरणितल शेषफणारूपी स्तंभांनी निश्चल झालेलें असें आसन आहे व हेंच आमच्यासारख्यांना योग्य असें स्थान आहे. कारण पर्वतश्रेष्ठ मेरु व सात महासागरहि याच आसनावर बसले आहेत व त्यांच्यासारखीच माझी योग्यता आहे.' अर्थात् हें आसन सामान्य प्रतीचें नसून माझ्यासारख्या सम्राट् प्रतिनिधीला योग्य असेंच तें आहे असा त्या दूताचा आशय आहे.

हा दूत कोण व तो कोणत्या सामन्ताच्या दरबारीं गेला होता याविषयी क्षेमेन्द्राने उल्लेख केला नाही. तेव्हा इतर संस्कृत ग्रंथांतील उल्लेखांवरून याविषयी काय माहिती मिळते तें आपण पाहूं.

---

* 'औचित्यविचारचर्चा' निर्णयसागर प्रेसने काव्यमाला, प्रथम गुच्छ (पृ. ११५-१६०), मध्ये छापली आहे. यामध्ये पृ. १३९ वर कालिदासाच्या ग्रंथाचें नांव ' कुन्तेश्वरदौत्य ' असें दिलें आहे. पण तें मुद्रणदोषामुळे असावें.

राजशेखराच्या 'काव्यमीमांसा'* आणि भोजाच्या 'शृंगारप्रकाश'† व 'सरस्वतीकण्ठाभरण'‡ या ग्रंथांत खालील श्लोक आला आहे–

असकलहसितत्वात्क्षालितानीव कान्त्या
मुकुलितनयनत्वाद्व्यक्तकर्णोत्पलानि।
पिबति मधुसुगन्धीन्याननानि प्रियाणां
त्वयि विनिहितभारः कुन्तलानामधीशः॥

[अर्थ–तुझ्यावर (राज्यकारभाराचा) भार टाकून कुन्तल देशाचा राजा किंचित् हास्याने ज्यांच्यावर कांति पसरली आहे, नयन अर्धमीलित झाल्यामुळे ज्यांच्या कर्णावरच्ीं कमलें स्पष्ट दिसत आहेत अशीं सुरापानाने सुगन्धित झालेलीं आपल्या प्रियांचीं मुखें चुम्बीत असतो.]

हा श्लोक विक्रमादित्याने 'कुन्तलेश काय करीत असतो' असें विचारल्यावर कालिदासाने उत्तरादाखल म्हटला असें भोजाने आपल्या शृंगारप्रकाशांत स्पष्ट म्हटलें आहे.|| श्लोकाच्या अर्थाकडे लक्ष देतां हाहि श्लोक कालिदासाच्या कुन्तलेश्वरदौत्यांतून घेतला असावा व विक्रमादित्याने कुन्तलेश्वराकडे पाठविलेला दूत दुसरा कोणी नसून स्वतः

---

* गायकवाडांची ओरिएंटल सीरीज (प्रथमावृत्ति), पृ. ६०-६१ पाहा.

† हा समग्र ग्रंथ अद्यापि प्रकाशित झाला नाही. तथापि त्याच्या आठव्या प्रकाशांतील प्रस्तुत उतारा श्रीयदुगिरियतिराजस्वामींनी शृंगारप्रकाशाच्या २२–२४ प्रकाशांच्या आवृत्तींला जोडलेल्या आपल्या संस्कृत प्रस्तावनेंत दिला आहे.

‡ सरस्वतीकण्ठाभरण (निर्णयसागर प्रत), द्वितीय परिच्छेद, श्लोक ८४. यांतील उताऱ्यांत कालिदासाच्या श्लोकांत 'पिबतु' असा पाठ दिला आहे. तसेंच 'व्यक्तकर्णोत्पलानि' याच्या जागीं 'ज्ञातकर्णोत्पलानि' असाहि पाठभेद आढळतो.

|| तद्यथा **कालिदासः** 'किं कुन्तलेश्वरः करोति' इति **विक्रमादित्येन** पृष्ट उक्तवान्। 'असकलहसितत्वात्—' इ.

कालिदासच असावा असें स्पष्ट दिसतें. कालिदासाचा रिपोर्ट ऐकून विक्रमादित्यानेहि त्या श्लोकाच्या द्वितीयार्धात किंचित् फरक करून

' पिबतु मधुसुगन्धीन्याननानि प्रियाणां
मयि विनिहितभारः कुन्तलानामधीशः ॥

म्हणजे 'माझ्यावर (राज्यकारभाराचा) भार टाकून कुन्तलेश आपल्या प्रियांचीं सुरापानाने सुगन्धित झालेलीं मुखें चुम्बीत राहो ' असें उत्तर दिलें असें राजशेखर व भोज यांनी आपापल्या ग्रंथांत म्हटलें आहे.

वरील दोन श्लोकांवरून विक्रमादित्याने कालिदासाला आपला दूत म्हणून स्वतःचा माण्डलिक कुन्तलेश याच्या दरबारीं पाठविलें होतें; तेथे त्याचा प्रथम अपमान झाला; तथापि त्याने तेथे राहून व तेथील परिस्थितीचें निरीक्षण करून ' कुन्तलेश तुझ्यावर राज्याचा भार टाकून स्त्रियांशीं विलास करण्यांत दंग असतो ' असा रिपोर्ट आपला प्रभु विक्रमादित्य यास केला व त्यानेहि ' कांही हरकत नाही, मी त्याच्या राज्याचें रक्षण करण्यास समर्थ आहे ' असा जबाब दिला असें दिसतें.

'कुन्तलेश्वरदौत्य' ग्रंथ सध्या उपलब्ध नसल्याने त्याविषयी अधिक माहिती मिळत नाही. तथापि वरील उताऱ्यांवरून तो नाटकरूपाचा असावा व त्यांत कालिदासाचें थोडेंबहुत आत्मचरित्र आलें असावें असें दिसतें. अशा तऱ्हेचीं ऐतिहासिक नाटकें प्राचीन काळीं संस्कृतांत लिहिलीं जात. याचें ठळक उदाहरण विशाखदत्ताचें 'मुद्राराक्षस' हें होय. याशिवाय याच लेखकाचे 'देवीचन्द्रगुप्त' नामक ऐतिहासिक नाटक होतें. त्यांत कांही महत्त्वाच्या गुप्तकालीन घटनांचा उल्लेख होता हें अलीकडे ज्ञात झालेल्या अलंकारग्रंथ व ताम्रपट यांतील उल्लेखांवरून सिद्ध झालें आहे. तशाच प्रकारचें हें कुन्तलेश्वरदौत्य नाटक असावें.* आमच्या ऐति-

* कदाचित् कालिदासाच्या इतर नाटकांप्रमाणे हेंहि नाटक शृंगार-प्रधान असून मालविकाग्निमित्रांतल्याप्रमाणे त्याला फक्त ऐतिहासिक घटनेची पार्श्वभूमि दिली असेल. राजशेखराची विद्धशालभंजिका, बिल्हणाची कर्णसुन्दरी इत्यादि संस्कृत नाटकांतहि तत्कालीन ऐतिहासिक घटनांची पार्श्वभूमि आढळते.

हासिक ग्रंथांविषयीच्या अनास्थेमुळे हीं नाटकें पुढे नष्ट झालीं. म्हणून उपलब्ध असलेल्या अन्य साधनांवरून त्यांचें स्वरूप अजमाविलें पाहिजे.

कुन्तलेश्वरदौत्यांत निर्देशिलेले विक्रमादित्य व कुन्तलेश्वर कोण याचा आता विचार करूं. कालिदास विक्रमादित्याचा आश्रित होता अशी परंपरागत आख्यायिका आहे व ती सर्व विद्वानांनी मान्य केली आहे. तथापि हा विक्रमादित्य कोण याविषयी मात्र विद्वानांत ऐकमत्य नाही. या बाबतींत मुख्य असे दोनच पक्ष आहेत. कांहींच्या मतें हा विक्रमादित्य सध्या विक्रम संवत् या नांवाने प्रचलित असलेल्या शकाचा संस्थापक होय. याच्या उलट दुसरे कांही विद्वान म्हणतात की तो गुप्तवंशी विख्यात सम्राट् द्वितीय चन्द्रगुप्त-विक्रमादित्य असावा. यांपैकी पहिल्या पक्षाचें साहाय्य आपला प्रश्न सोडविण्यांत मिळणें शक्य दिसत नाही. कारण या विक्रमादित्याच्या काळाची आपणांस फारशी माहिती नाही. किंबहुना असा कोणी विक्रमादित्य ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत होऊन गेला होता काय याविषयीहि निश्चित पुरावा मिळत नाही. दुसऱ्या पक्षाची मात्र मदत मिळणें शक्य आहे. कारण गुप्तकालाविषयी आता बरीच माहिती उपलब्ध झाली आहे. तेव्हा चन्द्रगुप्त-विक्रमादित्याचा कोणा कुन्तलेशाशीं संबंध आला होता काय याचा विचार करूं.

या बाबतींत आतापर्यंत दोन मतें व्यक्त झालीं आहेत. मुंबईच्या सेंट झेवियर कॉलेजचे प्रोफेसर हेरास यांनी हा कुन्तलेश्वर कदम्बवंशी काकुत्स्थवर्मन् असावा असें मत प्रतिपादलें आहे.* कारण त्या काळीं कदम्ब हे कुन्तलदेशावर राज्य करीत होते. दक्षिण महाराष्ट्र, मुंबई इलाख्याचे कानडी जिल्हे व म्हैसूरचा उत्तर भाग या प्रदेशाला पूर्वी कुन्तल अशी संज्ञा होती. कदम्बांची राजधानी वैजयन्ती (सध्याची वनवासी) ही या भागांतच उत्तर कानडा जिल्ह्यांत आहे. शिवाय कदम्बांच्या एका लेखांत काकुत्स्थवर्मन् या राजाने आपली मुलगी देऊन गुप्तराजांच्या कुळाला प्रसिद्ध केलें असें म्हटलें आहे. तेव्हा द्वितीय चन्द्रगुप्ताने या कदम्ब राजाची मुलगी आपल्या मुलाकरिता स्वीकारिली

* बिहार आणि ओरिसा सोसायटीचें जर्नल्, पु. १२, भाग ४ पाहा.

असावी व तो विवाहसंबंध जुळवून आणण्याच्या कामावर कालिदासाची योजना झाली असावी असें अनुमान प्रो. हेरास यांनी केलें आहे. पण तें बरोबर दिसत नाही. कारण हा काकुत्स्थवर्मन् इ. स. ४५० च्या सुमारास म्हणजे चन्द्रगुप्ताच्या काळानंतर सुमारें पन्नास वर्षांनी होऊन गेला असावा असें इतिहासज्ञांचें मत आहे. शिवाय कदम्बांचें राज्य चन्द्रगुप्ताच्या तन्त्राने चाललें होतें यालाहि कांही पुरावा नाही.

दुसरें मत प्रो. कृष्णस्वामी ऐयंगार यांचें. त्यांनी आपल्या लेखांत हा कुन्तलेश वाकाटकवंशी द्वितीय प्रवरसेन असावा असें प्रतिपादिलें आहे.* चन्द्रगुप्ताच्या काळीं गुप्त व वाकाटक या घराण्यांचा वैवाहिक संबंध आला होता, कारण चन्द्रगुप्ताने आपली मुलगी प्रभावती गुप्ता ही वाकाटकवंशी द्वितीय रुद्रसेन यास दिली होती. हा रुद्रसेन विवाहानंतर थोडयाच वर्षांनी वारला. तेव्हा प्रभावती गुप्ता आपल्या अल्पवयी मुलाच्या नांवाने राज्य करूं लागली. तिला मदत करण्याकरिता चन्द्रगुप्ताने आपल्या पदरचे अनुभवी अधिकारी व मुत्सद्दी विदर्भांत पाठविले होते असें दिसतें. कारण प्रभावती गुप्तेच्या ताम्रपटांत वाकाटकांच्या वंशावळीला प्राधान्य दिलें नसून गुप्तांच्या वंशावळीला दिलें आहे.† या प्रसंगीं राजकवि कालिदास हाहि विदर्भांत आला असावा व त्याने तेथे असतांना मेघदूत काव्य रचलें व द्वितीय प्रवरसेनास सेतुबन्ध काव्य रचण्यांत मदत केली असें अनुमान करतां येतें. कालिदासाचा वाकाटकांशीं असा संबंध आल्यामुळे कुन्तलेश हा वाकाटक द्वितीय प्रवरसेनच असावा असें मत प्रो. ऐयंगार यांनी प्रतिपादिलें. 'या प्रवरसेनाचें कुन्तलदेशावर राज्य नव्हतें. तेव्हा त्याला कुन्तलेश्वर कसें म्हटलें?' असा आक्षेप या मतावर येण्याजोगा होता. पण त्याचें निराकरण प्रो. ऐयंगार यांनी पुढील प्रकारें केलें. अजंठ्याच्या एका लेखांत या प्रवरसेनाचा आजा पहिला पृथ्वीषेण याने कुन्तलाधिपतीचा पराभव केला होता असें म्हटलें

* प्रो. ऐयंगार यांचे समग्र लेख (ओरिएंटल् बुक् एजन्सीने प्रकाशित केलेले), भाग १, पृ. २७१-२७४ पाहा.

† प्रभावती गुप्तेचा पुण्यास सापडलेला ताम्रपट पाहा. एपिग्राफिया इंडिका, पृ. १५, पृ. ३९ इ.

आहे. त्यानंतर वाकाटकांनी कुन्तलेश ही पदवी धारण केली असावी. याला उपोद्बलक असा पुरावा श्रीकृष्ण कवीच्या भरतचरित काव्यांत आढळतो. या काव्याच्या आरंभीं प्राचीन कवींची स्तुति करतांना श्रीकृष्ण कवीने प्रवरसेनाचा कुन्तलेश म्हणून निर्देश केला आहे.* या सर्व प्रमाणांवरून द्वितीय प्रवरसेन हाच कुन्तलेश असावा असें मत प्रो. ऐयंगार यांनी प्रतिपादिलें व त्या वेळीं उपलब्ध असलेल्या पुराव्यावरून तेंच सयुक्तिक भासत असल्याने इतरहि कांही संशोधकांनी त्याला पुष्टि दिली. याच मताचा पुरस्कार दहा वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या माझ्या 'कालिदास' पुस्तकांत मी केला होता. तथापि प्रो. ऐयंगार यांच्या मतावर कांही ठिकाणीं आक्षेप घेतां येण्याजोगा होता. गुप्त व वाकाटक यांचा इतका घनिष्ठ संबंध असतां प्रथम प्रसंगीं कालिदासाचा असा अपमान वाकाटकांच्या दरबारीं झाला असेल हें संभवनीय वाटत नव्हतें. शिवाय वाकाटकांनी कुन्तलनृपतीचा पराभव केला होता हें खरें असलें तरीं त्यांनी स्वतः 'कुन्तलेश' ही पदवी धारण केली होती असें त्यांच्या कोरीव लेखांवरून दिसत नाही. उलट बालाघाट येथे सापडलेल्या त्यांच्या अगदी शेवटच्या ताम्रपटांतहि वाकाटक नृपति नरेन्द्रसेन याचा कुन्तल राजकन्येशीं विवाह झाल्याचा उल्लेख आहे, त्यावरूनहि वाकाटक व कुन्तलेश हे भिन्न होते हें उघड आहे. श्रीकृष्ण कवि निश्चित कोणत्या काळीं होऊन गेला हें माहीत नाही, तथापि त्याचें काव्य बरेंच अलीकडचें दिसतें. तेव्हा त्यांतील विधानाचा पुरावा या विवादास्पद बाबतींत निर्णायक मानतां येत नाही.

* तो श्लोक येणें प्रमाणे—'जलाशयस्यान्तरगाधसत्त्वमलब्धबन्धं गिरिचौर्यवृत्त्या। लोकेष्वलं कान्तमपूर्वसेतुं बबन्ध कीर्त्या सह कुन्तलेशः ॥' भरतचरित, सर्ग १, श्लो. ४. यांत अनेक शब्दांवर श्लेष आहे. भावार्थ— 'श्रीरामचंद्राने समुद्रांत मोठमोठ्या पर्वतप्राय शिला जोडून तयार झालेला व लंकेपर्यंत जाणारा असा सेतु बांधला; पण कुन्तलेशाने त्याच्यावरहि ताण केली. कारण त्याने मन्दबुद्धींना आकलन न होणारा, अन्य ग्रंथांतून कांही चोरून न घेतां रचलेला, जगांत सुप्रसिद्ध व सुन्दर असा अपूर्व सेतु (सेतुबन्ध काव्यग्रंथ) आपल्या कीर्तीसह निर्माण केला.'

प्रस्तुत लेखकाच्या अलीकडच्या संशोधनावरून या प्रश्नावर जास्त प्रकाश पडत आहे. सातारा,* कोल्हापूर,† गोकाक,‡ व गोवें|| या ठिकाणीं गेल्या दहा पंधरा वर्षांत चार ताम्रपट सापडले आहेत. त्यांचा साकल्याने विचार करतां इ. स. च्या चौथ्या शतकापासून दक्षिण-महाराष्ट्रांत मानपूर येथे एक राष्ट्रकूट-घराणें राज्य करीत होतें असें स्पष्ट दिसतें. या घराण्याचा मूळ पुरुष मानाङ्क हा असून त्याने आपल्या नांवें मानपुर नामक नगर स्थापून तेथे आपली राजधानी केली होती. वर उल्लेखिलेल्या ताम्रपटांपैकी कोल्हापूर जवळ सांपडलेल्या ताम्रपटांत मानाङ्काला 'श्रीमत्कुन्तलानां प्रशासिता'–'समृद्ध अशा कुन्तल देशाचा अधिपति'– असें म्हटलें आहे. या तामपटाचे संपादक म्हैसूर युनिव्हर्सिटींतील डॉ. कृष्ण यांनी या ठिकाणीं 'श्रीसात्कुन्त धरा नः प्र ईसिता' असें कांही तरी वाचून व सात्‌कुन्त म्हणजे सातपुडा असा शोध लावून हें घराणें वऱ्हाड-मध्यप्रांतांत राज्य करीत होतें असें म्हटलें आहे ! पण तें चूक आहे. वर दिलेल्या शुद्ध वाचनावरून मानाङ्क हा कुन्तल देशावर राज्य करीत होता, हें स्पष्ट दिसेल. कुन्तल देशांत कृष्णा नदीचें खोरें व त्याच्या दक्षिणेचा महाराष्ट्र यांचा समावेश होत असे. 'विख्यातकृष्णवर्णे तैलस्नेहोपलब्धसरलत्वे । कुन्तलविषये नितरां विराजते मल्लिकामोदः ॥' हा उत्तर चालुक्यांच्या एका ताम्रपटांतील§ चालुक्यनृपति जयसिंह ऊर्फ

* भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, पु. ८, पृ. १६३ इ.

† म्हैसूर आर्किऑलाजिकल सर्व्हे रिपोर्ट, सन १९२९, पृ. १९७ इ.

‡ एपिग्राफिया इंडिका, २१, पृ. २८९ इ.

|| ए. इं., पु. २४, पु. १४३ इ.

§ ए. इं., पु. १२, पृ. १५३. या श्लोकाचे श्लेषामुळे दोन अर्थ होतातः—(१) कृष्णवर्णाबद्दल प्रख्यात असलेल्या व तेलाच्या चिक्कणतेनें सरळ झालेल्या (युवतीच्या) केशपाशांत मोगरीचा सुवास अतिशय खुलतो. (२) ज्यामध्ये कृष्णवर्णा नामक प्रसिद्ध नदी आहे व तैलप राजाविषयीच्या निष्ठेने ज्यांतील लोक सद्वर्तनी झाले आहेत अशा कुन्तल देशांत (तैलपाचा नातू) मल्लिकामोद ऊर्फ जयसिंह अतिशय शोभतो.

मल्लिकामोद याविषयी आलेला श्लेषपूर्ण सुंदर श्लोक पाहा. यांत कुन्तल-देशांत कृष्णवर्णा ऊर्फ कृष्णा नदी वाहते असा स्पष्ट निर्देश आहे. कोल्हापूरच्या ताम्रपटांत अने नदीच्या तीरावरील काम्यक व जावल या वाड्यांसहित पांडरंगपल्ली नामक गाव एका ब्राह्मणास दान दिल्याचा उल्लेख आहे. यांतील अने नदी ही कृष्णा नदीस मिळणारी येन्ना नदी किंवा वेणा नदी असावी. जावल तर जावळीचें प्राचीन रूप दिसतें. काम्यक गाव जावळीच्या आसपास सापडतें काय पाहिलें पाहिजे. तथापि एवढ्या निर्देशांवरून सातारा जिल्हा राष्ट्रकूट मानांकाच्या राज्यांत अंतर्भूत होत होता यांत संशय नाही. वरील ताम्रपटांतील कुन्तल देशाचा उल्लेख आतापर्यंत वाचतां न आल्यामुळे हें राष्ट्रकूट घराणें कोठे राज्य करीत होतें याविषयी संशोधकांनी अनेक तर्कवितर्क केले होते; पण या चार ताम्रपटांच्या प्राप्तिस्थानांवरून व त्यांत उल्लेखिलेल्या ग्रामनामांच्या शोधावरून दक्षिण महाराष्ट्रांत सातारा, कोल्हापूर, सोलापूर या भागावर या राष्ट्रकूटांचें राज्य होतें असें स्पष्ट दिसतें. त्यांची राजधानी मानपुर हें सातारा जिल्ह्यांतील माण तालुक्याचें मुख्य गाव माण हें असावें.

या ताम्रपटांतील अक्षरवटिका व कांही कालनिर्देश यांवरून हें घराणें इ. स. च्या चवथ्या शतकापासून दक्षिण-महाराष्ट्रांत राज्य करीत असावें असें दिसतें. त्यांचें राज्य उत्तरेस गोदावरी नदीपर्यंत पसरलें असावें. गोदावरीच्या उत्तरेस विदर्भांत वाकाटकांचा अंमल होता. इ. स. च्या चौथ्या शतकांत वाकाटक वंशाच्या दोन शाखा गोदावरीच्या उत्तरेस राज्य करीत असलेल्या आढळतात. वडील पातीची राजधानी नागपूरजवळचें नन्दिवर्धन असून तिच्या अमलाखाली उत्तर-वऱ्हाड व मध्यप्रांताचे नागपूर, वर्धा, भंडारा, छिंदवाडा, बैतूल, बालाघाट इत्यादि जिल्हे होते. धाकट्या पातीची राजधानी वत्सगुल्म (हल्लीचें अकोला जिल्ह्यांतील वाशीम) असून तिच्या राज्यांत अजंठा पर्वतराजीच्या दक्षिणेचा व गोदावरीच्या उत्तरेचा मुलूख अन्तर्भूत होत होता असें दिसतें. वाकाटकांची धाकटी पाती व राष्ट्रकूट यांचीं राज्यें एकमेकास लागून असल्यामुळे त्यांच्यामध्ये कटकटीचे प्रसंग वरचेवर

उद्भवत असले तर त्यांत आश्चर्य नाही. याचें प्रत्यंतर या दोन्ही राजवंशांच्या कोरीव लेखांत आढळतें. वत्सगुल्माच्या वाकाटकांचा एक कोरीव लेख अजंठा येथील १६ नंबरच्या गुहेंत कोरला आहे. त्यांत विंध्यसेन* नामक राजाने कुन्तलेशाचा पराजय केल्याचा उल्लेख आहे. याच्या उलट राष्ट्रकूटांच्या कोल्हापूरजवळ सापडलेल्या ताम्रपटांत मानाङ्कनृपतीने विदर्भ व अश्मक देश जिंकल्याचें नमूद केलें आहे. अश्मक हें गोदावरीच्या तीरावरील प्रदेशाचें नांव होतें. दुसरा देश विदर्भ हा वत्सगुल्म वाकाटकांच्या अमलाखालचा दक्षिण विदर्भ असावा. तेव्हा हे दोन राजवंश समकालीन मानण्यांत कांहीच हरकत नाही.

द्वितीय चंद्रगुप्त-विक्रमादित्याचा वाकाटकांना आश्रय होता तसा या राष्ट्रकूटांनाहि होता असें दिसतें. कदाचित् वाकाटकांप्रमाणे या राष्ट्रकूट घराण्याशींहि त्याने विवाहसंबंध जोडला असेल. दक्षिणेंतील राजांशी विवाहसंबंध करून त्यांचें सख्य कायम करणें ही गुप्तांची राजनीति होती. दक्षिण-कुंतलावर राज्य करणाऱ्या कदंबांशींहि गुप्तांचा विवाहसंबंध होता हें वर दाखविलें आहे. चंद्रगुप्ताचा समकालीन राष्ट्रकूटवंशी राजा देवराज हा होता. याला राष्ट्रकूटांच्या ताम्रपटांत देवराज इंद्राची उपमा दिली आहे. कदाचित् इंद्राप्रमाणे हा देवराज विलासलोलुप असेल. याच्या दरबारींच कालिदासाला चंद्रगुप्ताने आपला वकील म्हणून पाठविलें होतें असें दिसतें. कालिदासाने केलेल्या रिपोर्टांत हा कुन्तलेश विलासोपभोगांत मग्न झाला असून त्याने तुझ्यावर (म्हणजे विक्रमादित्यावर) या राज्याच्या संरक्षणाची जबाबदारी टाकली आहे असें म्हटलें आहे व चंद्रगुप्तानेहि कालिदासाच्या श्लोकांत थोडा फरक

* अजंठ्याचा लेख त्रुटित असल्याने पं. भगवानलाल इंद्रजी, डॉ. बुल्हर वगैरेंनी या राजाचें नांव पृथ्वीषेण असें वाचलें होतें. कारण त्या वेळीं वाकाटकांच्या दोन शाखा होत्या अशी माहिती उपलब्ध नव्हती. प्रस्तुत लेखकाने अलीकडे हा लेख हैद्राबाद आर्किऑलॉजिकल सीरिज, नं. १४ मध्ये प्रसिद्ध केला आहे.

करून 'माझ्यावर राज्याचा भार टाकून कुन्तलेश विलासमग्न होवो' असें उत्तर दिलें असें काव्यमीमांसादि ग्रंथांतील उल्लेखांवरून दिसतें.

वाकाटक व हे कुन्तलेश राष्ट्रकूट या दोन्ही राजवंशांना चंद्रगुप्ताचा आश्रय असल्याने त्यांच्यामध्ये पुढे स्नेहसंबंध उत्पन्न झाले व त्यांचेंच पर्यवसान चंद्रगुप्ताचा पणतु वाकाटक-नृपति नरेन्द्रसेन याचा विवाह कुंतलेशाची कन्या अज्झितभट्टारिका हिच्याशीं होण्यांत झालें असें वाकाटकांच्या बालाघाट येथे सांपडलेल्या ताम्रपटावरून दिसतें.

भरतचरित या संस्कृत काव्याचा कर्ता कृष्ण कवि याने सेतुबन्ध काव्याचा निर्माता (वाकाटक) प्रवरसेन यास कुन्तलेश म्हटलें आहे खरें, पण हा कवि प्रवरसेनानंतर कित्येक शतकांनी होऊन गेलेला दिसतो. तत्कालीन कोरीव लेखांवरून वाकाटकांचें राज्य कधीकाळीं कुन्तल देशावर होतें असें दिसत नाही. उलट त्यांचीं कुन्तलेशाशीं युद्धें व विवाहसंबंध झाल्याचें कोरीव लेखांत नमूद आहे. म्हणून कृष्णकवीचें विधान या विवादास्पद बाबतींत प्रमाण मानतां येत नाही.

याप्रमाणे कालिदासाने 'सेतुबन्ध' व 'कुन्तलेश्वरदौत्य' हे दोन ग्रंथ रचले होते या परंपरागत व लेखनिविष्ट अशा आख्यायिकांची उपपत्ति समाधानकारक रीतीने लावतां येते व त्या योगें कालिदास हा द्वितीय चन्द्रगुप्त-विक्रमादित्य याच्या काळीं इ. स. ४०० च्या सुमारास होऊन गेला या मताला पुष्टि मिळते. पुढे कधीकाळीं कुन्तलेश्वरदौत्य ग्रंथ उपलब्ध झाल्यास तत्कालीन राजकीय परिस्थितीवर व कालिदास-चरित्रावरहि जास्त प्रकाश पडेल हें उघड आहे.*

---

* अलीकडील संशोधनावरून गोवें येथील ताम्रपट या राष्ट्रकूट वंशाचा नव्हे असें दिसतें. ए. इं., पु. २६, पृ. ३३७ पाहा. पण याच वंशाचा आणखी एक ताम्रपट दौंड पेटयांत सापडला आहे. महाराष्ट्रांतील प्राचीन ताम्रपट व शिलालेख, पृ. १ पाहा. (वा. वि. मि.)

भवभूतीचें जन्मस्थान*

पुरा यत्र स्रोतः पुलिनमधुना तत्र सरितां
विपर्यासं यातो घनविरलभावः क्षितिरुहाम् ।
बहोर्दृष्टं कालादपरमिव मन्ये जगदिदं
निवेशः शैलानां तदिदमिति बुद्धिं द्रढयति ॥

उत्तररामचरित, २, २७.

संस्कृत वाङ्मयांत कालिदासाच्या खालोखाल सन्मानाचें स्थान ज्याने आपल्या रम्य नाट्यकृतींनी मिळविलें आहे त्या भवभूति कवीच्या स्थलकालाविषयीहि अद्याप विद्वानांचें ऐकमत्य झालें नाही. तसें पाहिलें तर त्याने आपल्या नाटकांत स्वतःविषयी सर्वस्वीं मुग्धता न स्वीकारतां आपल्या कालाविषयी नाही, तरी जन्मस्थान, कुल व विद्वत्ता यांविषयी स्पष्ट विधानें केलीं आहेत. उदाहरणार्थ—' महावीरचरित ' नाटकाच्या प्रस्तावनेंत नाटककाराविषयी माहिती देतांना सूत्रधार म्हणतो—' अस्ति दक्षिणापथे पद्मपुरं नाम नगरम्। तत्र केचित्तैत्तिरीयिणः काश्यपाश्चरण-गुरवः पङ्क्तिपावनाः पञ्चाग्नयो धृतव्रताः सोमपीथिन उदुम्बरनामानो ब्रह्मवादिनः प्रतिवसन्ति। तदामुष्यायणस्य तत्रभवतो वाजपेययाजिनो महाकवेः पञ्चमः सुगृहीतनाम्नो भट्टगोपालस्य पौत्रः पवित्रकीर्तेर्नीलकण्ठ-स्यात्मसंभवः श्रीकण्ठपदलाञ्छनो भवभूतिर्नाम जातूकर्णीपुत्रः कविर्मित्र-धेयमस्माकमित्यत्रभवन्तो विदाङ्कुर्वन्तु।' या उताऱ्यावरून भवभूतीच्या

* हा लेख मध्यप्रांत संशोधन मंडळ, नागपूर, या संस्थेच्या ता. १४ जानेवारी १९३५ रोजीं भरलेल्या प्रथम वार्षिक सम्मेलन-प्रसंगीं वाचला होता. नंतर 'सह्याद्रि,' पुणें, मे १९३५, पृ. १–१० मध्ये तो प्रसिद्ध झाला.

पूर्वजांचें कुलनाम उदुंबर होतें; ते तैत्तिरीयशाखेचे, काश्यपगोत्री, पंचाग्नि ठेवणारे, सोमयाग करणारे, ब्रह्मवेत्ते असे विद्वान् व सत्वशील ब्राह्मण होते; भवभूतीच्या महाकवि नामक पांचव्या पूर्वजाने वाजपेय नांवाचा श्रौतयाग केला होता; हे ब्राह्मण दक्षिणापथांत पद्मपुर नामक नगरांत राहत असत. इत्यादि निश्चित माहिती आपणांस मिळते. दक्षिणापथ या शब्दाने सामान्यतः नर्मदेच्या दक्षिणेचा प्रदेश समजण्यांत येतो. 'नर्मदाया दक्षिणेन देशो दक्षिणापथः' असें वात्स्यायनकामसूत्राचा टीकाकार यशोधर म्हणतो. राजशेखराच्या 'काव्यमीमांसें'त (पृ. ९३) 'माहिष्मत्याः परतो दक्षिणापथः' माहिष्मतीच्या (सध्याच्या महेश्वराच्या) पलीकडचा (म्हणजे दक्षिणेचा) प्रदेश हा दक्षिणापथ असें स्पष्ट म्हटलें आहे. तेव्हा भवभूति दक्षिण हिंदुस्थानांतील कवि होता यांत संशय नाही. 'मालतीमाधवा'च्या प्रस्तावनेंत तर यापेक्षाहि निश्चित विधान सापडतें. त्या नाटकांत सूत्रधाराच्या तोंडीं 'अस्ति दक्षिणापथे विदर्भेषु पद्मपुरं नाम नगरम्' असे शब्द घातले आहेत; त्यावरून भवभूतीचें जन्मस्थान जें पद्मपुर तें प्राचीन विदर्भांतच होतें असें म्हणतां येतें. वास्तविक इतका स्पष्ट निर्देश असल्यावर या बाबतींत तरी संशय राहूं नये.

पद्मपुर विदर्भांतच

पण कांही विद्वानांनी ही गोष्टहि संशयास्पद मानली आहे. 'मालतीमाधवा'चा प्राचीन टीकाकार जगद्धर हा पद्मपुर म्हणजे पद्मावती असें म्हणतो. भवभूतीने आपल्या 'मालतीमाधव' नाटकाचं संविधानक पद्मावती नगरींत घडलें असें दाखविलें आहे. विदर्भाच्या राजाचा मंत्री आपल्या माधव नामक मुलास पद्मावती नगरीच्या प्रधानाच्या मुलीशीं त्याचा विवाह व्हावा या हेतूने विद्याभ्यासासाठी म्हणून पद्मावतीस पाठवितो, असा कथाभाग त्या नाटकांत आला आहे; त्यावरून ही पद्मावती नगरी विदर्भांत नव्हती हें उघड आहे. पद्मावती नगरीच्या आसमंताद्भागाचें, तेथील पारा, सिंधु, मधुमती व लवणा या नद्यांचें, मधुमती व सिंधु यांच्या संगमावरच्या सुवर्णबिंदु नामक शिवालयाचें, जें

वर्णन 'मालतीमाधवां'त आलें आहे तें ग्वाल्हेरपासून नैर्ऋत्येस ५० मैलांवर असलेल्या ग्वाल्हेर संस्थानांतील नरवार शहरास लागू पडतें, असें जनरल कनिंगहॅम या प्रसिद्ध पुराणवस्तुसंशोधकाने प्रथम दाखविलें. नरवार ज्या नदीवर वसलें आहे तिचें नांव सिंधु आहे. पारा नदीला सध्या पार्वती म्हणतात. मधुमती व लवणा या नद्यांचीं सध्या महुवर व नोन अशीं नांवें प्रचलित आहेत. मधुमती व सिंधु या नद्यांच्या संगमावर सध्याहि सोनबिंदु नामक शिवालय दृष्टीस पडतें. नरवारचा पुरातन व प्रेक्षणीय किल्ला इतिहासप्रसिद्ध आहे. नऊ नागराजे पद्मावतीस राज्य करीत होते असें पुराणांत म्हटलें आहे. तेथे नागराजांचीं तांब्यांचीं नाणीं सापडलीं आहेत, त्यांवरून तें नगर निदान इ. स. च्या तिसऱ्या-चौथ्या शतकाइतकें प्राचीन आहे. तेव्हा भवभूतीचें पद्मावती नगर म्हणजे हल्लीचें नरवार होय असा जनरल कनिंगहॅमने तर्क केला.* त्यानंतर ग्वाल्हेर संस्थानच्या पुराणवस्तुसंशोधन खात्याचे अधिकारी श्री. एम्. बी. गर्दे यांनी उत्खनन करून पद्मावती म्हणजे खुद्द नरवार नसून त्याच्या जवळचें पवाया (ज्याला पदमपवाया असेंहि म्हणतात तें) खेडें होय असें निश्चित ठरविलें.†

कै. मा. व्यं. लेले यांनी आपल्या 'मालतीमाधव-सार व विचार' या निबंधांत (पृ. ५) पद्मावती हेंच भवभूतीचें जन्मस्थान पद्मपुर असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. भवभूति पद्मावतीचें फार बारकाईने वर्णन करतो तेव्हा तें स्थान त्याला बालपणापासून परिचित असावें अशी त्यांची विचारसरणी होती. पण हें गाव विदर्भांत नाही ही अडचण येत होती; तेव्हा त्यांनी 'अस्ति दक्षिणापथे पद्मपुरं नाम नगरम्' असा 'विदर्भेषु' हें पद नसलेला 'महावीरचरितां'तील पाठच प्रमाण मानला. शिवाय 'मालतीमाधवा'च्या अत्यंत प्राचीन प्रतींत

---

* Cunningham—
Coins of Mediaeval India, p. 22.

† Archaeological Survey of India Report for 1915–1916, pp. 101–109.

'विदर्भेषु' हें पद आढळत नाही व त्या नाटकाचा प्राचीन टीकाकार जगद्धर पद्मावती म्हणजे पद्मपुर असें म्हणतो या गोष्टीहि त्यांच्या तर्काला पोषक होत्या. पण पदमपवाया हें गांव दक्षिणेंत नाही ही अडचण येत होती. त्यावर त्यांनी खालील तोड सुचविली —"पद्मपुर नगर दक्षिणापथांत आहे' हा उल्लेख सूत्रधाराच्या भाषणांत आला आहे. भवभूतीचीं नाटकें कालप्रियनाथाच्या उत्सवप्रसंगीं प्रथम रंगभूमीवर आलीं असें त्यांच्या प्रस्तावनांतील उल्लेखांवरून दिसतें. हा कालप्रियनाथ म्हणजे उज्जैनीचा महाकालेश्वर नसून काल्पीचा असावा. पदमपवाया हें गाव काल्पीच्या दक्षिणेस असल्याने ' दक्षिणापथांत पद्मपुर आहे ' या सूत्रधारोक्तीची उपपत्ति लावतां येते. येथे दक्षिणापथ या शब्दाचा रूढार्थ न घेतां ' दक्षिण दिशेचा मार्ग ' असा यौगिक अर्थ घेतला पाहिजे." कै. लेले यांच्या वरील अनुमानांत अनेक गोष्टी गृहीत धरल्या आहेत. पद्मावती शहराचें सूक्ष्म वर्णन करतां येण्यास तें भवभूतीचें जन्मस्थानच असलें पाहिजे असें नाही.* दक्षिणापथ व कालप्रियनाथ यांचे त्यांनी केलेले अर्थहि तितकेसे ग्राह्य वाटत नाहीत. म्हणून भवभूतीचें पद्मपुर ग्वाल्हेर संस्थानांत नसून वऱ्हाडांत असावें असा तर्क उत्तररामचरिताचे विद्वान् संपादक, डॉ. श्री. कृ. बेलवलकर यांनी केला आहे. तथापि वऱ्हाडांत पद्मपुर नामक एखादें प्राचीन नगर होतें, असा स्पष्ट पुरावा त्यांस उपलब्ध न झाल्यानें त्यांनी 'Pending the discovery of new data, then, we may assume that Bhavabhuti's ancestral home was in the Berars and not near the site of Narwar in Gwalior'† (नवीन पुरावा सापडेपर्यंत भवभूतीच्या पूर्वजांचें राहण्याचें ठिकाण

---

* 'मालतीमाधवां'तील नायक माधव याच्याप्रमाणे भवभूतीहि विद्याभ्यासाकरिता विदर्भांतून पद्मावतीस गेला असावा असा तर्क डॉ. श्री. कृ. बेलवलकर यांनी केला आहे; ते खरा मानल्यास त्याला पद्मावतीचें सूक्ष्मज्ञान कसें प्राप्त झालें याची उपपत्ति लावतां येते.

† Rama's Later History (Harward Oriental Series), p. xxxvii.

ग्वाल्हेर संस्थानांतील नरवारनजीक नसून वऱ्हाडांत होतें असें आपण गृहीत धरूं) असे उद्गार काढले आहेत.

नवीन पुरावा

या बाबतींत अवश्य असलेला पुरावा नुकताच उपलब्ध झाला आहे. सुमारें पंधरा वर्षांपूर्वी मध्यप्रांताच्या दुर्ग जिल्ह्यांत पानाबारस जमीनदारींत मोहल्ला या गावीं एका घराचा पाया खणत असतां ताम्रपटाचा एक पत्रा सापडला होता. त्या वेळीं त्याचे ठसे घेऊन ते मध्यप्रांतांतील प्रसिद्ध संशोधक रायबहादूर हिरालाल यांच्याकडे पाठवले होते. ताम्रपटाचा एकच पत्रा उपलब्ध झाला होता व त्यांत ज्याने तो कोरविला त्या राजाची सबंध वंशावळ किंवा नांवहि आलें नसल्यामुळे यांत कांही विशेष महत्त्वाचा उल्लेख नसेल असें वाटून त्याकडे त्यांचें साहजिकच दुर्लक्ष झालें. गतवर्षींच्या जानेवारी महिन्याचे अखेरीस रा. ब. डॉ. हिरालाल यांनी त्या ताम्रपटाची मला माहिती दिली. तथापि त्याच्या मालकाचें नांव त्यांना आठवत नव्हतें व स्वतःच्या जवळचा त्याचा ठसाहि त्यांस सापडत नव्हता; म्हणून त्या ताम्रपटाचा शोध लावतां येईना. पुढे कांही दिवसांना आपल्या घरचे जुने कागदपत्र चाळीत असतां त्यांना तो ठसा सापडला. सुदैवाने त्यांनी त्या ठशावर त्यावेळीं ताम्रपटाच्या मालकाचें नांवहि लिहून ठेवलें होतें. त्यावरून दुर्ग जिल्ह्याचे डेप्युटी कमिशनर श्रीयुत बा. अ. बंबवाले यांनी माझ्या विनंतीवरून चौकशी केली. तेव्हा तो दुर्ग येथील मुनशी अकबरखान नामक मुसलमान गृहस्थाजवळ सापडला.

या ताम्रपटावरील लेख कांही कारणाने अपूर्ण राहिलेला दिसतो. हा लेख इ. स. च्या चौथ्यापासून सहाव्या शतकापर्यंत मध्यप्रांत-वऱ्हाड-मध्ये प्रचलित असलेल्या पेटिकाशीर्षक लिपींत कोरला आहे. त्यांत वाकाटक वंशांतील प्रथमच्या दोन राजांचें वर्णन आलें आहे. तें वाकाटकांच्या इतर ताम्रपटांतल्याप्रमाणेच असल्याने त्यांत कांही नवीन माहिती नाही. तथापि त्यांतील एक निर्देश अत्यंत महत्त्वाचा आहे. बहुतेक प्राचीन ताम्रपटांत ते जेथून दिले होते त्या स्थानांचा उल्लेख असतो. प्रस्तुत

ताम्रपटांतहि 'पद्मपुरात्' (पद्मपुराहून) असा स्पष्ट निर्देश लेखारंभींच आला आहे, त्यावरून तो ताम्रपट पद्मपुराहून दिला असावा किंवा देण्याचें योजिलें असावें हें उघड आहे. पद्मपुर या शब्दानंतर 'वासकात्' (शिबिराहून) 'स्थानात्' (ठिकाणाहून) 'विजयस्कन्धावारात्' (विजयी शिबिरांतून) यासारखा एखादा शब्द नसल्याने हा ताम्रपट देणाऱ्या राजाचा त्यावेळीं पद्मपुरीं तात्पुरता मुक्काम होता असें म्हणतां येत नाही. पद्मपुर हें तीर्थ म्हणूनहि प्रसिद्ध नाही. तेव्हा तो ताम्रपट तीर्थक्षेत्रीं ब्राह्मणास दिला होता असेंहि वाटत नाही. म्हणून पद्मपुर ही प्रस्तुत ताम्रपट देणाऱ्या राजाची राजधानी असावी असें अनुमान करतां येतें.

वाकाटकांचें साम्राज्य

विदर्भांत वाकाटकांनी इ. स. च्या चौथ्या शतकापासून सहाव्या शतकापर्यंत राज्य केलें. उत्तर हिंदुस्थानांत ज्याप्रमाणे गुप्तांचें त्याप्रमाणेच दक्षिण हिंदुस्थानांत वाकाटकांचें कांही काळ विस्तृत व समृद्ध असें साम्राज्य होतें, असें कोरीव लेखांवरून आता सिद्ध झालें आहे. विदर्भांत त्यांच्या कालपरत्वें अनेक राजधान्या झालेल्या दिसतात. गुप्तवंशी विख्यात राजा द्वितीय चन्द्रगुप्त–विक्रमादित्य याची कन्या प्रभावतीगुप्ता वाकाटक नृपति द्वितीय रुद्रसेन यास दिली होती. सध्या उपलब्ध झालेल्या वाकाटकांच्या सर्व ताम्रपटांत हिचा पुणें येथे सापडलेला ताम्रपट प्राचीन आहे. तो 'नन्दिवर्धनात्' म्हणजे नन्दिवर्धनाहून दिला होता. नन्दिवर्धन या स्थलनामानंतर 'वासकात्' वगैरेसारखे शब्द नसल्याने तें वाकाटकांचें त्यावेळचें राजधानीचें शहर असावें असें दिसतें.* त्यानंतर तिच्या द्वितीय प्रवरसेन नामक मुलाचे अनेक ताम्रपट प्रसिद्ध झाले आहेत. त्यांतील कित्येक प्रवरपुराहून दिले आहेत; त्यावरून त्याने आपल्या नांवाने

* हें स्थान रामटेकजवळचें नागपूर जिल्ह्यांतील नन्दरधन किंवा नगरधन असावें.

प्रवरपुर* नामक नगर स्थापून तेथें राजधानी नेली होती असें अनुमान होतें. प्रवरसेनानंतर नळवंशी भवदत्तवर्म्याने विदर्भावर स्वारी करून त्याचा कांही भाग काबीज केला व नन्दिवर्धन ही आपली राजधानी केली असें त्याच्या पेटिकाशीर्षक लिपींत कोरलेल्या ताम्रपटावरून प्रस्तुत लेखकाने सन १९३३ च्या नागपूरच्या 'वागीश्वरी' मासिकांतील वाकाटकांवरील लेखांत दाखविलें आहे. त्यानंतर प्रवरसेनाचा नातु द्वितीय पृथ्वीषेण याने पराक्रमानें आपलें राज्य परत मिळविलें असें दिसतें. त्याचा एकच व तोहि अपूर्ण असा ताम्रपट उपलब्ध झाला आहे व तो त्याने वेम्बार गावीं आपला मुक्काम असतांना (वेम्बारवासकात्) देण्याचें योजिलें होतें असें त्यांतील उल्लेखांवरून दिसतें. त्यावेळीं त्याची राजधानी कोठें होती हें समजत नाही. त्यानंतर देवसेन, हरिषेण इत्यादि वाकाटक नृपतींचें वर्णन अजंठ्याच्या शिलालेखांत आलें आहे. त्यांची राजधानी वत्सगुल्म, अकोला जिल्ह्यांतील वाशीम, ही होती. तेव्हा प्रस्तुत ताम्रपट बहुधा द्वितीय पृथ्वीषेणाने किंवा त्याचा पिता नरेन्द्रसेन याने देण्याचें योजिलें होतें व त्यावेळीं त्याची राजधानी पद्मपुर होती असें वाटतें.

भवभूतीच्या पूर्वजांस राजाश्रय

वाकाटक राजे स्वतः ब्राह्मण असून श्रौत विद्येचे अभिमानी होते. पहिल्या प्रवरसेनाने अग्निष्टोम, आप्तोर्याम, उक्थ्य, षोडशिन्, अतिरात्र, वाजपेय, बृहस्पतिसव, साद्यस्क्र व अश्वमेध यज्ञ केल्याचा उल्लेख वाकाटकांच्या बहुतेक ताम्रपटांत सापडतो तेव्हा त्यांचा विद्वान् व यज्ञयाग करणाऱ्या ब्राह्मणांस आश्रय असला पाहिजे. त्यांच्या ताम्रपटांवरून तीच गोष्ट सिद्ध होते. द्वितीय प्रवरसेनाने अनेक गावें ब्राह्मणांना दान दिल्याचें त्याच्या ताम्रपटांवरून दिसतें. भवभूति आपल्या नाटकांत पद्मपुरच्या आपल्या पांच पिढ्यांचा निर्देश करतो. तो आठव्या शत-

* हें स्थान वर्धा जिल्ह्यांतील पवनार असावें. तेथील अवशेषांचें वर्णन पुढे एका लेखांत केलें आहे. (वा. वि. मि.)

काच्या आरंभीं होऊन गेला असें संशोधकांनी ठरविलें आहे. प्रत्येक पिढी तीस वर्षांची मानल्यास भवभूतीचा पांचवा पूर्वज वाजपेययज्ञकर्ता महाकवि हा सहाव्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेला असावा. वाकाटक नृपति द्वितीय पृथ्वीषेण याचा काळ संशोधकांनी इ. स. ४७० ते ४८५ हा ठरविला आहे. हे काळ अनुमानाने ठरविले असल्यामुळे त्यांत पाचपंचवीस वर्षांची चूक असणें असंभवनीय नाही व पद्मपुरास भवभूतीच्या पूर्वजांच्या पिढ्याहि केवळ पांचच होऊन गेल्या असेंहि म्हणतां येत नाही. एकंदरींत भवभूतीचा पांचवा पूर्वज व हा वाकाटक राजा यांचे काळ जवळ जवळ येतात यांत संशय नाही. भवभूतीच्या नाटकांतील प्रस्तावनांवरून त्याचे पूर्वज तैत्तिरीय शाखेचे, पंचाग्नि राखणारे व वाजपेय यागासारखे यज्ञ करणारे, मीमांसक व ब्रह्मवादी ब्राह्मण होते. वाकाटक राजांनी अशा विद्वान् व सच्छील ब्राह्मणांस मुद्दाम आपल्या राजधानींत बोलावून त्यांच्याकरवीं यज्ञ करविले असावे असें अनुमान केलें तर तें बहुधा चूक होणार नाही. वाकाटकां-नंतर मध्यप्रांत–वऱ्हाडांत प्रथम कलचुरींची व नंतर चालुक्यांची सत्ता झाली. कलचुरींची राजधानी माहिष्मती व चालुक्यांची बदामी या दोन्ही या प्रांतांत नव्हत्या. त्या वेळीं हा प्रांत एखाद्या प्रांताधिकाऱ्याकडे सोपविला असेल किंवा त्या राजांचे लहान सहान मांडलिक राजे येथे राज्य करीत असतील. त्यांचा विद्वानांस व कवींस तितका आश्रय नस-ल्याने भवभूतीस राजाश्रयार्थ किंवा लोकाश्रयार्थ उत्तर हिंदुस्थानांत पद्मावती, कनोज इत्यादि ठिकाणीं हिंडावें लागलें असावें असें दिसतें. शेवटीं शेवटीं त्याला कनोजच्या यशोवर्म्याचा आश्रय होता हें कल्हणाच्या राजतरंगिणीवरून स्पष्ट दिसतें.

पद्मपुराचा शोध

येथवर भवभूतीचें जन्मस्थान पद्मपुर हें उत्तर हिंदुस्थानांत नसून प्राचीन विदर्भांतच होतें व तें एके काळीं वाकाटकांच्या राजधानीचें शहर होतें याबद्दल नुकताच उपलब्ध झालेला पुरावा आपण पाहिला.

आता हें पद्मपुर कोठे होतें याचा विचार करूं. प्राचीन विदर्भ म्हणजे सध्याचा वऱ्हाड अशी सामान्यतः समजूत असल्याने हें पद्मपुर वऱ्हाडांतच कोठेतरी असावें असें अनेक संशोधकांनी म्हटलें आहे. पण त्यांना त्याचा पत्ता अद्यापि लागला नाही.* सध्याच्या वऱ्हाड प्रांतांतील चारहि जिल्ह्यांतील खेडेगावांच्या सरकारी याद्या मी लक्षपूर्वक चाळून पाहिल्या, पण त्यांमध्ये पद्मपुर किंवा त्याला जुळेल अशा नांवाचें एकहि खेडेगाव किंवा शहर मला आढळलें नाही. वास्तविक विदर्भ म्हणजे सध्याचा वऱ्हाडच ही प्रचलित समजूत चुकीची आहे. कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्रां'त वर्धा नदीने प्राचीन विदर्भाचे दोन भाग झाले होते व राज्यविषयक कलह मिटविण्याकरिता ते दोघा चुलत भावांना दिले होते, असें दाखविलें आहे. त्यावरून हल्लीप्रमाणे वर्धा नदी विदर्भाची पूर्व मर्यादा नसून, त्या नदीच्या पूर्वेस जवळ जवळ अर्धा विदर्भ पसरला होता यांत संशय राहत नाही. विदर्भावर राज्य करणाऱ्या वाकाटकांची पहिली राजधानी नंदिवर्धन ही सध्याच्या वऱ्हाडांत नसून नागपूर जिल्ह्यांत रामटेकजवळ आहे. वाकाटक नृपति द्वितीय प्रवरसेन याचे ताम्रपट छिंदवाडा, शिवनी, नागपूर, भंडारा इत्यादि मध्यप्रांताच्या अनेक जिल्ह्यांत सापडले आहेत व त्यांत उल्लेखिलेलीं गावेंहि या जिल्ह्यांत सापडतात. तेव्हा विदर्भाची पूर्व मर्यादा वर्धा नदी ही नसून तो पूर्वेस छत्तीसगडपर्यंत पसरला होता यांत संशय नाही. भोजकट (सध्याचा वऱ्हाड) याप्रमाणे वेणाकट (वाईनगंगेच्या तीरावरचा प्रदेश) हाहि प्राचीन विदर्भाचा एक जिल्हा होता.

---

*डॉ. सर रा. गो. भांडारकरांनी हें पद्मपुर चांद्याजवळचें असावें असें म्हटलें आहे व भवभूति ज्या शाखेचा होता त्या तैत्तिरीय शाखेचे ब्राह्मण चांद्याच्या आसपास दिसतात, हें प्रमाण दिलें आहें. इतर संशोधकांनी याचाच अनुवाद केला आहे. चांद्याजवळ पद्मापुर म्हणून एक खेडें आहे; पण तें भवभूतीचें जन्मस्थान पद्मपुर असणें शक्य नाही. कारण (१) त्यांचे नांव निराळें आहे; (२) तें खेडें अलीकडे ५०–६० वर्षांत वसलें आहे असें सांगतात; आणि (३) तेथे महत्त्वाचे प्राचीन अवशेष दिसत नाहीत.

आमगावाजवळचें पदमपूर

भंडारा व चांदा या मध्यप्रांताच्या मराठी जिल्ह्यांत पद्मपुर, पद्मापुर किंवा पदमपूर या नांवाचीं सहा गावें मला सापडलीं. यांपैकी चांदा जिल्ह्याच्या चांदा, सिरोंचा व ब्रह्मपुरी तहसिलींत प्रत्येकी एक, भंडारा जिल्ह्याच्या साकोली तहसिलींत दोन व आमगाव जमीनदारींत एक अशी त्यांची वर्गवारी आहे. भवभूतीचें जन्मस्थान पद्मपुर हें एक नगर होतें असें तो स्वतःच सांगतो. वात्स्यायनाच्या कामसूत्राचा टीकाकार यशोधर 'नगरं अष्टशतग्राममध्ये तद्व्यवहारस्थानम्'—आठशें गावांचा व्यवहार जेथे चालतो तें नगर अशी नगराची व्याख्या करतो. तेव्हा प्राचीन पद्मपुर बरेंच मोठें असावें. शिवाय मागें उल्लेखिलेल्या ताम्रपटांवरून तें एके काळीं वाकाटकांच्या राजधानीचें शहर होतें. तेव्हा तेथे बरेच प्राचीन अवशेष असावे अशी आपली सहजच कल्पना होते. या दृष्टीने चौकशी करतां भंडारा जिल्ह्यांतील आमगाव स्टेशनजवळच्या पदमपूर या गावीं कांही अवशेष आहेत अशी माहिती मला मिळाली. शिवाय द्वितीय प्रवरसेनाच्या शिवनीच्या ताम्रपटाने दान दिलेलें गाव व त्याच्या चतुःसीमेच्या गावांपैकी बहुतेक गावें पदमपुरापासून पांचसहा मैलांच्या टापूंत सापडतात हें मी अन्यत्र दाखविलें आहे. त्यावरून त्या गावाभोवतालचा प्रदेश वाकाटकांच्या अमलाखालीं होता यांत संशय नाही. तेव्हा आमगावाजवळचें पदमपूर हेंच भवभूतीचें पद्मपुर असण्याचा संभव वाटून गेल्या नाताळांत माझे स्नेही श्रीयुत ल. रा. कुलकर्णी, एम्. ए. व श्रीयुत ना. पु. पाठक यांसह मी पदमपूरला गेलों होतों. तेथील अवशेषांचें वर्णन खाली थोडक्यांत दिलें आहे.

पदमपूरचे अवशेष

पदमपूर हें गांव भंडारा जिल्ह्याच्या आमगाव जमीनदारींत असून बंगाल–नागपूर रेल्वेच्या आमगाव स्टेशनच्या पूर्वेस अडीचतीन मैलांवर आहे. शेतासह त्या गावाचें क्षेत्रफळ १४६४ एकर असून लोकसंख्या सन १९११ च्या खानेसुमारींत ९२० होती ती गेल्या म्हणजे १९३१ च्या खानेसुमारींत फक्त ११२ भरली. गावाच्या पश्चिमेस एक लहानशी

टेकडी आहे. तिला नाथमहाराजांची टेकडी म्हणतात. तिजवर कांही जुन्या मूर्ति आहेत, असें समजल्यावरून आम्ही प्रथम तिजवर चढलों व तेथ आम्हास प्राचीन वाटलेल्या दोन शिलांचे फोटो घेतले. या दोन्ही शिला भुरक्या रंगाच्या असून प्रत्येकावर एक चतुर्भुज देव व द्विभुज देवी याच्या आकृति कोरल्या आहेत. यांची उंची २ फूट १० इंच आहे. देवाच्या वरच्या दोन्ही हातांत शूळासारखें आयुध असून खालच्या उजव्या हातांत गदा व डाव्या हातांत कलश आहे. देवीच्या डोक्यावर छत्र असून उंच केलेल्या डाव्या हातांत कलश आहे व उजवा हात मोकळा खाली सोडला आहे या मूर्ति मध्ययुगीन कालांतल्या दिसतात.

टेकडीवरून पूर्वेला झाडींत लपलेलें पदमपूर, त्याच्या पश्चिमेचें लहानसें तळें, सभोवार इतस्ततः पसरलेले उंच खडक, यांचें मनोहर दृश्य दिसतें. वर वर्णिलेल्या मूर्ति ठेवल्या आहेत त्या ठिकाणाजवळ एक नैसर्गिक रीतीने झालेली लहानशी गुहा आहे. तिला दरवाज्याची दगडी चौकट लावून बंदिस्त करण्याची सोय केली आहे. आंत एक पाण्याचें लहानसें टाकें दिसलें. या टेकडीवर माघ महिन्यांत शिवरात्रीस जत्रा भरते असें आम्हांस समजलें.

नंतर टेकडीवरून खाली उतरून आम्ही पदमपूर गावाच्या वायव्य दिशेस सुमारें २५० यार्डांवर जमिनीपासून १८ फूट उंच असलेल्या खडकावर एक मूर्ति ठेविली आहे असें समजल्यावरून तिकडे गेलों. या खडकावर जाण्यास वाट नसल्याने आमचे आमगावचे स्नेही श्री. भय्याजी जोशी यांनी गावांतून शिडी आणवून आमची वर चढण्याची सोय केली होती. या खडकावर चढल्यावर दुसऱ्या एका खडकाला टेकून ठेवलेली एक मोठी शिला दिसली. तिजवर मध्यभागीं चतुर्भुज विष्णूची मूर्ति कोरली असून दोन्ही बाजूंनी खांब व त्यावर कमान दाखविली आहे. विष्णूची मूर्ति सन्मुख आहे. त्याच्या हातांत शंख, चक्र, गदा व पद्म दाखविलीं आहत. खांबाच्या बाहेर उजव्या बाजूस सेवक व डाव्या बाजूस सेविका असून त्यांच्या हातांत चवऱ्या आहेत. मूर्तीच्या शिल्पकामावरून ती मध्ययुगीन कालाच्या शेवटीं म्हणजे दहावें ते बारावें शतक या कालांतील असावी असा तज्ज्ञांचा तर्क आहे.

नंतर आम्हीं पदमपूरच्या जवळच्या शेतांत गेलों. तेथे बांधावर तीन छिन्नविच्छिन्न मूर्तींचे अवशेष इतस्ततः पडलेले दिसले. ते एके ठिकाणीं करवून आम्ही फोटो घेतले. त्यांपैकीं एक मूर्ति मूळची दोन फूट उंचीची असावी. ती काळ्या दगडाची कोरलेली असून तिचें पॉलिश व शिल्पकाम प्रेक्षणीय आहे. या मूर्तीचा गळ्यापासून वरचा भाग तुटलेला दिसला; तो जवळच सापडल्यामुळे आम्ही तो धडावर ठेवून फोटो घेतला. ही मूर्ति जैन तीर्थंकर पार्श्वनाथ याची आहे. तो कमलावर पर्यंकासन घालून ध्यानस्थ असलेला असा दाखविला आहे. त्याच्या वक्षःस्थलावर श्रीवत्स आहे. त्याच्या कानाचे चाप लांब दाखविले आहेत. त्याच्या डोक्यावर सात फणांचा नाग असून त्यावर एकावर एक तीन छत्रें दिसतात. नागाच्या दोन्ही बाजूस हातांत माला घेऊन उभे राहिलेले पूजक दाखविले आहेत. त्याच्या पलीकडे दोन्ही बाजूंस एक लहानसें देऊळ कोरलें असून त्यांत पार्श्वनाथाच्या मूर्तीसारखीच पण लहान मूर्ति कोरली आहे. छत्रांच्या दोन्ही बाजूस एक एक हत्ती आपली सोंड वर उचलून अभिषेक करीत आहे असें दाखविलें आहे. मूर्तीचे हात, गळ्याजवळचा कांही भाग व सापाच्या फणा छिन्नविच्छन्न झाल्या आहेत. ही मूर्तीहि वरील विष्णूच्या मूर्तीप्रमाणेच मध्ययुगीन काळांतील दिसते. याशिवाय जवळच शेतांत पडलेली ऋषभदेव किंवा आदिनाथ या जैन तीर्थंकराचीहि एक मूर्ति वर वर्णिलेल्या पार्श्वनाथासारखीच ध्यानमग्न अशी कोरली आहे. मात्र हिच्या डोक्यावर नाग व दोन्ही बाजूस हत्ती नाहीत. पायांच्या खाली याचें चिन्ह वृषभ हें कोरलें आहे.

नागपूर म्यूझियम्‌मधील मूर्ति

याशिवाय पदमपूर गावाजवळच दोन मोठ्या देवळांचे अवशेष आम्हांस दिसले. यांपैकी एक देऊळ गावाच्या उत्तरेस सुमारें २०० यार्डांवर असावें. या देवळाच्या अवशेषांत दरवाजाच्या चौकटीची गणेशपट्टी ८ फूट लांब, १ फूट ७ इंच रुंद व १ फूट ६ इंच जाड भरली, त्यावरून त्या दरवाजाच्या रुंदीची कल्पना येईल. बाकीचे अवशेषहि याला शोभणारे

असे विशाल आकाराचे दिसले. वरील गणेशपट्टीवरील गणपतीच्या मूर्तीवरून हें देवालय हिंदु देवतेचें-बहुधा शिवालय-असावें. दुसरें देऊळ गावाला लागूनच उत्तर दिशेला होतें असें दिसतें. याचे कांही दगडी खांब व देवाच्या मूर्तीमागची दगडी प्रभावळ एवढीं मात्र अद्यापि उभीं आहेत. कांही खांबांचे तुकडे मातींत दबून गेलेले दिसले. वाटेवरच पडलेला एक तुकडा आम्ही मोजला. तो आरंभीं चौकोनी, नंतर अष्टकोनी, पुढे षोडशकोनी व शेवटीं वाटोळा असा घडविलेला दिसला. तळभागाची लांबी २१ इंच व रुंदी १९ व एकंदर तुकड्याची उंची ४ फूट ४ इंच भरली. प्रभावळीच्या आकारावरून तिच्यापुढील मूर्ति सुमारें पांच फूट उंचीची असावी असें वाटलें. सुमारें चाळीस वर्षांपूर्वी तेथील एक मोठी मूर्ति एका साहेबाने नागपूरच्या म्यूझियम्‌करिता नेली असें तेथील एका शेतकऱ्याने आम्हांस सांगितलें. नागपुरास परत आल्यावर आम्ही तिचा शोध केला. पण नागपूर म्यूझियम्‌मध्ये पदमपुराहून आलेली एकहि मूर्ति आम्हांस दिसली नाही. या म्यूझियम्‌मध्ये आरंभीं ;आरंभीं मूर्ति व कोरीव लेख यांच्या मूळ ठिकाणांचे निर्देश व्यवस्थितपणे लिहून ठेवण्याची काळजी घेतली नव्हती. म्हणून कित्येक मूर्तींचीं मूळ ठिकाणें (provenance) माहीत नाहीत असे शेरे म्यूझियम्‌च्या यादींत मारले आहेत. म्यूझियम्‌मध्ये भंडाऱ्यास सापडलेली ५८ इंच उंचीची व उत्कृष्ट रीतीने कोरलेली शिवाची उभी मूर्ति दृष्टीस पडते. ती खुद्द भंडाऱ्याहून आणली असेल काय याविषयी आम्हास संशय आला. कारण खुद्द भंडाऱ्यास प्राचीन देवळाचे अवशेष दिसत नाहीत. ही मूर्ति साधारणपणे पदमपूरच्या प्रभावळीइतकीच दिसल्यामुळे आम्ही आमच्या स्नेह्याकडून पदमपूरच्या प्रभावळीच्या लांबीरुंदीचीं मापें मागविलीं. व आश्चर्याची गोष्ट ही की, लांबी, रुंदी व आकृति या बाबतींत ती प्रभावळ व नागपूर म्यूझियम्‌मधील शिवाची मूर्ति ह्या अगदी एकसारख्या भरल्या. तेव्हा ती मूर्ति भंडारा शहरांतून आणली नसून भंडारा जिल्ह्यांतून-अर्थात् पदमपुराहून-आणली होती असें सिद्ध झालें.

या मूर्तीची पादपीठासहित उंची ४ फूट १० इंच असून ती तांबूस सैकतप्रस्तराची (sandstone) बनविलेली आहे. तिचें शिल्पकाम अत्युत्कृष्ट असून प्राचीन पद्धतीचें आहे. मूर्तीच्या डोक्यावरची कमान सर्पाची केली असून मध्ये कीर्तिमुख आहे. भगवान् शंकराच्या शिरावर जटामुकुट आहे. कीर्तिमुखाकार रत्न व त्यावर चंद्रकला समोरच दिसते. त्याच्या गळयांत अनेक अलंकार दाखविले आहेत. गळयांत घातलेली पुष्पमाला जवळजवळ घोटयापर्यंत खाली लोंबत असलेली दिसते. त्याच्या उजवीकडच्या वरच्या हातांत त्रिशूल व खालच्या हातांत रुद्राक्षमाळ आहे. डावीकडच्या वरच्या हातांत फणा पसरलेला सर्प व खालच्या हातांत कलश दिसतो. खालच्या उजव्या व डाव्या हाताजवळ अनुक्रमें मोरावर बसलेला कार्त्तिकेय व गणेश दाखविले आहेत. त्यांच्या पायांजवळ उजव्या बाजूस त्रिशूलधारी व डाव्या बाजूस कपालमुख दंड धारण करणारा सेवक कोरला आहे. त्यांच्या पलीकडे दोन्ही बाजूस चवरी घेऊन एक एक सेविका उभी आहे. पाद-पीठावर एका बाजूस बसलेल्या स्त्रीची आकृति व तिच्या समोरच नंदी कोरला आहे.

सुदैवाने या मूर्तीचा बहुतेक भाग उत्तम स्थितींत आहे. म्हणून शिल्पकाराचें कसब तींत उत्कृष्ट रीतीने व्यक्त झालेलें दिसत आहे. भगवान् शंकराची मुद्रा प्रसन्न व गंभीर आहे. एकंदर शिल्पकाम अप्रतिम आहे. नागपूरच्या म्यूझियम्‌मध्ये हिच्याइतकी उत्कृष्ट मूर्ति दुसरी नाही, असे उद्गार लखनौ म्यूझियम्‌चे क्यूरेटर नुकतेच येथील मूर्ति पाहण्यास आले होते त्यांनी मजजवळ काढले. मूर्तीच्या शिल्पकामावरून ती दहाव्या ते अकराव्या शतकांतील असावी असें वाटतें.

प्राचीन पद्मपुर

अशा प्रकारच्या अनेक उत्कृष्ट प्राचीन मूर्ति जेथे अद्यापि सापडतात तें हें पदमपूर एके काळीं अत्यंत भरभराटीस पोचलेलें शहर असावें याविषयी संशय राहत नाही. पदमपूरच्या सभोवतालची वनश्रीहि प्रेक्षणीय आहे. गावाच्या सभोवार इतस्ततः पसरलेल्या टेकडया व

त्यावरचे विविधाकृति विशाल खडक यांचीं दृश्यें मनोहर आहेत. सध्या येथे झाडी बरीच कमी झाली आहे. पण कांही वर्षांपूर्वीपर्यंत या बाजूचा भाग जंगलांत मोडत होता व त्यांत व्याघ्रादि हिंस्र पशूंची व सर्पासारख्या विषारी प्राण्यांची वसति होती, असें गॅझेटियरमध्ये म्हटलें आहे. अशा परिसरांत भवभूतीचें बालपण गेलें असल्यास त्यास सृष्टीचें भव्य व उदात्त स्वरूप निरीक्षण करण्याची गोडी लागावी यांत आश्चर्य नाही. उत्तररामचरितांतील

स्निग्धश्यामाः क्वचिदपरतो भीषणाभोगरूक्षाः
स्थाने स्थाने मुखरककुभो झाङ्कृतैर्निर्झराणाम् ।
एते तीर्थाश्रमगिरिसरिद्गर्तकान्तारमिश्राः
संदृश्यन्ते परिचितभुवो दण्डकारण्यभागाः ॥ * (२, १४)

यासारखीं दंडकारण्यांतील स्थलांचीं वर्णनें किंवा

निष्कूजस्तिमिताः क्वचित्क्वचिदपि प्रोच्चण्डसत्त्वस्वनाः
स्वेच्छासुप्तगभीरघोरभुजगश्वासप्रदीप्ताग्नयः ।
सीमानः प्रदरोदरेषु विलसत्स्वल्पाम्भसो यास्वयं
तृष्यद्भिः प्रतिसूर्यकैरजगरस्वेदद्रवः पीयते ॥ † (२, १६)

यासारखीं रोमहर्षण करणारीं अरण्यांचीं वर्णनें कवीला पद्मपुरच्या आसमंताद्भागांतील निसर्गाच्या दृश्यावरून सुचलीं असलीं पाहिजेत

* कोठे काळेभोर तर कोठे (अरण्यांच्या) भयंकर विशालतेमुळे रुक्ष दिसणारे, ठिकठिकाणीं निर्झरांच्या झंकाररवाने ज्यांनी दिग्भाग निनादित केले आहेत असे, व तीर्थे, आश्रम, पर्वत, नद्या, दऱ्या व अरण्यें यांनी युक्त असे हे मला परिचित असलेले दण्डकारण्याचे भाग दृग्गोचर होत आहेत.

† या दण्डकारण्याच्या प्रान्तभागांत कोठे पक्ष्यांचेंहि कूजन ऐकूं येत नसल्याने शांतता आहेत, तर कोठे श्वापदांच्या भयंकर गर्जना ऐकूं येत आहेत; यथेच्छ झोप घेणाऱ्या, प्रचण्ड व भयंकर सर्पांच्या श्वासोच्छ्वासानें येथील वणवे पेटले आहेत; क्वचित् दऱ्याखोऱ्यांत थोडेसें पाणी चमकत आहे (व म्हणून) तहानलेल्या सरड्यांना अजगरांचा घाम प्यावा लागत आहे.

अशी कल्पना सहजच रसिक प्रेक्षकाच्या मनांत येते. सध्या प्राचीन पद्मपुर नगराचें अगदी लहान अशा खेड्यांत रूपांतर झालें आहे. पूर्वी जेथे नगर होतें तेथे आता शेतें झालीं आहेत. या शेतांतच मागे वर्णिलेल्या जैन तीर्थंकरांच्या भग्न मूर्ति इतस्ततः पडलेल्या आम्हांस दिसल्या. अजूनहि शेतें नांगरतांना क्वचित् मातीचीं भांडीं व देवतांच्या लहान-सहान मूर्ति नांगराच्या फळाने वरती येतात. तेथील लोकांनी तशीं कांही प्राचीन मातीचीं भांडीं व गणपतीची १$\frac{3}{4}$ इंच उंचीची तांबूस सैकत-प्रस्तराची छोटी मूर्ति आम्हास दिली. एके काळीं भरभराटीस आलेल्या विस्तृत व समृद्ध अशा नगराचें हें आजचें दृश्य भवभूतीच्या दृष्टीस पडल्यास अनेक वर्षांनी दण्डकारण्याला भेट देणाऱ्या रामाप्रमाणेच त्याच्याहि तोंडून खालील उद्गार बाहेर पडतील यांत संशय नाही—

पुरा यत्र स्रोतः पुलिनमधुना तत्र सरिताम्
विपर्यासं यातो घनविरलभावः क्षितिरुहाम् ।
बहोर्दृष्टं कालादपरमिव मन्ये वनमिदं
निवेशः शैलानां तदिदमिति बुद्धिं द्रढयति ॥

'पूर्वी जेथे नद्यांचीं पात्रें होतीं तेथे आता वाळवंटें झाली आहेत. झाडी दाट होती तेथे विरळ झाली आहे व विरळ होती तेथे दाट झाली आहे. पुष्कळ काळाने हें अरण्य दृष्टीस पडल्यामुळे तें जणू काय अगदीच निराळें असें दिसत आहे. पर्वताच्या स्थानावरून मात्र तेंच हें स्थान अशी ओळख मनाला पटत आहे.' पदमपुराच्या पूर्वेला सुमारें दीड मैल अंतरावर एक विशाल व सुंदर तलाव दृष्टीस पडतो. याच्या तीनहि बाजूंस उंच टेकड्या असून चौथ्या बाजूस बराच उंच व लांब बांध घालून पाणी अडविलें आहे. हा तलावहि प्राचीन असावा. सुमारें तीस वर्षांपूर्वी सरकारने पंधरा हजार रुपये खर्च करून या बांधाची दुरुस्ती केली. सध्या या तलावाचें पाणी आमगावच्या जमीनदाराच्या बागेकरिता पाटाने नेलें आहे. प्राचीन काळीं पदमपूर हें राजधानीचें शहर असल्यास या तलावांतून त्याला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असावा.

आणखी एक प्रमाण

आमगावाजवळचें सध्याचें पदमपूर हेंच भवभूतीचें जन्मस्थान व एके काळीं वाकाटकांची राजधानी झालेलें पद्मपुर होय हें सिद्ध करण्यास आणखीहि एक प्रमाण देतां येईल. भवभूति हा तैत्तिरीय शाखेचा ब्राह्मण होता. वाकाटकांच्या शिवनी येथे सापडलेल्या ताम्रपटाने ब्रह्मपूरक गाव ज्याला दान दिलें होतें. तो ब्राह्मणहि तैत्तिरीय शाखेचाच होता व तो गांव बाह्मनी या नांवाने पदमपूरच्या ईशान्येस सुमारें सात मैलांवर अद्यापि विद्यमान आहे. तेव्हा प्राचीन काळीं या भागांत त्या शाखेच्या ब्राह्मणांची वस्ती होती यांत संशय नाही. सध्या पदमपुरास ब्राह्मणवस्ती मुळीच नाही; तथापि पदमपूरच्या आसपास कारंजा, लांजी वगैरे ठिकाणीं अद्यापि तैत्तिरीय शाखेचे तैलंगी ब्राह्मण दृष्टीस पडतात.

वऱ्हाड व मध्यप्रांताचा पश्चिम भाग यांवर राज्य करणाऱ्या वाकाटकांची राजधानी त्यांच्या राज्याच्या मध्यभागीं नसून पूर्व सरहद्दीजवळ पदमपूरसारख्या ठिकाणीं असावी याचें कदाचित् कोणास आश्चर्य वाटेल. पण वाकाटकांनी प्रवरपुराहून आपली राजधानी हलविली, त्यावेळची राजकीय परिस्थिति लक्षांत घेतल्यास तसें आश्चर्य वाटणार नाही. वाकाटकांचा समकालीन नळवंशी भवदत्तवर्मा याचा एक ताम्रपट वऱ्हाडांत उमरावती जिल्ह्यांत ऋद्धपूर येथे सापडला आहे. त्यांत दान दिलेलें कदंबगिरिग्राम हें गाव वऱ्हाडच्या यवतमाळ जिल्ह्यांतील कळंब असावें, हें रा. य. रा. गुप्ते यांनी दाखविलें आहे.* हा ताम्रपट भवदत्तवर्म्यानें नन्दिवर्धनाहून दिला होता. हें नन्दिवर्धन वाकाटकांचें एके काळीं राजधानीचें शहर होतें, हें आम्ही वर दाखविलेंच आहे. तेव्हा भवदत्तवर्म्यानें वाकाटकांच्या राज्याचा पश्चिमेकडचा बराचसा भाग गिळंकृत केला होता यांत संशय नाही. या अनुमानाला वाकाटकांच्या कोरीव लेखाचाहि आधार आहे. द्वितीय पृथ्वीषेणाच्या बालाघाट येथे सापडलेल्या अपूर्ण ताम्रपटांत त्या राजाचें

* एफिग्राफिया इंडिका, पु. १९ पृ. १००

(पृथ्वीषेणाचें) निमग्नवंशस्योद्धर्ता–' विपत्तींत सापडलेल्या आपल्या वंशाचा उद्धार करणारा ' असें वर्णन केलें आहे. त्यावरून वाकाटक वंशाला त्यावेळीं फारच अवनत दशा आली होती असें दिसतें, व तिचें कारण वर उल्लेखिलेली भवदत्तवर्म्याची स्वारी हेंच असलें पाहिजे. या प्रसंगीं वाकाटकांचे मांडलिकहि त्यांस जुमानीतनासे झाले होते. फक्त पूर्वेकडचे कोसल (छत्तीसगढ), मेकल (नर्मदा नदीच्या उगमाजवळचा प्रदेश) व मालव या देशांचे राजे द्वितीय पृथ्वीषेणाचा पिता नरेंद्रसेन याशीं राजनिष्ठ राहिले होते, म्हणून बालाघाटाच्या ताम्रपटांत ' कोसल–मेकल–मालवाधिपतिभिरभ्यर्चितशासनः ' (कोसल, मेकल व मालव देशाचे अधिपति ज्याची आज्ञा पाळीत असत) असेंच नरेन्द्रसेनाचें वर्णन केलें आहे. विपत्प्रसंगीं पूर्वेकडच्या या राजांचें साहाय्य झाल्यामुळे नरेन्द्रसेनाने कोसल देशालगतच आपली राजधानी नेली असली तर आश्चर्य वाटण्याचें कारण नाही. पुढे पृथ्वीषेणाने नळवंशीयांस विदर्भांतून हाकून लावलें व त्यांची राजधानी पुष्करी उद्ध्वस्त केली असें नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या भवदत्तवर्म्याच्या मुलाच्या शिलालेखावरून दिसतें.* पण त्या इतिहासाशीं सध्या आपणांस कांही कर्तव्य नाही.

उत्खननाची आवश्यकता

येथवर आमगावाजवळचें पदमपूर हेंच वाकाटकांची एके काळीं राजधानी असलेलें व भवभूतींचें जन्मस्थान पद्मपुर होय, हें सिद्ध करण्यास शक्य तो पूरावा साधार व सविस्तर विद्वानांपुढे मांडला आहे. पदमपुरास अद्यापि उत्खनन झालें नाही. मध्यप्रांत–वऱ्हाडची सांगड दूरच्या पाटणा येथील पुराणवस्तुसंशोधनखात्याच्या मध्यविभागाशीं घातली असल्याने आतापर्यंत या प्रांतांत कोठेहि उत्खनन झालें नाही. पदमपूरला मोठाल्या प्राचीन इमारतींचे अवशेष आहेत याची माहिती सरकारास आज निदान साठ वर्षें तरी आहे. पण या इमारती खेडेगावांत कशा आल्या याचें

---

* एपिग्राफिया इंडिका, पु. २१ पृ. १५३.

त्यांस कोडें पडलें होतें.* तें वरील विवेचनाने उलगडेल व लौकरच पदमपुराला उत्खनन करण्याचें काम पुराणवस्तुसंशोधनखातें हातांत घेईल अशी आशा आहे.

पण उत्खनन झालें तरी भवभूतीच्या जन्मस्थानासंबंधी वर मांडला आहे त्यापेक्षा जास्त सबळ पुरावा कधीकाळीं उपलब्ध होईल काय याची शंका आहे. कारण भवभूतीने आपल्या मालतीमाधवांत पद्मावतीच्या आसमंताद्भागाचें जसें सविस्तर वर्णन केलें आहे, तसें पद्मपुरचें कोठेहि केलें नाही व इतरत्रहि कोठे पद्मपुरचें तसें वर्णन येत नाही. आता खुद्द भवभूतीच्या किंवा त्याच्या ज्ञात असलेल्या पूर्वजांच्या नांवाचा ताम्रपट पद्मपुरास उत्खननांत मिळाला तर तो यापेक्षा बलवत्तर असा पुरावा होईल यांत संशय नाही. पण तसा ताम्रपट मिळणें अशक्य नसलें तरी असंभवनीय आहे. सध्या तरी या पदमपुराखेरीज मध्यप्रांतांतील इतर पद्मपुरांत अशा तऱ्हेचे प्राचीन अवशेष मिळत नाहीत हें खरें. तेव्हा या लेखांत मांडलेल्या पुराव्यावरून भंडारा जिल्ह्यांतील आमगावाजवळचें पदमपूर हेंच भवभूतीचें जन्मस्थान पद्मपुर होय याविषयी विद्वानांची खात्री पटेल अशी आशा आहे.

---

* Cf. There are some curious old remains of massive stone buildings in the neighbourhood (of Amgaon) at a place called Padampur, but their origin is unknown.—Central Provinces Gazetteer (second edition), p. 4.

भवभूतीच्या नाटकांतील कालप्रियनाथ*

सुप्रसिद्ध वैदर्भ कवि भवभूति यांचीं तीनहि उपलब्ध नाटकें कालप्रियनाथाच्या उत्सवप्रसंगीं प्रथम रंगभूमीवर आलीं, असें त्यांच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे. उदाहरणार्थ, त्याचें पहिलें नाटक 'महावीरचरित' याच्या प्रस्तावनेंत सूत्रधार म्हणतो—

भगवतः कालप्रियानाथस्य यात्रायामार्यमिश्राः समादिशन्ति। (भगवान् कालप्रियानाथाच्या यात्रेमध्ये जमलेल्या सद्गृहस्थांनी मला आज्ञा केली आहे.)

त्यानंतरचें नाटक 'मालतीमाधव' याच्या प्रस्तावनेंत त्याच्या प्रथम प्रयोगाविषयी खालील उल्लेख आहे. सूत्रधार म्हणतो, 'मारिष, सुविहितानि रङ्गमङ्गलानि, संनिपतितश्च भगवतः कालप्रियनाथस्य यात्राप्रसंगेन नानादिगन्तवास्तव्यो महाजनसमाजः। आदिष्टश्चास्मि विद्वज्जनपरिषदा यथा केनचिदपूर्वप्रकरणेन वयं विनोदयितव्या इति।' (मारिषा! रंगभूमीचीं मंगलकृत्यें उत्तम रीतीने पार पडलीं आहेत. भगवान् कालप्रियनाथाच्या यात्रेच्या निमित्ताने भिन्न भिन्न दिशांतील दूर देशांत वास्तव्य करणारे अनेक लोक येथे आले आहेत. तेव्हा विद्वज्जनसभेने मला आज्ञा केली आहे की, एखाद्या नवीन नाटकाने आमचें मनोरंजन करावें.)

उत्तररामचरित हें तिसरें नाटकहि कालप्रियनाथाच्या यात्रेमध्ये जमलेल्या लोकांपुढे प्रथम दाखविलें गेलें, असें त्याच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे. तेव्हा भवभूतीचीं नाटकें प्रथम राजदरबारीं मान्यता

---

* 'युगवाणी', नागपूर, १९४७, पृ. ३६७–३७१.

पावलीं नसून लोकाश्रयावर प्रसिद्धीस आलीं व त्यांचा प्रथम प्रयोग कालप्रियनाथ नामक देवतेच्या यात्रेच्या प्रसंगीं झाला, हें स्पष्ट आहे. हें कालप्रियनाथाचें देवालय फार प्रसिद्ध असून त्याच्या यात्रेकरिता हिंदुस्थानांतील दूरदूरच्या भागांतून लोक येत असत, असें 'मालती-माधवां'तील वर्णनावरून दिसतें. हें कालप्रियनाथाचें देवालय कोठें होतें, हें ठरविण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखांत केला आहे.

प्रथम याविषयी संस्कृत टीकाकार काय म्हणतात, तें पाहूं. या देवाचें नांव 'कालप्रियानाथ' व 'कालप्रियनाथ' असें दोन प्रकारें आढळतें. दुसऱ्या नांवांतहि मूळचें रूप 'कालप्रियानाथ' असेंच असून नंतर 'ङ्यापोः संज्ञाछन्दसोर्बहुलम्*' या पाणिनीच्या सूत्रानुसार 'कालप्रिया' याचें 'कालप्रिय' असें रूप झालें, असें एका टीकाकाराने म्हटलें आहे. पुढे तो म्हणतो, कालप्रिया म्हणजे अम्बिका व तिचा नाथ म्हणजे शंकर. या स्पष्टीकरणांत 'भवानीपतिः' या नांवांतल्याप्रमाणे 'विरुद्धमतिकृत्' हा दोष येतो (काव्यप्रकाश, उल्लास ७) ही गोष्ट वेगळी. कालप्रिय-नाथाचें देवालय कोठें होतें, याविषयी टीकाकारांनी विशेष कांही लिहिलें नाही. 'त्या क्षेत्रांतील हें दैवत होतें,' 'कालप्रिया नांवाची देवता तेथे होती, तिची कथा पुराणांत पाहावी' इत्यादि उडवा-उडवीचीं विधानें करून त्यांनी वेळ मारून नेली आहे. रामचंद्रबुधेन्द्र नामक एका टीकाकाराने मात्र कालप्रियनाथ हा विदर्भांतील पद्म-नगरांत स्थापलेला देव होता व त्याच्या उत्सवप्रसंगीं हें 'मालतीमाधव' नाटक प्रथम दाखविलें गेलें, असें म्हटलें आहे. पण त्याच्या म्हणण्याला कांही आधार दिसत नाही. भवभूति हा स्वतः विदर्भांतील पद्मपुरचा राहणारा. त्याचे पूर्वजहि तेथे पांच सहा पिढ्या वास्तव्य केलेले. त्या नगरांत त्याच्या नाटकांचे प्रथम प्रयोग झाले असते, तर त्याने त्यांमध्ये आपले पूर्वज व स्वतःची विद्वत्ता याविषयी जी सविस्तर माहिती दिली

* वेदांत व विशेषनामांत समासाच्या पहिल्या अवयवाच्या स्त्रीलिंगवाचक ई व आ या प्रत्ययांचा स्वर पुष्कळदा ऱ्हस्व होतो. उदाहरणार्थ 'कालिदास.'

आहे, ती देण्याची त्याला आवश्यकता वाटती ना. शिवाय विदर्भात कालप्रियनाथ या नांवाचें विख्यात क्षेत्र होतें, असा इतरत्र कोठेहि उल्लेख नाही. तेव्हा हें कालप्रियनाथाचें देवालय विदर्भापासून दूर अंतरावर असावें व त्या ठिकाणीं भवभूतीविषयी लोकांस माहिती नसल्यामुळे त्याला ती आपल्या नाटकांच्या प्रस्तावनेंत देणें आवश्यक वाटलें असावें, असें अनुमान करण्यास हरकत नाही.

भवभूतीच्या नाटकाचे आधुनिक टिप्पणीकार कालप्रियनाथ हा उज्जयिनीचा 'महाकाल' होय, असें म्हणतात. उज्जयिनी हें फार पुरातन काळापासून क्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. तेथील महाकालाची द्वादश ज्योतिर्लिंगांत गणना होते व भवभूतीच्या पूर्वींच्या कालिदासादि संस्कृत कवींनी त्याचें सुंदर वर्णन केलें आहे. शिवाय कालिदासाप्रमाणे भवभूतिहि शिवोपासक होता, असा समज आहे. तेव्हा त्याचीं नाटकें महाकालाच्या यात्रेच्या प्रसंगीं प्रथम रंगभूमीवर आलीं असलीं तरी त्यांत आश्चर्य नाही. या कारणामुळे कालप्रियनाथ म्हणजे उज्जयिनीचा महाकालेश्वर हें मत आतापर्यंत विद्वन्मान्य झालें आहे.

पण हें मत बरोबर आहे, असें वाटत नाही. महाकालाचा उल्लेख व वर्णन अनेक संस्कृत ग्रंथांत व पुराणांत आढळतें खरें, पण त्यामध्ये कोठेहि त्याचें कालप्रियनाथ असें नांव दिसत नाही. शिवाय भवभूति हा शिवोपासक होता, असेंहि दिसत नाही. तसें असतें, तर कालिदासाने आपल्या सर्व नाटकांच्या आरंभीं शिवस्तुतिपर नान्दी घातली आहे, तसा प्रकार भवभूतीच्या नाटकांतहि दिसला असता. पण भवभूतीने फक्त 'मालतीमाधवां' त आरंभीं गणपतीच्या विनोदमय वर्णनानंतर शिवस्तुतिपर श्लोक घातला आहे. 'महावीरचरिता' च्या नान्दींत स्वयंभू नित्य चैतन्य ज्योतीला म्हणजे ब्रह्माला व 'उत्तररामचरितां' त पूर्वसूरींना नमन केलें आहे व तें त्याच्या वेदान्ती मताला अनुरूप असेंच आहे. 'मालतीमाधवा' च्या प्रस्तावनेंत

यद्वेदाध्ययनं तथोपनिषदां सांख्यस्य योगस्य च
ज्ञानं तत्कथनेन किं न हि ततः कश्चिद्गुणो नाटके ।

—इत्यादि श्लोकांत आपण वेद, उपनिषदें, सांख्य, योग इत्यादिकांचें अध्ययन केलें होतें, असें त्यानें स्वतःच सांगितलें आहे. तेव्हा त्याचीं धार्मिक मतें उदार झालीं होतीं व सर्व देवतांत एकच ब्रह्मतत्त्व वास करतें, हें मत त्याला मान्य झालें होतें, यांत संशय नाही. अर्थात् 'तो शैव होता व कालप्रियनाथाच्या यात्रेच्या प्रसंगीं त्याच्या नाटकाचे प्रयोग झाले, म्हणून कालप्रियनाथ हा उज्जयिनीचा महाकालच असावा,' असें म्हणतां येत नाही.

तर मग कालप्रियनाथ कोण व त्याचें देवालय कोठे होतें, असा प्रश्न उपस्थित होतो. यासंबंधी प्रस्तुत लेखकाच्या अलीकडील संशोधनावरून उपलब्ध झालेली माहिती पुढे दिली आहे.

भविष्यपुराण, वराहपुराण, स्कन्दपुराण इत्यादि पुराणांत कृष्णपुत्र साम्बाची कथा आली आहे. साम्बावर कृष्णाच्या अनेक स्त्रिया अनुरक्त झाल्या होत्या, असें नारदाने कृष्णाला सांगितल्यावर त्याने त्यासंबंधी चौकशी करून सांबाला तूं कुष्ठी होशील असा शाप दिला. नंतर सांबाने भगवान् सूर्याची आराधना मूलस्थान येथे केल्यावर तो त्या रोगांतून मुक्त झाला. पुढे सूर्याने त्याला वर देऊन लवकरच तुला माझी प्रतिमा मिळेल, तिची स्थापना कर असें सांगितलें. नंतर नेहमीप्रमाणे ऋषींसह तो चन्द्रभागा नदीस स्नानास गेला असतां सूर्याची तेजस्वी मूर्ति वाहात आलेली त्याला दिसली. तेव्हा त्याला सूर्यदेवाच्या सांगण्याची सत्यता पटून त्याने ती मूर्ति प्रवाहांतून काढून घेतली व तेथील मित्रवनामध्ये स्थापिली. नंतर त्याने त्याच मूर्तीला 'आपली ही सुंदर आकृति कोणी बनविली' असें विचारलें. त्यावर सूर्याने सांगितलें की, 'विश्वकर्म्याने हिमालयावर कल्पवृक्षांतून ही मूर्ति निर्माण केली व तुझ्याकरिता चंद्रभागेमध्ये सोडली. हे सांबा, या रम्य ठिकाणीं माझें सान्निध्य नेहमी राहील.' पुढे भगवान सूर्य म्हणाले, 'सान्निध्ये मम पूर्वाह्ने सुतीरे द्रक्ष्यते जनः। कालप्रिये च मध्याह्नेऽपराह्ने चात्र नित्यशः॥ लोकांना माझें सान्निध्य पूर्वाह्णीं सुतीर येथे, व मध्याह्नीं कालप्रिय येथे व सायंकाळीं येथे म्हणजे चंद्रभागातीरीं मूलस्थान या ठिकाणीं नेहमी

पाहावयास मिळेल. कांही ठिकाणीं 'सुतीरे' याच्या ऐवजी 'मुंडीरे' असाहि पाठ आहे. हीं तीन स्थानें कोठे होतीं, याविषयी वराहपुराणांत (अध्याय १७८, श्लोक ५५-५७) खालील वर्णन आढळतें.

> साम्बः सूर्यप्रतिष्ठां च कारयामास तत्त्ववित् ।
> उदयाचले च संश्रित्य **यमुनायाश्च दक्षिणे** ॥
> मध्ये **कालप्रियं** देवं मध्याह्ने स्थाप्य चोत्तमम् ।
> मूलस्थानं ततः पश्चाद् अस्तमानाचले रविम् ॥
> स्थाप्य त्रिमूर्तिं साम्बस्तु प्रातर्मध्यापराह्णिकम् ॥

इत्यादि. या श्लोकांत साम्बाने सूर्यमूर्तीची स्थापना उदयाचलावर, म्हणजे पूर्व दिशेच्या पर्वतावर, **यमुनेच्या दक्षिणेस कालप्रिय** येथे व अस्तमानाचलीं किंवा पश्चिमपर्वतावर मूलस्थान येथे अशा तीन ठिकाणीं केल्याचा निर्देश आहे. यापैकी पहिल्या स्थानाचा उल्लेख गंगासागरसंगम असाहि कांही ठिकाणी केलेला आढळतो. कांही ठिकाणीं त्याला सूर्यकानन, रविक्षेत्र किंवा सूर्यक्षेत्र म्हटलें आहे. ब्रह्मपुराणांत उत्कल देशांतील कोणादित्य किंवा कोणार्क यालाहि रविक्षेत्र असें नांव दिलें आहे. कोणार्क हें पूर्वतीरावर बांधलेल्या अत्यंत भव्य अशा सूर्य-मंदिराचें नांव आहे. हें देवालय पुरीपासून सुमारें तीस मैलांवर आहे. तें ओरिसा (प्राचीन उत्कल) देशाच्या गङ्गवंशी पहिल्या नरसिंह राजाने इ. स. च्या तेराव्या शतकांत बांधलें असून हिंदुस्थानांतील प्राचीन काळच्या प्रेक्षणीय स्मारकांत त्याची गणना होते. पुराणवस्तु-संशोधनखात्याचे माजी डायरेक्टर जनरल सर जॉन मार्शल यांनी एके ठिकाणीं म्हटलें आहे की, 'जर कोणी मला हिंदुस्थानांतील प्राचीन काळचीं प्रेक्षणीय स्मारकें कोणतीं असा प्रश्न केला, तर आग्र्याचा ताजमहाल, कोणार्क येथील सूर्याचें देवालय, वेरूळ येथील कैलासनामक लेणें, अजंठ्याचीं चित्रें असलेलीं लेणीं व सांचीचे स्तूप-इतक्यांचा निर्देश मी निःसंशय करीन.' यावरूनहि कोणार्काच्या श्यामप्रस्तरनिर्मित देवालयाचें (Black Pagoda) महत्त्व ध्यानांत येईल. हें देवालय समुद्रकाठीं वालुकामय प्रदेशांत बांधलें आहे. समुद्रावरच्या क्षारमिश्रित

वायूने त्याच्या शिलाखंडावर परिणाम होऊन ते खडबडीत होतात. म्हणून पुराणवस्तुसंशोधनखातें तें देऊळ गोडया पाण्याने धुण्यांत दरवर्षी पुष्कळ खर्च करतें. आठ वर्षांपूर्वी कलकत्त्यास अखिल–भारतीय इतिहास परिषदेला आम्ही गेलों होतों, त्यावेळीं हें कोणार्कांचें देऊळ पाहिलें. आम्ही तेथे गेलों त्यावेळीं हें धुण्याचें काम चालू होतें. अशा ठिकाणीं हें अत्यंत भव्य देवालय बांधण्याचें कारण तें स्थान प्राचीन काळापासून सूर्यक्षेत्र म्हणून प्रसिद्ध होतें हें होय.

पश्चिमेकडील मूलस्थान हें सध्याचें मुलतान होय. मुलतान चन्द्रभागा (सध्याच्या चिनाब) नदीवर वसलें आहे या ठिकाणीं एका टेकडीवर सूर्याचें सुप्रसिद्ध देवालय होतें. अरब इतिहासकारांनी या देवळाचें व त्यांतील मूर्तीचें वर्णन केलें आहे त्यावरून त्यांतील सूर्याची प्रतिमा लाकडाची होती* व तिच्या डोळयाच्या ठिकाणीं दोन माणकें बसविलीं होतीं, असें दिसतें. मागे भविष्यपुराणांतील या मूर्तीचें वर्णन दिलें आहे, त्यांतही मूर्ति चंद्रभागा नदीच्या प्रवाहांतून वाहत आली, असें म्हटलें आहे. त्यावरून पुरींतील जगन्नाथाच्या मूर्तीप्रमाणे मूलस्थानमध्येही लाकडी मूर्तीची पूजा होत असे, असें दिसतें.

मूलस्थानच्या सूर्याच्या यात्रेला सिंधमधून व हिंदुस्थानांतील दूरदूरच्या प्रदेशांतून लोक जमत असत, असें अरब इतिहासकार सांगतात. त्यामुळे तेथील देवस्थानाला मोठें उत्पन्न होई. महम्मद कासीमने मुलतान काबीज केलें, तेव्हा त्याला या देवळांत तेरा हजार दोनशें मण सोनें मिळालें, असें 'चचनामा' ग्रंथांत वर्णन आहे. अरब हे मूर्तिभंजक होते, तथापि या ठिकाणच्या यात्रेच्या उत्पन्नाच्या लोभाने त्यांनी ही मूर्ति भग्न केली नाही व तिची पूजा पूर्वीप्रमाणे चालू दिली. त्याकाळीं कनोजचे प्रतिहार हे उत्तर हिंदुस्थानांत अत्यंत प्रबळ होते. त्यांनी व इतर राजांनी मुलतानचें पवित्र क्षेत्र मुसलमानांच्या ताब्यांतून सोडविण्याचा अनेकदा प्रयत्न केला. पण जेव्हा जेव्हा मुसलमानांना

* 'चचनाम्यां'त ही मूर्ति सोन्याची होती असें म्हटलें आहे.

त्याच्याशीं सामना करणें कठीण वाटे तेव्हा तेव्हा ते ही सूर्याची मूर्ति भग्न करण्याचा धाक घालीत आणि हिंदु लागलीच माघार घेत, असें अरब इतिहासकार अल् मसूदी याने लिहून ठेवलें आहे.

सुतीर किंवा कोणार्क, आणि मूलस्थान किंवा मुलतान, येथे सूर्याचीं सुप्रसिद्ध देवालयें होतीं व तेथे दूरदूरचे लोक यात्रेच्या निमित्ताने जमत असत हें आपण पाहिलें. कालप्रियाच्या बाबतींतहि तशीच स्थिति होती असें मानण्यास हरकत नाही. वरील दोन क्षेत्रें हिंदुस्थानच्या पूर्व व पश्चिम टोंकांना होतीं, तर कालप्रिय हें त्यांच्या मध्यभागी होतें व म्हणून त्या ठिकाणीं सूर्याचें सान्निध्य मध्याह्नीं असे, असें पुराणांत म्हटलें आहे. कालप्रिय हें कन्नोजच्या दक्षिणेस होतें, असें राजशेखराच्या काव्यमीमांसे-वरून दिसतें. राजशेखर म्हणतो, 'अनियतत्वाद्दिशामनिश्चितो दिग्विभाग इत्येके । तथाहि यो गाधिपुरस्य दक्षिणः स कालप्रियस्य उत्तरः ।' यावरून गाधिपुर किंवा कनोज व कालप्रिय यांमध्ये फारसें अंतर नसावें, असें दिसतें. कालप्रिय हें यमुनेच्या कांठीं होतें, हें आपण मागे पाहिलेंच आहे. तेव्हा कालप्रिय हें सध्याचें यमुनेच्या काठचें काल्पी असावें, असें वाटतें.* कालप्रिय व काल्पी यांतील नामसादृश्यहि ध्यानांत घेण्यासारखें आहे. सध्याच्या काल्पी शहराच्या बाहेर पश्चिमेच्या बाजूस अद्यापि जुने अव-शेष दिसतात. तेथील जुन्या पडक्या इमारतींच्या अवशेषांना चौऱ्यांशी घुमट अशी संज्ञा आहे. काल्पी येथे अद्यापि उत्खनन झालें नाही.

कालप्रिय हें यमुनेच्या काठीं असून तेथे एक विस्तृत आवार असलेलें भव्य देवालय होतें, हें कोरीव लेखांवरूनहि दाखवितां येतें. इ. स. च्या दहाव्या शतकाच्या आरंभीं दक्षिणेंत मान्यखेट (सध्याचें

---

* कालप्रिय हें काल्पी असावें असें अनुमान प्रथम कै. माधव व्यंकटेश लेले यांनी आपल्या 'मालतीमाधव सार व विचार' (पृ. ९८) या लेखांत केलें होतें. पण 'तूर्त या अनुमानाला शब्दसादृश्यावाचून दुसरा आधार नाही', असें त्यांनीच म्हटलें आहे. त्याच्या बरोबरच 'विदर्भदेश म्हणजे (ग्वाल्हेर संस्थानांतील) नरवारच्या आसपासचा प्रदेश होय,' असेंहि चमत्कारिक विधान त्यांनी केलें आहे !

निजामच्या राज्यांतील मालखेड) येथे राष्ट्रकूटवंशी महाप्रतापी राजा तृतीय इन्द्र हा राज्य करीत होता. हा इ. स. ९१५ मध्ये गादीवर आला. त्यानंतर लौकरच त्याने उत्तरेंत कन्नोजच्या प्रतिहार राजाच्या मुलखावर स्वारी केली व कन्नोजपर्यंत चाल करून तें राजधानीचें शहर उध्वस्त केलें. या स्वारींत त्याला वाटेंत कालप्रिय येथे देवळाच्या परिसरांत आपल्या सेनेसह कांही काळ थांबावें लागलें व नंतर त्याने यमुना पार केली, याचें सुंदर वर्णन खालील श्लोकांत केलें आहे. हा श्लोक त्याचा मुलगा चतुर्थ गोविंद याच्या खंबायत व सांगली या ठिकाणीं सापडलेल्या दोन्ही ताम्रपटांत आला आहे.

यन्माद्यद्द्विपदन्तघातविषमं कालप्रियप्राङ्गणं
तीर्णा यत्तुरगैरगाधयमुना सिन्धुप्रतिस्पर्धिनी।
येनेदं हि महोदयारिनगरं निर्मूलमुन्मूलितं
नाम्नाद्यापि जनैः कुशस्थलमिति ख्यातिं परां नीयते॥

भावार्थ—तृतीय इन्द्राच्या मदोन्मत्त हत्तीच्या दंतांच्या आघाताने कालप्रियाचें प्राङ्गण उंचसखल झालें, त्याच्या घोड्यांनी सागराशीं विशालत्वांत स्पर्धा करणारी यमुना नदी पोहून पार केली. त्याने समूळ उध्वस्त केल्यामुळे ही महोदय (कन्नोज) नामक शत्रूची राजधानी अद्यापि कुशस्थल या नांवाने प्रसिद्ध झाली आहे. (पूर्वीच्या सुसमृद्ध शहरांत सध्या गवत उगवलें आहे असा अर्थ.)

या श्लोकावरून कालप्रिय देवाचें अंगण अत्यंत विस्तृत होतें—इतकें की, त्यामध्ये हत्ती, घोडे, पायदळ इत्यादि इंद्र नृपतीची चतुरंग सेना सामावली. तें शहर यमुनेच्या काठीं होतें. कारण त्यानंतर इंद्र-राजाला यमुना पार करून कन्नोजवर चाल करतां आली—इत्यादि माहिती मिळते. इंद्रराजाच्या दरबारच्या कवींनी आपल्या प्रभूच्या उत्तर हिंदुस्थानांतील स्वारीच्या वर्णनांत दुसऱ्या कोणत्याहि शहराचा उल्लेख केला नाही. कालप्रियाचा उल्लेख करण्याचें कारण तेथील देवालयामुळे त्याला भरतखंडभर प्रसिद्धि प्राप्त झाली होती व तेथून विशाल यमुनेचें पात्र ओलांडल्यावर लौकरच इंद्राला कन्नोजवर हल्ला करतां आला, हें

असावें हें उघड आहे. सध्याचें काल्पी हें मान्यखेट (मालखेड) पासून कन्नोजला जाणाऱ्या प्राचीन मार्गावर आहे. काल्पीहून कन्नोज उत्तरेस सुमारें ७५ मैलांवर आहे. कालप्रिय येथील देवालयांत कोणत्या देवतेची स्थापना केली होती, याचा या कोरीव लेखांत उल्लेख नाही. पण त्या शहराचें बाकीचें वर्णन राजशेखराची काव्यमीमांसा व भविष्य, वराह, सांब इत्यादि पुराणें यांतील वर्णनाला धरूनच आहेत, हें दिसून येईल.

तेव्हा कालप्रिय (सध्याची काल्पी) येथे सर्व भरतखंडांत सुविख्यात झालेलें असें सूर्याचें विशाल देवालय होतें, तेथे यात्रेच्या निमित्ताने दूरदूरच्या प्रदेशांतून लोक येत व त्या यात्रेच्या प्रसंगीं भवभूतीचीं नाटकें प्रथम रंगभूमींवर आलीं हें स्पष्ट होईल. ही माहिती ध्यानांत घेतली असतां भवभूतीने मालतीमाधवांत सूर्यस्तुतिपर खालील श्लोक कां घातला, याचें स्वारस्य ध्यानांत येईल. सूत्रधार म्हणतो—

कल्याणानां त्वमसि महसां भाजनं विश्वमूर्ते
धुर्यां लक्ष्मीमथ मयि भृशं धेहि देव प्रसीद।
यद्यत्पापं प्रतिजहि जगन्नाथ नम्रस्य तन्मे
भद्रं भद्रं पितर भगवन्भूयसे मङ्गलाय ॥

[भावार्थ–हे विश्वमूर्ते ! तूं मंगल अशा तेजाचा निधि आहेस. मजवर कृपा करून वरिष्ठ अशी समृद्धि मला दे. मी तुजपुढे नम्र झालों आहें. माझीं सर्व पापें नष्ट करून मङ्गलप्राप्तीकरिता सर्व कल्याणप्रद वस्तु प्राप्त करून दे.]

कालप्रिय येथे भवभूतीच्या नाटकाचे प्रयोग झाल्यावर लौकरच त्याची कीर्ति कन्नोजचा सम्राट् यशोवर्मा याच्या कानावर गेली व नंतर त्याने त्याला सन्मानाने बोलावून आपल्या दरबारी ठेवून घेतलें, असें कल्हणाची राजतरंगिणी व वाक्पतिराजाचें गउडवहो, या ग्रंथांवरून दिसतें.

वरील विवेचनावरून भवभूतीच्या नाटकांत उल्लेखिलेलें कालप्रियनाथाचें देवालय हें सूर्याचें असून तें उज्जयिनीस नव्हतें, तर यमुनेच्या काठीं काल्पीस होतें, हें दिसून येईल.

'गाथासप्तशती'चा काळ*

अविनाशिनमग्राम्यमकरोत्सातवाहनः ।
विशुद्धजातिभिः कोशं रत्नैरिव सुभाषितैः ॥

[एखादा राजा अत्यंत शुद्ध जातीच्या रत्नांनी खेडेगावांत न होणारा असा अक्षय्य निधि करतो, त्याप्रमाणे सातवाहन राजाने अत्यंत निर्दोष अशा व जातिछंदांत रचलेल्या सुभाषितांनी अविनाशी व सोज्वळ असा कोश रचला.]

प्राकृत वाङ्मयांत 'गाथासप्तशती' किंवा 'सत्तसई' हें काव्य फार प्राचीन गणलें जातें. या ग्रंथांत सातशें प्राकृत गाथांचा संग्रह आहे. याचा कर्ता हाल किंवा सातवाहन होता, अशी प्रचलित समजूत आहे. पुराणांत तीस (कांही पाठांत एकतीस) आन्ध्र राजांची वंशावळ कालनिर्देशासह आली आहे, तिजमध्ये हालाचें नांव आहे. तेव्हा हाल हा आन्ध्र राजवंशांतील असावा असें मानतात. पुराणांतील निर्देशावरून आन्ध्रांनी सुमारें साडेचारशें वर्षें राज्य केलें असें दिसतें. हा काळ खरा असल्यास, सुमारें खिस्तपूर्व २०० पासून खिस्तोत्तर २५० वर्षांपर्यंत आंध्रांनी दक्षिणेंत राज्य केलें असावें. कारण आन्ध्रांनंतर आभीर राजे उदयास आले, असें पुराणें सांगतात. आभीरांनी आपला स्वतंत्र शक चालू केला होता. त्याचा आरंभ इ. स. २५० च्या सुमारास होतो. तत्पूर्वी साडेचारशें वर्षें आंध्रांनी राज्य केलें असल्यास त्यांचा उदय खिस्तपूर्व २०० च्या सुमारास झाला असला पाहिजे, हें उघड आहे.

पुराणांच्या वंशावळींत हालाचें नांव सतरावें आहे. पुराणांत प्रत्येक राजाच्या कारकीर्दीचीं वर्षें दिलीं आहेत. त्या बाबतींत सर्व

* 'युगवाणी', नागपूर, मार्च, १९४६.

पुराणांची एकवाक्यता नाही. तथापि त्यांतल्या त्यांत उत्तम असे पाठ घेऊन गणना केली, तर हाल हा आन्ध्र साम्राज्य स्थापनेनंतर २८१ वर्षांनी*—म्हणजे खिस्तोत्तर ८१ वर्षांच्या सुमारास—गादीवर आला, असें दिसतें. त्याने फक्त पांच वर्षें राज्य केलें, असें पुराणांत म्हटलें आहे.

तेव्हा गाथासप्तशती इ. स. च्या पहिल्या शतकांत झाली असावी. कांही विद्वान् संशोधक, आन्ध्रांचा उदय काण्व राज्यांच्या नंतर खिस्तपूर्व पहिल्या शतकांत झाला, असें मानतात. राजांच्या कारकीर्दीच्या वर्षांतहि कांही मतभेद आहेत. त्यामुळे कांहींच्या मतें हाल हा इ. स. च्या दुसऱ्या शतकांत होऊन गेला असावा.

गाथासप्तशतींत अनेक महत्त्वाचे उल्लेख आले आहेत. मंगळवाराचा अनिष्ट वार म्हणून उल्लेख, विक्रमादित्याच्या दातृत्वाचें वर्णन, राधाकृष्ण व कृष्णगोपी यांच्या लीला, गजाननाचा पराक्रम इत्यादिकांचें वर्णन सप्तशतींत आलें असल्यामुळे व तिचा काळ सामान्यतः निश्चित असल्यामुळे वादग्रस्त विषयांच्या विवेचनांत सप्तशतींतील गाथांचा पुरावा कालनिर्णयार्थ दिला जातो; व अमुक एका देवतेचा, व्यक्तीचा किंवा प्रसंगाचा उल्लेख सप्तशतींत आला आहे, तेव्हा ती देवता व व्यक्ति किंवा तो प्रसंग इ. स. च्या पहिल्या–दुसऱ्या शतकापूर्वी लोकप्रसिद्ध होता, असें अनुमान करण्यांत येतें. उदाहरणार्थ, अलीकडे विक्रमद्विसहस्राब्दी-महोत्सवाच्या प्रसंगाने लिहिलेल्या लेखांत 'संवाहणसुहरसतोसिएण—' इत्यादि ४६४ व्या गाथेंत† वर्णन केलेला विक्रमादित्याच्या दातृत्वाचा उल्लेख अनेक लेखकांनी केला होता. व त्यावरून

---

* पार्जिटरकृत कलियुगांतील राजवंश (इंग्रजी), पृ. ३८–४१ पाहा.

† गाथांच्या पाठांत व अनुक्रमांत हस्तलिखित प्रतींत, निर्णयसागराच्या आवृत्तींत व श्री. जगदीशलाल यांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या आवृत्तींत पुष्कळ फरक आढळतो. निर्णयसागरप्रत सर्वांस सहज उपलब्ध असल्याने प्रस्तुत लेखांत उल्लेखिलेल्या गाथांचे अनुक्रमांक त्या आवृत्तीप्रमाणे दिले आहेत.

'कालिदासाचा आश्रयदाता सुप्रसिद्ध विक्रमादित्य नृपति हा इ. स. च्या पहिल्या दुसऱ्या शतकापूर्वी होऊन गेला असला पाहिजे; त्यानेच खिस्तपूर्व ५८ व्या वर्षी आपल्या नांवें संवत्सर सुरू केला; तो विक्रमादित्य खिस्तोत्तर चौथ्या शतकांत होऊन गेलेला विख्यात गुप्तसम्राट् द्वितीय चन्द्रगुप्त असणें शक्य नाहीं' इत्यादि अनुमानें काढलीं होतीं. तसेंच, गजानन ही देवता किती जुनी आहे, याविषयी मागे 'सरस्वतीमंदिर' व 'विविधज्ञानविस्तार' या मासिकांत वादविवाद झाला होता, त्यांतहि सप्तशतीच्या ४०३ या गाथेंतील गजाननाच्या वर्णनाचा निर्देश करून 'गजानन ही देवता निदान पंधराशें ते अठराशें वर्षांइतकी जुनी आहे' असें प्रतिपादण्यांत आलें होतें. या विवेचनाच्या प्रसंगाने विद्याभूषण पं. कृष्णशास्त्री घुले यांनी 'वागीश्वरी' मासिकाच्या पहिल्या वर्षाच्या प्रथमांकांत गाथासप्तशतीच्या कालासंबंधाने एक विद्वत्ताप्रचुर लेख लिहिला होता. त्यांत त्यांनी सप्तशतीचा कर्ता हाल हा राजा नसून गोदावरीतीरींचा एक गरीब खेडवळ ब्राह्मण होता आणि तिच्यांत आलेल्या अनेक उल्लेखांवरून तिचा काळ सहाव्या शतकापूर्वी जाऊं शकत नाहीं, असें प्रतिपादिलें होतें. पुढे घुले शास्त्र्यांच्या प्रमाणांचें परीक्षण नागपूर येथील विद्वान् संशोधक श्री. अप्रबुद्ध यांनी 'वागीश्वरी'च्या तिसऱ्या वर्षाच्या पहिल्या अंकांत सविस्तर व निर्भीडपणें करून 'सप्तशतीच्या गाथांना बेधडक दुसऱ्या शतकांत ठेवतां येईल', असा आपला सिद्धांत मांडला होता व त्याला पं. घुले शास्त्र्यांचें उत्तर त्याच मासिकाच्या त्या वर्षाच्या सहाव्या अंकांत आलें होतें. हा वाद मूळ गजानन ही देवता किती जुनी आहे, या प्रश्नाच्या निमित्ताने झाला होता. त्या प्रश्नाशीं सध्या आपणांस कांही कर्तव्य नाही. तथापि अशा वादग्रस्त प्रश्नांच्या निर्णयार्थ सप्तशतींतील गाथांचा पुरावा दिला जातो, तेव्हा सप्तशतीचा काळ निश्चित करतां आल्यास त्या व तत्सम इतर प्रश्नांच्या निर्णयास मदत होईल, असें वाटून त्याचें विवेचन प्रस्तुत लेखांत केलें आहे.

गाथासप्तशती किंवा सत्तसई या प्राकृत ग्रंथाचा कर्ता हाल होता, ही गोष्ट सर्वांस मान्य आहे. या ग्रंथाच्या तिसऱ्या गाथेंत कविवत्सल

हालानें एक कोटी गाथांमधून सातशें गाथा निवडून काढून रचल्या, असें म्हटलें आहे. या गाथेंत 'विरइआइं'* (विरचितानि) या पदाचा उपयोग केला असला, तरी या सर्व गाथा हालानें स्वतः रचल्या नसून, त्या त्यानें अनेक गाथांतून निवडून ग्रथित केल्या, हें या गाथेंतील वर्णनावरूनच स्पष्ट आहे. या ग्रंथावर झालेल्या तेरा टीका सध्या उपलब्ध आहेत. त्यांत कित्येक गाथांच्या संबंधांत तत्कर्त्या कवींचीं नांवें आलीं आहेत. आरंभीं प्रत्येक गाथेशीं तिच्या कर्त्याचें नांव संलग्न होतें, असें दिसतें. पण कालांतरानें त्यांतील कांही नांवें लुप्त झालीं व कांहींच्या बाबतींत घोटाळा झालेला दिसतो. शिवाय हस्तलिखित प्रतींवरून या ग्रंथांचे निदान सहा पाठ झाले आहेत, असें दिसतें. सर्व पाठांत ४३० गाथाच समान आहेत. बाकीच्या फक्त कांही पाठांतच दिसतात. हाल हा राजा होता, असें सप्तशतींत कोठें म्हटलें नाही खरें, पण तशी परंपरागत समजूत होती, यांत संशय नाही. कारण संस्कृत व प्राकृत कवींनी त्याच्या स्तुतिपर जे अनेक श्लोक केले, त्यांत तसा उल्लेख आहे. उदाहरणार्थ, सोड्ढलाच्या 'उदयसुन्दरी'तील खालील श्लोक पाहा—

हाले गते गुणिनि शोकभराब्दभूवुरुच्छिन्नवाङ्मयजडाः कृतिनस्तथामी।
यत्तस्य नाम नृपतेरनिशं स्मरन्तो हेत्यक्षरं प्रथममेव परं विदन्ति ॥

यांत हाल हा नृपति होता, असें स्पष्ट म्हटलें आहे. हालाचा कवींना उदार आश्रय होता. कवींचा सुभाषितसंग्रह प्रकाशांत यावा म्हणून त्यानें आपला कोश भरला होता, असें अभिनन्द कवीनें स्वतःच्या आश्रयदात्या हारवर्ष राजाची स्तुति करतांना म्हटलें आहे.

नमः श्रीहारवर्षाय येन हालादनन्तरम् ।
स्वकोषः कविकोषाणामाविर्भावाय संभृतः ॥

या कवींमध्ये श्रीपालित नांवाचा कवि प्रमुख होता व तो हालाच्या दरबारीं राजकवि होता, असें दिसतें. कारण अभिनन्द कवि म्हणतो—

---

* सत्त सताइं कइवच्छलेण कोडीअ मज्झआरम्मि ।
हालेण विरइआइं सालंकाराणं गाहाणं ॥

हालेनोत्तमपूजया कविवृषः श्रीपालितो लालितः
ख्यातिं कामपि कालिदासकृतयो नीताः शकारातिना ।
श्रीहर्षो विततार गद्यकवये बाणाय वाणीफलं
सद्यः सत्क्रिययाभिनन्दमपि च श्रीहारवर्षोऽग्रहीत् ॥

यांत वर्णिलेल्या शकारि, विक्रमादित्य, श्रीहर्ष व हारवर्ष या राजांप्रमाणे हाल हाहि राजा होता, यांत संशय नाही. पालित कवीच्या कांही गाथा सप्तशतींत घेतलेल्या आढळतात. त्याने हालनृपतीस गाथांचा संग्रह व निवड करण्यास मदत केली असावी. हा हाल राजा गोदावरी तीरीं प्रतिष्ठान येथे राज्य करीत होता, हें 'वज्जालग्गम्' नामक एका प्राकृत ग्रंथांतील खालील गाथेवरून दिसून येईल.

पुरिसविसेसेण सइत्तणाइं न कुलक्कमेण महिलाणं ।
सग्गं गए वि हाले न मुयइ गोला पइट्ठाणं ॥

वज्जालग्गम्, ४६८

[उत्तम पुरुषाच्या संगतीमुळे स्त्रिया सती होतात; केवळ कुलक्रमामुळे नव्हे. कारण हाल स्वर्गाला गेला, तरी गोदावरी कांही प्रतिष्ठान (पैठण) नगर सोडत नाही.] या हालाचेंच सातवाहन (प्राकृत सालाहण) असें दुसरें नांव होतें, असें हेमचन्द्राने आपल्या कोषांत सांगितलें आहे. 'हालः सातवाहनपार्थिवे' (हेमकोष) व 'सालाहणम्मि हालो' (देशीनाममाला) हीं वचनें पाहा. बाणाने आपल्या हर्षचरिताच्या आरंभीं एका श्लोकांत सातवाहनाच्या सुभाषितसंग्रहाची स्तुति केली आहे. तो श्लोक प्रस्तुत लेखाच्या आरंभीं दिला आहे. हा सुभाषितसंग्रह म्हणजे गाथासप्तशतीच होय असें समजलें जातें. प्रसिद्ध संस्कृत कवि राजशेखर याने प्राचीन संस्कृत व प्राकृत कवींच्या स्तुतिपर अनेक श्लोक रचले होत. त्यांमध्ये सातवाहनाविषयी पुढील श्लोक आला आहे.

जगत्यां ग्रथिता गाथाः सातवाहनभूभुजा ।
व्यधुर्धृतेस्तु विस्तारमहो चित्रपरम्परा ॥

(या जगांत सातवाहनाने गाथा अनेक ठिकाणांहून जमवून एकत्रित केल्या; पण त्यायोगें लोकांचा आनंद संकुचित न होतां विस्तार पावला ! काय ही आश्चर्यांची परंपरा !)

यांत उल्लेखिलेल्या गाथाहि सप्तशतींतीलच असल्या पाहिजेत. 'ग्रथिता' या पदाने राजशेखराने सूचित केलें आहे की, सातवाहनाने सर्व गाथा रचल्या नसून त्याने त्यांची निवड करून संग्रह केला; व हेंच सप्तशतींतील तिसऱ्या गाथेंतहि म्हटलें आहे, हें वर दाखविलें आहेच.

तेव्हा हाल सातवाहन याने गाथासप्तशती ग्रथित केली होती, असें म्हणावयास हरकत दिसत नाही. पुराणांत हालाचें नांव आन्ध्रराजांच्या वंशावळींत दिसतें, तेव्हा तो आन्ध्र होता असेंहि म्हणतां येतें.

हाल, सातवाहन व आन्ध्र यांचें जें तादात्म्य वर दाखविलें आहे, तें पं. कृष्णशास्त्री घुले यांस मान्य नाही. ते म्हणतात 'हालाने सप्तशती केली, हें कबूल. पण तो सातवाहन राजा होता हें कशावरून ? हेमचंद्राने हालाला सालाहण म्हटलें आहे खरें, पण सातवाहनाचें सालाहण असें प्राकृत रूप होत नाही. शिवाय आन्ध्रराजांच्या प्राकृत लेखांतहि सातवाहन हेंच रूप आढळतें. पुराणांत आन्ध्र राजांची वंशावळ दिली आहे, तीमध्ये किंवा आन्ध्रांच्या शिलालेखांतहि या सातवाहन राजाचें नांव येत नाही. नाशिकच्या एका कोरीव लेखांत आन्ध्रनृपति गौतमीपुत्राला 'शातवाहनकुलयशःप्रतिष्ठापनकरस्य'– सातवाहनकुलाच्या यशाची प्रतिष्ठपना करणारा–असें विशेषण लावलें आहे. पण पुढे त्याला 'कुलविपुण्यश्रीकरस्य'* 'कुलाची अभिवृद्धि करणारा' असें म्हटलें आहे. यांतील पुनरुक्ति टाळावयाची असल्यास सातवाहनकुल हें गौतमीपुत्राच्या मातृकुलाचें नांव मानावें लागतें. तेव्हा हाल हा सातवाहन नव्हे. अर्थात् बाणाने प्रशंसिलेला सातवाहनाचा सुभाषितसंग्रह हाहि हालाच्या गाथासप्तशतीहून भिन्न ठरतो. या सातशें गाथांत असा एकहि शब्द नाही की, ज्यावरून तिचा कर्ता राजा किंवा

* याचा खरा प्राकृत पाठ 'कुलविपुलसिरिकरस' असा आहे.

राजसभेंतील पंडित असावा, असें निश्चयाने म्हणतां येईल. सप्तशतींतील सर्व वर्णन खेडेगावांतील दृश्यांचेंच आहे. तेव्हा सप्तशतीचा कर्ता गोदातीरचा एखादा गरीब खेडवळ ब्राह्मण असावा. शिवाय त्या ग्रंथांतील अनेक उल्लेख इ. स. च्या पहिल्या–दुसऱ्या शतकानंतरचे दिसतात. २६१ व्या गाथेंत मंगळवाराचा उल्लेख असल्याने, सप्तशती याज्ञवल्क्य स्मृतीनंतरची–अर्थात् खिस्तोत्तर तिसऱ्या शतकानंतरची-असावी. ४६४ व्या गाथेंत विक्रमादित्याच्या दातृत्वाचा उल्लेख आहे. तो विक्रमादित्य कालिदासाचा आश्रयदाता असावा. कालिदास इ. स. च्या सहाव्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेला, असें डॉ. भांडारकरांनी म्हटलें आहे. ४०३ या गाथेंत गजाननाने आपल्या शुंडाग्राने समुद्राचें सर्व पाणी शोषून घेतल्याचें वर्णन आहे. गजानन ही देवता इ. स. च्या पांचव्या शतकापासून आठव्या शतकापर्यंतच्या काळांत होऊन गेली, असें डॉ. भांडारकरांनी आपल्या 'वैष्णव, शैव व इतर धर्मपंथ' या ग्रंथांत दाखवून दिलें आहे. या सर्व प्रमाणांवरून गाथासप्तशतीचा काळ सहाव्या शतकापूर्वी जाऊं शकत नाही, हें निर्विवाद आहे.'

पं. कृष्णशास्त्री घुले यांच्या प्रमाणांचें परीक्षण श्री. अप्रबुद्ध यांनी 'वागीश्वरीं'त केलें आहे. त्याची पुनरुक्ति करीत नाही. पण या प्रश्नाविषयी प्रस्तुत लेखकाच्या अलीकडील संशोधनावरून कांही महत्त्वाचा पुरावा उपलब्ध झाला आहे. तो पुढे मांडतों.

पुराणांतील आंध्र नृपतींची वंशावळ व शिलालेखांतील राजनामें यांचें सादृश्य दिसत असल्यामुळे, शिलालेखांतील राजवंश हा पुराणांतील आंध्रवंश होय, असें कबूल करण्यास घुलेशास्त्री तयार आहेत. पण तो वंश सातवाहन म्हणावयास काय आधार असें ते विचारतात. पुराणांत या राजवंशाला आन्ध्र म्हटलें आहे. त्यावरून तो मूळचा आन्ध्र देशांतील होता, असा अनेक हिंदी व युरोपीय संशोधकांचा ग्रह झाला आहे. पण तो बरोबर नाही. या राजवंशाचें खरें नांव सातवाहनच होतें व त्याचें राज्य प्रथम महाराष्ट्र, विदर्भ व कुन्तल या देशावरच होतें, हें सप्रमाण दाखवितां येतें. या राजवंशाचे आरंभींचे कोरीव लेख मुंबई इलाख्यांत

जुन्नरजवळच्या नाणेघाटांत व नाशकास अद्यापि विद्यमान आहेत. याची आरंभींची नाणींहि विदर्भ व निजामच्या राज्याचा उत्तरभाग या प्रांतांतच सापडलीं आहेत. आन्ध्र देशांतील लेख व नाणीं पुष्कळ नंतरचीं, चोविसावा राजा वासिष्ठीपुत्र पुळुमावि याच्या व त्याच्या नंतरच्या काळाचीं, मिळालीं आहेत. शिवाय या राजवंशाच्या कोणत्याहि लेखांत त्याला आन्ध्र म्हटलें नाही. उलट या वंशांतील अनुक्रमानें दुसरा राजा कृष्ण हा सातवाहन कुळांतला होता, असें नाशिकच्या कोरीव लेखांत म्हटलें आहे. तेविसावा राजा गौतमीपुत्र याला तर 'सातवाहन-कुलयसपतिठापनकर' (सातवाहन कुलाच्या यशाची प्रतिष्ठापना करणारा) असें सार्थ उपपद लावलें आहे. याच राजाच्या वर्णनांत पुढे 'कुलविपुल-सिरिकर' (कुलाचें ऐश्वर्य विपुल वाढविणारा) असें विशेषण आलें आहे. पण त्यांत पुनरुक्ति मुळीच नाही. कारण एकांत कुलाचें यश व दुसऱ्यांत त्याचें ऐश्वर्य वाढविल्याचा निर्देश आहे. ही दोन्ही विशेषणें गौतमीपुत्राच्या बाबतींत सर्वस्वी सार्थ होतीं, हें तत्कालीन इतिहासाचें परिशीलन केल्यास दिसून येईल. गौतमीपुत्राचे पूर्वज आरंभीं महाराष्ट्रांत राज्य करीत होते, हें मागें सांगितलें आहेच. कांही काळानें परकी शक-क्षत्रप, भूमक व नहपान, यांनी त्यांचा पराभव करून उत्तर महाराष्ट्रांत आपली सत्ता स्थापली. या दोघांचीहि नाणीं गुजराथ व उत्तर महाराष्ट्र या प्रांतांत सापडलीं आहेत. नहपानाचा जावई ऋषभदत्त याचा लेख नाशिकच्या पांडव लेण्यांत आहे. त्यावरून नहपानाच्या राज्यांत निदान कोंकण, उत्तर महाराष्ट्र व गुजराथ अंतर्भूत होत होते, असें स्पष्ट दिसतें. त्यावेळीं सातवाहन राजे विदर्भांत येऊन राहिलेले दिसतात. पुढे गौतमीपुत्रानें नहपानाचा पराभव करून क्षहरातवंशी शकांचा समूळ निःपात केला व कोंकण, महाराष्ट्र, सुराष्ट्र (काठेवाड), माळवा, गुजराथ वगैरे प्रांत पुनः आपल्या अंमलाखालीं आणले. आपल्या विजयानंतर लौकरच नाशिकच्या एका लेण्यांत कोरविलेल्या लेखांत त्यानें आपला 'बेनाकटकस्वामी' असा निर्देश केला आहे, त्यावरून त्यावेळीं तो बेण्णानदीच्या (वाइनगंगेच्या) परिसरांत राज्य करीत होता, हें उघड आहे. तेव्हा गौतमीपुत्राची माता बालश्री हिनें आपल्या पराक्रमी

पुत्राच्या निधनानंतर नाशकास कोरविलेल्या दुसऱ्या एका लेखांत 'कुलाच्या यशाची प्रतिष्ठापना करणारा' व 'त्याचें ऐश्वर्य वाढविणारा' असें त्याचें वर्णन केलें असलें, तर त्यांत मुळीच अतिशयोक्ति नाही, पुनरुक्ति तर नाहीच नाही.

गौतमीपुत्राला सातवाहनकुलाच्या यशाची प्रतिष्ठापना करणारा म्हटलें आहे. हें सातवाहन कुल त्याचें मातृकुल असावें, असें पं. घुलेशास्त्री म्हणतात. पण तें बरोबर नाही. कारण सातवाहन हें नांव गौतमीपुत्राच्या पूर्वी निदान तीन राजांच्या बाबतींत योजलेलें आढळतें. या राजवंशाचा पुराणांत उल्लेखिलेला पहिला राजा शिशुक (किंवा शिमुक) याची प्रतिमा नाणेंघाटांत कोरली आहे, तिच्याखाली त्याचें नांव 'सिमुक सातवाहनो' असें कोरलें आहे. त्याच्या मुलालाहि 'कुमारो सातवाहनो' असें म्हटलें आहे. नाशिकच्या लेखांत त्याचा भाऊ कृष्ण याचें 'सातवाहन कुलांत जन्मलेला' असें वर्णन आलें आहे. या सर्व ठिकाणीं सातवाहन हें त्या त्या राजाचें मातृकुल होतें, असें म्हणणें शक्य नाही, हें उघड आहे.

पण या कुळाला 'सातवाहन' तरी कां म्हणत असत, असा प्रश्न उपस्थित होतो. पुराणांतील वंशावळींत कोठेहि सातवाहन हें नांव येत नसल्याने संस्कृत ग्रंथकारांनी व अर्वाचीन विद्वानांनी या नांवाच्या अनेक व्युत्पत्ति दिल्या आहेत. 'सात' नांवाच्या यक्षाने वाहून नेलें, म्हणून त्या राजाला 'सातवाहन' म्हणत, असें कथासरित्सागरांत म्हटलें आहे. कोणी म्हणतात, सात म्हणजे अश्व त्याचें वाहन होतें, म्हणून त्याचें असें नांव पडलें. पण व्युत्पत्ति कांही असली, तरी सातवाहन या नांवाचा राजा या कुळाचा संस्थापक होता, असा निर्विवाद पुरावा आतापर्यंत मिळाला नव्हता. पुराणांत त्याचें नांव येत नाही हें मागे सांगितलें आहेच. त्याचे कोरीव लेख व नाणींहि मिळालीं नव्हतीं. तेव्हा सातवाहन नामक राजा कधी काळीं होऊन गेला, किंवा कांही अन्य कारणाने त्या कुळाला हें नांव मिळालें, हें समजण्यास साधन नव्हतें. पण सुदैवाने या वर्षींच सातवाहन राजांचीं दोन तांब्याचीं नाणीं सापडलीं आहेत. त्यांपैकी एक औरंगाबादेस मिळालेलें माझे स्नेही डॉ. मो. गं.

दीक्षित यांच्या हातीं आलें. त्याची प्लॅस्टरची प्रतिकृति त्यांनी मजकडे गेल्या जानेवारींत पाठविली होती. दुसरें नाणें वारंगळला कांही वर्षांपूर्वी सापडलें होतें. त्याचा छाप हैद्राबादच्या एका गृहस्थाने मजकडे वाचनार्थ गेल्या मे महिन्यांत पाठविला होता. दोन्ही नाणीं चौकोनी प्रकारचीं असून त्यांच्या पुढील बाजूवर सोंड वर केलेला हत्ती आहे व त्याच्या मागील बाजूस 'रञो सिरिसादवाह–' अशीं अक्षरें आहेत. राजनामाचीं दोन अक्षरें या नाण्यांवर जागेच्या अभावीं उमटलीं नाहीत, असें दिसतें. पूर्ण नांव 'रञो सिरिसादवाहनस' (राज्ञः श्रीसातवाहनस्य) असें असावें. नाण्यांच्या मागील बाजूस उज्जयिनी चिन्ह (एकावर एक आडवे उभे ठेवलेले डंबेलस) व स्वस्तिक आहेत. अशा तऱ्हेचीं नाणीं (गौतमीपुत्र) सातकर्णि, पुळुमावि, स्कन्द सातकर्णि, यज्ञश्री सातकर्णि, विजय सातकर्णि इत्यादि पुराणांत निर्दिष्ट केलेल्या राजांचीं व इतरहि कुंभ सातकर्णी-सारख्या राजांचीं आपल्या प्रांतांत अकोला जिल्ह्यांतील तऱ्हाळा गावीं पांच सहा वर्षांपूर्वी सापडलीं होतीं. त्याविषयी माहिती प्रस्तुत लेखकाने त्यावेळीं नागपूरच्या 'महाराष्ट्र' पत्रांत प्रसिद्ध केली होती.* आता सापडलेल्या सातवाहन राजाच्या नाण्यांची घडण व आकार आणि त्यांवरील अक्षरें व इतर कांही चिन्हें तऱ्हाळ्याच्या नाण्यांपेक्षा फार प्राचीन दिसतात. त्यावरून सातवाहन राजा हा या कुळाचा मूळ पुरुष दिसतो. गुप्त राजापासून झालेल्या वंशाला जसें पुढें 'गुप्तवंश' असें नांव मिळालें, तसेंच सातवाहन राजापासून झालेल्या वंशाला 'सातवाहनकुल' असें नांव पडलेलें दिसतें. त्यामुळे त्या वंशांतील कोणत्याहि राजाला सातवाहन म्हणतां येईल. सातवाहन याचें प्राकृतांत प्रथम 'सादवाहन' व नंतर 'सालाहण' असें रूप झालेलें दिसतें.† तेव्हा पुराणांत निर्दिष्ट केलेल्या

* जिज्ञासूंस या नाण्यांदरील प्रस्तुत लेखकाचा लेख जर्नल ऑफ् दि न्युमिस्मॅटिक सोसायटी ऑफ् इंडिया, पु. २, पृ. ८६–९४ यामध्ये सापडेल.

† प्राकृतांत मूळच्या द चा ल होतो, हें गोदानदीच्या 'गोला' ह्या सप्तशतींतच आलेल्या नांवावरून स्पष्ट होईल.

हाल नामक सतराव्या राजाला सातवाहन म्हणत असले, तर त्यांत आश्चर्य नाही. ४६७ व्या गाथेंत ज्या 'सालाहण' नरेन्द्राची स्तुति आली आहे, तो हालच असावा.

वरील विवेचनावरून पुराणांतील आन्ध्रवंशी हाल राजा आणि संस्कृत व प्राकृत वाङ्मयांत प्रशंसिलेला हाल हे एक होत, हें वाचकांच्या ध्यानांत येईल. तसेंच, या हालाला सातवाहन कां म्हणत असत याचाहि उलगडा होईल. हाच हाल गाथासप्तशतीचा कर्ता होय. बाणाने प्रशंसिलेला सातवाहनाचा सुभाषितसंग्रहहि गाथासप्तशतीहून भिन्न नाही, हें आता सांगावयास नकोच.

पण मग गाथासप्तशतींत मंगळवारचा अनिष्ट वार म्हणून उल्लेख, राधाकृष्णांच्या लीला, गजाननाचें वर्णन इत्यादि सकृद्दर्शनीं उत्तरकालीन दिसणारे उल्लेख कसे आले, अशी शंका उत्पन्न होते. किंबहुना, अशा उल्लेखांमुळेच पं. कृष्णशास्त्र्यांसारख्या विद्वान् संशोधकांना हाल-सातवाहन राजाने गाथासप्तशती रचिली, या परंपरागत समजुतीच्या खरेपणाविषयी शंका आली. हे सर्व उल्लेख ख्रिस्ती शकाच्या पहिल्या-दुसऱ्या शतकानंतरचे असलेच पाहिजेत असा प्रस्तुत लेखकाचा आग्रह नाही. यांतील प्रत्येक बाबीचा चिकित्सक दृष्टीने विचार करून निश्चय केला पाहिजे. पण हे उल्लेख पहिल्या-दुसऱ्या शतकानंतर प्रचलित झालेल्या देवादिकांचे आहेत असें मानलें, तरी त्यांची समाधानकारक रीतीने उपपत्ति लावतां येते, हें प्रस्तुत लेखांत दाखवावयाचें आहे.

गाथासप्तशती हा प्राकृत गाथांचा संग्रह आहे, हें मागे सांगितलेंच आहे. यांत अनेक कवींच्या गाथा आहेत. आरंभीं प्रत्येक गाथेशीं तिच्या कर्त्याचें नांव संलग्न असावें; पण पुढे, संस्कृत सुभाषितांच्या बाबतींत झालें त्याप्रमाणे, कित्येक कवींचीं नांवें विस्मरणामुळे किंवा लेखकांच्या निष्काळजीपणामुळे गळलेलीं दिसतात. तथापि सप्तशतीच्या अवशिष्ट टीकांत अनेक कवींचीं नांवें दिलीं आहेत. सध्या तेरा टीका अवशिष्ट आहेत. त्यांपैकी फक्त गंगाधरभट्टाची टीका निर्णयसागर छापखान्याने छापलेली दोन

वर्षांपूर्वीपर्यंत उपलब्ध होती. निर्णयसागरी आवृत्तींत गंगाधरभट्टाच्या टीकेंत कवींचीं नांवें आढळत नाहीत. पण त्या आवृत्तीला जोडलेल्या गाथासूचींत कित्येक कवींचीं नांवें विशिष्ट गाथांशीं संबद्ध अशीं दिलीं आहेत. हीं नांवें 'रइराअस्स,' 'गुणड्ढस्स,' 'मिअङ्कस्स' अशीं षष्ठ्यन्त आहेत. दोन वर्षांपूर्वी पीताम्बर नामक टीकाकाराची 'गाथा-सप्तशती–प्रकाशिका' नांवाची संस्कृत टीका पंजाबचे पं. जगदीशलाल शास्त्री यांनी प्रकाशित केली. ही टीका सप्तशतीच्या ३८८ ते ७०० या गाथांवरच उपलब्ध झाली आहे. या टीकेंत कित्येक अज्ञात अशीं कवि-नामें दिसतात. तीं सर्व संस्कृतांत दिलीं आहेत. इतर टीका प्रकाशित झाल्या, तर आणखीहि कांही कवींचीं नांवें प्रकाशांत येतील. तथापि सध्या उपलब्ध असलेल्या नांवांवरूनहि महत्त्वाचीं अनुमानें काढतां येतात.

सप्तशतींतील गाथा महाराष्ट्री प्राकृतांत लिहिल्या आहेत. त्यांत गोदावरी नदीचा उल्लेख अनेक ठिकाणीं व विंध्यपर्वताचा कांही ठिकाणीं येतो. उत्तरेंतल्या एकाहि नदीपर्वताचा त्यांत निर्देश नाही. तेव्हा या गाथा महाराष्ट्रांत (यांत उत्तर महाराष्ट्र, विदर्भ व गोदावरीच्या दक्षिणेचा कुन्तल यांचा अन्तर्भाव होतो)–विशेषतः गोदावरीच्या परिसरांत–रचल्या गेल्या, यांत संशय नाही. सातवाहनांची राजधानी प्रतिष्ठान (सध्याचें पैठण) हीहि गोदावरीच्या काठींच होती. सातवाहन वंशांतील इतर राजांप्रमाणे हाल राजाहि गोदावरीच्या तीरीं राज्य करीत होता, हें मागे उद्‌धृत केलेल्या गाथेवरून दिसून येईल.

सप्तशतींतील कांही गाथा हालाने रचिल्या होत्या. कांही त्याच्या दरबारच्या कवींनी रचल्या असाव्या. या कवींमध्ये पालित, पालित्त किंवा पादलिप्त हा कवि प्रमुख होता, असें दिसतें. पण कित्येक गाथा राजदर-बाराशीं संलग्न नसलेल्या प्राकृत कवींनी रचिलेल्या दिसतात. त्यांत कांही रेवा, रोहा, अनुलक्ष्मी यांसारख्या कवयित्रीहि होत्या. इसवी सनाच्या पहिल्या चार-पांच शतकांत महाराष्ट्रांत प्राकृत काव्यगंगेला पूर आलेला दिसतो. राजापासून रंकापर्यंत ज्याला म्हणून नैसर्गिक काव्यप्रतिभा होती, त्याने प्राकृत गाथा रचलेल्या दिसतात, आणि म्हणूनच या गाथांमध्ये

संस्कृत काव्यांत सहसा न आढळणारें खेडेगावांतील जीवन चित्रित केलेलें दिसतें. अशा कोट्यवधि गाथांमधून हालानें सातशें गाथांची निवड केली, असें एका गाथेंत म्हटलेलें आपण पाहिलें आहेच. गाथा–सप्तशतीच्या विविध पाठांतून आलेल्या भिन्न भिन्न गाथा व संस्कृत आलंकारिकांनी उद्धृत केलेल्या तदितर अनेक गाथा यांची एकंदर संख्या लक्ष्यांत घेतली, तर या विधानांत फारशी अतिशयोक्ति असेल, असें वाटत नाही. या गाथांच्या लोकप्रियतेचा पुरावा सप्तशतींत अनेक ठिकाणीं आढळतो. 'अमृततुल्य प्राकृत काव्य वाचावें किंवा ऐकावें कसें, हें ज्यांना कळत नाही, पण जे कामपुरुषार्थाच्या तत्त्वज्ञानाची उठाठेव करतात, त्यांना लाज कशी वाटत नाही', असें एक कवि विचारतो!* 'ललित, मधुर शब्दाचें शृङ्गाररसमय असें तरुणींना आवडणारें प्राकृत काव्य असल्यावर संस्कृताला कोण विचारतो?' असें दुसरा कवि म्हणतो!† त्या काळीं महाराष्ट्री प्राकृतांत इतकी काव्यरचना झाली व तिची सर्व देशभर इतकी प्रशंसा झाली की, त्यापुढे प्राकृत काव्य लिहावयाचें झालें, तर तें महाराष्ट्रींत लिहिलें पाहिजे, असा संकेत ठरून गेला आणि तो संकेत सर्व उत्तरकालीन संस्कृत नाटककारांनी आपल्या पात्रांच्या तोडीं प्राकृत पद्यें घालतांना तंतोतंत पाळलेला दिसतो.

पण सप्तशतींतल्या सर्वच गाथा हालाच्या काळीं किंवा तत्पूर्वी रचिल्या, असें म्हणतां येत नाही, हें गाथा–सूचींतील कविनामांचें निरीक्षण केल्यास स्पष्ट होईल. या गाथांमध्ये प्रवरसेनाच्या नांवावर पांच गाथा [६४, २०२, २०८, ४८१ आणि ५६५] गंगाधरभट्ट व पीतांबर यांनी दिल्या आहेत. हा प्राकृत कवि वाकाटक नृपति द्वितीय प्रवरसेनच असावा; कारण या वाकाटक राजाने महाराष्ट्रींत

* अमिअं पाउअकव्वं पढिउं सोउं अ जे ण आणन्ति ।
कामस्स तत्ततन्ति कुणन्ति ते कहं न लज्जन्ति ॥ सप्तशती, २.

† ललिए महुरक्खरए जुवइयणवल्लहे ससिङ्गारे ।
सन्ते पाइयकव्वे को सक्कइ सक्कयं पढिउं ॥

वजालग्गम्, गाथा २१.

सेतुबंध किंवा रावणवहो [रावणवध] हें काव्य रचलें होतें. त्याची बाण, दण्डी, आनन्दवर्धन इत्यादि संस्कृत कवींनी व आलंकारिकांनी मुक्तकंठाने स्तुति केली आहे. हा प्रवरसेन सुप्रसिद्ध गुप्त सम्राट् द्वितीय चन्द्रगुप्त–विक्रमादित्य याचा दौहित्र असून, तो प्रथम रामटेकजवळ नन्दिवर्धन येथून व नंतर प्रवरपुराहून उत्तरविदर्भावर राज्य करीत होता. याचा काळ सुमारें इ. स. ४२० ते इ. स. ४५० हा असावा.

पीतांबराच्या 'गाथासप्तशतीप्रकाशिका' टीकेंत सर्वसेन नामक दुसऱ्या एका कवीचें नांव ५०४ व ५०५ या गाथांचा कर्ता म्हणून आलें आहे. भुवनपाल नामक दुसऱ्या एका टीकाकाराने २१७ व २३४ या गाथांचाहि तोच कर्ता होता, असें म्हटलें आहे. हा सर्वसेनहि वाकाटक नृपति असावा. कारण पांच–सहा वर्षांपूर्वी वाशीमला सापडलेल्या ताम्रपटांत सर्वसेनाचें नांव वाकाटक सम्राट् प्रथम प्रवरसेन याचा मुलगा व उत्तराधिकारी म्हणून आलें आहे.* प्रथम प्रवरसेनाला चार मुलगे होते व ते चारहि राजे झाले, असें पुराणांत म्हटलें आहे. त्यावरून प्रवरसेनाचें विस्तृत साम्राज्य त्याच्या चार मुलांमध्ये विभागलें होतें असें दिसतें. त्यांपैकी ज्येष्ठ पातीच्या अंमलाखाली उत्तर विदर्भ होता, हें मागे सांगितलें आहेच. दुसऱ्या शाखेचें राज्य दक्षिण विदर्भावर होतें व तिची राजधानी वत्सगुल्म (सध्याचें वाशीम) ही होती. तिचा संस्थापक सर्वसेन हा स्वतः उत्कृष्ट प्राकृत कवि होता. हा इ. स. ३३०–३५५ या काळांत होऊन गेला. त्याने महाराष्ट्रींत रचिलेलें 'हरिविजय' नामक काव्य सध्या उपलब्ध नाही. तथापि, दण्डी, आनन्दवर्धन, कुन्तक, हेमचन्द्र इत्यादि आलंकारिकांनी कालिदासाच्या काव्याच्या बरोबरीने त्या काव्याची स्तुति केलेली आढळते. सर्वसेन व त्याच्यानंतरचे वाकाटक नृपति यांच्या आश्रयाखाली प्राकृत काव्याचा वत्सगुल्म नगरींत अत्यंत

* एपिग्राफिआ इंडिका, पु. २६, १३७–१५५ पहा; सर्वसेनाचें नांव अजंठा येथील सोळा नं. च्या लेण्यांतील कोरीव लेखांत आलेलें प्रस्तुत लेखकाने याच लेखांत दाखविलें आहे.

उत्कर्ष झालेला दिसतो. कारण तत्कालीन प्राकृत काव्यांमुळे संस्कृतांतल्या वैदर्भीप्रमाणे प्राकृताची वच्छोमी (वात्सगुल्मी) ही रीतिहि सर्वत्र प्रसिद्धि पावली. वत्सगुल्म नगर बराच काळ काव्य व कला यांचें माहेर-घर होऊन राहिलें होतें. इ. स. च्या दहाव्या शतकांत होऊन गेलेल्या राजशेखर कवीने आपल्या काव्यमीमांसेंत वत्सगुल्म नगरींत काव्यपुरुषाचा साहित्यविद्यावधूशीं विवाह झाला असें वर्णिलें आहे, त्यावरूनहि त्या शहराचें प्राचीन वैभव व्यक्त होतें.

द्वितीय प्रवरसेन व सर्वसेन यांचीं राज्यें गोदावरीच्या उत्तरेस होतीं. पण दुसऱ्या दोन वाकाटक शाखांचा अंमल गोदावरीच्या दक्षिणेस असावा. या शाखांचे कोरीव लेख अद्यापि सापडले नाहीत. म्हणून त्यांमध्ये कोण राजे होऊन गेले, तें निश्चितपणें सांगतां येत नाही. नन्दि-वर्धन व वत्सगुल्म येथे राज्य करणाऱ्या सर्व नृपतींचीं नांवें सेनपदान्त आहेत. उदाहरणार्थ प्रवरसेन, रुद्रसेन, पृथिवीषेण, नरेन्द्रसेन, देवसेन, हरिषेण इत्यादि. यांसारखीं कांही नांवें–जयसेन, मकरन्दसेन, सत्यसेन, मल्लसेन इत्यादि सप्तशतीच्या कवि–सूचींत आढळतात. हीं नांवें राहिलेल्या दोन वाकाटक शाखांच्या राजांचीं किंवा राजकुमारांचीं असावीं, असें अनुमान केल्यास तें बहुधा चूक होणार नाही.

पण या दोन शाखा लौकरच नामशेष झालेल्या दिसतात व याचें कारण गोदावरीच्या दक्षिणेस कुन्तल देशांत राष्ट्रकूट राजांचा इ. स. ३७५ च्या सुमारास उदय झाला, हें होय. हें राष्ट्रकूट घराणें सातारा जिल्ह्यांत माण येथे राज्य करीत होतें, हें प्रस्तुत लेखकाने इतरत्र दाखविलें आहे.* या वंशांतील देवराज हा राजा विलासलोलुप व कलाभिज्ञ होता, असें कालिदासाच्या 'कुन्तलेश्वरदौत्या'वरून दिसतें. सप्तशतीच्या कविसूचींत देवराजाच्या नांवावर २३८ व २३९ या दोन गाथा दिल्या आहेत. हा देवराज राष्ट्रकूटवंशी होता, असें अनुमान करण्यास हरकत दिसत नाही. तो द्वितीय प्रवरसेनाचा समकालीन असून इ.स.च्या पांचव्या शतकाच्या आरंभीं राज्य करीत असावा. प्रवरसेन व सर्वसेन यांच्याप्रमाणे

* मागे पृ. ७२–७५ पाहा. (वा. वि मि.)

देवराजाने एखादें स्वतंत्र प्राकृत काव्य रचलें होतें काय, हें माहीत नाही. तथापि त्याने प्राकृत भाषेचा कोश रचला होता, अशी माहिती हेमचन्द्राच्या 'देशीनाममाले'वरून समजते. तेव्हा त्याने प्राकृत गाथा रचल्या असल्या, तर त्यांत आश्चर्य नाही.

वाकाटक नृपति सर्वसेन व द्वितीय प्रवरसेन आणि राष्ट्रकूट नृपति देवराज यांच्या गाथा अर्थात्च हालानंतर कित्येक शतकांनी सप्तशतींत घातल्या गेल्या असाव्या. कारण सर्वसेन हा इ. स. च्या चौथ्या शतकांत आणि प्रवरसेन व देवराज हे पांचव्या शतकांत होऊन गेले. तथापि सप्तशतीला हल्लीचें रूप पांचव्या शतकांतहि पूर्णपणें आलें होतें, असें दिसत नाही. कारण तिच्यांतील कांही गाथा वाक्पतिराजाने (बप्पइराआने) रचल्या होत्या असें दिसतें. गंगाधराच्या टीकेंत बप्पइराआच्या नांवावर एकच–९५ वी–गाथा दिलेली दिसते. पण पीताम्बराने वाक्पतिराजाचें नांव आणखी तीन (नं. ६१६, ६१७ व ६१८) गाथांवरच्या टीकेंत दिलें आहे. हा वाक्पतिराजहि देवराज, सर्वसेन व प्रवरसेन यांच्याप्रमाणेच प्राकृतवाङ्मयांत उत्कृष्ट ग्रंथकार म्हणून प्रसिद्ध आहे. याने महाराष्ट्री भाषेंत 'मधुमथनविजय' व 'गौडवध' अशीं दोन काव्यें रचलीं होतीं. त्यांपैकीं पहिलें सध्या उपलब्ध नाही. पण सुप्रसिद्ध आलंकारिक आनन्दवर्धन याने आपल्या ध्वन्यालोकांत त्याचीं प्रशंसा केली आहे, आणि भोज व अभिनवगुप्त यांनी त्यांतील कांही प्राकृत गाथा उद्धृत केल्या आहेत, त्यावरून त्यांत कृष्णचरित्र वर्णिलें होतें, असें दिसतें. गौडवध काव्यांत कनोजचा सम्राट् यशोवर्मा याचा दिग्विजय वर्णिला आहे. वाक्पतिराज हा भवभूतीचा समकालीन असून, भवभूतीप्रमाणे त्यालाहि यशोवर्म्याचा आश्रय होता, असें कल्हणाच्या राजतरंगिणीवरून समजतें. वाक्पतिराजानेहि आपल्या काव्यांत 'भवभूति हा अमृताचा सागर असून, त्याचे कांही बिन्दु मात्र माझ्या कथावर्णनांत स्फुरतात' असें अत्यंत विनयाने भवभूतीचें ऋण व्यक्त केलें आहे. भवभूति आपले पूर्वज विदर्भांत पद्मपुर नामक नगरीं राहत असत, असें आपल्या नाटकांत सांगतो. हें पद्मपुर भंडारा जिल्ह्यांतील आमगावाजवळचें पदमपूर होय हें प्रस्तुत लेखकाने इतरत्र दाखविलें आहे. तेव्हा भवभूतीप्रमाणे

वाक्पतिराज हाहि वैदर्भ कवि असावा, असें सहजच अनुमान सुचतें. हे दोन्ही कवि इ. स. च्या आठव्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेले. त्या काळीं विदर्भांत त्यांस राजाश्रय न मिळाल्याने उत्तरेस कनोजनृपतीच्या आश्रयास जावें लागलें, असें दिसतें. सप्तशतींत घेतलेल्या वाक्पतिराजाच्या उपरिनिर्दिष्ट गाथा 'गौडवध' काव्यांत आढळत नाहीत. तेव्हा त्या त्याच्या 'मधुमथन' काव्यांतील असाव्या, असें अनुमान कांही विद्वानांनी केलें आहे. पण त्या गाथांच्या अर्थाकडे लक्ष्य देतां, त्या इतर गाथांप्रमाणेच 'मुक्तक' रूपाच्या दिसतात. तेव्हा त्या वाक्पतिराजाने प्रसंगोपात्त रचल्या असाव्या.

वरील विवेचनावरून गाथासप्तशतींत निदान आठव्या शतकापर्यंत वेळोवेळीं भर पडत गेली असावी, हें वाचकांच्या लक्ष्यांत येईल. या गाथांमध्ये कोणत्याहि कथानकाचा संबंध येत नसल्याने, एखादी गाथा गाळणें किंवा नवीन घालणें मुळीच कठीण जात नसे; व याच कारणामुळे सप्तशतींतील गाथांच्या अनुक्रमांत व पाठांत अत्यंत वैविध्य दृष्टीस पडतें. सप्तशतीच्या हस्तलिखितांचा अभ्यास करून वेबर साहेबाने तिच्या निदान सहा आवृत्त्या झाल्या असाव्या असें सप्रमाण दाखविलें आहे. त्या सर्वांमध्ये फक्त ४३० गाथा समान आहेत. बाकीच्या कांही विशिष्ट पाठांतच आढळतात. त्यावरूनहि सप्तशतीच्या आवृत्त्या भिन्न भिन्न काळांत होत गेल्या, हें उघड आहे.

सप्तशतींतील गाथांची ही वस्तुस्थिति असल्याने, 'तो गाथासंग्रह इ. स. च्या दुसऱ्या शतकांत रचला गेला' या विधानाप्रमाणेच 'सप्तशती इ. स. च्या सहाव्या शतकामागे जाऊं शकत नाही' हें विधानहि लटकें पडतें. सप्तशतींतील कांही गाथा हालाच्याहि पूर्वीच्या असतील,*

* गंगाधरभट्टाने माधवसेन नामक कवीच्या नांवावर ३२७ वी गाथा दिली आहे. कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्रा'वरून शुंगकाळीं म्हणजे खिस्तपूर्व दुसऱ्या शतकांत विदर्भाचें राज्य माधवसेन व यज्ञसेन या दोन चुलत भावांत विभागलें होतें असें दिसतें. कदाचित् हा माधवसेनच ३२७ व्या गाथेचा कर्ता असेल.

तर कांहीं हालानंतर शेंकडो वर्षांनी रचलेल्या दिसतात. तेव्हा सप्तशतींतील गाथांचा पुरावा इतर ग्रंथांच्या किंवा प्रसंगांच्या कालनिर्णयार्थ ग्राह्य धरण्यापूर्वी त्या गाथा विशिष्ट कालांत रचल्या गेल्या, हें ठरविणें जरूर आहे. पण तसें करणें सध्या दुरापास्त असल्याने अशा पुराव्यावर भिस्त न ठेवणें बरें!

उदाहरणार्थ, आपण खालील गाथा घेऊं—

संवाहणसुहरसतोसिएण देन्तेण तुइ करे लक्खम् ।
चलणेण विक्कमाइत्तचरिअं अणुसिक्खअं तिस्सा ॥

गाथा नं. ४६४

भावार्थ—एक स्त्री आपल्या प्रियकरास म्हणते–तूं तिचे पाय चुरीत होतास, त्यावेळीं त्या आनंदांत तुझ्या हातावर लाक्षारसाने काढलेल्या आकृति उमटविण्यांत तिच्या पायाने विक्रमादित्याच्या कृत्यांचें अनुकरण केलें आहे. कारण विक्रमादित्य राजा आपल्या सेवकांच्या कामगिरीने संतुष्ट होऊन त्यांच्या हातावर लक्ष नाणीं ठेवत असतो. [यांत 'लक्खम्' या पदावर श्लेष असल्याने त्याचे लाक्षा व लक्ष (नाणीं) असे दोन अर्थ होतात.]

या गाथेंत विक्रमादित्याच्या दानशूरत्वाचें वर्णन आहे. 'ही गाथा सप्तशतींत आली असल्यामुळे, हा विक्रमादित्य इ. स. च्या पहिल्या–दुसऱ्या शतकापूर्वी होऊन गेला असावा, अर्थात् तो खिस्तपूर्व ५८ व्या वर्षी सुरू झालेल्या संवत्सराचा संस्थापक असला पाहिजे. तेव्हा या गाथेवरून विक्रमादित्य व त्याचा आश्रित कालिदास हे खिस्तपूर्व पहिल्या शतकांत होऊन गेले, हें मत सिद्ध होतें' असें कांही विद्वानांनी प्रतिपादिलें आहे. याच्या उलट पं. कृष्णशास्त्री घुले म्हणतात की, या गाथेमुळे सप्तशतीच इ. स. च्या सहाव्या शतकामागे जाऊं शकत नाही. कारण डॉ. सर रामकृष्णपंत भांडारकरांनी कालिदासादि नवरत्नें सहाव्या शतकाच्या प्रथमार्धांत होऊन गेलीं, या डॉ. कर्नच्या मताचा पुरस्कार आपल्या 'दक्षिणच्या प्राचीन इतिहासां'त केला आहे. श्री. अप्रबुद्धांस तर या गाथेंतील वर्णन विक्रमादित्याबद्दल आहे काय, याबद्दल शंका वाटते.

कारण ते म्हणतात 'एका श्लोकाला एक लाख रुपये असल्या आख्यायिका विक्रमाविषयी नसून भोजराजाविषयी आहेत.'*

या मतामतांच्या गलबल्यांत तथ्य काय आहे तें पाहूं. सप्तशतीच्या अनेक आवृत्त्या झाल्या असल्यामुळे, जोंपर्यंत ही गाथा हालराजाच्या मूळच्या सप्तशतींत होती, असें निर्विवादपणें सिद्ध करतां येत नाही, तोंपर्यंत केवळ तिच्या पुराव्यावरून विक्रमादित्य खिस्तोत्तर पहिल्या-दुसऱ्या शतकापूर्वी होऊन गेला, असें अनुमान करणें योग्य होणार नाही. शिवाय शिलालेखादिकांच्या पुराव्यावरून सध्या विक्रमादित्याच्या नांवाने प्रचलित असलेल्या संवत्सरास पूर्वी 'कृतसंवत्' असें नांव होतें, हें सिद्ध झालें आहे.† तेव्हा खिस्तपूर्व पहिल्या शतकांत विक्रमादित्य होऊन गेला, या विषयीं निश्चित पुरावा मिळत नाही. प्रस्तुत गाथेंतलें वर्णन अकराव्या शतकांतल्या भोजराजाच्या अगोदर कोणत्याहि राजास लागू पडत नाही, असें म्हणणेंहि धाष्टर्याचें होईल. कारण गुप्तवंशी विख्यात सम्राट् द्वितीय चन्द्रगुप्त-विक्रमादित्य याचीहि दानशूरत्वाबद्दल ख्याति होती. त्याने केवळ लक्षावधिच नव्हे, तर कोटयवधि नाणीं दान केल्याच्या कथा लोकांत प्रचलित होत्या, हें खालील श्लोकावरून दिसून येईल. हा श्लोक संजान येथील ताम्रपटांत राष्ट्रकूट सम्राट् प्रथम अमोघवर्ष याच्याविषयी आला आहे.‡

हत्वा भ्रातरमेव राज्यमहरद्देवीं च दीनस्तथा
लक्षं कोटिमलेखयत्किल कलौ दाता स गुप्तान्वयः ।
येनात्याजि तनुः स्वराज्यमसकृद् बाह्यार्थकैः का कथा
ह्रीस्तस्योन्नतराष्ट्रकूटतिलको दातेति कीर्त्यामपि ॥

[अर्थ—गुप्तवंशी (द्वितीय चन्द्रगुप्त) आपल्या भावालाच ठार मारून त्याची पत्नी व राज्य हरण करता झाला.§ (तेव्हा) तो

* वागीश्वरी, पु, ३, पृ. ९. † सह्याद्रि, पु. ९, पृ. ६९३-७०१.
‡ एपिग्राफिआ इंडिका, पु. १८, पृ. २४८.
§ 'कालिदास' (पृ. ५९-६२) पाहा.

तिरस्करणीय होय. तथापि तो लाख, कोटी अशीं नाणीं दान केल्याबद्दल (आपल्या कोशाध्यक्षाला) लिहावयास लावीत असे,* म्हणून त्याला या कलियुगांत दाता म्हणतात ! तेव्हा ज्याने स्वतःचा देह व आपलें राज्य अनेकदा दान केलें† (बाह्य वस्तूंची गोष्ट तर सांगावयासच नको) त्या थोर राष्ट्रकूटवंशाच्या तिलकभूत अशा (अमोघवर्ष) राजाला आपली दाता म्हणून कीर्ति झाली असतां लज्जा वाटते !]

या श्लोकावरून द्वितीय चन्द्रगुप्त-विक्रमादित्यासंबंधी लक्षदानाच्या आख्यायिका लोकांत प्रचलित होत्या, यांत संशय नाही. तेव्हा या विक्रमादित्याचा उल्लेख सप्तशतीच्या उपरिनिर्दिष्ट गाथेंत आहे, असें मानलें तर खचित चूक होणार नाही. 'सप्तशतीं'त वाकाटक नृपति द्वितीय प्रवरसेन व राष्ट्रकूट नृपति देवराज यांच्या गाथा आल्या आहेत, हें आपण पाहिलें आहेच. द्वितीय चन्द्रगुप्त हा त्यांचाच समकालीन असल्यामुळे व तत्कालीं वाकाटक व राष्ट्रकूट या दोन्ही राजवंशांस त्याचा आश्रय असल्यामुळे त्याच्यासंबंधी अशा गाथा विदर्भांत रचल्या गेल्या, तर त्यांत मुळीच आश्चर्य नाही. सारांश, या गाथेमुळे विक्रमादित्य व म्हणून त्याचा आश्रित कविकुलगुरु कालिदास हे इ. स. ४०० च्या सुमारास होऊन गेले, या मताला पुष्टिच मिळते.

इतर वादग्रस्त प्रश्नांबद्दल अशीच गाथांच्या पुराव्याची छाननी झाली पाहिजे. त्या सर्वांचा येथे विचार करणें शक्य नाही. तथापि जातां जातां हें सांगावेंसें वाटतें की, गजाननवर्णनपर ४०३ नंबरची गाथा ही पीतांबराच्या टीकेंत येण्यासारखी असूनहि आली नाही, तेव्हा ती हालनृपतीच्या मूळच्या गाथासंग्रहांत होती काय, याविषयी शंका वाटते.

---

* विक्रमादित्याच्या संबंधींच्या अशा अशा आख्यायिका मज्मुलतवारिखमध्ये दिल्या आहेत.

† अमोघवर्षाने एका प्रसंगीं लोकोपद्रव (रोगाची साथ) शमविण्याकरिता आपल्या डाव्या हाताची अंगुलि महालक्ष्मीला अर्पण केली होती व अनेकदा धर्माचरणार्थ राज्यत्याग केला होता, त्याला अनुलक्षून हें विधान आहे.

गुणाढ्याचें जन्मस्थान*

पैशाची भाषेंत लिहिलेल्या बृहत्कथेचा कर्ता गुणाढ्य हा प्रतिष्ठान किंवा सध्याचें पैठण या गावीं जन्मला अशी प्रचलित समजूत आहे.† कोणी त्याचें जन्मस्थान वऱ्हाडांतील वाशीम (प्राचीन वत्सगुल्म) असावें असा तर्क करतात.‡ याविषयी उपलब्ध पुराव्याची छाननी करून तें स्थान निर्णित करण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखांत केला आहे.

मूळच्या बृहत्कथेचीं दोन संस्कृत रूपें, सोमदेवाचें कथासरित्सागर व क्षेमेंद्राची बृहत्कथामंजरी अशीं सध्या उपलब्ध आहेत. या दोन्ही ग्रंथांत बृहत्कथेच्या निर्मितीविषयीची खालील कथा प्रस्तावनारूपाने आली आहे. गुणाढ्य हा सोमशर्मा नामक ब्राह्मणाचा दौहित्र. सोमशर्म्याला वत्स व गुल्म असे दोन मुलगे व श्रुतार्था नामक कन्या होती. श्रुतार्थेला कीर्तिसेन नामक नागपुरुषापासून गुणाढ्य हा पुत्र झाला. त्याचे मातुल व माता हीं निधन पावल्यावर तो विद्याभ्यासाकरिता देशांतरीं गेला. विद्यापारंगत झाल्यावर तो आपल्या गावीं परत आला व नंतर सातवाहन राजाला भेटण्याकरिता त्याच्या राजधानीस गेला. तेथे तो त्या राजाचा मंत्रि झाला. एकदा राजा राण्यांशीं जलक्रीडा करीत असतां 'मोदकैर्मा ताडय' या संस्कृत वाक्याचा अर्थ न समजल्यामुळे त्याची फजिती झाली. तेव्हा त्याने संस्कृत शिकण्याचा निश्चय केला. राजाला किती थोड्या काळांत संस्कृत शिकतां येईल याविषयी शर्वशर्मा व गुणाढ्य यांमध्ये पैज लागली. शर्वशर्म्याने कार्त्तिकस्वामीच्या प्रसादाने कातन्त्र व्याकरण प्राप्त करून घेऊन सहा महिन्यांत राजाला संस्कृत शिकविलें. तेव्हा

* भा. इ. सं. मंडळ त्रैमासिक, पृ. ६७ ते ७२

† Keith–History of Sanskrit Literature, p. 266.

‡ शारदाश्रम वार्षिक, शके १८५५, पृ. ३०.

गुणाढ्यानें आपल्या प्रतिज्ञेप्रमाणे संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश या तीनहि भाषा वर्ज्य करून पैशाची भाषेंत आपला बृहत्कथा नामक ग्रंथ लिहिला.

वरील कथा मूळच्या बृहत्कथेंत होती काय याविषयी संशय आहे.* तथापि गुणाढ्याविषयीचे कांही उल्लेख, त्याचें जन्मस्थान, त्याचा सातवाहन राजाशीं संबंध वगैरे खरे असावेत असें वाटतें. त्यांचा आता विचार करूं.

गुणाढ्याचा आजा सोमशर्मा हा 'दक्षिणात्य ब्राह्मण' होता एवढाच निर्देश बृहत्कथामंजरींत आला आहे; कथासरित्सागरांत मात्र याविषयी खालील निश्चित विधान आहे.

प्रतिष्ठानेऽस्ति **नगरं सुप्रतिष्ठितसंज्ञकम्** ।
तत्राभूत् सोमशर्माख्यः कोऽपि ब्राह्मणसत्तमः ॥

यावरून **प्रतिष्ठान** हें **देशाचें** नांव असून त्यांतील **सुप्रतिष्ठित** नामक **नगर** गुणाढ्याचें आजोळ होतें, असें स्पष्ट दिसतें. अशोकाच्या शिलालेखांत पेतेनिक किंवा पितिनिक लोकांचा उल्लेख आला आहे. तेही या प्रतिष्ठान देशाचे (केवळ पैठण शहराचे नव्हे) रहिवासी असावे. बृहत्कथामंजरींत एका ठिकाणीं गुणाढ्य हा प्रतिष्ठानपुरीं होऊन गेला असें म्हटलें आहे. पण त्याचा अर्थ तो प्रतिष्ठानपुरीं जन्मला असा नसून त्याच्या कर्तृत्वाचा काल प्रतिष्ठानपुरीं गेला असा घेतला पाहिजे. कदाचित् ' प्रतिष्ठानपुरे जातः ' याचा अर्थ प्रतिष्ठान नामक नगरींत होऊन गेला असा नसून प्रतिष्ठान देशांतील एका नगरींत तो होता असा विवक्षित असेल. तसें असल्यास कथासरित्सागर व बृहत्कथामंजरी या दोन ग्रंथांमध्ये गुणाढ्याच्या मूलस्थानाविषयीच्या विधानांत विरोध आढळणार नाही.

विद्याभ्यास संपवून गुणाढ्य स्वदेशीं सुप्रतिष्ठित नगरांतच परत आला असें कथासरित्सागरांत म्हटलें आहे. याविषयी गुणाढ्याच्या तोंडीं खालील श्लोक घातले आहेत—

* बुधस्वामीच्या 'बृहत्कथाश्लोकसंग्रहां'त ती आढळत नाही.

कालेन तत्र संप्राप्य सर्वा विद्याः प्रसिद्धिमान् ।
स्वदेशमागतोऽभूवं दर्शयिष्यन्निजान् गुणान् ॥
प्रविशंश्च चिरात्तत्र **नगरे सुप्रतिष्ठिते** ।
अपश्यं शिष्यसहितः शोभां कामप्यहं तदा ॥

बृहत्कथामंजरींत गुणाढ्य विद्याभ्यास संपवून शातवाहन राजाची भेट घेण्याकरितां त्याच्या नगरीं गेला असें स्पष्ट विधान आहे—

ततो निखिलविद्यानामाश्रयो वेदपारगः ।
शातवाहनभूपालं **द्रष्टुं यातोऽस्मि तत्पुरम्** ॥

या वर्णनावरून गुणाढ्याचें जन्मस्थान हें सातवाहन राजाच्या राजधानीहून भिन्न होतें हें दिसून येईल. सातवाहन राजांची राजधानी प्रतिष्ठान (सध्याचें पैठण) येथें होती हें सर्वांस माहीत आहे. कथासरित्सागरांत गुणाढ्याचें जन्मस्थान सुप्रतिष्ठित होतें, असा दोन ठिकाणीं निर्देश आला असला तरी पुढील वर्णन वाचतांना तें नगर व प्रतिष्ठान हीं एक होत असा वाचकांचा ग्रह होतो. पण पुढे दाखविल्याप्रमाणे या बाबतींत सोमदेवाची चूक झालेली दिसते.

या कथासंग्रहांत सुप्रतिष्ठित नगराचें नांव इतरत्रहि आलें होतें. कथासरित्सागराच्या सुरतमञ्जरी लंबकांत कुरंगी नामक राजकन्येची कथा आली आहे. त्या ठिकाणीं म्हटलें आहे.—

प्राक् प्रसेनजितो राज्ञः **सुप्रतिष्ठितसंज्ञके** ।
पुरे कुरंगी नामाभूदतिरूपवती सुता ॥

बृहत्कथामंजरींत हीच गोष्ट खालीलप्रमाणे सांगितली आहे—

नगरे सुप्रतिष्ठाख्ये राज्ञः सेनाजितः पुरा ।
पुत्री कुरंगिका नाम विहर्तुं वनमाययौ ॥

हे दोन्ही ग्रंथ पैशाची प्राकृतांतील ग्रंथाचीं संस्कृत रूपांतरें असल्याने व वृत्तरचनेच्या कारणाने नगरादिकांच्या नामांत किंचित् फरक आढळतो. पण **सुप्रतिष्ठित** किंवा **सुप्रतिष्ठ** या नांवाचें प्रख्यात नगर दक्षिणेंत होतें यात संशय नाहीं. तें प्रतिष्ठानापासून भिन्न असावें.

कारण सातवाहन राजांच्या राजधानीचें नांव सर्वत्र प्रतिष्ठान असेंच येतें. तें कोठेहि सुप्रतिष्ठित किंवा सुप्रतिष्ठ असें दिलेलें नाही. पाली सुत्तनिपात ग्रंथांत प्रतिष्ठानचें प्राकृत रूप पतिट्ठान हें 'मूलक' देशाची राजधानी म्हणून आलें आहे.* ग्रीक भूगोलकार टॉलेमी हाहि सातवाहन-वंशी पुळुमावि राजा प्रतिष्ठान नगरीं राज्य करीत होता अशी माहिती देतो. यांपैकी एकाहि ठिकाणीं प्रतिष्ठानाचें 'सुप्रतिष्ठित' किंवा 'सुप्रतिष्ठ' असें नांव आढळत नाही. तेव्हा गुणाढ्याच्या जन्मस्थानाचें नांव सुप्रतिष्ठित किंवा सुप्रतिष्ठ असून तें प्रतिष्ठान (सध्याचें पैठण) नगराहून भिन्न होतें असें अनुमान केल्यास तें चूक होणार नाही.

पण हें स्थलनाम प्राचीन काळीं प्रचलित होतें याविषयी स्वतंत्र पुरावा आहे काय असा प्रश्न येथे उपस्थित होतो. असा गुणाढ्यकालीन पुरावा उपलब्ध नाही. पण त्यानंतरच्या वाकाटककालांतील तीन ताम्रपटांत सुप्रतिष्ठ नामक **आहाराचें** किंवा तालुक्याचें नांव आढळतें. त्यावरून सुप्रतिष्ठ नगराच्या प्राचीनकाळच्या अस्तित्वाबद्दल संशय राहत नाही. एवढेंच नाही तर सामान्यतः त्याचें स्थानहि ठरवितां येतें.

या तीन ताम्रपटांपैकी पहिला ताम्रपट वाकाटकराज्ञी प्रभावती-गुप्ता हिचा पुणें येथे सापडलेला होय.† हा प्रभावतीगुप्तेने तत्कालीन राजधानी नन्दिवर्धन (सध्यांचें रामटेकजवळचें नन्दर्धन) येथून दिला होता. याने दान दिलेल्या गावाच्या चतुःसीमा पुढीलप्रमाणे दिल्या आहेत–

श्रीप्रभावतीगुप्ता **सुप्रतिष्ठाहारे** विलवणकस्य पूर्वपार्श्वे शीर्षग्रामस्य दक्षिणपार्श्वे कदापिञ्जनस्यापरपार्श्वे सिदिविवरकस्योत्तरपार्श्वे दङ्गुणग्रामे ब्राह्मणाद्यान्ग्रामकुटुम्बिनः कुशलमुक्त्वा समाज्ञापयति।

या सुप्रतिष्ठ नामक आहाराचा व त्यांतील गावांचा पत्ता या ताम्रपटाचे संपादक कै. प्रो. पाठक व रा. ब. दीक्षित यांना लागला नव्हता. कांही वर्षांपूर्वी याच आहाराचा निर्देश असलेला दुसरा एक

---

* सुत्तनिपात, पारायणवग्गो, वत्थुगाथा, ५, ३६.

† एपिग्राफिया इंडिका, पु. १५, पृ. ४१,

ताम्रपट वाकाटक द्वितीय प्रवरसेन याने दिलेला वर्धा जिल्ह्याच्या हिंगणघाट तहसिलींतील जांबगावीं सापडला.* त्यावरून शोध करतां पुण्याच्या ताम्रपटांतील गांवें हिंगणघाट तहसिलींत सांपडली. तीं अशीं:— विलवणक म्हणजे हिंगणघाटच्या पश्चिमेस अडीच मैलांवर असलेलें वणी. कदापिञ्जन हें त्याच्या पूर्वेस ३ मैलांवरचें कधाजन. यावरून दान दिलेलें दङगुण हें बहुधा सध्याचें हिंगणघाट असावें असें वाटतें. पुण्यास सापडलेला हा प्रभावतीगुप्तेचा ताम्रपट मूळचा वर्धा जिल्ह्यांतील होता हें यावरून स्पष्ट दिसेल. याविषयी सविस्तर विवेचन भारत इतिहास संशोधक मंडळाचें त्रैमासिक (वर्ष २२, अं. १) यांत यापूर्वी केलें आहे.

वर उल्लेखिलेल्या जांबच्या ताम्रपटांतील दान दिलेल्या कोथुरक गावांचें ठिकाण व चतुःसीमा येणेप्रमाणे दिल्या आहेत.

सुप्रतिष्ठाहारे उमानद्या अपरपार्श्वे चिंचापल्ल्या उत्तरे पार्श्वे बोन्थिकवाटकस्य पूर्वे पार्श्वे मण्डुकिग्रामस्य दक्षिणे पार्श्वे कोथुरकन्नाम ग्रामः ।

यांतील गावेंही हिंगणघाट तहसिलींत जांबजवळ सापडतात. तीं अशीं:—चिंचापल्ली म्हणजे वन्नानदीच्या उजव्या तीरावरचें चिंचोली. बोन्थिकवाटक म्हणजे बोथड, व मण्डुकिग्राम म्हणजे मांडगांव; हीं दोन्ही जवळच त्या त्या दिशांस सापडतात. उमानदीचें हल्लीचें नांव वन्ना होय. दान दिलेलें कोथुरक गाव सध्या त्या नांवाने ज्ञात नाही. त्याच्या जागीं मनगाव वसलेलें दिसतें.

तिसरा ताम्रपट पांचसहा वर्षांपूर्वी प्रकाशांत आला. तो चांदा जिल्ह्याच्या वरोडा तहसिलींत वडगाव येथे सापडला. तो एपिग्राफिया इंडिकामध्ये मी प्रसिद्ध करीत आहे.† हाहि ताम्रपट वाकाटकनृपति द्वितीय प्रवरसेनानच दिला असून त्यांत दान दिलेल्या ग्रामाचें वर्णन खालीलप्रमाणे दिलें आहे.

* एपिग्राफिया इंडिका, पु. २६, पृ. १५५.

† हाहि आता प्रकाशित झाला आहे. ए. इं. पु. २७, पृ. ७४ पाहा. (वा. वि. मि.)

सुप्रतिष्ठाहारे गृध्रग्रामस्य पूर्वतः कदम्बसरकस्य दक्षिणतः नीलीग्रामस्य पश्चिमेन कोकिलारस्य उत्तरतः वेलुसुकं नाम ग्रामः ।

या ताम्रपटांतहि सुप्रतिष्ठाहाराचा उल्लेख आहे. दान दिलेल्या वेलुसुक गावाच्या जागीं सध्या चिंचमंडळ नामक गाव वसलेलें दिसतें. तें वर उल्लेखिलेल्या वन्ना नदीच्या दक्षिणेस आहे. त्याच्याजवळ गृध्रग्राम, नीलिग्राम व कदम्बसरक हीं त्या त्या दिशेस गदेघाट, नीलजई व कोसर या नांवांनी अद्यापि विद्यमान आहेत. हा ताम्रपट प्रवरसेनाने हिरण्यानदीच्या काठीं दिला होता असा त्यांत निर्देश आहे. ही नदी सध्या एरई या नांवाने ज्ञात आहे. वर उल्लेखिलेलीं गांवें हिंगणघाट तहसिलीच्या किंचित् दक्षिणेस चांदा जिल्ह्याच्या वरोडा तहसिलींत सापडलीं. त्यावरून प्राचीन सुप्रतिष्ठ आहारांत हिंगणघाट तहसिलींतील बराचसा भाग व त्याच्या दक्षिणेचा यवतमाळ व चांदा जिल्ह्यांतील कांही भाग अन्तर्भूत होत असावा असें अनुमान करतां येतें.

सुप्रतिष्ठ आहाराचें हें नांव त्यांतील मुख्य नगर सुप्रतिष्ठ यावरूनच पडलें असावें. हें नगर बृहत्कथामंजरींत याच नांवाने उल्लेखिलें आहे हें वर दाखविलें आहेच. कथासरित्सागरांतील 'सुप्रतिष्ठित' हें नांव मूळच्या प्राकृत नांवाचें संस्कृतीकरण करण्यामुळे भिन्न झालेलें दिसतें. वस्तुतः या दोन्ही नांवांत भिन्नता नाही.

या नांवाला जुळेल असें ग्रामनाम हिंगणघाट तहसिलींत सापडतें. हिंगणघाटच्या आग्नेयेस सुमारें बारा मैलांवर, पोथ्रा असें गांव अद्यापि विद्यमान आहे. त्याच्या दक्षिणेस वाहणारी त्याच नांवाची पोथ्रा नदी वन्ना (प्राचीन उमा) नदीला मिळते. सुप्रतिष्ठ आहारांतील म्हणून तीन्ही प्राचीन ताम्रपटांत निर्दिष्ट केलेलीं बहुतेक गांवें पोथ्रा गावाच्या दक्षिणेस किंवा उत्तरेस पंधरा मैलांच्या आंत सापडतात. सुप्रतिष्ठ गाव भरभराटींत होतें त्या काळाला आज दीड हजार वर्षं होऊन गेल्यामुळे आता तेथे कांही प्राचीन अवशेष असतीलच असें सांगवत नाही. वाशीम (प्राचीन वत्सगुल्म), नंदर्धन (प्राचीन नन्दिवर्धन) या

तत्कालीन राजधानीच्या शहरींहि सध्या फारसे प्राचीन अवशेष आढळत नाहीत. या नांवाचें गाव बलवत्तर पुराव्यावरून दक्षिणेंत इतरत्र सापडत नाही तोंपर्यंत प्राचीन विदर्भांतील या भागांतच सुप्रसिद्ध प्राकृत कवि गुणाढ्याचा जन्म झाला होता असें म्हणण्यास हरकत नाही. संस्कृत व प्राकृत कवींपैकी भवभूतीसारख्या फारच थोड्यांच्या जन्मस्थानाविषयी आपणांस निश्चित माहिती आहे. या दृष्टीने वरील विवेचन महत्त्वाचें वाटेल अशी आशा आहे.*

---

* गुणाढ्याचें जन्मस्थान वत्सगुल्म होतें या पं. गाडगेशास्त्री यांच्या विधानाला कांही आधार नाही. कथासरित्सागर व बृहत्कथा-मंजरी यांत गुणाढ्याचे मातुल वत्स व गुल्म यांचीं नांवें आलीं आहेत. पण त्यांनी आपल्या नांवें वत्सगुल्म नामक नगर स्थापलें असा उल्लेख नाही. या दोन ग्रंथांत इतरत्रहि कोठे वत्सगुल्माचा उल्लेख येत नाही. वात्स्यायनकृत कामसूत्राच्या एका टीकाकाराने दिलेली, वत्स व गुल्म हे राजपुत्र होते व त्यांनी वसविलेल्या देशास वत्सगुल्म म्हणत, ही माहितीहि आनुमानिक दिसते.

एक प्राचीन कविमंडळ*

वाग्देवीची उपासना करावी या ध्येयाने प्रेरित होऊन अलीकडे महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं कविमंडळें स्थापन झालेलीं दिसतात; व कित्येकदा त्यांच्या सभासदांचे काव्यसंग्रह किंवा लेखसंग्रहहि प्रकाशित होतात. याचें सुप्रसिद्ध उदाहरण सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी पुण्यास स्थापन झालेलें 'रविकिरण मंडळ' हें होय. आपल्या प्रांतांतहि अशीं कांही मंडळें स्थापन होऊन त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. काव्यनिर्मिति किंवा काव्यचर्चा यांच्या उद्देशाने मंडळ स्थापण्याची ही पद्धत अलीकडेच प्रचारांत आली नसून, ती फार प्राचीन काळापासून चालत आली आहे, असें दिसतें. प्राचीन काळीं सरस्वती देवीच्या देवालयांत, नागरकांच्या घरीं किंवा कलावंतिणीच्या भवनांत समान विद्या, बुद्धि, वित्त व वय असलेल्या नागरकांच्या गोष्ठी किंवा मंडळें जमत; व काव्यचर्चा समस्यापूर्ति, कलाचर्चा, इत्यादिकांत आपला वेळ घालवीत, असें वात्स्यायनाच्या कामसूत्रावरून दिसतें. तथापि अशीं मंडळें स्वतःच्या नावानें ग्रंथप्रसिद्धिहि करीत असत काय, याविषयी आतापर्यंत माहिती नव्हती. या तऱ्हेचें एक उदाहरण अलीकडे माझ्या वाचनांत आलें आहे. त्याविषयीची माहिती वाचकांस मनोरंजक वाटेल म्हणून येथे देत आहे.

ख्रिस्ती शकाच्या पहिल्या चार पांच शतकांत प्राकृत काव्याला बहर आलेला दिसतो. हालाच्या गाथासप्तशतींत अनेक कवींचीं नावें दिलीं आहेत. त्यांवरून राजापासून रंकापर्यंत सर्व दर्जांचे लोक व पुरुषांप्रमाणेच स्त्रियाहि अहमहमिकेने काव्यरचना करीत असत, असें दिसतें.

---

*'तरुण भारत', नागपूर, वर्षारंभ अंक, १९४७.

गाथासप्तशतीसारखे अनेक गाथासंग्रह प्राचीन काळीं प्रचलित असावे. पण ते आता नामशेषहि राहिले नाहीत. कांही प्राकृत कवींचीं नांवें उत्तरकालीन संस्कृत व प्राकृत गद्यपद्यग्रंथांतील प्रास्ताविक श्लोकांवरून ज्ञात होतात. उद्योतनसूरि नामक जैन कवीचा ' कुवलयमाला ' हा गद्यकाव्य ग्रंथ या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. हा ग्रंथ अद्यापि प्रकाशित झाला नाही. तथापि त्यांतील कांही गाथा श्री. दलाल यांनी राजशेखराच्या काव्यमीमांसेच्या आपल्या आवृत्तीला जोडलेल्या टिपणींत दिल्या आहेत. त्यावरून खालील माहिती दिली आहे.

हा ग्रंथ शके ६९९ च्या (इ. स. ७७८) अखेरीस रचला, असें त्यांतील अखेरच्या उल्लेखावरून दिसतें. तेव्हा हा विद्यमान संस्कृत प्राकृत ग्रंथांत बराच प्राचीन आहे, यांत संशय नाही. या ग्रंथाच्या आरंभीं बाणाच्या हर्षचरितांतल्याप्रमाणे प्राचीन कवींच्या स्तुतिपर कांही गाथा आल्या आहेत, त्यांपैकी एक खाली दिली आहे.

पालित्तयसालाहणछप्पण्णयसीहनायसद्देण।
संखुद्धमुद्धसारंग उव्व कह ता पयं देमि॥

[अर्थ–पालित्तय, सालाहण व छप्पण्णय या सिंहांच्या गर्जनेने भयग्रस्त झालेल्या साध्या भोळ्या हरणासारख्या मीं कसें बरें पुढे पाऊल टाकावें ?]

या गाथेंत पालित्तय, सालाहण व छप्पण्णय या तीन विख्यात कवींविषयीचा आपला आदर उद्योतनाने व्यक्त केला आहे. यांपैकी पालित्तय हा सातवाहनवंशी हाल नृपतीच्या दरबारचा श्रीपालित किंवा पादलिप्त हा असावा. या कवीच्या कांही गाथा सप्तशतींत घेतल्या आहेत. दुसरा कवि सालाहण हा सप्तशतीकार हालच होय. सप्तशतींतील एका गाथेंत सालाहण नरेन्द्राची स्तुति आली आहे. ती गाथा ही—

आवण्णाइं कुलाइं दो व्विअ जाणंति उण्णइं णेउम्।
गोरीअ हिअअदइओ अहवा सालाहणणरिन्दो॥

[अर्थ–आपत्तींत सापडलेल्या कुलांना उन्नतिप्रत नेणे हें दोघेच जाणतात–एक पार्वतीचा हृदयदयित शंकर व दुसरा सालाहण नृपति.]

सालाहण हें सातवाहन शब्दाचें प्राकृत रूप होय. सातवाहन हा पुराणांत आन्ध्र म्हणून उल्लेखिलेल्या राजकुलाचा मूळ पुरुष होता, हें मी गतवर्षीच्या ' तरुण भारता'च्या विशेषांकांत सिद्ध केलें होतें. या राजवंशांत उत्पन्न झालेल्या कोणाहि राजाला सातवाहन किंवा सालाहण म्हणतां येईल. तथापि, या वंशांतील सतरावा राजा जो गाथासप्तशती-कर्ता हाल तोच ' सालाहण ' म्हणून येथे विवक्षित दिसतो. हालाच्या अनेक गाथा सप्तशतींत घेतल्या आहेत त्यावरूनहि वरील अनुमान युक्त दिसेल. या हालकवीच्या स्तुतिपर आणखी दोन गाथा उद्योतनाने पुढे दिल्या आहेत. असो.

छपन्न कवींचें मंडळ

आता राहिला तिसरा कवि छप्पण्णय. ह्या कवीविषयी मात्र अद्यापपर्यंत आपणांस कांही माहिती नाही. तथापि उद्योतनानेच पुढे या कवीविषयी खालील गाथा दिली आहे.

छप्पण्णयाण किंवा भन्नइ कयकुंजराण भुवणम्मि ।
अन्नो वि छेयभणियो अज्ज वि उवमिज्जए जेहिं ॥

[अर्थ—छप्पण्णय या कविश्रेष्ठाविषयी काय सांगावें ? ज्यांच्याशीं छेकोक्ति रचणाऱ्या देशांतील अन्य कवींची अद्यापिहि तुलना केली जाते !]

या गाथेवरून छप्पण्णय कवीविषयी बरीच माहिती मिळते. सकृद्दर्शनींच एक गोष्ट ध्यानांत येते ती ही की, या गाथेंत छप्पण्णय कवीचें वर्णन करतांना उद्योतनसूरीने बहुवचनाचा उपयोग केला आहे. हें बहुवचन आदरार्थी असणें शक्य नाही. कारण पालित्तय, हाल, बाण, देवगुप्त किंबहुना स्वतःचा गुरु हरिभद्र यांच्याविषयीही रचलेल्या गाथांत उद्योतनाने एकवचनाचाच प्रयोग केला आहे. तेव्हा ' छप्पण्णय ' हें एका कवीचें नांव नसून अनेक कवींचें असावें- ही कल्पना सुचतांच या कविनामाच्या अर्थाकडे साहजिकच लक्ष जातें. छप्पण्णय हें संस्कृत ' षट्पञ्चाशत् ' शब्दाचें प्राकृत रूप होय. यापासून मराठी छप्पन्न शब्द झाला आहे. तेव्हा छप्पन्न कवींच्या विषयी उद्योतनाचें वरील वर्णन

असावें, असें दिसतें. या छप्पन्न कवींनी एक कविमंडळ स्थापलें असावें व तें त्यांच्या संख्यावाचक अभिधानाने प्रसिद्ध झालें असावें. हें कविमंडळ छेकोक्तीबद्दल प्रसिद्ध होतें. छेक म्हणजे विदग्ध किंवा सुसंस्कृत मनुष्य. अशा मनुष्याने एखादी कल्पना श्लेषादिकांच्या सहाय्याने रमणीय करून शब्दांनी व्यक्त केली म्हणजे तिला छेकोक्ति म्हणतात. संस्कृतांतील अनेक सुभाषितें या तऱ्हेचीं आहेत. छप्पन्न कवींची छेकोक्तिरचनेने ख्याति झाल्यामुळे पुढे बऱ्याच काळपर्यंत कोणी छेकोक्ति रचली की तिची तुलना छप्पन्न कवींच्या छेकोक्तीशीं होत असे, असें उद्योतनसूरीच्या वरील गाथेवरून स्पष्ट दिसतें.

त्यांच्या ग्रंथाचें नांव 'सेतु'

छप्पन्न कवि व त्यांच्या छेकोक्ति यांच्या विषयीचें वरील विवेचन वाचकांना कदाचित् असंभवनीय वाटेल. या कवींचा दुसऱ्या कोठे उल्लेख आहे काय, असें ते विचारतील. सुदैवाने तसा उल्लेख उपलब्ध आहे. सुमारें वीस वर्षांपूर्वी श्री. रामकृष्ण कवि यांना दण्डीच्या 'अवन्तिसुंदरीकथा' या गद्यकाव्याची एक त्रुटित हस्तलिखित प्रत मिळाली ती त्यांनी ' दक्षिणभारती ' नामक ग्रंथमालेंत प्रसिद्ध केली आहे. या हस्तलिखिताचा मधून मधून कांही भाग कसरीने खाल्ल्यामुळे नष्ट झाला आहे. तथापि अवशिष्ट भागहि ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. दंडी हा खिस्तोत्तर सातव्या शतकाच्या द्वितीयार्धांत, म्हणजे उद्योतनापूर्वी सुमारें शंभर वर्षें, होऊन गेला. त्याचें अवन्तिसुन्दरीकथा हें सुन्दर गद्यकाव्य बाण, सुबन्धु इत्यादि कवींच्या ग्रंथांच्या तोडीचें आहे. बाणाच्या हर्षचरिताच्या आरंभीं प्राचीन कवींच्या स्तुतिपर असे कांही श्लोक आले आहेत, तसेच अवन्तिसुन्दरीकथेच्या आरंभीं दिसतात. त्यांमध्ये खालील श्लोक आला आहे.

सेतुरूपेण तिष्ठन्तो लोके सद्वस्तुदर्शिनः ।
षट्पञ्चाशत् प्रमाणत्वं गता नः कविपुङ्गवाः ॥

[अर्थ–सद्वस्तूंचें स्वरूप ज्यांनी अवलोकिलें आहे व जे सेतुरूपाने

(अद्यापि) या जगतांत विद्यमान आहेत, असे छप्पन्न कविश्रेष्ठ आम्हाला प्रमाणभूत झाले आहेत.]

या श्लोकांतहि छप्पन्न कवींचें वर्णन आलें आहे; व तें कुवलय-मालेंतील वर्णनाशीं कांही बाबतींत अगदी जुळतें. दण्डीच्या काळींहि या छप्पन्न कवींची मार्मिक निरीक्षणाबद्दल ख्याति झाली होती; व ते स्वतःच्या उत्कृष्ट काव्यनिर्मितीमुळे प्रमाणभूत झाले होते, असें यावरून स्पष्ट दिसतें. या श्लोकांत आणखी एक महत्त्वाची माहिती दिली आहे. हे छप्पन्न कवि दिवंगत झाले तरी ते सेतुरूपाने अद्यापि या जगांत वास करीत आहेत, असें यांत वर्णन आहे. याचा अर्थहि स्पष्ट आहे. 'सेतुग्रंथ' हा या छप्पन्न कवींचा स्थायी झालेला ग्रंथ असावा, हें उघड आहे. हा सेतुग्रंथ कोणता याचा आता विचार करूं.

सेतुबंध हा छप्पन कवींचा ग्रंथ नव्हे

' सेतु ' हें ' सेतुबंध ' या काव्यनामाचें संक्षिप्त रूप म्हणून प्रसिद्ध आहे. सेतुबंध हें प्रवरसेन नामक कवीने प्राकृत भाषेंत रचलेलें पंधरा सर्गांचें काव्य सुप्रसिद्ध आहे. या काव्याच्या अखेरच्या गाथेंत त्याचें रावणवह [रावणवध] असें नांव दिलें आहे. प्रत्येक सर्गाच्या शेवटीं त्याचे ' दहमुहवध ' [दशमुखवध] असें दुसरें नांव येतें. या दोन्ही नांवांचा अर्थ एकच आहे. तथापि हें काव्य तिसऱ्या 'सेतुबंध' या नांवानेच जास्त प्रसिद्ध आहे. दण्डीने आपल्या काव्यादर्श नामक अलंकारग्रंथांत याच नांवाने याचा उल्लेख केला आहे. पण इतर कांही ग्रंथकारांनी ' सेतु ' या संक्षिप्त नांवाने त्याचा निर्देश केला आहे. ' पूर्वी कपिसेना जशी सेतूने सागर ओलांडून लंकेंत गेली तशी प्रवरसेनाची कीर्ति या ' सेतु ' ग्रंथाने सागर पार करून गेली ' असें श्लेषमय वर्णन बाणाने आपल्या हर्षचरितांत केलें आहे. विख्यात काव्यशास्त्रज्ञ आनंद-वर्धन याने आपल्या ध्वन्यालोकांत या काव्याचा ' सेतु ' म्हणूनच निर्देश केला आहे. तेव्हा छप्पन्न कवींचा ' सेतु ' ग्रंथ व हें सेतुबंध काव्य हीं एकच काय असा प्रश्न उपस्थित होतो.

'सेतुबंध' हें काव्य प्रवरसेनाच्या नांवावर प्रचलित आहे. त्याचा कर्ता कोणी राजा असून त्याने गादीवर आल्यावर लौकरच तें रचण्यास सुरवात केली, असें या काव्यांतील एका श्लोकावरून (१,९) दिसतें. हा प्रवरसेन काश्मीरचा राजा असून, त्याने वितस्ता (झेलम) नदीवर पूल बांधला, त्या प्रसंगाने हें काव्य रचलें, असें पूर्वी मानलें जात असे. पण अलीकडील संशोधनावरून हा प्रवरसेन वाकाटकवंशी द्वितीय प्रवरसेन नृपति होता, असें दिसतें. हें काव्य 'महाराष्ट्री' प्राकृतांत असल्यामुळे दूरच्या काश्मीरांत याची निर्मिति होणें शक्य दिसत नाही. शिवाय, कल्हणाच्या राजतरंगिणींत प्रवरसेनाने वितस्तेवर बांधलेल्या पुलाचा उल्लेख आहे, पण या काव्याचा नाही. तेव्हा हें काव्य विदर्भनृपति द्वितीय प्रवरसेनाने रचलें असणें जास्त संभवनीय आहे. या काव्याच्या रामदास नामक टीकाकाराने 'हें काव्य कालिदासाने विक्रमादित्याच्या आज्ञेने रचलें' अशी आख्यायिका दिली आहे. तिचीहि या योगें उपपत्ति लावतां येते. द्वितीय प्रवरसेन हा विख्यात गुप्तसम्राट् द्वितीय चंद्रगुप्त विक्रमादित्य याचा दौहित्र होता. याचा पिता द्वितीय रुद्रसेन हा अल्पायुषी झाल्यामुळे चंद्रगुप्ताने आपल्या पदरच्या मुत्सद्द्यांस विदर्भांत आपल्या प्रभावतीगुप्ता नामक मुलीस राज्यकारभारांत मदत करण्याकरिता पाठविलें होतें. त्या प्रसंगाने त्याचा आश्रित कालिदास हाहि विदर्भांत आला असावा व त्याने आपलें मेघदूत विदर्भांत रचलें असावें, हें मी इतरत्र दाखविलें आहे. विदर्भांत असतांना कालिदासाने 'सेतुबंध' काव्य स्वतः रचलें असावें किंवा प्रवरसेनाला तें करण्यांत मदत केली असावी. यामुळे कालिदासाचेंहि नांव या काव्याशीं संलग्न झालेलें दिसतें.

अवन्तिसुन्दरीकथेंतील वरील उल्लेखावरून हेंच सेतुबंध काव्य प्रवरसेनाने किंवा कालिदासानेहि रचलें नसून छप्पन्न कवींनीच रचलें होतें काय, असा प्रश्न उपस्थित होतो. 'सेतु' या नांवाचें दुसरें काव्य उपलब्ध नसल्याने या प्रश्नाचें उत्तर अस्तिपक्षीं द्यावें, असें सकृद्दर्शनींच वाटतें. शिवाय अवन्तिसुन्दरी कथेंतील प्राचीन कवींच्या स्तुतिपर श्लोक कालानुक्रमाने घातलेले दिसतात. 'सेतु'कार छप्पन्न

कवींविषयीचा श्लोक हरिविजयकर्ता वाकाटक नृपति सर्वसेन व कवि-कुलगुरु कालिदास या दोन कवींच्या स्तुतिपर श्लोकांमध्ये आला आहे. त्यावरूनहि हें 'सेतु' काव्य कालिदासकालाच्या सुमारास रचलें असावें, असें अनुमान करतां येतें. सेतुबंध काव्याचा काळ हाच आहे, हें वर दाखविलें आहे. तेव्हा सेतुबंध काव्य छप्पन्न कविमंडळाने रचलें असावें, असें मानण्याकडे मनाचा कल होतो.

पण 'सेतुबंध' काव्याच्या स्वरूपाचा विचार करतां हें मत ग्राह्य वाटत नाही. हें काव्य कुमारसंभव, शिशुपालवध इत्यादि संस्कृत महाकाव्यांप्रमाणे आरंभापासून अखेरपर्यंत एकाच शैलींत लिहिलें आहे. ह्यांत विविधविषयपर वर्णन आलें असलें, तरी त्याचे भाग छप्पन्न निरनिराळया कवींनी स्वतंत्रपणे रचून मागाहून एकत्रित केलेले दिसत नाहीत. अशा प्रकारच्या कृतींत शैलीची व वर्णनाची एकरूपता राहणें शक्य नसतें. तेव्हा छप्पन्न कवींचा ग्रंथ हें सेतुबंध काव्य असणें शक्य नाही.

छप्पन्न कवींच्या गाथांचा संग्रह

छप्पन्न कवींचा सेतुग्रंथ सुभाषितसंग्रहात्मक स्वरूपाचा असावा, असें वाटतें. अशा तऱ्हेच्या ग्रंथांत कथानकाचा संबंध येत नसल्याने अनेक कवींच्या कृति एकत्रित करतां येतात. हालाची 'सप्तशती' हा गाथासंग्रह या प्रकारचाच आहे. उद्योतनसूरीची छप्पन्न कवींच्या स्तुति-पर गाथा मागे दिली आहे. तींतील वर्णनावरूनहि हें अनुमान सयुक्तिक भासतें. उद्योतन म्हणतो, 'छप्पन्न कवि दिवंगत झाल्याला आज पुष्कळ काळ लोटला. पण अद्यापि कोणी छेकोक्ति रचली की तिची त्यांच्या कृतीशीं तुलना करण्यांत येते.' या वर्णनावरून छप्पन्न कवींची कृति छेकोक्तिमय किंवा सुभाषितसंग्रहरूपाची होती, हें उघड आहे. संस्कृतांत कवीन्द्रवचनसमुच्चय, शार्ङ्गधरपद्धति, सुभाषितावलि, सूक्तिमुक्तावलि असे अनेक सुभाषितसंग्रह अद्यापि विद्यमान आहेत. प्राकृत भाषेंत मात्र 'गाथासप्तशती' व 'वज्जालग्ग' असे दोनच गाथासंग्रह सध्या ज्ञात आहेत. गाथासप्तशतींतील वर्णनावरून हालाच्या काळीं कोटयवधि अलंकारयुक्त गाथा रचल्या गेल्या होत्या, असें दिसते. वाकाटक-

काळींहि तोच क्रम चालू होता. कारण वाकाटक नृपति सर्वसेन, प्रवरसेन इत्यादिकांनीहि प्राकृत महाकाव्यांप्रमाणे स्फुट गाथाहि रचल्या होत्या. या गाथा त्या काळीं निरनिराळया गाथासंग्रहांत संगृहीत केल्या असाव्या. हालाच्या सप्तशतीचें प्राचीन नांव कोश किंवा गाथाकोश होतें, हें मी इतरत्र सप्रमाण दाखविलें आहे. तेव्हा छप्पन्न कवींनी आपल्या गाथांचा संग्रह 'सेतु' नांवाने प्रसिद्ध केला असला, तर त्यांत आश्चर्य नाही.

हे छप्पन्न कवि कोण होते, हें मात्र समजण्यास आज साधन नाही. त्यांनीहि वैयक्तिक कीर्तीची अपेक्षा न ठेवता आपल्या मंडळाच्या नांवेंच आपला संग्रह प्रकाशित केलेला दिसतो; व उत्तरकालीन ग्रंथकारांसहि छप्पन्न या नांवानेच ते ज्ञात होते, हें दण्डी व उद्योतनसूरि यांच्या वर्णनावरून मागे दाखविलें आहे. येनकेनप्रकारेण आपलें नांव वर्तमानपत्रांत झळकावें अशी अपेक्षा करणाऱ्या आधुनिक लेखकांस त्यांनी उत्कृष्ट उदाहरण घालून दिलें आहे.

वाकाटक नृपति सर्वसेन याचें 'हरिविजय' काव्य*

भारतीय इतिहासांतील सुवर्णयुग

प्राचीन भारतीय इतिहासांत खिस्तोत्तर चौथ्या व पांचव्या शतकांच्या कालाला सुवर्णयुग अशी संज्ञा देण्यांत येते. कारण, या काळांत हिंदुस्थानाचा इतर देशांशीं व्यापार वाढून देशांत सुबत्ता झाली, सर्वत्र शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित होऊन स्थापत्य, शिल्पकला, चित्रकला इत्यादि कलांना उत्तेजन मिळालें आणि संस्कृत व प्राकृत वाङ्मयाची अभिवृद्धि झाली. याचें श्रेय मुख्यतः गुप्त व वाकाटक राजवंशांना देण्यांत येतें. कारण, या काळांत उत्तरेंत जसें गुप्तांचें तसें दक्षिणेंत वाकाटकांचें साम्राज्य पसरलें होतें. या दोन्ही वंशांतील राजे सामान्यतः शूर, न्यायी, विद्वान् व कलाभिज्ञ असून त्यांचा विद्वानांना व कलावंतांना उदार आश्रय होता. यांपैकी कांही तर उत्कृष्ट कवि होते. सुविख्यात गुप्तसम्राट् समुद्रगुप्त याला त्याच्या उत्कृष्ट काव्यांमुळे 'कविराज' अशी सार्थ पदवी मिळाली होती. त्याच्या काव्यांतील सुंदर कल्पना आत्मसात् करून त्या आपल्या ग्रंथांत योजण्यांत विद्वानांना धन्यता वाटे, इत्यादि वर्णनें तत्कालीन लेखांत आढळतात. त्याचा मुलगा द्वितीय चन्द्रगुप्त विक्रमादित्य याने तर उज्जयिनीच्या विद्वत्सभेपुढे स्वतः परीक्षा दिली होती, अशी आख्यायिका राजशेखराने आपल्या काव्यमीमांसेंत दिली आहे. कवींद्रवचनसमुच्चयादि प्राचीन सुभाषितसंग्रहांत कांही सुभाषितें विक्रमादित्याच्या नांवावर दिलीं आहेत. तीं या चन्द्रगुप्त-विक्रमा-

---

* प्रस्तुत लेख हा भारत–इतिहास-संशोधक मंडळाच्या ३३ व्या संमेलनांत वाचलेला निबंध होय. तो पुढे 'नवभारत', पुणें, या मासिकांत जून, १९४८ मध्ये प्रसिद्ध झाला.

दिल्याचीं असावीं. त्यांवरून त्याच्या काव्यप्रतिभेची प्रतीति येते. दक्षिणेंतले वाकाटक नृपतीहि काव्यरचनेंत मागे नव्हते. त्यांच्या कारकीर्दींत विदर्भांत इतकीं उत्कृष्ट काव्यें निर्माण झालीं की त्यांच्यामुळे आलंकारिकांना वैदर्भी नामक विशिष्ट रीति मानावी लागली. तींतील उत्कृष्ट गुणांमुळे तिला सर्वश्रेष्ठ रीति मानण्यांत आलें. कविकुलगुरु कालिदास हा माळव्यांतला कवि; पण त्यालाहि वैदर्भी रीतीची श्रेष्ठता पटून त्याने आपलीं सर्व काव्यें व नाटकें याच रीतींत लिहिलीं. त्याचें मेघदूत हें काव्य तर तत्कालीन वाकाटक राजधानीजवळच्या रामगिरीवर लिहिलें होतें हें प्रस्तुत लेखकानें इतरत्र* दाखविलें आहे. दुर्दैवाने विदर्भांतील कालिदासपूर्वकालीन संस्कृत काव्यें कालाच्या उदरांत गडप झालीं आहेत; तथापि त्या काळचीं कांही सुभाषितें अद्यापि सुभाषितसंग्रहांत अवशिष्ट राहिलीं आहेत व विशेष उल्लेखनीय गोष्ट ही की त्यांपैकी एक वाकाटक युवराज दिवाकरसेन याच्या नांवावर दिलें आहे.†

संस्कृत काव्यांप्रमाणें प्राकृत काव्यांचीहि निर्मिति या काळांत झाली होती. किंबहुना ख्रिस्तोत्तर पहिल्या चारपांच शतकांत विदर्भांत प्राकृत काव्यकलेलाच जास्त बहर आला होता. सातवाहन व वाकाटक या दोन राजवटींत राजापासून रंकापर्यंत ज्याला म्हणून कांही प्रतिभा होती त्याने प्राकृतांत सुभाषितरचना केली होती. त्यांपैकी सातशें सुभाषितांचा संग्रह सातवाहन नृपति हाल याच्या नांवावर गाथासप्तशती या नांवाने अद्यापि प्रसिद्ध आहे. पण या गाथा मुक्तक रूपाच्या आहेत. याशिवाय प्राकृत महाकाव्येंहि त्या काळांत निर्माण झालीं. सध्यां अवशिष्ट असलेल्या प्राकृत महाकाव्यांत सेतुबंध किंवा रावणवहो हें अत्यंत प्राचीन समजलें जातें. हें प्रवरसेनाने रचलें असें सुप्रसिद्ध संस्कृत कवि बाणभट्ट याने आपल्या हर्षचरिताच्या एका प्रास्ताविक श्लोकांत म्हटलें आहे. हा प्रवरसेन वाकाटक वंशांतील द्वितीय प्रवरसेन होय.

* मागे, पृ. ६४ पाहा. (वा. वि. मि.)

† श्रीधरदासाचें सदुक्तिकर्णामृत, २, ३१, ४.

गुप्तसम्राट् द्वितीय चन्द्रगुप्त-विक्रमादित्याचा हा दौहित्र असून कालिदासाचा समकालीन होता. किंबहुना कालिदासाने स्वतःच सेतुबंध काव्य विक्रमादित्याच्या आज्ञेने रचलें अशीहि आख्यायिका त्या काव्याच्या एका टीकाकारानें दिली आहे. तिजमध्ये किती तथ्य आहे हें सांगतां येत नाही. तथापि तें काव्य विदर्भांत रचलें गेलें यांत संशय नाही. या काव्याची दंडी, बाण, आनंदवर्धन इत्यादि ग्रंथकारांनी मुक्तकंठाने स्तुति केली आहे. या काव्यासारखेंच हरिविजयनामक प्राकृत काव्य वाकाटककाळीं रचलें गेलें होतें व त्याचा कर्ता सर्वसेन हाहि प्रवरसेनाप्रमाणे वाकाटक नृपति होता हें प्रस्तुत लेखांत दाखवावयाचें आहे.

सेतुबंध काव्य सध्या उपलब्ध असून निर्णयसागर छापखान्यांत छापलें आहे. त्यामुळे त्यांतील कथानक, काव्यगुण वगैरेविषयी लोकांना माहिती आहे. हरिविजयाचें तसें नाही. हें काव्य सध्यां उपलब्ध नाही. म्हणून आनंदवर्धन, भोज, कुन्तक वगैरे संस्कृत आलंकारिकांच्या ग्रंथांतील तद्विषयक उल्लेखांवरून व त्यांतून उद्धृत केलेल्या उदाहरणांवरून त्याच्या कथानकाविषयी अनुमानाने माहिती जमवावी लागते. त्याचा कर्ता सर्वसेन याच्याविषयी तर सहासात वर्षांपूर्वी कांहीच माहिती नव्हती. सन १९३९ मध्ये वऱ्हाडांतील अकोला जिल्ह्यांत वाशीम येथे एक ताम्रपट सापडला. तो सर्वसेनाचा पुत्र वाकाटक नृपति द्वितीय विन्ध्यशक्ति याने दिला असून त्यावरून सर्वसेनाचें नांव प्रथमच ज्ञात झालें. तो लेख प्रस्तुत लेखकाने एपिग्राफिया इंडिकामध्ये प्रकाशित केला आहे.* अजंठा येथील सोळा नंबरच्या लेण्यांत एक वाकाटककालीन कोरीव लेख आहे त्यांतहि सर्वसेनाचें नांव आलें आहे. पण तो लेख सध्या अत्यंत जीर्ण अवस्थेंत असल्यामुळे डॉ. भाऊ दाजी, पं. भगवानलाल इंद्रजी, डॉ. बुल्हर वगैरे विद्वानांनी त्या ठिकाणीं रुद्रसेन असें वाचलें होते. तो लेखहि प्रस्तुत लेखकाने हैदराबाद-पुराणवस्तु-संशोधन-

---

* एपिग्राफिया इंडिका, पु. २६, पृ. १३७-१५५.

खात्याच्या ग्रंथमालेंत प्रसिद्ध केला आहे.* या दोन लेखांवरून सर्वसेनाविषयी माहिती मिळते ती खाली दिली आहे.

सर्वसेनाची राजधानी वत्सगुल्म (वाशीम)

सर्वसेन हा वाकाटक वंशाचा मूळ पुरुष पहिला विंध्यशक्ति याचा नातू व विख्यात सम्राट् प्रथम प्रवरसेन याचा मुलगा. सातवाहन वंशाचा इ. स. २५० च्या सुमारास लय झाल्यावर विंध्यशक्तीने विदर्भांत आपलें राज्य स्थापलें. त्याचा पुत्र प्रथम प्रवरसेन हा अत्यंत बलाढ्य होता. याने अनेक वाजपेय यज्ञ केल्याचा पुराणांत उल्लेख आहे. वाकाटकांच्या कोरीव लेखांतहि याने अनेक श्रौत यज्ञ व चार अश्वमेध केले होते असें म्हटलें आहे. याचें साम्राज्य दक्षिणच्या पठारावर नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत पसरलें होतें. याला चार पुत्र होते. त्यांच्यामध्ये प्रवरसेनाच्या निधनानंतर त्याच्या विस्तृत साम्राज्याची वाटणी झाली. सर्वांत वडील मुलगा गौतमीपुत्र हा अगोदरच निवर्तला होता. त्याचा पहिला मुलगा रुद्रसेन याला उत्तर विदर्भ मिळाला. त्याने आपली राजधानी नागपूरजवळ नन्दिवर्धन येथे केली. दुसरा मुलगा सर्वसेन याच्या वाट्यास दक्षिण विदर्भ—सातमाला पर्वतराजीच्या दक्षिणचें गोदावरी नदीचें खोरें, ज्यामध्ये अकोला, यवतमाळ, परभणी, नान्देड, अदिलाबाद इत्यादि जिल्ह्यांतील प्रदेश अन्तर्भूत होतो तो—आला. त्याने आपली राजधानी वत्सगुल्म (सध्याचे अकोला जिल्ह्यांतील वाशीम) येथे स्थापिली. दुसऱ्या दोन पुत्रांच्या वंशजांचे लेख अद्यापि मिळाले नसल्यामुळे ते नक्की कोणत्या प्रदेशावर राज्य करीत होते तें सांगतां येत नाही. बहुधा ते गोदावरीच्या दक्षिणेस दक्षिण महाराष्ट्रांत—ज्याला पूर्वी कुन्तल अशी संज्ञा होती त्या प्रदेशांत—राज्य करीत असावे. पुढे लवकरच त्या भागांत राष्ट्रकूट घराण्याचा उदय झाला, त्यामुळे या दोन वाकाटक शाखांचा अस्त झाला असावा.

वत्सगुल्म शहर वाकाटकांच्या अमलाखाली अत्यंत भरभराटलें. येथे संस्कृत व प्राकृत वाङ्मयांचा व कलाकौशल्याचा इतका उत्कर्ष झाला

* हैदराबाद आर्किऑलॉजिकल सीरीज, नं. १४.

की तें नगर भगवान् मदनाचें क्रीडास्थान मानण्यांत येऊं लागलें असें राजशेखराने आपल्या काव्यमीमांसेंत म्हटलें आहे.* वत्सगुल्म शाखेचा शेवटचा ज्ञात वाकाटक राजा हरिषेण याच्या काळीं अजंठा येथे कोरविलेलीं सोळा, सतरा व एकोणीस नंबरचीं लेणीं अद्यापिहि तेथल्या सर्व लेण्यांत भव्यता, कलाकुसरी, शिल्पें, चित्रें इत्यादिकांत अप्रतिम गणलीं जातात. वत्सगुल्म नगरींत रचलेल्या काव्यांमुळे वात्सगुल्मी (प्राकृत वच्छोमी) नामक रीति वैदर्भीचा पर्याय म्हणून प्रसिद्ध झाली. वच्छोमी रीतीचा उल्लेख राजशेखराने आपल्या कर्पूरमंजरी नामक प्राकृत नाटकाच्या मंगलश्लोकांत केला आहे.

वाकाटक नृपति सर्वसेन हाच 'हरिविजय'चा कर्ता

हरिविजय सर्वसेनाने रचलें अशी माहिती आनंदवर्धनाच्या ध्वन्यालोकावरून आपणांस मिळते. तथापि सर्वसेन वाकाटक नृपति होता हें अद्यापपर्यंत माहीत नव्हतें. वक्रोक्तिजीवितकार कुंतक यानेहि सर्वसेनाचा उल्लेख केला आहे; पण त्यानेहि तो राजा होता असें म्हटलेलें नाही. तेव्हा केवळ नामसादृश्यावरून तो वाकाटक नृपति होता असें मानणें योग्य होणार नाही अशी शंका कदाचित् उत्पन्न होईल. सुदैवाने या बाबतींत निर्णायक पुरावा उपलब्ध आहे. सुप्रसिद्ध संस्कृत कवि दण्डी याचें अवन्तिसुन्दरीकथा नामक गद्यकाव्य सुमारें वीस वर्षांपूर्वीं दक्षिण-भारती-ग्रंथमालेंत प्रसिद्ध झालें आहे; त्याच्या आरंभीं प्राचीन कवींच्या स्तुतिपर असे कांही प्रास्ताविक श्लोक आढळतात, त्यामध्ये सर्वसेनाविषयी खालील श्लोक आला आहे—

राज्ञा श्रीसर्वसेनेन . . . . |
. . . . विजयं हरेः ॥

---

* 'तत्रास्ति मनोजन्मनो देवस्य क्रीडावासो विदर्भेषु वत्सगुल्मं नाम नगरम्।'—राजशेखर, काव्यमीमांसा, (गायकवाड-प्राच्यग्रंथमाला, पृ. १०).

या ग्रंथाचें एकच हस्तलिखित प्राप्त झालें आहे व त्याचा पुष्कळ भाग किड्यांनी खाऊन टाकला असल्यामुळे वाचतां येत नाही. वरील श्लोकाचाहि बराच भाग वरील कारणाने नष्ट झाला आहे; तथापि सुदैवाने त्यांतील अत्यंत महत्त्वाचा भाग अवशिष्ट राहिला आहे, त्यावरून हरिविजय काव्य सर्वसेन नामक राजाने रचलें होतें ही अन्यत्र दुष्प्राप्य अशी माहिती मिळते. या पद्यमय प्रस्तावनेंतील इतर कविप्रशंसापर श्लोकांचें निरीक्षण केल्यास ते त्या कवींच्या कालक्रमानुसार घातले आहेत असें ध्यानांत येतें. या श्लोकांमध्ये सर्वसेनाच्या स्तुतीचा श्लोक भासाच्या प्रशंसेनंतर व कालिदासाच्या स्तुतीच्या पूर्वी घातला आहे. यावरून सर्वसेन हा भासानंतर व कालिदासापूर्वी होऊन गेला असावा असें अनुमान करतां येतें.

भारतीय इतिहासांत आपणांस एकच सर्वसेन ज्ञात आहे. तो वाकाटकांच्या वत्सगुल्म शाखेचा संस्थापक होता हें मागे दाखविलें आहे. तो इ. स. ३३० ते ३५० या काळांत होऊन गेला असावा. अर्थात तो इ. स. ४०० च्या सुमारास होऊन गेलेल्या कालिदासापेक्षा प्राचीन होता यांत संशय नाही व हेंच अवन्तिसुन्दरी कथेंतील प्रास्ताविक श्लोकांच्या क्रमावरूनहि दिसतें. तेव्हा वाकाटक नृपति सर्वसेन हाच हरिविजय काव्याचा कर्ता होता असें निर्विवादपणें म्हणतां येतें.

'हरिविजया'चें कथानक

आता हरिविजय काव्याविषयी काय माहिती मिळते तें पाहूं. या हरिविजय काव्याचा उल्लेख अनेक संस्कृत कवींनी व आलंकारिकांनी केला आहे. कांहींनी त्यांतील पद्येंहि उद्धृत केलीं आहेत, तर काहींनी त्यांतील वर्ण्यविषयांचा निर्देश केला आहे. इ. स. च्या सातव्या शतकांतल्या दण्डीने केलेली प्रशंसा मागे दिली आहे. पण तो श्लोक आता अत्यंत त्रुटित झाल्यामुळे त्यावरून आपणांस जास्त माहिती मिळत नाही. यानंतर नवव्या शतकांतला विख्यात आलंकारिक आनंदवर्धन याने हरिविजयाचा उल्लेख अनेक ठिकाणीं केला आहे. "कवीने एखादें ऐतिहासिक कथानक आपल्या काव्याचा विषय म्हणून पसंत केलें

असल्यास त्यांतील इष्टरसविरोधी प्रसंग गाळून तद्रसपरिपोषक अशा काल्पनिक घटनांची योजना करावी.* कारण, कवीला आपल्या काव्यामध्ये रसोत्पत्ति करावयाची असते, इतिहास शिकवावयाचा नसतो," असा उपदेश आनंदवर्धनाने केला आहे. व याचीं उदाहरणें म्हणून कालिदासाच्या प्रबंधांचा व सर्वसेनकृत हरिविजयाचा निर्देश केला आहे. हरिविजयांत वर्णिलेलें मूळ ऐतिहासिक कथानक कोणतें, त्यांतील कोणता भाग सर्वसेनाने गाळला व कोणते प्रसंग नवीन घातले ही माहिती आनंदवर्धनाच्या ग्रंथावरून आपणास मिळत नाही; पण ती त्याचा टीकाकार सुविख्यात काश्मीरी ग्रंथकार अभिनवगुप्त याच्या टीकेंतील एका विधानावरून आपणास मिळते. अभिनवगुप्त म्हणतो, 'हरिविजयांत पारिजातहरणाचा प्रसंग पत्नीच्या अनुनयाकरिता योजिला आहे; पण इतिहासावरून तसें दिसत नाही.'† या विधानावरून श्रीकृष्णाने इंद्रावर स्वारी करून पारिजात वृक्ष भूतलीं आणला, या कथानकावर हरिविजय काव्याची रचना झाली होती हें उघड आहे. या कथानकाचें मूळचें रूप काय होतें तें निश्चितपणें सांगतां येत नाही. महाभारतांत दोन ठिकाणीं‡ श्रीकृष्णप्रशंसेंत परिजातहरणाचा उल्लेख आला आहे; पण तेथे तें सत्यभामेच्या अनुनयाकरिता केलें होतें असा निर्देश नाही. सध्याच्या हरिवंशाच्या मुंबई-पाठांत या कथेचीं दोन रूपें दिसतात. पहिलें रूप विष्णुपर्वाच्या ६४ व्या अध्यायांत आढळतें. त्यांत वर्णिलें आहे की, श्रीकृष्ण नरकासुराचा वध करून सत्यभामेसह स्वर्गांत गेला. तेथे इंद्राच्या उद्यानांत पारिजातक वृक्ष पाहून त्याने तो उपटून

---

* इतिवृत्तवशायातां कथञ्चिद्रसाननुगुणां स्थितिं त्यक्त्वा पुनरुत्प्रेक्ष्याभीष्टरसोचितकथोन्नयो विधेयः यथा कालिदासप्रबन्धेषु । यथा च सर्वसेनविरचिते हरिविजये । ——ध्वन्यालोक, तृतीयोद्द्योत.

† हरिविजये कान्तानुनयाङ्गत्वेन पारिजातहरणादि निरूपितमितिहासेष्वदृष्टमपि । ——ध्वन्यालोकलोचन, तृतीयोद्द्योत.

‡ उद्योगपर्व, अ. १६०, श्लो. ४९; द्रोणपर्व, अ. ११, श्लो. २२-२३.

गरुडावर घातला व आपल्याबरोबर द्वारकेस आणला. मागाहून इंद्राला तें समजल्यावर त्यानें त्या कृत्याला संमति दिली. पारिजातहरणाच्या कथेचें हें साधें रूप प्राचीन दिसतें व एका श्लोकावरून (द्रोणपर्व, अ. ११, श्लो. २३) हेंच रूप महाभारत-कर्त्यालाहि माहीत होतें असें दिसतें. याच कथेचें दुसरें विस्तृत रूप हरिवंशाच्या ६५-७५ या अकरा अध्यायांत वर्णिलें आहे व तेंच आपणा सर्वांना परिचित आहे. ती कथा अशी :— "एके दिवशीं नारदानें स्वर्गीय पारिजाताचीं फुलें कृष्णास अर्पण केलीं, तीं त्यानें रुक्मिणीस दिलीं. तें समजल्यावर सत्यभामा रागावली. तिला प्रसन्न करण्याकरितां कृष्णानें पारिजात वृक्ष स्वर्गांतून खाली आणण्याचें तिला वचन दिलें व इंद्राचा पराजय करून तें पार पाडलें." मूळ कथानकांत प्रियानुनय हें पारिजातहरणाचें कारण म्हणून दाखविलें नव्हतें; त्या प्रसंगाची योजना सर्वसेनानें प्रथम आपल्या हरिविजय काव्यांत रसोत्पत्तीकरितां केली हें अभिनवगुप्ताच्या टीकेवरून स्पष्ट दिसतें. पुढे तो प्रसंग हरिवंशादि ग्रंथांत घातला गेला असावा. कालिदासाच्या शाकुंतलांतील कांही प्रसंग व शारद्वत, शार्ङ्गरव, प्रियंवदा, गौतमी इत्यादि पात्रेंहि पद्मपुराणांत घेतलेलीं आढळतात, तसाच प्रकार याहि बाबतींत झालेला दिसतो.

'हरिविजया'संबंधीचे उल्लेख

आनंदवर्धनानें दुसऱ्या एका ठिकाणीं हरिविजयाचा उल्लेख केला आहे. ध्वनिकाव्याच्या एका प्रकाराचें उदाहरण देतांना त्यानें खालील गाथा हरिविजयांतील म्हणून दिली आहे*:—

चूअंकुरावअंसं छणपसरमहग्घमणहरसुरामोअम् ।
असमप्पिअं पि गहिअं कुसुमसरेण महुमासलच्छिमुहम् ॥

---

* ध्वन्यालोक (हरिदास-संस्कृतग्रंथमाला) पृ. २९८. छाया—चूताङ्कुरावतंसं क्षणप्रसरमहार्घमनोहरसुरामोदम् । असमर्पितमपि गृहीतं कुसुमशरेण मधुमासलक्ष्मीमुखम् ॥

वसंतऋतूच्या आरंभीं आम्रमंजरी फुटून सर्वत्र सुगंध दरवळला असतां मदन कामिजनांचा चित्तविक्षेप करतो ही कल्पना या गाथेंत आलंकारिक भाषेंत ग्रथित केली आहे. या गाथेवरून हरिविजय काव्य महाराष्ट्री-प्राकृत भाषेंत रचलें होतें असें स्पष्ट दिसतें. 'सज्जेइ सुरहिमासो' इत्यादि आणखीहि एक वसंतऋतुपर गाथा आनंदवर्धनाने उदाहरण म्हणून दिली आहे. ती हरिविजयांतून घेतली असा स्पष्ट निर्देश नसला तरी ती त्या काव्यांतीलच असावी; कारण, त्या काव्यांत वसंतऋतूचें वर्णन आलें होतें हें वरील गाथेवरून तसेंच हेमचंद्राच्या काव्यानुशासनांतील उल्लेखावरून स्पष्ट दिसतें.

यानंतरचा सर्वसेनाचा उल्लेख दहाव्या शतकांतल्या कुन्तकाच्या वक्रोक्तिजीवितांत आढळतो. कुन्तकाने काव्याच्या शैलीचे किंवा मार्गाचे वैचित्र्यमार्ग, सुकुमारमार्ग व मध्यममार्ग असे तीन प्रकार मानले आहेत. त्यांपैकी सुकुमारमार्गाचीं उदाहरणें म्हणून कालिदास, सर्वसेन इत्यादिकांचीं काव्यें पाहावीं, तीं सहजसौकुमार्यानें अत्यंत सुंदर झालीं आहेत* असें म्हणून कुन्तकाने सर्वसेनाला कालिदासाच्या जोडीस बसविलें आहे. यानंतर अकराव्या शतकांतील सुप्रसिद्ध धारानृपति भोज यानें आपल्या सरस्वतीकण्ठाभरण व शृंगारप्रकाश या दोन्ही अलंकार-ग्रंथांत हरिविजयांतून अनेक गाथा उद्धृत केल्या आहेत. त्यापैकीं एकी उदाहरणार्थ घेऊं:—

सुरकुसुमेहिं कलुसिअं जइ तेहिं चिअ पुणो पसायामि तुमं।
तो पेम्मस्स किसोअरि अवराहस्स अ ण मे कअं अणुरूपं॥

या गाथेचा संदर्भ भोजानें दिलेला नाही; तथापि अर्थाकडे लक्ष देतां ही गाथा कृष्णाने सत्यभामेला उद्देशून म्हटली असावी असें दिसतें.

* एवं सहजसौकुमार्यसुभगानि कालिदाससर्वसेनादीनां काव्यानि दृश्यन्ते।

† सरस्वतीकण्ठाभरण (निर्णयसागर-प्रत) पृ. ६५५. छाया- सुरकुसुमैः कलुषितां यदि तैरेव पुनः प्रसादयामि त्वाम्। ततः प्रेम्णः कृशोदरि अपराधस्य च न मे कृतमनुरूपम्॥

कृष्ण म्हणतो, ' कृशोदरि सत्यभामे ! मी रुक्मिणीला पारिजातपुष्पें दिलीं म्हणून तूं रागावलीस. आता तुला प्रसन्न करण्याकरितां मी तींच पुष्पें तुला आणून दिलीं तर माझें कृत्य तुझ्यावरील माझ्या प्रेमाला व माझ्या अपराधाला साजेसें होणार नाही; ' म्हणून ' मी पारिजात वृक्षच आणून तुझ्या अंगणांत लावतों ' असा कृष्णाचा अभिप्राय दिसतो.

यानंतर अकराव्या शतकांतल्या अभिनवगुप्तालाहि हरिविजय काव्य माहीत होतें हें मागे दाखविलें आहेच. तदुत्तरकालीन बाराव्या शतकांत होऊन गेलेल्या हेमचन्द्राने तर आपल्या काव्यानुशासनावरील टीकेंत हरिविजयाचा ठिकठिकाणीं उल्लेख केला आहे.* त्यावरून त्या काव्याविषयी खालील माहिती मिळते:—

हरिविजय हें काव्य आरंभापासून अखेरपर्यंत एकाच स्कन्धक नामक छंदांत रचलें होतें. त्यांत कांही ठिकाणीं दिसणाऱ्या गलितक छंदांतील गाथा दुसऱ्या कोणी तरी प्रक्षिप्त केल्या होत्या. त्याच्या प्रत्येक सर्गाच्या शेवटच्या गाथेंत 'उत्साह' शब्द ग्रथित केला होता. त्याचें कथानक सत्यभामेला प्रसन्न करण्याकरितां इन्द्राचा पराजय करून कृष्णाने पारिजात वृक्ष स्वर्गांतून भूमीवर आणला असें होतें. कृष्णाने प्रथम सात्यकीला आपला निसृष्टार्थ दूत म्हणून शिष्टाई करण्याकरितां इन्द्राकडे पाठविलें; पण इन्द्र त्याचें ऐकेना म्हणून त्याने त्याच्यावर स्वारी केली. हरिविजयांत नगरवर्णन, नायकवर्णन, वसन्तऋतुवर्णन, सूर्यास्तवर्णन, वाहनवर्णन इत्यादि विषय आले होते.

वरील विवेचनावरून हरिविजय काव्य प्राकृतांत असलें तरी रघुवंश, किरातार्जुनीय, शिशुपालवध इत्यादि संस्कृत महाकाव्यांप्रमाणेंच त्याचें स्वरूप होतें व महाकाव्यांत जरूर असणाऱ्या सर्व विषयांचें वर्णन त्यांत आलें होतें हें दिसून येईल. किंबहुना हें काव्य विद्यमान सर्व संस्कृत व प्राकृत काव्यांत प्राचीनतम असल्याने त्यानेच महाकाव्यरचनेची प्रथा पाडून दिली असावी असेंहि अनुमान करण्यास हरकत नाही.

---

* काव्यानुशासन (सं. र. छो. पारीख) भाग १, पृ. ४५७–४६१.

दुर्दैवानें हें काव्य सध्या उपलब्ध नाही. कांही वर्षांपूर्वी कै. रा. ब. हिरालाल यांनी मध्यप्रांतवऱ्हाडांतील हस्तलिखित ग्रंथांची यादी प्रसिद्ध केली. तींत सर्वसेनाच्या हरिविजयाचें हस्तलिखित नागपूरकर भोसले राजांच्या संग्रहीं आहे असा निर्देश होता.* म्हणून भोसले राजांच्या परवानगीने मी दोन्ही पातींचे हस्तलिखितसंग्रह चाळून पाहिले. पण त्यांत तें हस्तलिखित दिसलें नाही. रा. ब. हिरालाल यांनींहि तें पाहिलें असावें असें वाटत नाही. हस्तलिखितांची यादी करण्याकरितां नेमलेल्या गृहस्थाने भोसल्यांच्या सग्रहांत श्रीधरकविकृत मराठी हरिविजयाच्या पोथ्या पाहून हरिविजयाचें नांव त्यांना कळविलें असावें व त्यांनी ऑफ्रेक्टच्या हस्तलिखित ग्रंथसूचीचा उपयोग करून तें हरिविजय काव्य सर्वसेनकृत आहे असा निर्देश आपल्या सूचींत केला असावा. पण तो चूक होता हें वरील विवेचनावरून दिसून येईल. प्रस्तुत लेखांत गोळा केलेल्या माहितीवरून तें हरिविजय काव्य कोणाच्या संग्रहीं असल्यास त्यास तें प्रकाशित करण्याची सुबुद्धि होईल अशी मला आशा आहे.

सर्वसेनानें केलेली प्राकृतसुभाषितरचना

सर्वसेनानें केवळ हरिविजय काव्यच लिहिलेलें नसून कांही प्राकृत सुभाषितेंहि रचलीं होतीं असें दिसतें. गाथासप्तशती किंवा सत्तसई नामक प्राकृतसुभाषितसंग्रह प्रसिद्ध आहे. हा ग्रंथ इ. स. च्या पहिल्या-दुसऱ्या शतकांत होऊन गेलेल्या हाल नामक सातवाहनवंशी राजाने रचला अशी परंपरागत समजूत असली तरी त्यांत अनेक उत्तरकालीन कवींच्या गाथा समाविष्ट झाल्या आहेत हें त्यांतील कविनामांच्या उल्लेखांवरून स्पष्ट दिसतें. निर्णयसागरने छापलेल्या गाथासप्तशतींतील कविनामांच्या सूचींत सर्वसेनाचें नांव दिसत नाही. पण अलीकडे पंजाबमध्ये सप्तशतीच्या कांही भागावरील पीतांबराची टीका छापली आहे तिजवरून निर्णयसागर-प्रतींतील क्रमांक ५०४ व ५०५ या गाथा सर्वसेनानें रचल्या होत्या असें दिसतें. भुवनपाल नामक दुसऱ्या

---

* डॉ. हिरालालकृत मध्यप्रांतवऱ्हाडमधील संस्कृत व प्राकृत हस्तलिखितांची यादी, पृ. १९९.

एका टीकाकाराने २१७ व २३४ या आणखी दोन गाथा सर्वसेनाच्या नांवावर दिल्या आहेत.* यावरून सर्वसेनाने प्राकृतसुभाषितेंहि रचलीं होतीं व त्यांतील कांही गाथासप्तशतींत घेतलीं गेलीं असें स्पष्ट दिसतें. या सुभाषितांतहि सर्वसेनाचे प्रतिभा, मार्मिक निरीक्षण व समर्पक शब्दयोजना इत्यादि गुण आढळतात. उदाहरणार्थ एक गाथा घेऊं:—

जस्स जहं विअ पढमं तिस्सा अंगम्मि णिवडिआ दिट्ठी।
तस्स तहिं चेअ ठिआ सव्वंगं केण वि ण दिट्ठम् ॥

एका अत्यंत सुंदर स्त्रीला पाहून येण्यासाठी पाठविलेल्या आपल्या सहचरांना नायकाने तिच्या रूपाविषयी विचारलें असतां ते म्हणतात, 'आमच्यापैकी प्रत्येकाची तिच्या अवयवावर जेथे प्रथम दृष्टि पडली तेथेच ती खिळून राहिली. तिचें समग्र रूप कोणीच पाहिलें नाही.' शब्दयोजना साधीच पण किती अर्थवाही आहे!

समुद्रगुप्त, चंद्रगुप्त, प्रवरसेन, हर्ष, मुंज, भोज इत्यादि प्रथितयश भारतीय राजांच्या मालिकेमध्ये सर्वसेनाचें स्थान आहे. या राजांप्रमाणे सर्वसेनानेहि आपल्या काव्यनिर्मितीने उज्ज्वल कीर्ति मिळविली होती. सामान्यतः एकत्र न राहणाऱ्या लक्ष्मी व सरस्वती या देवतांचें मधुर मीलन त्याच्या ठिकाणीं झालें होतें. त्याच्या काळानंतर सातआठशें वर्षें इ. स. च्या बाराव्या शतकापर्यंत त्याचें काव्य लोकप्रिय होतें. पुढे प्राकृत भाषा हळूहळू दुर्बोध होत चालल्यामुळे हरिविजय काव्य मागें पडलें व कालांतराने सर्वसेनाचें नांवहि लोकांच्या स्मरणांतून गेलें. प्रस्तुत लेखांत त्याच्या ग्रंथावरचा विस्मृतीचा पडदा किंचित् दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. यापुढे या प्रथितयश आद्य प्राकृत कवीविषयी उत्तरोत्तर जास्त माहिती उपलब्ध होऊन त्याच्या सुंदर काव्यांचीं हस्तलिखितें प्रकाशांत येतील अशी आशा व्यक्त करून हा लांबलेला लेख पुरा करतों.

---

* वेबरकृत Indische Studien या ग्रंथमालेचा भाग १६ वा, पृ. २३. हे गाथांचे क्रमांक निर्णयसागर–आवृत्तीप्रमाणें आहेत.

शालिवाहन शकाची पूर्वपीठिका*

दक्षिण हिंदुस्थानच्या बऱ्याचशा भागांत सध्या प्रचलित असलेला शालिवाहन शक इ. स. च्या पहिल्या शतकांत शालिवाहन नामक राजाने स्थापला अशी परंपरागत समजूत आहे. हा शालिवाहन पैठण नगरीं राज्य करीत होता असही मानण्यांत येतें. पुराणें, कथासरित्सागर व बृहत्कथामंजरी यांसारखे संस्कृत ग्रंथ आणि जैनांचें कल्पप्रदीप व निर्युक्ति इत्यादि टीकाग्रंथ यांत पैठणच्या सातवाहन राजांच्या कथा आल्या आहेत. तो सातवाहन व शकसंस्थापक शालिवाहन एकच होत असेंहि म्हणतात. सातवाहन हें कुलनाम होतें. हें कुल सातवाहन नामक राजापासून निघालें असल्याने त्याचें नांव त्या कुळाला देण्यांत आलें असावें. चार-पांच वर्षांपूर्वीपर्यंत हा सातवाहन पूर्णपणें अज्ञात होता. पण अलीकडे त्याचीं तीन नाणीं हैद्राबाद संस्थानांत औरंगाबाद, मेडक व वारंगळ जिल्ह्यांत सापडलीं आहेत. त्यांवरील अक्षरवटिकेवरून तो सम्राट् अशोकानंतर लौकरच होऊन गेला असें दिसतें. पण या सातवाहन राजाने किंवा त्याच्या कोणी वंशजानें सध्या दक्षिणेंत प्रचलित असलेला शालिवाहन शक चालू केला, असें दिसत नाही. कारण तसें असतें तर या वंशाच्या एखाद्या तरी कोरीव लेखांत या शतकाला अनुसरून कालगणना केली असती. पण सातवाहनाच्या एकाहि लेखांत या काळाचा उल्लेख नाही. शालिवाहन राजाचें नांवहि इ. स. च्या तेराव्या शतकांत म्हणजे या संवताच्या स्थापनेपासून सुमारें बाराशें वर्षांनंतर यादवनृपति कृष्ण याच्या मांडलिकाच्या एका ताम्रपटांत त्याशीं संलग्न झालेलें प्रथम आढळतें.†

* 'नवभारत', पुणें, जानेवारी १९५१.

† तासगांव ताम्रपट शके ११७२ (इ. स. १२५०) पाहा. 'दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें,' खंड ३, पृ. ६५.

त्यापूर्वीच्या सर्व लेखांत या संवताला 'शककाल' किंवा 'शकनृपकाल' म्हटलें आहे व त्याच्या वर्षांना 'शकवर्ष', 'शकनृपतिसंवत्सर' किंवा 'शकनृपतिराज्याभिषेकसंवत्सर' असें उल्लेखिलें आहे. तेव्हा हा काल कोणा शकनृपतीने चालू केला असून कित्येक शतकांनंतर शालिवाहनाचें नांव त्याला जोडण्यांत आलें हें स्पष्ट आहे.

या कालाचा संस्थापक शक राजा कोण होता व तो कोठे होऊन गेला याविषयी विद्वानांत मतभेद आहेत. तथापि, पुष्कळ संशोधकांच्या मतें तो कुशानवंशी कनिष्क असावा. या कनिष्काचें विस्तृत साम्राज्य उत्तर हिंदुस्थानांत वायव्यप्रांतापासून मगधापर्यंत पसरले होतें. याने स्थापिलेल्या शकाचा उपयोग त्याच्या हुविष्क, वासुदेव इत्यादि वंशजांनी आपल्या लेखांत केला आहे. हे राजे शकवंशी नसून कुशानवंशी होते हें खरें; पण इतर भारतीय संवताप्रमाणे या संवताचें 'शक' हें नांव आरंभींच्या लेखांत येत नाही. तें साडेचारशें वर्षांनंतरच्या लेखांत प्रथम आढळतें. आभीरांनी स्थापिलेल्या संवताला जसें पुढे कलचुरि राजांनी त्याचा उपयोग केल्यामुळे 'कलचुरि' हें नांव प्राप्त झालें, तसेंच या संवताचा पुढे शक राजांनी उपयोग केल्यामुळे त्याला 'शक' हें नांव पडलें असावें.

कुशानवंशाचा असा अस्त झाल्यावर उत्तरेंत या संवताचा हळूहळू संकोच होत गेला. मध्य हिंदुस्थानांत राज्य करणाऱ्या मघ राजांचे कांही कोरीव लेख अलीकडे सापडले आहेत; त्यांत एका विशिष्ट संवताचा उपयोग केलेला आढळतो तोहि हा शकसंवतच असावा हें प्रस्तुत लेखकाने इतरत्र दाखविलें आहे.* गुप्त-सम्राट् समुद्रगुप्ताने या राजांचा उच्छेद केल्यावर या संवताचा मध्यहिंदुस्थानांतहि लोप झाला. त्यानंतर माळवा व काठेवाड या प्रांतांत राज्य करणाऱ्या क्षत्रपांच्या कोरीव लेखांत व नाण्यांवर या संवताचीं वर्षें दिलीं आहेत. हीं वर्षें शक संवताचीं होत याविषयी विद्वानांचें ऐकमत्य आहे. कांहींच्या मतें तर या क्षत्रपांचा मूळ पुरुष चष्टन हाच या संवताचा उत्पादक असावा. पण हें

---

* 'एपिग्राफिया इंडिका', पु. २५, पृ. २९७.

मत योग्य दिसत नाही. कारण चष्टन किती झालें तरी 'महाक्षत्रप' म्हणजे प्रांताधिपति होता; तेव्हा तो कोणत्या तरी सम्राटाचें स्वामित्व कबूल करीत होता यांत संशय नाही. त्याला स्वतःचा संवत् चालू करण्याचें स्वातंत्र्य नव्हतें. बहुधा त्याचा सम्राट् कनिष्कच असावा व म्हणून कनिष्काने स्थापिलेला संवत् त्याचा प्रांताधिपति चष्टन याच्या व त्याच्या वंशजांच्या लेखांत उल्लेखिला आहे, हें मतच सयुक्तिक दिसतें. क्षत्रपांचा उच्छेद द्वितीय चंद्रगुप्त विक्रमादित्याने इ. स. च्या चौथ्या शतकाच्या अखेरीस केला. त्यानंतर शक संवताचें उत्तर हिंदुस्थानांतून पूर्णपणें उच्चाटन झालें व त्याची जागा प्रथम गुप्तसंवत् व नंतर विक्रमसंवत् यांनी बळकाविली.

दक्षिणेंत मात्र या शकसंवताने आपले पाय हळूहळू पसरले. भूमक व नहपान या दोन परकी क्षत्रपांचें राज्य उत्तर महाराष्ट्रावर कांही काळ होतें. नहपानाच्या लेखांतील ४२ ते ४६ हीं वर्षें या शकसंवताचींच असावीं. या नहपानाचे लेख नाशिक, कार्लें वगैरे ठिकाणीं सापडले आहेत. सातवाहनवंशी गौतमीपुत्राने या नहपानाचा पराभव केला व त्याच्या क्षहरातवंशाचा समूळ उच्छेद केला. त्यानंतर इ. स. च्या दुसऱ्या शतकांत हा शकसंवत् कांही काळ महाराष्ट्रांतून लुप्त झाला व त्याची जागा आभीरांनी सुमारें इ. स. २५० मध्ये स्थापलेल्या एका दुसऱ्याच संवताने घेतली. आभीरांच्या साम्राज्यविस्ताराबरोबर त्यांच्या संवताचा प्रसार उत्तर महाराष्ट्र, कोंकण व गुजरात या प्रांतांत झाला. पुढे कलचुरि राजांनी त्याचा पुरस्कार केल्यामुळे तो विदर्भांतहि कांही काळ प्रचलित झाला. इ. स. च्या सातव्या शतकांत बदामीच्या चालुक्यांनी कलचुरींचा पराभव केल्यावर या आभीर किंवा कलचुरि संवताचें दक्षिणेंतून हळूहळू कायमचें उच्चाटन झालें.

यानंतर बदामीच्या चालुक्यांनी शकसंवताचा पुरस्कार केला. मागे सांगितल्याप्रमाणे इ. स. च्या दुसऱ्या शतकांत हा संवत् उत्तर महाराष्ट्रांतून लुप्त झाला होता. यानंतरचें या संवताचें पहिलें ज्ञात वर्ष ४६५ (इ. स. ५४३) हें चालुक्य सम्राट् प्रथम पुलकेशी याच्या बदामी येथील

लेखांत आढळतें. चालुक्यांचें साम्राज्य इ. स. च्या सातव्या शतकांत महाराष्ट्र, कोकण, गुजरात, विदर्भ व आंध्र या प्रांतांवर पसरलें. त्याबरोबर शकसंवताचा प्रसारहि हळूहळू या प्रांतांत झाला. तेव्हापासून आजपर्यंत हा संवत् या प्रांतांत अविच्छिन्नपणे प्रचलित आहे.

इ. स. च्या दुसऱ्या शतकापासून सहाव्या शतकापर्यंतच्या काळांतले मात्र या संवताचे लेख अद्यापि सापडले नाहीत. या काळांत या संवताचा उपयोग कोण करीत होते हा प्रश्न अद्यापि अनिर्णीत आहे. त्याविषयी थोडी नवीन माहिती प्रस्तुत लेखांत देण्याचा प्रयत्न केला आहे.

इ. स. च्या सहाव्या शतकापासून बदामीच्या चालुक्यांनी या संवताचा पुरस्कार केला खरा. पण याला ते आपला संवत् मानीत नव्हते; तर तो शकांचा किंवा शकराजांचा संवत् होता असा स्पष्ट निर्देश त्यांच्या, त्याचप्रमाणे त्यांच्या मांडलिकांच्याहि, सर्व लेखांत आढळतो. तेव्हा चालुक्यांच्या उदयापूर्वी हा संवत् कोणा शकराजांनी उपयोजिला असून आपल्या प्रांतांत तो पूर्वीपासून प्रचलित असल्यामुळेच चालुक्यांनी त्याचा पुरस्कार केला, हें उघड आहे. चालुक्यांचे मांडलिक उत्तर महाराष्ट्र, कोकण व गुजराथ येथे राज्य करूं लागले, तेव्हा प्रथम कांही काळ त्या प्रांतांत पूर्वी प्रचलित असलेल्या आभीर-कलचुरि संवताचा त्यांनी उपयोग केला, यावरूनहि वरील अनुमान युक्त दिसेल.

पण बदामीच्या किंवा विजापूर जिल्ह्याच्या जवळपास शक राजांचा अंमल चालुक्यांच्या उदयापूर्वी होता याला कांही पुरावा आहे काय, असा प्रश्न येथे उपस्थित होतो. या प्रश्नाचें उत्तर अलीकडे हैदराबाद संस्थानांत सापडलेल्या चार नाण्यांवरून देतां येतें. यांपैकी दोन नाणीं हैदराबादचे नाणकसंग्राहक श्री. हुरमुज कौस यांच्या संग्रहांतील आहेत. तीं तीन वर्षांपूर्वी प्रस्तुत लेखकाने 'इंडियन हिस्टॉरिकल क्वार्टर्ली' (पु. २२, पृ. ३४ इ.) ह्या सुप्रसिद्ध संशोधन त्रैमासिकांत प्रसिद्ध केलीं. हीं नाणीं सातवाहनांच्या नाण्यांसारखीं आहेत. त्यांवर पुढच्या बाजूस सोंड वर केलेला हत्ती असून मागील बाजूस उज्जयिनी चिन्ह (एकावर एक आडवे–उभे ठेवलेले डंबेल्स) आहे. हत्तीच्या



मान
राजाचें
नाणें



पुढील बाजू मागील बाजू

सभोवार राजनाम आहे. कोणत्याहि एका नाण्यावर हें पूर्णपणें दिसत नाही, पण दोन्ही नाण्यांवरचीं अक्षरें एकत्रित केली असतां तें 'रञो सिरि-सगमानमहसस' असें पूर्ण करतां येतें. हें नाम तत्कालीन प्राकृत भाषेंत असून अक्षरांची लिपि इ. स. च्या दुसऱ्या तिसऱ्या शतकांतील आहे. नाण्यांवरच्या शब्दांचा अर्थ, 'हें नाणें राजा श्रीशकमानमहिष यांचें' असा होतो. पुराणांत या राजाचें नांव खालील ओळींत आलें आहे. 'शक्यमानाभवद्राजा महिषीणां महीपतिः ।*' पुराणांच्या पाठांत अनेक लेखकांच्या अनवधानामुळे किंवा अज्ञानामुळे पुष्कळ चुका झालेल्या आढळतात. वरील ओळींचा मूळचा पाठ 'शकमानोऽभवद्राजा महिषाणां महीपतिः' असा असावा. त्याचा अर्थ 'महिषांचा राजा शक मान होऊन गेला' असा आहे. तेव्हा हीं नाणीं शकवंशी मान राजाचीं होतीं, असें स्पष्ट दिसतें. त्याला पुराणांत 'महिषांचा राजा' म्हटलें आहे. या नाण्यां-वरहि त्याला महिष असें विशेषण लावलें आहे. त्यावरून तो माहिषक देशावर राज्य करीत होता असें दिसतें. या माहिषक देशाचा उल्लेख दक्षिणेंतील विदर्भ व ऋषिक (सध्याचा खानदेश) या देशाबरोबर रामायणांत केला आहे. त्याविषयी विवेचन पुढे करूं.

गतवर्षी (मे १९४९ मध्ये) हैद्राबाद संस्थानच्या पुराणवस्तु-संशोधन-खात्याचे डायरेक्टर श्री. ख्वाजा मुहम्मद अहमद यांनी कांही नाण्यांचें फोटो वाचनार्थ मजकडे पाठविले. त्यापैकी दोन नाणीं या

* पार्जिटरकृत 'कलियुगांतील राजवंश' (इंग्रजी), पृ. ५१.

वंशांतील राजांचीं आहेत.* यांपैकी एक नाणें हैदराबाद शहराच्या उत्तरेस मेडक जिल्ह्यांतील कोंडापूर येथे सापडलें होतें. या ठिकाणीं सातवाहन राजांच्या काळचे विस्तृत अवशेष सापडले आहेत. हें नाणें शिशाचें असून त्याच्या पुढील भागावर सिंहाची आकृति आहे. हेंहि नाणें सातवाहनांच्या नाण्यांसारखें आहे. या नाण्यावरचें राजनाम खंडित आहे. तथापि 'माण महसस' अशीं अक्षरें वाचतां येतात. त्यावरून हें नाणेंहि त्याच शकवंशी मान राजाने पाडलें होतें यांत संशय नाही.

दुसरें नाणें हैदराबाद संस्थानच्या दक्षिणेंतील रायचूर जिल्ह्यांतील मस्की येथे उत्खननांत सापडलें. येथे अशोकाचा शिलालेख सापडला असल्याने हें गाव संशोधकांस सुपरिचित आहे. हेंहि नाणें शिशाचें असून त्याच्या पुढील भागावर घोड्याची आकृति आहे. त्याच्या सभों-वारचें राजनाम खंडित आहे. तथापि 'यसस महसस' अशीं अक्षरें वाचतां येतात. त्यावरून हें नाणें महिष वंशांतीलच एका राजाने पाडलें असून त्याच्या नांवाच्या शेवटीं 'यशस्' असा शब्द होता असें दिसतें. या राजाचीं आणखी नाणीं सापडल्याशिवाय हें राजनाम पूर्ण करणें शक्य नाही.

महिष हें वंशनाम माहिषक या देशनामावरून पडलें असावें. या माहिषक देशाचा उल्लेख रामायण, महाभारत व पुराणें यांत अनेक ठिकाणीं येतो. रामायणामध्ये सीतेच्या शोधाकरितां सुग्रीवाने भिन्न भिन्न दिशांस वानर पाठविल्याचें वर्णन आहे. दक्षिणच्या देशांमध्ये 'विदर्भान् ऋषिकांश्चैव रम्यान् माहिषकानपि' असें विदर्भ व ऋषिक (खानदेश) देशाबरोबर माहिषक देशाचें नांव आलें आहे. महाभारतांत तर माहिष-काचें नांव भीष्मपर्व, कर्णपर्व, आनुशासनिकपर्व, आश्वमेधिकपर्व इत्यादि अनेक पर्वांत आढळतें.† त्यावरून माहिषक देश द्रविड, कलिंग, आन्ध्र व महाराष्ट्र या देशांप्रमाणेच दक्षिणेंत होता असें दिसतें; किंबहुना

* 'जर्नल ऑफ दि न्यूमिस्मॅटिक सोसायटी ऑफ इंडिया', पु. ११, पृ. १

† 'ज. न्यू. सो. ऑ. इं.' पु. ११, पृ. ४.

या देशांबरोबर त्याचें नांव आल्याने त्या देशाजवळच तो असावा असेंहि अनुमान करतां येतें. मागे वर्णिलेलीं नाणीं हैदराबाद संस्थानच्या दक्षिण भागांत सापडलीं असल्याने त्या भागाचें प्राचीन नांव माहिषक होतें असें अनुमान केल्यास तें बहुधा चूक होणार नाही.

मागें वर्णिलेल्या नाण्यांवरून मान राजा या प्रदेशावर राज्य करीत होता असें दिसतें. पुराणांत ज्या ऐतिहासिक काळांतील थोडया राजांचा नामनिर्देश आहे त्यांपैकी तो एक आहे. त्यावरून तो बराच बलाढ्य असावा व त्याचें राज्यहि बरेंच विस्तृत असावें. या भागांत त्याच्या वंशजांचें राज्य कित्येक पिढ्या चाललें होतें. पुराणांत म्हटलें आहे की, आन्ध्र किंवा सातवाहन वंशाचा अस्त झाल्यावर अनेक राज्यें उदयास आलीं. त्यांपैकी एक शकराज्य होतें. हे शक राजे अठरा असून त्यांनी ३८० वर्षें राज्य केलें, असें पुराणें सांगतात. या वर्षांच्या संख्येंत चूक असावी व खरी संख्या १८३ वर्षें असावी असें पार्टिजरसाहेबांचें म्हणणें आहे.* तें खरें असल्यास या अठरा शक राजांनी सुमारें इ. स. २५० ते ४३३ या काळांत राज्य केलें असावें.

या दक्षिणेंतील शक राजांचे कोरीव लेख अद्यापि सापडले नाहीत. तथापि, वनवासीच्या कदंबनृपतींचा मूळ पुरुष मयूरशर्मा याने शकस्थान नामक प्रदेश जिंकला असल्याचें म्हैसूर संस्थानांतील चंद्रवल्ली येथील प्रस्तरलेखांत म्हटलें आहे. हें शकस्थान कदंबांच्या राज्यापासून फार दूर नसून दक्षिणेंतच असावें. कदंबांचें राज्य धारवाड जिल्ह्याच्या दक्षिणेस उत्तर कानडा प्रांतावर होतें. तेव्हा त्यांनी जिंकलेलें शकस्थान माहिषकच असावें असें अनुमान करण्यास हरकत नाही.

या शकराजांनी आपला संवत् माहिषक देशांत व त्या सभोवारच्या आपल्या राज्यांतील इतर भागांत प्रचलित केला होता असें दिसतें; तेव्हा हा संवत् विजापूर, बेळगाव, धारवाड या जिल्ह्यांत प्रचलित असावा. या कर्नाटक जिल्ह्यांतील चालुक्यपूर्वकालीन कोरीव लेख सापडल्यास त्यांत या संवताचा उल्लेख आढळेल अशी अपेक्षा आहे.

* पार्टिजरकृत 'कलियुगांतील राजवंश', प्रस्तावना, पृ. २४.

इ. स. च्या सहाव्या शतकांत बदामीच्या चालुक्यांचा उदय झाला. त्यांनी आपल्या लेखांत या संवताचा उपयोग केला आहे याचें कारण त्यांच्या देशांत तो पूर्वीपासून चालू होता, हें होय. राज्यक्रांति झाली तरी लोकांच्या अंगवळणीं पडलेली कालगणनापद्धति एकदम बदलत नाही. आभीर, कलचुरि, गुप्त, हर्ष यांचे संवत् त्यांचें साम्राज्य नष्ट झाल्यावरहि कित्येक शतकें चालू होते याचें कारणहि हेंच आहे. इंग्रजांचें राज्य गेल्यावरहि आपण त्यांच्या खिस्ती शकाचा उपयोग करीत आहोंच. असो.

चालुक्यांनी शकसंवताचा उपयोग केला असला तरी त्यांनी तो संवत् आपला नसून शकांचा किंवा शकराजांचा होता असा स्पष्ट निर्देश आपल्या सर्व लेखांत केला आहे. चालुक्यांचें साम्राज्य द्वितीय पुलकेशीच्या कारकीर्दींत महाराष्ट्र, कोकण, विदर्भ, गुजराथ, आंध्र या प्रांतांवर पसरलें. यांपैकी पहिल्या चार प्रांतांत त्याकाळीं आभीर किंवा कलचुरि संवताचा प्रचार होता. चालुक्यवंशी राजांनी किंवा त्यांच्या मांडलिकांनी आपल्या आरंभींच्या लेखांत त्याच संवताचा उपयोग केला आहे. पण पुढे हळूहळू ते स्वतःला जास्त परिचित असलेल्या शकसंवताचा उपयोग करूं लागले. शंभर दीडशें वर्षांच्या अवधींत या प्रांतांतून कलचुरि संवताचें पूर्णपणें उच्चाटन झालें. पूर्वेस आंध्र प्रांतांत शक संवताचा प्रसार आरंभापासून झाला होताच. आंध्र देशाच्या उत्तरेस कलिंग देशांत गांगसंवत् चालू होता. तो इ. स. च्या दहाव्या शतकापर्यंत टिकला. पुढें इ. स. च्या अकराव्या शतकांत तेथेही शकसंवतानें आपला प्रवेश केला. नंतर इ. स. च्या तेराव्या शतकांत देवगिरीच्या यादव राजांच्या मांडलिकाच्या एका लेखांत प्रथमच त्याला शालिवाहन शक असें नांव मिळालें व त्याचा शालिवाहन या पुरातन राजाच्या नांवाशीं संबंध जोडला गेला. तेव्हापासून आपण त्यास शालिवाहन शक म्हणत आहों.

सध्या महाराष्ट्रांत प्रचलित असलेल्या शालिवाहन शकाची पूर्वपीठिका ही अशी आहे.

शकनृपति श्रीधरवर्म्याचा एरण येथील स्तंभलेख*

मध्यप्रदेशाच्या सागर जिल्ह्यांतील खुरई तहसिलींत एरण नांवाचें अत्यंत प्राचीन नगर आहे. त्या ठिकाणीं खिस्तपूर्व तीनचार शतकांइतकीं प्राचीन नाणीं सापडतात. तेथे अनेक प्राचीन देवालयांचे अवशेष, विष्णु, वराह, नरसिंह इत्यादिकांच्या विशाल मूर्ति, उत्तुंग स्तंभ व कित्येक प्राचीन शिलालेख आणि स्तंभलेख अद्यापि विद्यमान आहेत. तेथे सापडलेल्या कांही नाण्यांवर त्या नगराचें प्राचीन नांव 'एरिकिण' हें प्राकृत भाषेंत लिहिलेलें आढळतें. सुमारें पाऊणशें वर्षांपूर्वी जनरल कनिंगहॅमने या ठिकाणाची पाहणी करून तेथील अवशेषांचें विस्तृत वर्णन आपल्या रिपोर्टाच्या दहाव्या भागांत प्रसिद्ध केलें. एरणजवळ बीना नदीच्या काठीं कनिंगहॅमला एका शिवलिंगावर कोरलेला लेख आढळला. तो पुढे डॉ. फ्लीटने आपल्या 'उत्कीर्ण गुप्त लेख' या पुस्तकांत प्रसिद्ध केला. त्यामध्ये 'गुप्तनृपति भानुगुप्त याचा मित्र गोपराज हा येथे युद्धांत शौर्यानें लढत असतां मृत्यु पावला व त्याची पत्नी सती गेली' असा उल्लेख आला आहे. हा लेख गुप्तसंवताच्या १९१ या वर्षाचा म्हणजे खिस्तोत्तर ५१० चा आहे. या लेखावरून एका स्तंभाच्या अवशिष्ट भागाला पुढे शाळुंका जोडून त्याचें शिवलिंग बनविण्यांत आलें असें दिसतें. याच शिवलिंगावरील दुसरा एक कोरीव लेख गतवर्षी दृष्टीस पडला. तो येथे दिला आहे.

हा लेख कसा माहीत झाला याची हकीकतहि मनोरंजक आहे. १९५१ च्या जानेवारी महिन्यांत पाटणा येथील पुराणवस्तुसंशोधन

---

* ऐतिहासिक संकीर्ण निबंध : खंड ५ (भा. इ. सं. मंडळ, पुणें).

खात्याचे सुपरिंटेंडेंट श्री. कृष्णदेव हे मध्यप्रदेशांतील प्राचीन स्थळांची पाहणी करण्याकरितां आले होते. त्यांना एरण येथील वर उल्लेखिलेल्या शिवलिंगाच्या शाळुंकेवर दगडमातीचा थर जमून त्यायोगें गोपराजाच्या लेखाची एक ओळ लुप्त झाली आहे असें दिसलें. तेव्हा त्यांनी तो थर काढून टाकण्याचा आदेश दिला. तसें करीत असतां सबंध शाळुंकाच निखळली व तिच्या खाली त्याच शिवलिंगरूपी स्तंभावर असलेला दुसरा लेख दृष्टीस पडला. नागपूर संग्रहालयाचे असिस्टंट क्यूरेटर श्री. रोडे हे त्यानंतर एरण येथे गेले होते. त्यांनी त्या लेखाचे फोटोग्राफ घेतले. त्यावरून मला या लेखाची माहिती प्रथम झाली. नंतर माझ्या विनंती-वरून भारतसरकारचे लेखशास्त्रज्ञ डॉ. छाबडा यांनी एरण येथे जाऊन त्या लेखाचे उत्कृष्ट छाप घेतले. व ते मला पाठविले. त्यावरून मी या लेखाचें प्रथम वाचन केलें. लेख त्रुटित व खराब स्थितींत असल्या-मुळे कांही अक्षरांचें वाचन संदिग्ध होतें. म्हणून एरण येथे जाऊन लेख समक्ष पाहिला. मूळ लेख व त्याचे छाप यावरून केलेलें वाचन खाली दिलें आहे.

हा लेख ज्यावर कोरला आहे तो स्तंभ तीन ठिकाणीं अष्टकोनी व त्यावरच्या तीन भागांत षोडशकोणी असून शेवटीं वाटोळा केला आहे. अष्टकोणी भागांवर तीन लेख आहेत. अगदी खालच्या भागावर प्रस्तुत लेख, मध्यभागावर गोपराजाचा लेख व वरच्या भागावर दुसरा एक गुप्तकालीन सध्या अस्पष्ट झालेला लेख, असे ते तीन लेख आहेत.

प्रस्तुत लेखाचा उजव्या बाजूचा एकतृतीयांश भाग पूर्णपणे नष्ट झाला आहे. राहिलेल्या भागांतील अक्षरेंहि अनेक ठिकाणीं अतिशय खराब किंवा पूर्णपणें नष्ट झालीं आहेत. त्यामुळे हा लेख वाचणें अत्यंत कष्टाचें काम झालें आहे. तथापि चिकाटीने प्रयत्न केल्यावर या लेखाचा अवशिष्ट राहिलेला बहुतेक भाग वाचतां येतो.

अक्षरवटिका-या लेखाची लिपी मध्यभारतांतल्या लेखांच्यासारखी दक्षिणी वळणाची आहे. सांची जवळ कानाखेडा येथें श्रीधरवर्म्याचा लेख सांपडला आहे त्याची लिपीहि याच वळणाची आहे. तिसऱ्या

ओळींत २७ ही संख्या शब्दांनी तसेंच २० व ७ दर्शविणाऱ्या संख्या-चिन्हांनीहि दाखविली आहे. संख्या दर्शविण्याची ही पद्धति प्राचीन होय.

भाषा—या लेखाची भाषा संस्कृत असून आरंभींचा भाग गद्यांत आहे व शेवटीं स्रग्धरा वृत्तांत एक श्लोक घातला आहे. हाच प्रकार कानाखेडा लेखांतहि दिसतो. भाषा बहुतेक शुद्ध आहे, पण कांही ठिकाणीं प्राकृत भाषेचे अवशेष दिसतात. उदाहरणार्थ, 'महाक्षत्रपस' हें षष्ठ्यंत रूप 'महाक्षत्रपस्य'बद्दल व 'सप्तविंशतिमे' हा 'सप्तविंशतितमे' बद्दल योजलेला शब्द पाहा.

हा लेख शकनंदाचा पुत्र 'राजा' व 'महाक्षत्रप' या पदव्या धारण करणाऱ्या शकवंशी श्रीधरवर्म्याच्या कारकीर्दीच्या सत्ताविसाव्या वर्षी कोरला होता. याच राजाच्या कानाखेडा येथील लेखांत त्याला 'महा-दंडनायक' म्हटलें आहे. तो लेख त्याच्या कारकीर्दीच्या तेराव्या वर्षी कोरला होता. त्या लेखात महिना, पक्ष व तिथि यांचा निर्देश आहे. तसा निर्देश प्रस्तुत लेखांतहि असावा पण तो आता नष्ट झाला आहे. या लेखांत कानाखेडा लेखांतल्याप्रमाणे श्रीधरवर्म्याचें वर्णन 'धर्मविजयी' असें केलें आहे. कौटिलीय अर्थशास्त्रांत विजेत्या राजांचे धर्मविजयी, असुरविजयी व लोभविजयी असे तीन प्रकार वर्णिले आहेत. जो राजा शत्रूच्या शरणागतीने संतुष्ट होतो, त्याचें राज्य व द्रव्य हरण करूं इच्छित नाही, तसेंच त्यास ठार मारून त्याच्या भार्यादिकांचें अपहरण करीत नाही तो धर्मविजयी. शक नृपति श्रीधरवर्म्यानें धर्मविजयी राजाप्रमाणे वर्तन केलें हें विशेष होय. कानाखेडा लेखांत त्याला महासेन किंवा कार्त्तिकेय याचा उपासक म्हटलें आहे. प्रस्तुत लेखांतहि तसा निर्देश पहिल्या ओळीच्या शेवटीं आला असावा, पण तो आता अस्पष्ट झाला आहे.

प्रस्तुत लेखाचा एकतृतीयांश भाग नष्ट झाल्याने त्याचा सर्व अर्थ लावणें किंवा त्यांतील मजकूर पूर्णपणें देणें शक्य नाही. अवशिष्ट भागावरून कांही अनुमानें करतां येतात. या लेखाचे दोन उद्देश दिसतात—(१) पहिला उद्देश नगेन्द्राहारांतील बाहिरिका नामक पथका-

मधील एरिकिण अधिष्ठानांत नारायणस्वामी नामक गृहस्थाने गोब्राह्मण-प्रमुख अशा अधिष्ठानाच्या उपयोगाकरिता तसेंच मातापित्यांच्या पुण्यवृद्धीकरिता नदीवर तीर्थ किंवा घाट बांधला हें नमूद करण्याचा असावा. प्रस्तुत स्तंभ किंवा शिवलिंग एरण गावाजवळ वाहणाऱ्या बीना (प्राचीन वेण्वा) नदीच्या काठाजवळच अद्यापि आहे. या नदीलाच हा घाट बांधला असावा. (२) दुसरा उद्देश शकवंशी महाक्षत्रप व राजा श्रीधरवर्मा याचा आरक्षिक (पोलिसदलाचा प्रमुख) व सेनापति महाराष्ट्रीय सत्यनाग याने अरिष्टशान्ति, समृद्धि व सर्व प्राण्यांचें सुख व हित, याकरिता ही यष्टि किंवा स्तंभ उभारला हें जाहीर करण्याचा असावा. शेवटच्या तीन ओळींत स्रग्धरा वृत्तांतील श्लोक घातला आहे त्याचा बराचसा भाग खंडित किंवा अस्पष्ट झाला आहे. तथापि अवशिष्ट भागावरून 'नागांनीच येथे उभारलेली यष्टि अखंड राहून लोकांना क्षत्रराष्ट्राच्या धर्माचें किंवा कर्तव्याचें शिक्षण देवो; कारण हें स्थान शत्रु व मित्र यांना सारखेंच आदरणीय असें आहे' असा आशय त्या श्लोकामध्ये व्यक्त केलेला दिसतो.

मागे सांगितल्याप्रमाणें शकनन्दाचा पुत्र महादण्डनायक शक श्रीधरवर्मन् याचा लेख सांची जवळ कानाखेडा येथे कांही वर्षांपूर्वी सापडला होता. त्यांत त्याच्या कारकीर्दीचें तेरावें वर्षहि उल्लेखिलें होतें. तथापि त्याच्या 'महादंडनायक' या पदवीवरून तो स्वतंत्र नसून दुसऱ्या कोणा राजाचा अंकित असावा असें मानलें जात असे. प्रस्तुत लेखांत त्याच्या 'राजन्' व 'महाक्षत्रप' या पदव्या दिल्या आहेत. माळवा व काठेवाड येथील क्षत्रपांच्या लेखांतहि याच पदव्या येतात. त्या पूर्ण स्वातंत्र्याच्या द्योतक असल्यामुळे श्रीधरवर्मा स्वतंत्र होता याविषयी आता संशय राहत नाही.

कानाखेडा लेखाच्या शेवटीं आणखी एक कालनिर्देश आला आहे, पण त्याचें वाचन व अर्थ या बाबतींत संशोधकांत एकवाक्यता नाही. कै. राखालदास बॅनर्जी यांच्या मतें त्या लेखाच्या शेवटीं २०१ ही संख्या कालनिदर्शक म्हणून कोरली आहे. हें वर्ष शकसंवताचें मानून

ते कानाखेडा लेखाचा काळ खिस्तोत्तर २७९ हा देतात. कै. एन्. जी. मुजुमदार यांच्या मतें हें वाचन चूक असून त्या लेखाची मिती २४१ आहे. हें वर्ष शकसंवताचें असावें. अर्थात् त्यांच्या मतें त्या लेखाचा काळ खिस्तोत्तर ३१९ हा येतो. मी स्वतः त्या लेखाचा अभ्यास केला त्यावरून माझें असें मत झालें आहे की, त्या लेखांत १०२ हें वर्ष दिलें आहे. हें वर्ष आभीर किंवा तथाकथित कलचुरि शकाचें असावें. तसें तें मानल्यास त्या लेखाचा काळ खिस्तोत्तर ३५१ हा येतो. हें वर्ष श्रीधरवर्म्याच्या कारकीर्दीतील तेरावें होतें. तेव्हा तो इ. स. ३३९ मध्ये गादीवर आला असावा. प्रस्तुत एरण लेख त्याच्या कारकीर्दीच्या सत्ताविसाव्या वर्षी म्हणजे इ. स. ३६५ मध्ये कोरला असावा.

कानाखेडा लेखांत उल्लेखिलेल्या 'महादण्डनायक' या पदवीवरून श्रीधरवर्मा हा आरंभीं एखाद्या राजाचा मुख्य सेनापति असावा असें दिसतें. त्याच्या लेखांतील आभीर शकाच्या उपयोगावरून त्याचा स्वामी आभीरनृपति असावा असें अनुमान करतां येतें. आभीरांची सत्ता निर्बल झाल्यावर त्याने आपलें स्वातंत्र्य पुकारून स्वतःच्या कारकीर्दीचीं वर्षें आपल्या कोरीव लेखांत नमूद करण्यास आरंभ केला; तथापि त्याने आपली पूर्वीची 'महादंडनायक' पदवी किंवा आपल्या राज्यांत चालू असलेला 'आभीर' शक यांचा एकदम त्याग केला नाही. या तऱ्हेचीं उदाहरणें भारतीय इतिहासांत अनेक आहेत. पुढे त्याने आपली पूर्वीची पदवी टाकून माळव्याच्या क्षत्रपांप्रमाणे 'राजन्' व 'महाक्षत्रप' या पदव्या धारण केल्या व आपल्या पूर्वीच्या पारतंत्र्याचा निदर्शक जो आभीर शक त्याचाहि आपल्या लेखांत निर्देश करणें सोडून दिलें असें एरण लेखावरून स्पष्ट दिसतें.

प्रस्तुत लेख ज्यावर कोरला आहे त्याला 'यष्टि' असें म्हटलें आहे. यष्टि या संस्कृत शब्दाचे प्राकृतांत लष्टि (मराठींत लाठ किंवा लाठी) असें रूप होतें. कच्छ व काठेवाड या भागांत क्षत्रपांच्या काळचे कांही लेख सापडले आहेत, त्यांत लोकांनी आपल्या नातेवाईकांच्या किंवा मित्रांच्या स्मरणार्थ 'लष्टि' उभारल्याचा उल्लेख आहे. हे लेख ज्यांवर कोरले आहेत त्या शिला लांबट आकाराच्या व अग्रभागीं टोक असलेल्या

अशा आहेत. त्या सामान्य लोकांनी उभारल्या होत्या. त्यावरून यष्टीच्या आकाराची कल्पना करणें बरोबर होणार नाही. प्रस्तुत लेखांत निर्देशिलेली यष्टि एका प्रबळ राजाच्या सेनापतीने उभारली होती. अर्थात् ती योग्य आकाराची व पद्धतीची असली पाहिजे. त्या यष्टीचा सध्या अवशिष्ट असलेला भाग साडेसहा फूट उंचीचा आहे. हा तिचा वरचा भाग. त्याखाली निदान तितकाच भाग असणें असंभवनीय नाही. त्यापैकी कांही भाग जमिनींत गाडला गेल्यावर जोत्यावरचा यष्टीचा भाग सुमारें साडेनऊ ते दहा फूट उंचीचा असावा. अशा यष्टि किंवा स्मारकस्तंभ मृतव्यक्तींच्या स्मरणार्थ उभारीत असत. मनुस्मृतींत (अध्याय ९, श्लो. २८५) त्यांचा उल्लेख आहे आणि या यष्टींचा जो नाश करील त्याला राजाने ५०० पण दंड करावा व नवी यष्टि करावयास लावावी असा आदेश दिला आहे. अशा मृत सैनिकांच्या स्मारकस्तंभांना गुजरात–काठेवाडांत 'पालिया' व कर्नाटकांत 'वीरक्कल' (मराठी, वीरगळ) म्हणतात. त्यांवर बहुधा घोडेस्वाराचें चित्र असतें. प्रस्तुत शिलास्तंभावरहि श्रीधरवर्म्याच्या लेखाच्या वरच्या भागीं तीन पैलूंवर एक एक घोडेस्वार कोरला आहे. घोडेस्वाराने आपल्या डाव्या हातांत घोड्याचा लगाम व उजव्या हातांत तलवार घेतली आहे. त्यावरूनहि हा शिलास्तंभ प्रथम यष्टि किंवा स्मारकस्तंभ म्हणून उभारला होता असें दिसतें.

प्रस्तुत लेखांतील वर्णनावरून ही यष्टि शकनृपति श्रीधरवर्मा याचा सेनापति सत्यनाग याने एरण येथे धारातीर्थी शयन केलेल्या नागसैनिकांच्या स्मरणार्थ उभारली होती असें दिसतें. ही यष्टि सदैव अखंड राहून लोकांना क्षत्रराष्ट्राच्या धर्माचें किंवा कर्तव्याचें स्मरण देवो, कारण हें स्थान शत्रु व मित्र या दोघांनाहि आदरणीय आहे असें सत्यनागाने म्हटलें आहे. एरणला हें वर्णन पूर्णपणें लागू पडतें. कारण तें स्थान युद्धदृष्टया अत्यंत महत्त्वाचें असून त्या ठिकाणीं इ. स. च्या चौथ्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंत अनेक युद्धें झालीं. त्यांचे स्मारकलेख व सतीशिला अद्यापि एरण येथे विद्यमान आहेत.

श्रीधरवर्म्याच्या सेनापतीने एरण येथे उभारलेला स्मारकस्तंभ शूर पुरुषांना आपलें कर्तव्य करण्याची स्फूर्ति अनेक शतकें देत होता यांत संशय नाही. कारण श्रीधरवर्म्याच्या काळानंतर सुमारें दीडशें वर्षांनी रानटी हूण लोकांच्या भारतावर स्वाऱ्या झाल्या व त्यायोगें सुसमृद्ध व बलाढ्य असें गुप्त साम्राज्यहि खिळखिळें झालें. खिस्तोत्तर पांचव्या शतकाच्या अखेरीस तोरमाण नामक हूण राजाने मध्य भारतापर्यंत आक्रमण केलें होतें. त्याच्या काळचा एक लेख एरण येथेच प्रचंड वराहमूर्तीवर कोरलेला अद्यापि विद्यमान आहे. त्यानंतर थोड्याच वर्षांनी एरण येथे एक भयंकर युद्ध झालें. त्यांत भानुगुप्त नामक गुप्तराजाचा मित्र गोपराज हा निधन पावला. तेव्हा त्याची साध्वी स्त्री सती गेली. या घटनेचा निर्देश याच स्तंभावर दुसऱ्या बाजूस कोरलेल्या लेखांत आला आहे. भानुगुप्ताचें कोणाशीं युद्ध झालें याचा निर्देश त्या लेखांत नाही. तथापि वरील माहितीवरून त्याचा शत्रु तोरमाण नामक हूण राजाच होता यांत संशय नाही. भारतभूमीला परकीयांच्या दास्यांतून सोडविण्याकरिता धारातीर्थी शयन करणाऱ्या गोपराजाचें स्मारक अशा पवित्र कर्तव्याचें शूर पुरुषांस सदैव स्मरण करून देण्याकरिता उभारलेल्या 'यष्टी'वर लेख कोरून व्हावें यांत मोठेंच औचित्य आहे.

ही यष्टि आरंभीं तेरा फूट उंच होती असें दिसतें. कालांतराने ती जमिनीवर पडून तिचे तुकडे झाले. तेव्हा तिचा वरचा भाग शिवलिंगाप्रमाणे गोल असल्याने कोणी शिवभक्ताने त्याला शाळुंका लावून शिवलिंग बनविलें. त्यावर तीन लेख होते. त्यांपैकी एक जमिनींत व दुसरा शाळुंकेंत दबला गेला होता. तिसरा मुद्दाम अस्पष्ट केला असावा. म्हणून हें शिवलिंग पूर्वीची यष्टि असावी असा संशय कोणासहि आला नसावा. यष्टीवर गोपराज व त्याची पत्नी यांचें शिल्प व सैनिकांच्या आकृति कोरल्या होत्या; पण भारतीयांच्या नैसर्गिक अचिकित्सकतेमुळे त्यांचा कोणीहि विचार केला नसावा.

या लेखांत सत्यनाग आपणांस 'माहाराष्ट्र' म्हणजे महाराष्ट्रीय म्हणवितो. महाराष्ट्र हें देशवाचक नांव पुराणादि प्राचीन ग्रंथांत येतें.

पण या ग्रंथांचे काळ अनिश्चित आहेत. सिंहलद्वीपाच्या 'दीपवंश' व 'महावंश' ग्रंथांतहि अशोकाने महाराष्ट्रांत बौद्धधर्माचा प्रसार करण्याकरिता भिक्षु पाठविले होते असा निर्देश आहे; पण हे ग्रंथ पांचव्या सहाव्या शतकांतील आहेत. संस्कृत वाङ्मयांतील बृहत्संहिता, काव्यादर्शादि ग्रंथांत महाराष्ट्राचा निर्देश आहे; पण हे ग्रंथ इ. स. च्या सहाव्या शतकांतील किंवा नंतरचे आहेत. तेव्हा श्रीधरवर्म्याच्या काळच्या म्हणजे इ. स. चौथ्या शतकांतील या लेखांत महाराष्ट्राचा निर्देश आहे तो कालक्रमानें पहिला ठरतो. त्यानंतर सुमारें तीनशें वर्षांनी ऐहोळे लेखांत व युआन च्वांगच्या प्रवासवर्णनांत महाराष्ट्राचा उल्लेख येतो, तो कालक्रमाने पहिला निश्चित उल्लेख मानण्यांत येत असे. त्यापेक्षा प्रस्तुत लेखांतील उल्लेख पुष्कळच अगोदरचा आहे. याशिवाय या लेखांत एरणचें प्राचीन नांव 'एरिकिण' हें येतें. हें नांव 'एरिकिञ' या रूपांत एरणच्या प्राचीन नाण्यांवर येतें. समुद्रगुप्ताच्या व हूण नृपति तोरमाणाच्याहि एरण येथील लेखांत तें 'ऐरिकिण' या रूपानें आढळतें. एरिकिण हें अधिष्ठान किंवा नगर नगेन्द्र नामक आहारांतील किंवा जिल्ह्यांतील बाहिरिका नामक पथकांत किंवा तालुक्यांत अन्तर्भूत होतें. पण हीं प्रदेशनामें अद्यापि इतरत्र आढळलीं नाहीत.

वाचन[1]

१ सिद्धम् [।*] राज्ञा(ज्ञो) महाक्षत्रपस(स्य) स्ववीर्य्या [र्जिज]–
[त*]विजयविपुलकीर्तेर[2]· · · · · · · · ·स्य

२ शकनन्दपुत्रस्य ध[र्म्म]विजयिनः [श्री]धरवर्म्म[णः]· · ·
· · · · · ·[स्वराज्या*][3]–

१ मूळ स्तंभ व छाप यांवरून. यांतील कांही शब्दांच्या वाचनांत डॉ. छाबडा, श्री. लक्ष्मीनारायण राव व श्री. य. रा. गुप्ते यांचें साहाय्य झालें आहे. २ यापुढचीं अक्षरें –जितसेनमहाकुमारपादानुध्यात– अशीं असावीं. ३ येथे नष्ट झालेल्या अक्षरांपैकी शेवटचीं नऊ अक्षरें कानाखेडा लेखांतल्या प्रमाणे 'वर्षसहस्राय स्वराज्या–' अशीं असावीं. शेवटचीं तीन अक्षरें तर जवळजवळ निश्चित आहेत.

३ भिवृद्धिकरे वैजयिके सं[व]त्सरे सप्तविंशतिमे[४] २० ७ . .
. . . .[५]

४ एतद्दिवस[६]मेरिकिणाधिष्ठाणे(ने)स्य नगे[न्द्रा]हारबा[हि]-
रकायां[७] . . . .[नारा*]–

५ यणस्वामिना भक्तिपू[र्व्वं] तीर्त्थं गोब्राह्मणपुरोगस्य चाधि . .
. . . .[८] मा . . .[९]

६ भिवृध्या(द्धय)र्त्थम् [।*] राज्ञः आरक्षिकेन(ण)[१०] [से]ना[प]-
तिसत्यनागेन म[हाराष्ट्र*][११] . . . . . .[प्र*]मु–

७ खेन माहाराष्ट्रेन(ण) शान्तिकर्द्धिसर्व्वसत्व(त्त्व)[सु]खहिताय स्व-
. . . .[१२]

८ अपि च[।*] सिध्य[न्ते] प्रेरितान्तात्पृथु[१३]पृ[थिवीमी]शमान-
(ने)[१४] नरेन्द्रे ना[गै]रे — ⏑ — — ⏑ ⏑ ⏑ ⏑

९ वपुषा क्षत्त्रराष्ट्र[स्य] धर्म्मा[न्।*] यष्टिश्शिष्टा[१५]मखण्ड-
स्थिति त ⏑ ⏑ ⏑ — — ⏑ — — ⏑ — —, — — — —

१० ⏑ सेवादररिपु[सु] [हृदां*] स्थानमेतत्प्रजानाम्[१६] [॥*]

---

४ 'सप्तविंशतितमे' वाचावें. ५ येथे नष्ट झालेल्या भागांत काना-खेडालेखांतल्याप्रमाणे महिना, पक्ष व तिथि यांचा निर्देश असून शेवटीं –पूर्वकम् असा शब्द असावा. ६ 'एतस्मिन्दिवसे–' वाचावें. ७ 'नगेन्द्राहारस्य बाहिरिकायां' वाचावें. हें सापेक्षसमासाचें उदाहरण आहे. याच्यापुढे 'पथके वेण्वानद्यां कारितं नारा–' असे शब्द असावे. ८ येथे नष्ट झालेले शब्द '–ष्ठानस्य स्वस्त्यर्थं' असे असावे. ९ येथील शब्द '–तापित्रोः पुण्या–' असे असावे. १० 'राज्ञ आरक्षिकेण' वाचावें. ११ येथील सामासिक शब्द 'महाराष्ट्राभिजननागप्रमुखेन' असा असावा. १२ येथे नष्ट झालेले शब्द 'स्वभोगाधिष्ठानैरिकिणे यष्टिरुच्छ्रिता' असे असावे. १३ येथें स्रग्धरा वृत्ताला आवश्यक अशीं दोन अक्षरें गळलेलीं दिसतात. १४ व्याकरण-दृष्टचा शुद्ध रूप 'ईशाने' असें आहे. १५ 'यष्टिश्शिष्टाम्' असें वाचावें' वास्तविक व्याकरणदृष्टचा शुद्ध रूप 'शास्तु' असें पाहिजे; कारण 'शास्' हा धातु परस्मैपदी आहे. १६ वृत्त–स्रग्धरा. येथे लेख संपल्याची खूण म्हणून 'म्' अक्षरावर लांब रेघ काढली आहे.

रामगुप्ताच्या चरित्रावर नवीन प्रकाश*

मगधाच्या गुप्त घराण्याविषयी सर्व हिंदुलोकांस अत्यंत आदर व अभिमान वाटतो. खिस्ती शकाच्या पहिल्या तीन शतकांत उत्तर हिंदुस्थानांत बौद्ध धर्माचा सर्वत्र प्रसार होऊन हिंदुधर्म नामशेष होऊं लागला होता. अशा बिकट परिस्थितींत ज्यांनी आपल्या बाहुबलाने परकी राजांस जिंकून उत्तर हिंदुस्थानांत हिंदूंचें एकच्छत्री साम्राज्य स्थापिलें, हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन केलें आणि राष्ट्रांतील शूर, विद्वान् व कर्तबगार लोकांच्या गुणांस क्षेत्र मिळवून दिलें त्या गुप्तवंशीय राजांविषयी सर्व हिंदी इतिहासज्ञांस औत्सुक्य वाटावें व त्यांच्या चरित्राविषयीं जितकी जास्त माहिती मिळेल तितकी मिळविण्याकरिता त्यांनी अविरत प्रयत्न चालू ठेवावा यांत नवल नाही. आणि क्वचित् एकादा नवीन शिलालेख, ताम्रपट किंवा नाणें सापडून, अथवा संस्कृत, प्राकृत, चिनी इत्यादि भाषांतील तत्कालीन परिस्थितिविषयक उल्लेख दृष्टीस पडून त्यांच्या प्रयत्नांस यश येतेंहि. या प्रथितयश गुप्तवंशांतील एका राजाच्या चरित्रावर थोडा नवीन प्रकाश पाडण्याचा या लेखांत प्रयत्न केला आहे.

सुमारें ८—१० वर्षांपूर्वीपर्यंत गुप्तराजांची खालील वंशावळ सर्वमान्य झाली होती.

चन्द्रगुप्त (प्रथम) इ. स. ३२०–३३०
|
(मुलगा)
समुद्रगुप्त इ. स. ३३०–३७५
|
(मुलगा)
चन्द्रगुप्त (द्वितीय) इ. स. ३७५–४१३

---

* 'शारदाश्रम वार्षिक', यवतमाल, (१९३३), पृ. २१.

चन्द्रगुप्त (द्वितीय) इ. स. ३७५-४१३
|
(मुलगा)
कुमारगुप्त इ. स. ४१३-४५५

सन १९२४ मध्ये कै. प्रो. राखालदास बॅनर्जी यांनी काशी विश्वविद्यालयांत व्याख्यानें दिलीं होतीं, त्यांत त्यांनी समुद्रगुप्तानंतर त्याचा मुलगा रामगुप्त गादीवर बसला असे प्रतिपादिलें होतें. पण तीं व्याख्यानें अद्यापि अप्रकाशित आहेत. त्यानंतर सन १९२८-१९२९ मध्यें डॉ. अ. स. अळतेकर यांनी जर्नल ऑफ् बिहार अँड ओरिसा या त्रैमासिकांत दोन लेख लिहिले. त्यांत हर्षचरित (इ. स. ७ वें शतक) व त्यावरील शंकरार्य याची टीका, रामचंद्र व गुणचंद्र (इ. स. चें १२ वें शतक) यांचा नाटयदर्पण नामक ग्रंथ, धारानृपति भोज (इ. स. चें ११ वें शतक) याचा शृंगारप्रकाश, राजशेखराची (इ. स. १० वें शतक) काव्यमीमांसा इत्यादि भिन्न भिन्न काळीं लिहिलेल्या व परस्परस्वतंत्र अशा संस्कृत ग्रंथांतील उतारे, संजान येथें सापडलेला राष्ट्रकूट नृपति अमोघवर्ष याचा ताम्रपट, व मज्मुल तवारिख (बारावें शतक) या ग्रंथांतील दंतकथा इत्यादिकांचा उपयोग करून रामगुप्ताविषयी खालील माहिती जुळविली.

"समुद्रगुप्तानंतर त्याचा मुलगा रामगुप्त हा गादीवर आला. तो अत्यंत निर्बळ व भ्याड राजा होता. काठेवाडांतील शकवंशीय क्षत्रपाने त्याच्या मुलखावर स्वारी करून राजधानीला वेढा दिला व त्याला इतकें पेचांत आणलें की प्रजेचा सर्वस्वी नाश न व्हावा म्हणून त्याला आपली राणी ध्रुवदेवी हिला शकराजाकडे पाठविण्याची अट नामुष्कीने कबूल करावी लागली. पण त्याचा शूर व मानी भाऊ चन्द्रगुप्त यास ती अट अपमानास्पद वाटून त्याने स्वतः ध्रुवदेवीच्या वेषाने शक राजाकडे जाण्याचें ठरविलें व पुढे एकांतांत त्याचा खून करून त्याच्या सैन्याचा धुव्वा उडविला. त्यानंतर लौकरच रामगुप्त व चन्द्रगुप्त या भावांत वैमनस्य उत्पन्न झालें. व बहुधा चन्द्रगुप्ताच्या हातून किंवा त्याच्या चिथावणीने रामगुप्ताचा वध झाला. राणी ध्रुवदेवी हिचें प्रथमपासून चंद्रगुप्तावर

प्रेम होतें व तिचा पति रामगुप्त याच्या अत्यंत भ्याड वर्तनाबद्दल तिच्या मनांत त्याच्याबद्दल तिरस्कार उत्पन्न झाला होता म्हणून त्याच्या वधानंतर तिने चंद्रगुप्ताशीं लग्न केलें. रामगुप्ताची कारकीर्द गुप्तवंशास लांछनास्पद असल्याने तिचा गुप्तवंशीय राजांच्या शिलालेखांत कोठेही उल्लेख आढळत नाही यांत आश्चर्य नाही. ध्रुवदेवीचा उल्लेखहि चन्द्रगुप्ताची पट्टराणी या नात्यानेच कोरीव लेखांत सर्वत्र आढळतो. तिने आपल्या सख्ख्या दिराशीं केलेला विवाह सध्या धर्मशास्त्रसंमत नसला तरी प्राचीन काळीं तो निंद्य मानला जात नसे."

डॉ. अळतेकर यांनी उपलब्ध पुराव्याची छाननी करून वरील अनुमानें काढल्यावर इतिहाससंशोधकांमध्ये मोठी खळबळ उडून गेली. प्रथम बरेच साशंक होते व त्यांनी वरील इतिहासावर नाना प्रकारचे आक्षेप आणले. पण त्यांचेंहि निराकरण होऊन सध्या बहुतेक इतिहासज्ञांचा कल वरील गोष्ट खरी मानण्याकडेच दिसून येतो. कलकत्ता युनिव्हर्सिटींतील प्राचीनभारतीयेतिहासाचे अध्यापक डॉ. देवदत्तपंत भांडारकर* व पाटण्याचे प्रसिद्ध संशोधक बॅ. काशीप्रसाद जयस्वाल† यांनी नुकतेच या विषयावर लेख लिहून नवीन प्रकाश पाडण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि वरील प्रसंगांतील कांही बाबी अद्यापि अनिर्णीत राहिल्या आहेत. रामगुप्ताचा पराभव करणारा शत्रु कोण व हा प्रसंग कोठे घडला याविषयी अद्यापि विद्वानांत ऐकमत्य नाही. वरील प्रसंगावर 'देवीचंद्रगुप्त' या नावाचें विशाखदत्ताचें एक नाटक होतें. त्यांतील कांही उतारे भोजाच्या 'शृंगारप्रकाशां'त आले आहेत. त्यांत वरील गोष्टींचा उल्लेख असावा. तथापि तें सबंध नाटक अद्यापि उपलब्ध झालें नसल्यामुळे वरील बाबी आपणास इतर पुराव्यावरूनच ठरविल्या पाहिजेत.

---

* Malaviya Commemoration Volume, pp. 186 f.

† J. B. O. R. S., Vol. XVIII, pp. 17 f

राजशेखराच्या काव्यमीमांसेंत 'कथोत्थ मुक्तकाचें' उदाहरण म्हणून खालील श्लोक आला आहे--

दत्त्वा रुद्धगतिः खसाधिपतये देवीं ध्रुवस्वामिनीं
यस्मात्खण्डितसाहसो निववृते श्रीशर्मगुप्तो नृपः ।
तस्मिन्नेव हिमालये गुरुगुहाकोणक्वणत्किन्नरे
गीयन्ते तव कार्त्तिकेय नगरस्त्रीणां गणैः कीर्तयः ॥

या श्लोकांत 'खसाधिपतये' याबद्दल 'शकाधिपतये' व 'श्रीशर्मगुप्तो' याबद्दल 'श्रीरामगुप्तो' हा मूळचा पाठ असून लेखकांच्या चुकीने त्याबद्दल सध्याचे पाठ घातले गेले असावे हें उघड आहे. त्यामध्ये रामगुप्त व कार्त्तिकेय या दोन राजांची तुलना करून कार्त्तिकेयाचा उत्कर्ष दाखविला आहे. 'ज्या हिमालय पर्वतावर शत्रूने मार्ग अडविल्यामुळे खण्डितसाहस झाल्याकारणाने रामगुप्तास आपली राणी ध्रुवस्वामिनी देऊन स्वतःची सुटका करून घ्यावी लागली, ज्याच्या विशाल दऱ्यांत बसून किन्नर गात असतात त्या हिमालय पर्वतावर नगरस्त्रियांचे समूह, कार्त्तिकेय राजा! तुझें यश गात असतात' असें त्या श्लोकांत म्हटलें आहे. येथे कार्त्तिकेयनगरस्त्रीणां' असा एक सामासिक शब्द मानावा व कार्त्तिकेयनगरींत रामगुप्ताचा पराभव झाला असावा असें डॉ. भांडारकरांचें म्हणणें आहे. हें कार्त्तिकेयनगर संयुक्तप्रांताच्या अल्मोरा जिल्ह्यांत गोमती नदीच्या खोऱ्यांत वसलेल्या वैजनाथ नामक गावाजवळ होतें व त्याचा कार्त्तिकेयपुर या नांवाने एका ताम्रपटांत उल्लेखहि आढळतो असें त्यांनी दाखविलें आहे. आणि वरील श्लोक चंद्रगुप्तास उद्देशून असावा असें त्यांनी म्हटलें आहे; पण तें सयुक्तिक दिसत नाही. राजशेखराने वरील श्लोक मुक्तकाचें उदाहरण म्हणून दिला आहे. संस्कृत वाङ्मयांत काव्याचे रचनेच्या दृष्टीने मुक्तक व प्रबंध असे दोन प्रकार मानतात. एकाच श्लोकांत सर्व कल्पना पूर्ण झाली असल्यास मुक्तक व अनेक श्लोकांत तिचा विस्तार झाला असल्यास प्रबंध असा त्या दोन संज्ञांचा अर्थ आहे. तेव्हा वरील श्लोकाच्या अर्थास जरूर ते सर्व शब्द त्यांत असले पाहिजते हें उघड आहे. संस्कृत

कवींनी स्वकालीन राजप्रशस्तिपर अनेक श्लोक रचलेले दिसतात. पण त्या सर्वांत त्या त्या राजांचीं नांवें गोवलेलीं आढळतात. याचें कारणहि उघड आहे. एकाच श्लोकांत सर्व कल्पना पूर्ण करावयाची असल्यानें त्या राजाचें नांव त्यांत न आल्यास तो श्लोक एका विशिष्ट राजाच्या विषयी आहे असें कोणास समजणें शक्य नाही. या विधानाच्या समर्थनार्थ संस्कृत सुभाषितांतून शेंकडो उदाहरणें देतां येतील.* तेव्हा वरील श्लोकांत 'कार्त्तिकेयनगरस्त्रीणां' असा एक शब्द न मानतां कार्त्तिकेय हें संबोधन मानणें भाग आहे.

आता हा कार्त्तिकेय कोण याचा विचार करूं. हा चंद्रगुप्ताचा मुलगा कुमारगुप्त असावा असें डॉ. अळतेकर म्हणतात. वरील श्लोकांत द्वितीय चंद्रगुप्ताची स्तुति केली आहे असें डॉ. भांडारकरांचें मत वर उद्धृत केलें आहे. पण हीं दोन्ही मतें सयुक्तिक दिसत नाहीत. रामगुप्ताची कारकीर्द मानधन गुप्तवंशास इतकी लांछनास्पद होती की तद्वंशीय राजांच्या लेखांत तिचा उल्लेख त्यांनी बुद्धिपुरस्पर टाळलेला दिसतो. तेव्हा गुप्तकालीन एखादा कवि आपल्या राजाची रामगुप्ताशीं तुलना करून त्याचें श्रेष्ठत्व स्थापित करण्याचें मनांत आणील असें वाटत नाही. तेव्हा हा कार्त्तिकेय दुसऱ्याच एखाद्या वंशांतील असावा. संजान येथील ताम्रपटांत राष्ट्रकूट अमोघवर्षाची रामगुप्ताशीं तुलना करून त्याचें श्रेष्ठत्व दाखविलें आहे, तसाच प्रकार या श्लोकांतहि केलेला दिसतो. राजशेखराच्या काळापूर्वी कार्त्तिकेय हें नांव कोणी राजानें धारण केलेलें दिसत नाही. पण राजशेखराचा आश्रयदाता महीपाल याचें कार्त्तिकेय हें दुसरें नांव असावें असें दिसतें. हा महीपाल कन्नोज येथील प्रतीहारवंशीय राजा होय. प्रतीहारवंशीय राजांनी अनेक नांवें धारण केलेलीं प्राचीन कोरीव लेख व नाणीं यांवरून दिसून येतात. उदाहरणार्थ, या महीपालाच्या आजा भोज यानें मिहिर, प्रभास आणि आदिवराह हीं नांवें घेतलीं होतीं. महीपालाचा पिता महेन्द्रपाल हा महेन्द्रायुध, निर्भयराज व भाक या नांवांनी ज्ञात होता. महीपालाचींहि क्षितिपाल, विनायकपाल,

* पाहा, सुभाषितरत्नभांडागार (निर्णयसागर प्रेस), पृ. ११८-१२४.

हेरम्बपाल, हर्ष इत्यादि दुसरीं नांवें प्रसिद्ध आहेत. तसेंच कार्त्तिकेय हें
नांव दिसतें. याच्या दरबारीं राजशेखर व आर्यक्षेमीश्वर हे प्रसिद्ध संस्कृत
ग्रंथकार होऊन गेले. आर्यक्षेमीश्वराने 'चंडकौशिक' या नाटकाच्या
प्रस्तावनेंत आपल्या आश्रयदात्यास 'महीपाल' या नांवाने व भरतवाक्यांत
'कार्त्तिकेय' या नांवाने उल्लेखिलें आहे. शिवाय त्या नाटकाच्या नांवांतहि
त्या राजाच्या नांवाचा गर्भित उल्लेख असावा. कारण चण्ड हें कार्त्ति-
केयाचेंच एक प्रसिद्ध नांव आहे असें महाभारतांत म्हटलें आहे.*
राजशेखरानेंहि आपल्या बालभारत या नाटकास 'प्रचण्डपाण्डव' हें
दुसरें नांव वरील उद्देशानेच दिलें असावें. संस्कृत ग्रंथकारांची अशी पद्धत
होती हें कालिदासाच्या 'विक्रमोर्वशीय' व 'कुमारसंभव' या ग्रंथांवरून
दिसून येईल. असो. राजशेखराने उद्धृत केलेल्या श्लोकांतील कार्त्तिकेय
हा कन्नोजचा प्रतीहारवंशीय प्रथम महीपाल होय हें आपण पाहिलें. त्यांत
वर्णिल्याप्रमाणे या राजाने हिमालयांतील एखादा प्रदेश जिंकला होता
काय याचा आता विचार करूं. महीपालाच्या कारकीर्दीच्या शेवटीं
शेवटीं राष्ट्रकूट नृपति तृतीय इंद्र व कलचुरि राजा प्रथम युवराजदेव
यांच्या स्वाऱ्यांमुळे कन्नोजच्या साम्राज्यास उतरती कळा लागली होती.
तथापि प्रारंभीं महीपालाने अनेक ठिकाणीं स्वाऱ्या करून विजय
मिळविला होता यांत संशय नाही. मध्यहिंदुस्थानांत खजुराहो येथे चंदेल्ल-
नृपति यशोवर्मन् याचा एक शिलालेख उपलब्ध झाला आहे त्यांत
महीपालाने आपले हत्ती व घोडदळ यांच्या बळावर काबूल व पंजाब
येथे राज्य करणाऱ्या साहि राजाचा पराभव करून वैकुंठ नामक विष्णूची
प्रतिमा हस्तगत केली होती असा उल्लेख आला आहे.† राजशेखराच्या
'बालभारत' अथवा 'प्रचण्डपाण्डव' या नाटकांत महीपालाचें येणेंप्रमाणें
वर्णन केलें आहे—

नमितमुरलमौलिः पाकलो मेकलानां
रणकलितकलिङ्गः केलितट् केरलेन्दोः ।

* महाभारत, वनपर्व, अध्याय २३२ (मुंबई प्रत).

† Ep. Ind., Vol. I, p. 129.

अजनि जितकुलूतः कुन्तलानां कुठारो
हठहृतरमठश्रीः श्रीमहीपालदेवः ॥

यांत वर्णिलेल्या युद्धांपैकीं एक कुलूत देशाच्या राजाशीं झालें होतें. सतलज नदीच्या किनाऱ्याने जालंदर दोआब्च्या ईशान्येस जो प्रदेश लागतो त्यास पूर्वी कुलूत ही संज्ञा होती. हें स्थान हिमालयांत आहे. तेव्हा तेथे महीपालाने जो विजय मिळविला त्याचें वर्णन त्याच्या दरबारच्या एखाद्या कवीने काव्यमीमांसेंत उद्धृत केलेल्या श्लोकांत केलें असावें असें वाटतें.

अर्थात् याच ठिकाणीं शकराजाने रामगुप्ताचा पराभव केला असावा. डॉ. अळतेकर म्हणतात त्याप्रमाणे हा पराभव रामगुप्ताच्या राजधानींत म्हणजे पाटलिपुत्रांत झाला नसून हिमालयांत झाला असावा हें उघड आहे. भोजाच्या शृंगारप्रकाशांत 'प्रकृतीनामाश्वासनाय शकस्य ध्रुवदेवीसंप्रदानेऽभ्युपगते' असे शब्द आहेत. त्यावरून रामगुप्ताने आपल्या राजधानींतील प्रजेच्या आश्वासनार्थ ध्रुवदेवीला शकराजाकडे पाठविण्याचें ठरविलें असावें असें डॉ अळतेकर यांनी अनुमान केलें आहे. पण 'प्रकृति' या संस्कृत शब्दाचे प्रजा व प्रधान असे दोन अर्थ होत असल्यामुळे दुसऱ्या अर्थानेच त्या शब्दाचा येथे प्रयोग झालेला दिसतो. काव्यमीमांसेंतील श्लोकावरून आपणांस असें दिसतें की गादीवर आल्यावर रामगुप्ताने आपला दिग्विजयी पिता समुद्रगुप्त याचें अनुकरण करण्याच्या इच्छेने शकराजावर स्वारी केली असावी. त्याप्रसंगीं त्याचा भाऊ चंद्रगुप्त, राणी ध्रुवस्वामिनी, व इतरहि मन्त्र्यादि परिवार त्याच्या बरोबर होता. इतक्या लवाजम्यासह शत्रूच्या राज्यांत दूरवर स्वारी करणें म्हणजे वरील श्लोकांत म्हटल्याप्रमाणे साहसच होय. दुर्दैवाने या साहसांत अपयश आल्यामुळे रामगुप्ताबरोबरच्या सर्व मंडळीचा नाश होण्याचा प्रसंग आला होता. म्हणून शकनृपतीने घातलेली मानहानिकारक अट स्वीकारणें रामगुप्तास भाग पडलें. शृंगारप्रकाशांत देवीचन्द्रगुप्त नाटकांतील एक उतारा दिला आहे* त्यांत चन्द्रगुप्ताने

* स्त्रीवेषनिह्नुतश्चन्द्रगुप्तः शत्रोः स्कन्धावारमलिपुरं शकपतिवधायागमत् । Ind. Ant. for 1923, p. 183.

अलिपूर नामक शत्रूच्या स्कन्धावारांत कामिनीवेषाने प्रवेश करून शत्रूचा निःपात केला असें म्हटलें आहे. डॉ. अळतेकर स्कन्धावाराचा शिबिर असा अर्थ करतात व तें शिबिर पाटलिपुत्राजवळ होतें असें म्हणतात. पण हा शब्दहि निराळयाच अर्थाने योजिलेला दिसतो. स्कन्धावार याचा राजधानी असाहि अर्थ होतो व तोच अर्थ येथे विवक्षित दिसतो; कारण वरील उताऱ्यांत 'स्कन्धावार' या शब्दाबरोबर अलिपूर या गावाचाहि उल्लेख केला आहे. बाणाच्या हर्षचरितांत या गावाचें नांव अरिपूर असें आलें आहे.* पण तें लेखकास अलिपूर या शब्दाचा अर्थ न समजल्यामुळे आलें असावें. हर्षचरिताच्या एका हस्तलिखित प्रतींत वरील उताऱ्यांत त्या गावाचें नांव नलिनपुर असें दिलें आहे. कदाचित् तेंच त्याचें मूळचें नांव असावें व कालांतराने लेखकाच्या अज्ञानामुळे प्रथम त्याचें अलिपूर व नंतर अरिपूर असें रूपांतर झालें असावें. बाणाचा समकालीन चिनी प्रवासी युअनच्वांग ह्याने सध्याच्या जलालाबादच्या थोडें पश्चिमेस Teng-kuang असें गाव उल्लेखिलें आहे. या गावाचें प्राचीन नांव पद्मपुर होतें असें एका विद्वानाने दाखविलें आहे.† हेंच बाणाच्या नलिनपुराने विवक्षित असण्याचा संभव आहे. तसें असल्यास रामगुप्ताचा पराभव जलालाबाद-जवळ झाला असावा. महीपालाने पंजाब व काबूल येथील साहि राजाचा पराभव याच प्रांतांत केल्याचें वर दाखविलें आहे. हें स्थळ हिमालयांत नसून हिंदुकुश पर्वतांत आहे खरें, पण या पर्वताला त्यावेळीं श्वेतपर्वत असें म्हणत असत असें दिसतें. त्यामुळे अशी भौगोलिक चूक दूरच्या कन्नोज येथील कवीच्या हातून होणें असंभवनीय नाही.

रामगुप्ताचा पराभव जालंदर दोआबजवळ झाला असो किंवा दूरच्या जलालाबादजवळ झाला असो, त्याचा शत्रु माळवा व काठेवाड येथे राज्य करणारा कोणी क्षत्रप किंवा प्रांताधिकारी नसून पंजाब व अफगा-

---

* अरिपूरे च परकलत्रकामुकं कामिनीवेषगुप्तश्चन्द्रगुप्तः शकपतिमशातयत् । हर्षचरित, पृ. १५३.

† Watters, On Yuan Chwang, Vol. I, p. 188.

णिस्थान येथे राज्य करणारा कुशान राजाच असावा यांत संशय नाही. हे कुशानवंशीय राजे समुद्रगुप्ताच्या वेळीं प्रबळ होते. त्यांचा 'दैवपुत्रषाहिषाहानुषाहि' अशा पदवीने समुद्रगुप्ताच्या अलाहाबाद येथील प्रशस्तींत उल्लेख आला आहे. ते इ. स. च्या पांचव्या शतकापर्यंत पंजाबांत राज्य करीत होते. व त्यांना शक असेंहि म्हणत. दिल्लीजवळ मिहरौली येथील लोहस्तंभावर एका चंद्रनृपाचा प्रशस्तिलेख कोरलेला विद्वानांस माहीत आहे. हा चंद्र म्हणजे गुप्तवंशीय द्वितीय चन्द्रगुप्तच होय हें बॅ. जयस्वाल यांनी दाखविलें. आहे.* या प्रशस्तींत उल्लेखिलेली बाल्हीकांवरची स्वारी चंद्रगुप्ताने गादीवर बसल्यावर कुशानांवर सूड उगविण्याकरिता केली असावी. काठेवाड–माळवा येथील क्षत्रपांनी रामगुप्ताचा पराभव केला असता तर चन्द्रगुप्ताने त्यांचा निःपात करण्याची पहिली संधि साधली असती. पण निदान इ. स. ३८८ पर्यंत म्हणजे चन्द्रगुप्त गादीवर आल्यावर १०–१२ वर्षेपर्यंत तरी त्याने त्यांच्याकडे लक्ष दिलेलें दिसत नाही; कारण या वर्षांपर्यंतचीं त्या क्षत्रपांचीं नाणीं उपलब्ध आहेत. या अवधींत तो उत्तरेकडे स्वाऱ्या करण्यांत गुंतला असावा असें दिसतें. चन्द्रगुप्ताने माळव्यावर स्वारी केली त्यावेळीं त्याच्या बरोबर असलेल्या एका मंत्र्याने आपल्या लेखांत स्वतःचा 'अनेकसमरावाप्तयशस्पताकः' असा उल्लेख केला आहे.† त्यावरून तत्पूर्वी त्याने चन्द्रगुप्ताबरोबर राहून अनेक लढाया जिंकल्या होत्या असें दिसतें. म्हणून उत्तरेंतील कुशानवंशीय सम्राटांचा पराभव केल्यावरच चन्द्रगुप्त त्यांनी नेमलेल्या काठेवाड व माळवा येथील प्रांताधिपतींचा समूळ उच्छेद करण्यास प्रवृत्त झाला असें अनुमान करतां येतें.

---

* J. B. O. R. S., Vol. XVIII, pp. 31 f.
† Fleet–Gupta Inscriptions, p. 29.

पवनार येथील प्राचीन अवशेष*

वर्धा जिल्ह्यांतील पवनार येथे श्री विनोबाजी यांच्या आश्रमाजवळ कांहीं मूर्ति कित्येक वर्षांपूर्वी सापडल्याची बातमी वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली होती. तसेंच कै. जमनालालजी बजाज यांच्या वर्धा येथील संग्रहालयांत पवनार येथे सापडलेली व सुंदर कोरीव काम केलेली मूर्ति ठेविली आहे, असेंहि अनेकांकडून ऐकलें होतें. या मूर्ति स्वतः पहाव्या अशी फार दिवसांची इच्छा होती. पण इतर कामाच्या गर्दींत त्याकरितां फुरसत मिळेना. गेल्या ऑक्टोबर महिन्यांत कांही मित्रांसहित पवनार येथे जाऊन या मूर्ति पाहण्याचा योग आला. या मूर्तींच्या योगाने विदर्भाच्या प्राचीन इतिहासांतील एका प्रश्नावर प्रकाश पडत असल्याने त्यांविषयी थोडक्यांत माहिती येथे देत आहे.

पवनार हें सध्या लहानसें खेडेगाव झालें असून तें धाम नदीच्या उजव्या तीरावर वसलें आहे. या खेड्यांत सध्या उल्लेखनीय असे प्राचीन अवशेष नाहीत. येथे मधून मधून कांही नाणीं सापडतात असें समजलें, पण तीं प्रयत्न करूनहि पाहावयास मिळालीं नाहीत. नदीच्या डाव्या तीरावर श्रीविनोबाजींचा आश्रम आहे. त्याच्या मागील बाजूस कांही शिल्पें व मूर्तींचे भग्न अवशेष जमीन खणतांना त्यांस सापडले. त्यांतील शाबूत असलेलीं दोन शिल्पें त्यांनी आश्रमाजवळ सुरक्षित ठेविलीं आहेत. तीं विदर्भाच्या प्राचीन शिल्पेतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचीं आहेत.


यांपैकी एका शिल्पाकरिता श्रीविनोबाजींनी लहानशी झोपडी बांधून तींत तें ठेवलें आहे. या शिल्पाला 'भरतभेट' असें नांव दिलें

---

* प्रो. पोतदार सन्मान-ग्रंथ (१९५०), पृ. १–७.

आहे. या शिल्पांत चार मूर्ति स्पष्ट दिसतात. त्या डावीकडून सीता, राम, भरत व लक्ष्मण यांच्या होत. पुढे दाखविल्याप्रमाणे या शिल्पाच्या निर्मितीला सुमारें दीड हजार वर्षें झाल्यामुळे त्या मूर्ति आता बऱ्याच अस्पष्ट झाल्या आहेत. तथापि अजूनहि त्यांच्या मुखांवरील भाव स्पष्ट दिसतात. सीतेने आपल्या उजव्या हाताने रामाचा उजवा हात धरला आहे. राम भरताशीं बोलत असून त्याने आपला डावा हात भरताच्या उजव्या हातावर ठेवला आहे. रामाच्या मुद्रेवर गांभीर्याची छटा आहे. भरताने आपली मान किंचित् वाकविली असून त्याच्या मुखावर रामाच्या भेटीचा आनंद व्यक्त झाला आहे. लक्ष्मणाने मात्र तोंड फिरविलें असून त्याची मुद्रा उदासीनतेची आहे. सीतेच्या बाजूस आणखी एक व्यक्ति होती, पण ती अर्धच्छिन्न झाली आहे. सर्व मूर्तींचे वेश अगदी साधे आहेत. त्या सर्वांनी फक्त अधोवस्त्र नेसलें आहे तें अजंठ्याचा लेण्यांतल्यासारखें आहे. राम व लक्ष्मण यांच्या डोक्यांवर जटा आहेत. भरताचे केस मात्र लांब सडक असून ते त्याच्या खांद्यावर पडले आहेत. सर्व मूर्तींचें शरीर बांधेसूद आहे. या शिल्पामध्ये कोठेही कृत्रिमता दिसत नाही. स्वाभाविकता, संयम, भावाविष्कार इत्यादि गुणांमुळे या मूर्ति गुप्तकालांतील दिसतात.

श्री विनोबांनी या शिल्पाला 'भरतभेट' असें नांव देऊन त्याचा फलकहि दरवाज्यावर लावला आहे. हें नांव सार्थ आहे यांत शंका नाही. पण 'भरतभेट' या नांवाने श्रीरामचंद्र रावणवधानंतर सीता, लक्ष्मण, सुग्रीव, बिभीषण, हनुमान इत्यादिकांसह नंदिग्रामास आले त्या वेळीं त्यांची भरताशीं झाली ती भेट असें सामान्यतः समजण्यांत येतें. ती भेट या शिल्पाचा विषय नाही. या शिल्पांत चित्रित केलेली भरतभेट चित्रकूट पर्वतावरची होय. मातुलनगराहून अयोध्येला आल्यावर भरताला रामादिकांचें वनवासगमन व दशरथाचें निधन यांची वार्ता समजली. लागलीच आपले मंत्री, सैन्य अयोध्येचे प्रजाजन इत्यादिकांसह तो रामाला परत आणण्याकरिता निघाला. राम तेव्हा चित्रकूट पर्वतावर होता. दुरून धुळीचा लोट दिसतांच त्याने लक्ष्मणाला वृक्षावर चढून कोण येत आहे



भरतभेट



वालिवध

तें पाहण्यास सांगितलें. लक्ष्मणाने हत्ती, घोडेस्वार, रथ, पायदळ इत्यादिकांनी युक्त अशी कोविदारध्वजांकित सेना पाहून भरतच येत असावा असें अनुमान केलें व तो म्हणालाः—

संपन्नं राज्यमिच्छंस्तु व्यक्तं प्राप्याभिषेचनम् ।
आवां हन्तुं समभ्येति कैकेय्या भरतः सुतः ॥
. . . .
संप्राप्तोऽयमरिर्वीर भरतो वध्य एव हि ।
भरतस्य वधे दोषं नाहं पश्यामि राघव ॥
पूर्वापकारिणं हत्वा न ह्यधर्मेण युज्यते ।
पूर्वापकारी भरतस्त्यागे धर्मश्च राघव ॥*

'स्वतःला राज्याभिषेक झाला असतांहि त्याने संतुष्ट न होतां समृद्ध राज्याची इच्छा करणारा हा भरत आपणां दोघांना ठार मारण्याकरिता येत आहे. हा आपला शत्रु आहे. याला ठार मारण्यांत कांही दोष मला दिसत नाही. त्यानेच प्रथम अपराध केला असल्यामुळे त्याला मारण्यांत पाप लागणार नाही, उलट पुण्यच लागेल.'

यावर रामाने भरताच्या आगमनाचें कारण हें नसून तो आपणांस अयोध्येस परत नेण्याकरिता आला असावा, आपणाला इजा करण्याचें कधी त्याच्या मनांतहि आलें नसेल इत्यादि सांगून लक्ष्मणाचा गैरसमज दूर केला. तथापि त्याच्या मनांतील अढी गेली नाही. ही लक्ष्मणाची मनोवृत्ति प्रस्तुत शिल्पांत दाखविली आहे. राम व भरत प्रेमाने परस्परांशीं बोलत असतां† लक्ष्मण त्यांच्याकडे न पाहतां विरुद्ध दिशेस पाहात आहे. तेव्हा ही 'भरतभेट' नन्दिग्रामीं झालेली नसून वनवासाच्या आरंभीं चित्रकूट पर्वतावर झालेली होय यांत संशय नाही.

* रामायण (निर्णयसागर प्रत), सर्ग ९६, श्लो. १७, २३-२४.

† प्रस्तुत शिल्पांत रामानें आपला हात भरताच्या हातावर ठेवून त्याचें स्वागत केलेलें दिसतें. त्याविषयीं रामायणांतील वर्णन पुढीलप्रमाणें आहे.—कथञ्चिदभिविज्ञाय विवर्णवदनं कृशम् । भ्रातरं भरतं रामः परिजग्राह पाणिना ॥ अयोध्याकांड, सर्ग १००, श्लो. २.

आश्रमाच्या मागे सापडलेलें दुसरें शिल्प श्री विनोबाजींनी एक लहानशी कुटी करून तींत ठेवलें आहे. या शिल्पाचा विषय काय आहे याविषयी मी अनेक तज्ज्ञांशीं चर्चा केली. कोणीं त्याला 'अहिल्योद्धार' तर कोणी त्याला 'अहिरावणवध' असें नांव दिलें. पण त्याचें बारकाईने निरीक्षण केल्यावर तें वालिवधाचें शिल्प आहे, याविषयी माझी खात्री झाली. यासंबंधी रामायणांत खालील वर्णन आहे.

सीतेच्या शोधार्थ राम व लक्ष्मण हिंडत हिंडत किष्किंधेस आले. तेथे हनुमानाची व त्यांची गाठ पडून त्याच्या मध्यस्थीने त्यांचें सुग्रीवाशी सख्य झालें. सुग्रीवाची पत्नी रुमा हिला त्याचा भाऊ वाली याने पळविली असल्याने तोहि दुःखी होता. त्याने सीतेचा शोध करण्यांत मदत करण्याचें वचन देऊन वालीचें पारिपत्य करण्यांत रामाची मदत मागितली. रामाने ती देण्याचें कबूल केल्यावर सुग्रीवाने वालीला युद्धाचें आव्हान दिलें. त्यांच्या युद्धांत सुग्रीवाचा पाडाव होत आहे असें पाहतांच रामाने वृक्षांआडून बाण मारून वालीला घायाळ केलें. वाली जमिनीवर पडला तेव्हा त्याला पाहण्यास राम व लक्ष्मण आले. त्यांना पाहून वालीने रामाची पुष्कळ निर्भर्त्सना केली तो म्हणाला—

हत्वा बाणेन काकुत्स्थ मामिहानपराधिनम् ।
किं वक्ष्यसि सतां मध्ये कर्म कृत्वा जुगुप्सितम् ॥
शठो नैकृतिकः क्षुद्रो मिथ्याप्रश्रितमानसः ।
कथं दशरथेन त्वं जातः पापो महात्मना ॥*

'निरपराधी अशा मला बाणाने ठार मारून निन्द्य कर्म केल्यावर सज्जनांच्या सभेंत तूं याचा काय जबाब देशील ? महात्मा दशरथाला तूं असा लबाड, हिंसक, क्षुद्र, ढोंगी व पापी मुलगा कसा झालास!' त्यावर रामाने खालील उत्तर दिलें—

इक्ष्वाकूणामियं भूमिः सशैलवनकानना ।
मृगपक्षिमनुष्याणां निग्रहानुग्रहेष्वपि ॥

---

* रामायण, किष्किन्धा कांड, सर्ग १७, श्लो. ३५, ४३.

तां पालयति धर्मात्मा भरतः सत्यवानृजुः ।
धर्मकामार्थतत्त्वज्ञो निग्रहानुग्रहे रतः ॥

. . . .

तस्य धर्मकृतादेशा वयमन्ये च पार्थिवाः ।
चरामो वसुधां कृत्स्नां धर्मसन्तानमिच्छवः ॥

. . . .

तदेतत्कारणं पश्य यदर्थं त्वं मया हतः ।
भ्रातुर्वर्तसि भार्यायां त्यक्त्वा धर्मं सनातनम् ॥
न हि लोकविरुद्धस्य लोकवृत्तादपेयुषः ।
दण्डादन्यत्र पश्यामि निग्रहं हरियूथप ॥*

'ही सर्व भूमि इक्ष्वाकूंची आहे. मृग, पक्षि, मनुष्य यांचा निग्रह किंवा अनुग्रह करण्याचा अधिकार त्यांचा आहे. या भूमीवर धर्मात्मा, ऋजुस्वभावी व सत्यशील असा भरत राज्य करीत आहे. तो निग्रहानुग्रह करीत असतो. त्याच्या आज्ञेने मी व इतर राजे धर्मपालनार्थ हिंडत असतों. तुला मारण्याचें कारण हें की तूं आपल्या भावाच्या पत्नीशीं व्यभिचार करीत असतोस. असें लोकविरुद्ध आचरण करणाऱ्यास दण्डाशिवाय इतर शासन मला माहीत नाही.'

वालिवधाचा हा प्रसंग प्रस्तुत शिल्पांत दाखविला आहे. वाली जमिनीवर पडला आहे. रामाच्या बाणाने घायाळ झाल्यामुळे रक्तस्रावाने तो व्याकुळ झाला होता. तथापि डाव्या हातावर भार टाकून तो अर्धवट उठून बसला आहे व उजव्या हाताने मान सावरून रामाकडे पाहत आहे. राम 'प्रत्यालीढ' स्थानांत उभा आहे. त्याचा डावा पाय पुढे असून वाकला आहे. उजवा पाय मागे ताठ आहे. डावा हात मांडीवर ठेवला आहे. उजव्या हातांत कांही वस्तु आहे. रामाच्या मुद्रेवर तिरस्कारयुक्त अभिमान आहे. त्याचें शरीर सौष्ठवयुक्त आहे. त्याच्या उभे राहण्याच्या दबीमुळे उजव्या छातीजवळचा भाग फुगीर झाल्याचें दाखविलें आहे. यांत शिल्पकाराची निरीक्षणशक्ति, शरीरशास्त्रज्ञान व

* रामायण, किष्किन्धा कांड, सर्ग १८, श्लो. ६, ७, ९, १८, २१.

शिल्पकौशल्य स्पष्टपणे दिसून येतात. रामाच्या गळ्यांत एक साधा हार व कमरेला कटिबंध दाखविला आहे. त्याच्या मागील बाजूस लक्ष्मण व सुग्रीव उभे आहेत. जवळच मोठ्या आकाराचीं फुलें कोरून त्यायोगें ज्या वृक्षांमागून रामाने बाण मारला तेही दाखविले आहेत. वृक्ष दाखविण्याची ही प्राचीन पद्धत गुप्तकालीन शिल्पांत आढळते. झांशी जिल्ह्यांत देवगड येथे गुप्तकालीन 'दशावतार' देवळाला लावलेलें अहिल्योद्धाराचें शिल्प आहे. त्यांत अरण्यांतील वृक्ष असेच दाखविले आहेत. साधेपणा, स्वाभाविकता, संयम, धार्मिकता हे गुप्तकालीन शिल्पांचे विशेष मानण्यांत येतात. ते सर्व या दोन्ही शिल्पांत आढळतात. म्हणून तीं निःसंशय गुप्तकालीन होत.

या दोन सुंदर शिल्पांवरून पवनार येथे श्री विनोबाजींचा आश्रम आहे त्याजवळच धाम नदीच्या काठीं इ. स. च्या चौथ्या-पांचव्या शतकांत श्रीरामचंद्राचें सुंदर देवालय होतें हें स्पष्ट दिसतें. हीं शिल्पें त्या देवालयाच्या भिंतींना भूषित करण्याकरिता लाविलीं असावीं. वर उल्लेखिलेल्या देवगड येथील गुप्तकालीन देवालयाला अशीं शिल्पें लावलेलीं अद्यापि विद्यमान आहेत.

हें देवालय कोणी बांधलें असावें याचा विचार करतां एक कल्पना सहजच सुचते. इ. स. च्या चौथ्या पांचव्या शतकांत—ज्या काळांतील हीं शिल्पें आहेत त्या काळांत—वाकाटकांचें विदर्भावर सुसमृद्ध असें राज्य होतें. त्यांच्या आरंभींच्या राजधान्या पुरिका व चनका या पुराणांत उल्लेखिल्या आहेत.* तथापि वाकाटकांचे आरंभींचे कोरीव लेख प्राप्त न झाल्यामुळे त्यांचा उल्लेख इतरत्र कोठे आढळत नाही. वाकाटकसम्राट् प्रथम प्रवरसेन याच्या निधनानंतर त्याच्या चार मुलांत साम्राज्याची वाटणी झाली. त्यांपैकी थोरल्या पातीने नागपूर जवळचें नन्दिवर्धन (सध्याचें रामटेकजवळचें नन्दरधन किंवा नगरधन) येथे आपली राज-

---

* पार्जिटरकृत कलियुगांतील राजवंश, पृ. ५०. येथील मूळचा पाठ 'पुरिकां चनकां च वै' हें डॉ. जयस्वालचें मत येथे स्वीकारलें आहे.

धानी स्थापिली. वाकाटकांचे सर्वांत प्राचीन असे चार ताम्रपट नन्दिवर्धनाहूनच दिलेले आहेत. त्यांतील पहिला ताम्रपट वाकाटकराज्ञी प्रभावतीगुप्ता हिचा होय.* हा तिने आपला अल्पवयस्क मुलगा दिवाकरसेन याच्या नांवाने राज्य करीत असतां दिला होता. त्यानंतरचे तीन ताम्रपट तिचा दुसरा मुलगा द्वितीय प्रवरसेन याच्या काळचे आहेत.† ते त्याच्या कारकीर्दीच्या आरंभींचे म्हणजे राज्यारंभापासून दुसऱ्या व तेराव्या वर्षी दिलेले आहेत. त्यानंतरचे ताम्रपट मात्र द्वितीय प्रवरसेनाने प्रवरपुराहून दिले आहेत.‡ या नगराचें नांव त्याच्याच ताम्रपटांत प्रथम येत असल्याने त्याने तें नगर आपल्या नांवाने स्थापून तेथे आपली राजधानी नेली असावी असें दिसतें.

या प्रवरपुराचा शोध अद्यापि लागला नाही. पवनारच्या गुप्तकालीन अवशेषांवरून तेंच प्राचीन प्रवरपुर असावें असें वाटतें. भाषाशास्त्राच्या नियमाप्रमाणे 'प्रवरनगर' चें कालान्तराने 'पवनार' असें रूप होणें अगदी शक्य आहे.§ पवनार येथे या शिल्पांखेरीज अनेक भग्न मूर्तींचे अवशेष सांपडले आहेत. शिवाय तेथे धाम नदीच्या दोन्ही तीरांवर दूरपर्यंत मोठ्या आकाराच्या प्राचीन विटा सापडतात असें श्री विनोबांनी आम्हांस सांगितलें, त्यावरून या नगराच्या विस्ताराची कल्पना करतां येते.

मागे सांगितल्याप्रमाणे पवनार येथे गुप्तकाळीं श्रीरामचंद्राचें सुंदर देवालय होतें. पवनार हें प्राचीन प्रवरपुर (किंवा प्रवरनगर) मानल्यास हें देवालय गुप्तवाकाटककाळीं येथे कां असावें याचीहि उपपत्ति लावतां येते. वाकाटक राजे सामान्यतः शिवोपासक होते ते

---

* एपिग्राफिया इंडिका, पु. १५, पृ. ३९. इ.

† ए. इं. पु. २६, पृ. १५५; पु. २४, पृ. २६०.

‡ गुप्तकालीन कोरीव लेख (सं. फ्लीट), पृ. २३५ व २४३.

§ प्रवरनगर–पवअनअर–पवनार अशी व्युत्पत्ति लावतां येते. कालान्तराने प्रवरसेनाची विस्मृति झाल्यावर पवनारच्या लोककथांमध्यें पवनराजाशीं संबंध जोडण्यांत आला असावा.

आपणास ‘ परममाहेश्वर ’ (श्रीशंकराचे परमोपासक) म्हणवीत. याला फक्त दोनच अपवाद माहीत आहेत. ते म्हणजे प्रभावतीगुप्तेचा पति द्वितीय रुद्रसेन व त्याचा पणतू द्वितीय पृथिवीषेण हे होत. हे दोन वाकाटक नृपति विष्णूपासक होते. द्वितीय पृथिवीषेणाच्या काळाविषयी आपणांस फारशी माहिती नाही, पण द्वितीय रुद्रसेन विष्णूपासक कसा झाला हें सांगणें कठीण नाही. या राजाची पत्नी प्रभावतीगुप्ता ही सुप्रसिद्ध गुप्तसम्राट् द्वितीय चंद्रगुप्त–विक्रमादित्य याची कन्या होती.* गुप्तसम्राट् विष्णूपासक असत. द्वितीय चन्द्रगुप्त हा आपणास ‘ परम-भागवत ’ म्हणवी. प्रभावतीगुप्ता ही अपल्या पित्याप्रमाणे विष्णूपासक होती. हिच्याच वर्चस्वामुळे द्वितीय रुद्रसेन हा विष्णूपासक बनला असें मानण्यास हरकत नाही.

विवाहानंतर लौकरच प्रभावतीगुप्तेवर वैधव्याचा प्रसंग आला, तरी धैर्य खचूं न देतां तिने आपल्या अल्पवयस्क मुलांच्या नांवें अनेक वर्षें राज्य केलें. ती अत्यंत धर्मशील होती. तिचे दोन ताम्रपट सापडले आहेत. ते दोन्ही कार्त्तिक शुक्ल द्वादशीस ब्राह्मणांस दिले असून त्यांत तिच्या ग्रामदानांचा निदश आह. कार्त्तिकी एकादशीस प्रबोधिनी एकादशी म्हणतात. कारण या दिवशीं भगवान् विष्णु चातुर्मासानंतर आपल्या भुजगशय्येवरून उठतात असें मानण्यांत येतें. या पवित्र दिवशीं उपवास करून द्वादशीस पारण्याच्या प्रसंगीं हे ताम्रपट दिलेले दिसतात. द्वितीय प्रवरसेनाने इतरहि कांही ताम्रपट याच तिथीस दिले आहेत. तो स्वतः परममाहेश्वर होता. तेव्हा या इतर ताम्रपटांत प्रभावतीगुप्तेचा साक्षात् उल्लेख नसला तरी ते त्याने आपल्या मातेच्या इच्छेवरूनच दिले होते असें अनुमान करण्यास हरकत नाही.

प्रभावतीगुप्ता केवळ विष्णूपासक नसून रामभक्त होती. ऋद्धपूरला सापडलेला तिचा ताम्रपट रामगिरिस्वामीच्या म्हणजे रामगिरीवरील श्रीरामचंद्राच्या पादुकांजवळ दिला होता असा त्यांत स्पष्ट निर्देश

* भा. इ. सं. मं. त्रैमासिक, वर्ष ३, पृ. ८९; ए. इं., पु. १५, पृ. ४१.

आहे.* रामगिरीवर श्रीरामचंद्राच्या पादुकांची पूजा होत असे हें कालिदासाच्या मेघदूतावरून दिसतें.† हा रामगिरि म्हणजे नागपूर-जवळचें रामटेक होय हें आम्ही इतरत्र सिद्ध केलें आहे.‡ रामटेक-जवळचें नगरधन (किंवा नन्दरधन) हें वाकाटकांची राजधानी नन्दि-वर्धन होय हेंहि आता निश्चित झालें आहे.

प्रभावतीगुप्तेचा मुलगा द्वितीय प्रवरसेन हा स्वतः शिवोपासक होता, तरी त्याने सेतुबन्ध हें उत्कृष्ट प्राकृत काव्य रामचरितावर रचलें, तेंहि प्रभावतीगुप्तेच्या इच्छेवरूनच असावें. या काव्याची प्रशंसा बाण, दण्डी, आनंदवर्धन इत्यादि अनेक संस्कृत ग्रंथकारांनी केली आहे.

वाकाटकांची राजधानी नन्दिवर्धनास होती तोंपर्यंत जवळच असलेल्या रामगिरीस जाऊन प्रभावतीगुप्तेला आपल्या इष्टदेवतेचें दर्शन घेतां येत असे. पण द्वितीय प्रवरसेनाने प्रवरपुर स्थापून तेथे राज-धानी नेल्यावर प्रभावतीगुप्तेला श्रीरामप्रभूच्या दर्शनाकरिता तेथे देवालयाची जरूरी भासली असावी व तिच्याच आज्ञेवरून प्रवरपुरांत (सध्याच्या पवनारांत) श्रीरामचंद्राचें उत्तुंग देवालय बांधलें गेलें असावें. या देवालयाच्या भिंतींना भूषित करण्याकरिता हीं दोन शिल्पें लावलीं असावीं. या देवालयांतील मुख्य मूर्ति अद्यापि सापडली नाही. त्या जागीं उत्खनन केल्यास ती कदाचित् सापडेलहि. या शिल्पांवरून तिच्या सौन्दर्याची कल्पना करतां येईल.

गुप्त-वाकाटक काळाला प्राचीन भारतीय इतिहासाचें सुवर्णयुग मानण्यांत येतें. या काळांत संस्कृत व प्राकृत वाङ्मय व विविध कला यांची अत्यंत भरभराट झाली. याच काळांत अजंठ्याचीं सोळा, सतरा व एकोणीस नंबरचीं लेणीं कोरविलीं गेलीं. तीं शिल्पकला व चित्रकला

---

* ' रामगिरिस्वामिनः पादमूलात् । ' भा. इ. सं. मं. त्रै., वर्ष ३, पृ. ९३.

† वन्द्यैः पुंसां रघुपतिपदैरङ्कितं मेखलासु । मेघदूत, श्लो. १२.

‡ मागे, पृ. ५३–६४ (वा. वि. मि.).

या दोन्ही दृष्टींनी अप्रतिम आहेत. दुर्दैवाने फारच थोडीं वाकाटक–गुप्तकालीन शिल्पें अद्यापि अस्तित्वांत आहेत. त्या काळीं विदर्भांत अनेक ठिकाणीं देवालयें बांधलीं गेलीं असावीं. कांहीचा निर्देश तत्कालीन ताम्रपटांत आढळतो.* तथापि विदर्भांत अद्यापि कोठेहि उत्खनन झालें नसल्यामुळे गुप्तवाकाटककालीन शिल्पें अत्यंत दुर्लभ आहेत. प्रस्तुत शिल्पांखेरीज असें एकच शिल्प आम्हांस माहीत आहे, तें रामटेकवरील त्रिविक्रमाचें होय. यामुळे येथे यदृच्छेने सापडलेल्या या दोन शिल्पांचें महत्त्व अधिकच वाटतें.

वाकाटककालानंतर प्रवरपुर ही विदर्भाची राजधानी राहिली नाही. तथापि त्याचें महत्त्व नाहीसें झालें नव्हतें असें दिसतें. कारण त्यानंतरचीं मध्ययुगीन दोन शिल्पें पवनार येथे सापडलीं आहेत. त्यांपैकी एक धाम नदीच्या तीरावर एका देवळांत ठेवलें आहे. हें शिल्प मोठ्या आकाराचें आहे. यांत शेषशायी विष्णूची भव्य मूर्ति आहे. भगवान् विष्णु शेषावर निजले असून त्यांच्या नाभींतून निघालेल्या कमळावर बसलेला ब्रह्मदेव दाखविला आहे. ब्रह्मदेवाचीं चार तोंडें चिमटीने मातीच्या गोळ्याला आकार देऊन बनवावीं त्या प्रकारचीं दिसतात. त्याच्या दोन्ही बाजूस इतर देव दिसतात. विष्णूच्या पायांजवळ लक्ष्मी बसली असून ती ते चुरीत असल्याचें दाखविलें आहे. एकंदरींत या मूर्तीचें काम अगदी सामान्य प्रतीचें असून ती भारतीय शिल्पकलेच्या निकृष्टावस्थेच्या काळांत बनविलेली दिसते.


याच्या उलट, उत्कृष्ट काम केलेली दुसरी एक मूर्ति पवनारासच सापडली होती. ती सध्या श्री. जमनालाल बजाज यांनी स्थापिलेल्या संग्रहालयांत ठेविली आहे. ही मूर्ति विष्णूची असून ती काळ्या पाषाणाची बनविली आहे. विष्णूच्या चार हातांत शंख, चक्र, गदा व अक्षमाला आहेत. त्याच्या डाव्या बाजूस लक्ष्मी व उजव्या बाजूस

---

* प्रस्तुत लेखकाने अलीकडे संपादलेल्या द्वितीय प्रवरसेनाच्या पट्टन येथील ताम्रपटांत विष्णूच्या पादुकांच्या देवळाचा उल्लेख आहे. ए. इं., पु. २३, पृ. ८६ पाहा.



शेषशायी विष्णु



विष्णु

गरुड आहे. विष्णूच्या मस्तकावरचा किरीट, गळ्यांतले हार, श्रीवत्स व अधोवस्त्र हीं उत्कृष्ट रीतीने कोरलीं आहेत. मूर्तीमागची प्रभावळहि सुंदर असून तीवर बुद्धासहित दशावतार दाखविले आहेत. त्यांमध्ये रामानंतर परशुराम व कृष्णाबद्दल बलराम घातले आहेत.* मूर्तीचें बारीक काम, दागिन्यांची रेलचेल, व या दशावतारांच्या मूर्ति यावरून ही मूर्ति बरीच नंतरची म्हणजे मध्ययुगीन कालांतील (इ. स. १०–११ व्या शतकांतील) दिसते.

पवनारचें महत्त्व मुसलमानी अमलापर्यंत टिकून होतें. या ठिकाणीं दिल्लीच्या मुसलमान बादशहाचा फौजदार राहत असून देवगड व चांदा येथील गोंड राजांकडून बादशहाची खंडणी वसूल करीत असे. मराठ्यांच्या अमदानींत पवनार हें परगण्याचें मुख्य ठिकाण झालें. येथे एक कमाविसदार राहत असे. येथे एक जुना किल्ला असून त्यावर एक देवनागरी लिपींत लिहिलेला लेख आहे असें समजतें.

मागे सांगितल्याप्रमाणे पवनारला प्राचीन अवशेष विपुल आहेत. या लेखांत वर्णिलेल्या शिल्पांवरून वाकाटक कालांत हें नगर महत्त्वाचें होतें व येथे श्रीरामचंद्राचें सुंदर देवालय होतें असें स्पष्ट दिसतें. पवनार हें नांव प्रवरनगराचें अपभ्रष्ट रूप आहे यांत संशय नाही. या सर्व उपोद्बलक प्रमाणांवरून सध्याचें पवनार हें एका काळीं वाकाटकांची सुसमृद्ध राजधानी असलेलें प्रवरनगर किंवा प्रवरपुर असावें असा तर्क होतो. याविषयीं निश्चित पुरावा या जागेची सूक्ष्म पाहणी करून उत्खनन केल्यास मिळण्याचा संभव आहे. तेव्हा या स्थलाकडे भारत सरकारच्या पुराणवस्तुसंशोधन खात्याचें लक्ष वेधून हा लांबलेला लेख पुरा करतो.

---

* या तऱ्हेच्या दशावतारांच्या मूर्ति विष्णूच्या प्रभावळीवर इतरत्रहि आढळतात. इंडियन म्यूझियमधील एका शिल्पांत हे दशावतार उजवीकडून डावीकडे याच क्रमाने दाखविले आहेत. राखालदास बॅनर्जींचें ईस्टर्न ॲन्ड इंडियन स्कूल ऑफ मेडिइव्हल स्कल्प्चर, पृ. १०३.

विद्धशालभञ्जिकेंतील राजकारणाचें प्रतिबिंब*

नाटिका त्रिपुरी येथे रंगभूमीवर आली

संस्कृत साहित्यांत जीं थोडीं ऐतिहासिक पार्श्वभूमि असलेली नाटकें आहेत, त्यांमध्ये राजशेखराच्या विद्धशालभंजिकेची गणना होते. या नाटिकेंतील नायक कर्पूरवर्ष हा त्रिपुरीचा कलचुरि राजा पहिला युवराज-देव ऊर्फ केयूरवर्ष असून हें नाटक त्रिपुरी येथे प्रथम रंगभूमीवर आलें, हें डॉ. हुल्श या जर्मन विद्वानाने सन १९०५ मध्येच दाखविलें होतें. त्या नाटकांतील इतर ऐतिहासिक घटनांचा शोध मात्र त्याला लागला नव्हता. कलचुरि लेखांचा अभ्यास करतांना प्रस्तुत लेखकाला त्याविषयी एक कल्पना सुचली. तत्कालीन ऐतिहासिक साधनांचा अभ्यास करून या विषयावर त्याने भांडारकर संशोधन मंडळाच्या त्रैमासिकांत सुमारें वीस वर्षांपूर्वी एक लेख लिहिला होता. त्यानंतर उपलब्ध झालेल्या सामग्रीवरून विद्धशालभंजिकेंतील ऐतिहासिक घटनेवर जास्त प्रकाश पडला आहे. त्याविषयी माहिती प्रस्तुत लेखांत देण्याचा प्रयत्न केला आहे.

वत्सगुल्म– राजशेखराचें मूळ निवासस्थान

विद्धशालभंजिकेचा कर्ता राजशेखर याच्या विषयी इतर संस्कृत कवींच्या मानाने बरीच माहिती उपलब्ध आहे. हा स्वतःला व आपल्या पूर्वजांना ‘ महाराष्ट्रचूडामणि ’ असें विशेषण लावतो, त्यावरून त्याचा महाराष्ट्राविषयी अभिमान व्यक्त होतो. आपल्या ‘काव्यमीमांसा’ नामक ग्रंथांत विदर्भांतील वत्सगुल्म हें नगर भगवान् मदनाचें क्रीडास्थान आहे

---

* ‘तरुणभारत’, नागपूर, दिवाळी विशेषांक, १९५०.

व तेथे काव्यपुरुषाचा साहित्यविद्यावधूशीं विवाह झाला, असें आलंकारिक वर्णन त्याने केलें आहे. कर्पूरमंजरी नामक दुसऱ्या ग्रंथांतहि वत्सगुल्माचा उल्लेख आला आहे. प्राचीन साहित्यग्रंथांत वैदर्भी रीतीला सर्वोत्कृष्ट म्हटलें आहे. राजशेखर आपल्या कर्पूरमंजरी या प्राकृत नाटकांत वैदर्भीचा 'वच्छोमी' असा पर्याय देतो. तो 'वात्सगुल्मी' या शब्दाचा अपभ्रंश आहे. पण तो इतरत्र रूढ झालेला दिसत नाही. या सर्वांवरून राजशेखराचें वत्सगुल्माविषयीचें प्रेम व्यक्त होतें. वत्सगुल्म म्हणजे अकोला जिल्ह्यांतील वाशीम हें वाकाटकांच्या एका शाखेचें राजधानीचें शहर असल्याने इ. स. च्या चौथ्या-पांचव्या शतकांत तें अत्यंत भरभराटींत होतें. पण त्यानंतरच्या राजवटींत तेथून राजधानी हलविल्यामुळे त्याचें महत्त्व पुष्कळच कमी झालें असावें. असें असताहि वाकाटकांच्या काळानंतर चारशें वर्षांनी झालेला राजशेखर त्या नगराचा इतक्या गौरवाने निर्देश करतो, त्यावरून तो तेथील मूळचा रहिवासी असावा, असें अनुमान करण्यास हरकत नाही. तेव्हा भवभूतीप्रमाणे राजशेखरहि वैदर्भ कवि होता असें म्हणतां येते.

राजशेखराचें चरित्र

राजशेखर हा यायावर कुळांत जन्मला होता. त्याचे पूर्वज अकालजलद, सुरानंद व तरल हेहि आपल्या कवित्वाने प्रसिद्धीस आले होते. यांचीं कांही सुभाषितें प्राचीन सुभाषितसंग्रहांत घेतलीं आहेत. यांना त्रिपुरी (जबलपूरजवळचें सध्याचें तेवर) येथील कलचुरि राजांचा आश्रय होता. राजशेखर हा अकालजलदाचा पणतू. याच्या पित्याचें नांव दुर्दुक व मातेचें शीलवती. राजशेखर स्वतः ब्राह्मण होता, तरी त्याने चाहुआन किंवा चव्हाण नामक क्षत्रियकुळांतील अवन्तिसुन्दरी या स्त्रीशीं विवाह केला होता. प्राचीन काळीं असे अनुलोम विवाह स्मृतिसंमत होते. अवन्तिसुन्दरी ही मोठी विदुषी होती. हिचीं अलंकारविषयक कांही मतें राजशेखराने आपल्या काव्यमीमांसेंत उल्लेखिलीं आहेत.

राजशेखर लहानपणापासून कवित्वाबद्दल प्रसिद्ध होता. त्यामुळे त्याला ' बालकवि ' अशी सार्थ पदवी मिळाली होती. पुढे त्याला कनोजचा सम्राट् महेन्द्रपाल याचा आश्रय मिळाला. या प्रतीहारवंशी राजाचें साम्राज्य इ. स. च्या दहाव्या शतकाच्या आरंभीं उत्तर हिंदुस्थानच्या बऱ्याचशा भागावर पसरलें होतें. असा बलाढ्य सम्राट् आपणास गुरु मानतो, याचा साभिमान उल्लेख राजशेखराने आपल्या नाटकांत केला आहे. कनोजला असतांना राजशेखरला 'कविराज' ही पदवी मिळाली. महेन्द्रपाल व त्याचा मुलगा महीपाल याच्या दरबारीं असतांना राजशेखराने बालरामायण, बालभारत व कर्पूरमंजरी हीं संस्कृत व प्राकृत नाटकें लिहिलीं. इ. स. ९१८ च्या सुमारास राष्ट्रकूटनृपति तृतीय इन्द्र याने कनोजवर स्वारी करून तें नगर उध्वस्त केलें. तेव्हापासून प्रतीहारांच्या साम्राज्याला उतरती कळा लागली. म्हणून राजशेखर त्रिपुरी येथे कलचुरि राजाच्या आश्रयास आला. तेथे त्याने विद्धशालभंजिका ही नाटिका व काव्यमीमांसा हा साहित्यशास्त्रावरचा अपूर्ण ग्रंथ हे लिहिले.

विद्धशालभंजिकेचें कथानक

विद्धशालभंजिकेच्या प्रस्तावनेंतील व इतर उल्लेखांवरून ती नाटिका त्रिपुरी येथे युवराजदेव ऊर्फ केयूरवर्ष या कलचुरि नृपतीच्या विजयोत्सवाच्या प्रसंगीं प्रथम रंगभूमीवर आली असें स्पष्ट दिसतें. या नाटिकेचें संविधानक पुढीलप्रमाणे आहे—

त्रिपुरीचा राजा युवराजदेव ऊर्फ कर्पूरवर्ष याच्या दरबारीं कुन्तलदेशचा वीरपाल साहाय्यार्थ येतो. त्याची मुलगी कुवलयमाला हिच्यावर कर्पूरवर्षाचें प्रेम बसतें. कर्पूरवर्षाच्या राणीचा मामा लाट किंवा गुजराथ देशाचा राजा चन्द्रवर्मा याला मुलगा नसल्यामुळे त्याने आपल्या मृगांकावलि नामक मुलीलाच मुलगा म्हणून वाढविलें होतें, व त्याचें मृगांकवर्मा असें नांव ठेवलें होतें. मृगांकावलीचें ज्याच्याशीं लग्न होईल, तो चक्रवर्ती राजा होईल असें ज्योतिष्यांनी भविष्य केलें

होतें. तें कर्पूरवर्षाचा मन्त्री भागुरायण याला माहीत असल्याने त्याने तिला मृगांकवर्मारूपाने त्रिपुरीस आणलें. त्याचें कन्यासदृश रूप पाहून राणी मौजेने त्याला कधी कधी स्त्रीवेष देत असे. या वेषांत मृगांकावलि राजाच्या दृष्टीस पडते व त्याचें तिच्यावर प्रेम बसतें. तिचेंहि प्रेम राजावर बसतें. पुढे अनेक प्रसंगीं परस्परांस दर्शन होऊन त्यांचें परस्परांवरचें प्रेम वाढत जातें. राणीला राजाचें कुवलयमाला या कुन्तलराजकन्येवर बसलेलें प्रेम माहीत झाल्यावर ती राजाच्या तावडींत सापडूं नये म्हणून ती तिचें लग्न आपला मामेभाऊ मृगांकवर्मा याच्याशीं लावून देते; व नित्य नव्या नव्या तरुणींवर आषक्त होणाऱ्या आपल्या पतीची फजिती करण्याच्या हेतूने ती त्याला निरोप पाठविते की 'माझ्या मामाने मृगांकवर्म्याची बहीण मृगांकावलि हिला माझ्याकडे पाठविली आहे व कोणी योग्य वर पाहून त्याला ती देण्याविषयी सांगितलें आहे. तिचा विवाह ज्याच्याशीं होईल तो चक्रवर्ती राजा होईल असें भविष्य आहे. म्हणून मी तुमच्याशीं तिचा विवाह लावून देणार आहे. आपण विवाहास तयार असावें.' राणीच्या कारस्थानाची बातमी विदूषकाला कळते व तो राजाला विवाहाला तयार राहण्यास सांगतो. ठरल्याप्रमाणे राजा व मृगांकावलि यांचा विवाह होऊन लाजाहोमहि होतो. राणीला वाटतें की आपण राजाचा विवाह एका तरुणाशी लावून त्याची फजिती करीत आहों. पण तिचें कारस्थान तिच्याच गळ्यांत येतें. कारण तितक्यांत तिचा मामा चन्द्रवर्मा याचा संदेश येतो की, 'मला नुकताच मुलगा झाला आहे. तेव्हा जिला मी मुलगा म्हणून वाढविलें होतें, ती मृगांकावलि कोणा योग्य वरास द्यावी.' हें ऐकतांच आपण करावयाला गेलों एक आणि झालें भलतेंच हें राणीला समजतें. तथापि, झालें तें ठीकच झालें असें म्हणून ती त्या विवाहाला संमति देते. इतक्यांत विदूषक म्हणतो, "अहो या कुवलयमालेचा मृगांकवर्म्याशीं विवाह झाला होता. मृगांकवर्मा तर मृगांकावलि होऊन आमच्या राजेसाहेबांची भार्या झाला आहे. 'भार्या पुत्रश्च दासश्च त्रय एवाधनाः स्मृताः। यत्ते समधिगच्छन्ति यस्य ते तस्य तद् धनम्॥' असें स्मृतिवचन आहे. भार्येच्या मिळकतीवर पतीचें

राजशेखर लहानपणापासून कवित्वाबद्दल प्रसिद्ध होता. त्यामुळे त्याला ' बालकवि ' अशी सार्थ पदवी मिळाली होती. पुढे त्याला कनोजचा सम्राट् महेन्द्रपाल याचा आश्रय मिळाला. या प्रतीहारवंशी राजाचें साम्राज्य इ. स. च्या दहाव्या शतकाच्या आरंभीं उत्तर हिंदुस्थानच्या बऱ्याचशा भागावर पसरलें होतें. असा बलाढ्य सम्राट् आपणास गुरु मानतो, याचा साभिमान उल्लेख राजशेखराने आपल्या नाटकांत केला आहे. कनोजला असतांना राजशेखरला 'कविराज' ही पदवी मिळाली. महेन्द्रपाल व त्याचा मुलगा महीपाल याच्या दरबारीं असतांना राजशेखराने बालरामायण, बालभारत व कर्पूरमंजरी हीं संस्कृत व प्राकृत नाटकें लिहिलीं. इ. स. ९१८ च्या सुमारास राष्ट्रकूटनृपति तृतीय इन्द्र याने कनोजवर स्वारी करून तें नगर उध्वस्त केलें. तेव्हापासून प्रतीहारांच्या साम्राज्याला उतरती कळा लागली. म्हणून राजशेखर त्रिपुरी येथे कलचुरि राजाच्या आश्रयास आला. तेथे त्याने विद्धशालभंजिका ही नाटिका व काव्यमीमांसा हा साहित्यशास्त्रावरचा अपूर्ण ग्रंथ हे लिहिले.

विद्धशालभंजिकेचें कथानक

विद्धशालभंजिकेच्या प्रस्तावनेंतील व इतर उल्लेखांवरून ती नाटिका त्रिपुरी येथे युवराजदेव ऊर्फ केयूरवर्ष या कलचुरि नृपतीच्या विजयोत्सवाच्या प्रसंगीं प्रथम रंगभूमीवर आली असें स्पष्ट दिसतें. या नाटिकेचें संविधानक पुढीलप्रमाणे आहे—

त्रिपुरीचा राजा युवराजदेव ऊर्फ कर्पूरवर्ष याच्या दरबारीं कुन्तलदेशचा वीरपाल साहाय्यार्थ येतो. त्याची मुलगी कुवलयमाला हिच्यावर कर्पूरवर्षाचें प्रेम बसतें. कर्पूरवर्षाच्या राणीचा मामा लाट किंवा गुजराथ देशाचा राजा चन्द्रवर्मा याला मुलगा नसल्यामुळे त्याने आपल्या मृगांकावलि नामक मुलीलाच मुलगा म्हणून वाढविलें होतें, व त्याचें मृगांकवर्मा असें नांव ठेवलें होतें. मृगांकावलीचें ज्याच्याशीं लग्न होईल, तो चक्रवर्ती राजा होईल असें ज्योतिष्यांनी भविष्य केलें

होतें. तें कर्पूरवर्षाचा मन्त्री भागुरायण याला माहीत असल्याने त्याने तिला मृगांकवर्मारूपाने त्रिपुरीस आणलें. त्याचें कन्यासदृश रूप पाहून राणी मौजेने त्याला कधी कधी स्त्रीवेष देत असे. या वेषांत मृगांकावलि राजाच्या दृष्टीस पडते व त्याचें तिच्यावर प्रेम बसतें. तिचेंहि प्रेम राजावर बसतें. पुढे अनेक प्रसंगीं परस्परांस दर्शन होऊन त्यांचें परस्परांवरचें प्रेम वाढत जातें. राणीला राजाचें कुवलयमाला या कुन्तलराजकन्येवर बसलेलें प्रेम माहीत झाल्यावर ती राजाच्या तावडींत सापडूं नये म्हणून ती तिचें लग्न आपला मामेभाऊ मृगांकवर्मा याच्याशीं लावून देते; व नित्य नव्या नव्या तरुणींवर आषक्त होणाऱ्या आपल्या पतीची फजिती करण्याच्या हेतूने ती त्याला निरोप पाठविते की 'माझ्या मामाने मृगांकवर्म्याची बहीण मृगांकावलि हिला माझ्याकडे पाठविली आहे व कोणी योग्य वर पाहून त्याला ती देण्याविषयी सांगितलें आहे. तिचा विवाह ज्याच्याशीं होईल तो चक्रवर्ती राजा होईल असें भविष्य आहे. म्हणून मी तुमच्याशीं तिचा विवाह लावून देणार आहे. आपण विवाहास तयार असावें.' राणीच्या कारस्थानाची बातमी विदूषकाला कळते व तो राजाला विवाहाला तयार राहण्यास सांगतो. ठरल्याप्रमाणे राजा व मृगांकावलि यांचा विवाह होऊन लाजाहोमहि होतो. राणीला वाटतें की आपण राजाचा विवाह एका तरुणाशी लावून त्याची फजिती करीत आहों. पण तिचें कारस्थान तिच्याच गळ्यांत येतें. कारण तितक्यांत तिचा मामा चन्द्रवर्मा याचा संदेश येतो की, 'मला नुकताच मुलगा झाला आहे. तेव्हा जिला मी मुलगा म्हणून वाढविलें होतें, ती मृगांकावलि कोणा योग्य वरास द्यावी.' हें ऐकतांच आपण करावयाला गेलों एक आणि झालें भलतेंच हें राणीला समजतें. तथापि, झालें तें ठीकच झालें असें म्हणून ती त्या विवाहाला संमति देते. इतक्यांत विदूषक म्हणतो, "अहो या कुवलयमालेचा मृगांकवर्म्याशीं विवाह झाला होता. मृगांकवर्मा तर मृगांकावलि होऊन आमच्या राजेसाहेबांची भार्या झाला आहे. 'भार्या पुत्रश्च दासश्च त्रय एवाधनाः स्मृताः। यत्ते समधिगच्छन्ति यस्य ते तस्य तद् धनम् ॥' असें स्मृतिवचन आहे. भार्येच्या मिळकतीवर पतीचें

स्वामित्व असतें. तेव्हा कुवलयमालाहि आमच्या महाराजांची झाली. तिच्याशींहि त्यांचें लग्न याच विवाहकंकणाने होऊं द्या!" राणीला याहि विवाहाला संमति देणें भाग पडतें. इतक्यांत एक दूत येऊन श्रीवत्स सेनापतीचा खलिता राजाला सादर करतो. त्यांत श्रीवत्स कळवितो की, राज्यापासून भ्रष्ट झालेला कुन्तलाधिपति वीरपाल आपल्या आश्रयास आला होता त्याला पुढे करून आम्ही पयोष्णीच्या तीरावर आपल्या सैन्याचा तळ दिला. तेथे घनघोर युद्ध होऊन कार्णाटांच्या सैन्याचा पराजय झाला. नंतर आम्ही वीरपालाला त्याच्या गादीवर बसविलें. हा खलिता वाचल्यावर भागुरायण मंत्री जाहीर करतो की, पूर्वी आमच्या करचुलि महाराजांनी पूर्व, पश्चिम व उत्तर दिशांच्या राजांना जिंकलें होतें. आता दक्षिण दिशेच्या राजांना जिंकून ते सर्व पृथ्वीचे चक्रवर्ती झाले आहेत. नंतर भरतवाक्याने नाटिका समाप्त होते.

नाटिकेचें ऐतिहासिक महत्त्व

विद्धशालभंजिकेचें कथानक कालिदासाच्या मालविकाग्निमित्राच्या धर्तीवर रचलें आहे. नायिकेशीं जो विवाह करील त्याला चक्रवर्तिपद प्राप्त होईल, या भविष्याची कल्पना हर्षाच्या रत्नावली नाटकांत प्रथम आढळते. तसेंच भासाच्या स्वप्नवासवदत्ता नाटकांत ऐतिहासिक पार्श्वभूमीचा उपयोग प्रथम केलेला दिसतो. पण एकंदरींत राजशेखराच्या या नाटकांत भासकालिदासांचें संविधानकचातुर्य दिसत नाही. नाटकांतील ऐतिहासिक प्रसंगहि संविधानकाशीं एकजीव झालेला दिसत नाही. याप्रमाणे नाटक या दृष्टीने विद्धशालभंजिका यशस्वी झाली नसली, तरी ऐतिहासिक दृष्टीने तिला महत्त्व आहे. कारण तिच्यांत एका ऐतिहासिक घटनेचा उल्लेख आहे. त्याकड आता आपण वळूं.

नाटिकेंतील तत्कालीन राजकारणाचें प्रतिबिंब

प्रस्तुत नाटकांत ऐतिहासिक व्यक्तींचीं नांवें बदललीं आहेत. 'कलचुरि' वंशाचें 'करचुलि' असें नांव दिलें आहे. कलचुरि नृपति

युवराजदेव याला 'केयूरवर्ष' असें बिरुद होतें. तें प्रस्तुत नाटकांत 'कर्पूरवर्ष' झालें आहे. युवराजदेवाचा मंत्री भाकमिश्र या नांवाचा होता हें तत्कालीन शिलालेखावरून कळतें. तो व प्रस्तुत नाटकांतील भागुरायण एकच होत यांत संशय नाही. या विशेषनामांच्या समीकरणावरून युवराजदेवाच्या आश्रयास आलेला कुन्तलाधिपति वीरपाल हीहि एक ऐतिहासिक व्यक्ति असावी असें सहजच वाटतें; व तत्कालीन कोरीव लेखांचा अभ्यास केल्यास तें अनुमान खरें ठरतें. कृष्णानदीच्या खोऱ्यांतील दक्षिण महाराष्ट्र व जवळचे कानडी जिल्हे यांना 'कुन्तल' अशी संज्ञा होती. या देशावर तत्कालीं राष्ट्रकूट राजांचें राज्य होतें, व त्या काळीं त्यांची मातृभाषा कानडी झाली होती, म्हणून त्यांना 'कुन्तलाधिपति' व 'कार्णाट' असें प्रस्तुत नाटकांत म्हटलें आहे. त्या वेळीं राष्ट्रकूटांची राजधानी हैदराबाद संस्थानांतील मान्यखेट (सध्याचें मालखेड) येथे होती. राष्ट्रकूटांचें साम्राज्य नर्मदेच्या दक्षिणेस महाराष्ट्र, कर्णाटक व आन्ध्र या प्रांतांवर पसरलें होतें. त्या काळीं मालखेड येथे चतुर्थ गोविंद हा राष्ट्रकूटनृपति राज्य करीत होता. हा सदैव ख्यालीखुशालींत मग्न असल्याने त्याच्या विरुद्ध त्याच्या राज्यांत कारस्थानें रचण्यांत आलीं व त्याला पदच्युत करून त्याचा चुलता बद्दिग–अमोघवर्ष यास गादी द्यावी असा कांही सामंतांनी कट रचला. तो सिद्धीस गेल्यास राष्ट्रकूटांच्या दरबारीं आपलें महत्त्व वाढेल असें वाटून कलचुरि नृपति युवराजदेव याने त्या कारस्थानाला प्रोत्साहन दिलें. शिवाय ज्याच्या करिता हा कट रचला होता, तो बद्दिग–अमोघवर्ष युवराजदेवाचा जावई होता. युवराजदेवाची कन्या कन्दकदेवी ही त्याला दिली होती. अमोघवर्ष हा स्वतः त्रिपुरीस कांही काळ राहत होता; व तेथे त्याने आपल्या कन्येचा विवाहहि थाटाने साजरा केला, हें कडब येथील ताम्रपटावरून माहीत झालें आहे. तेव्हा कुन्तलराज्यावर हक्क सांगणारा व त्रिपुरी येथे युवराजदेवाच्या आश्रयास आलेला विद्धशालभंजिकेंतील वीरपाल हा बद्दिग–अमोघवर्षच होय यांत संशय नाही.

वीरपालाचा पक्ष घेऊन युवराजदेवाच्या सेनापतीने पयोष्णीच्या तीरावर कर्णाटांच्या सैन्याशीं घनघोर लढाई केली, अशी माहिती विद्धशालभंजिकेवरून आपणांस मिळते. ती कितपत खरी आहे, तें आता आपण पाहूं.

अचलपुरचा राजा कर्कर

चतुर्थ गोविंदाला पदच्युत करण्याच्या कटांत राष्ट्रकूटांचे बरेचसे सामंत सामील झाले होते. तरी इतर कांही सामंत राजनिष्ठ राहून त्याच्याकरिता लढले, हें तत्कालीन कोरीव लेखांवरून दिसतें. या राजनिष्ठ सामंतांमध्ये उत्तरकर्नाटक प्रांतावर राज्य करणारा बप्पुव व त्याचा भाऊ अचलपुर येथे राज्य करणारा कर्कर हे प्रमुख होते. बप्पुवाने मोठा पराक्रम करून दक्षिणेंत बंडखोर सामंतांचा प्रथम मोड केला होता. पण पुढे बद्दिगाचा पक्ष घेणाऱ्या अरिकेसरी नामक एका चालुक्यवंशी सामंताने त्याचा पराजय करून मान्यखेटावर चाल केली, व बद्दिगाला त्याचें सिंहासन मिळवून दिलें असें तत्कालीन कर्नाटक कवि पम्प याच्या 'विक्रमार्जुनविजयां'त म्हटलें आहे. अलीकडे कोंकणांत मुरुडजंजिरा येथें शिलाहार नृपति अपराजित याचे दोन ताम्रपट सापडले आहेत. त्यांमध्ये बद्दिग-अमोघवर्षाच्या वर्णनांत पुढील श्लोक आला आहे—

> श्रीमत्कर्क्करराष्ट्रकूटकटकेऽसद्वंशसंघर्षतो
> रौद्रद्रोहदवप्रतापशमनं निस्त्रिंशधाराजलैः ।
> येनाकारि समुद्धृतेन्द्रधनुषा भूपाश्मभिर्विद्युता
> भाति श्रीमदमोघवर्षसुघनोऽसद्धूलिविध्वंसनात् ॥

(भावार्थ—ज्याप्रमाणे अरण्यामध्ये वेळूंच्या संघर्षामुळे उत्पन्न झालेल्या दावानलाला इन्द्रधनुष्य उभारून विजेने युक्त असा मेघ जलधारांनी शान्त करतो व भूमीवरची धूळ बसवून टाकतो, त्याप्रमाणे श्रीमान् अमोघवर्षाने राष्ट्रकूट (सामन्त) कर्कर याच्या राजधानींत आपल्या तरवारीच्या धारेने व आपला मुलगा (तृतीय) इन्द्र याच्या

धनुष्याच्या सहाय्याने दुष्टांच्या संघर्षानें उत्पन्न झालेल्या भयंकर बंडाचा मोड केला व दुष्टांचा समूळ नाश केला.)

पूर्णेच्या काठीं झालेलें घनघोर युद्ध

या वर्णनावरून राष्ट्रकूट सामन्त कर्कर याच्या राजधानीजवळ भयंकर युद्ध होऊन त्यांत अमोघवर्षाचा विजय झाला, असें स्पष्ट दिसतें. कर्कर हा अमरावती जिल्ह्यांतील अचलपुर येथे राज्य करीत होता, हें इतर कोरीव लेखांवरून ज्ञात झालें आहे.

वरील श्लोकांत उल्लेखिलेलें युद्ध व विशालभंजिकेंत वर्णिलेलें पयोष्णीच्या काठचें युद्ध हीं एकच असावींत; कारण पयोष्णी ऊर्फ पूर्णा ही नदी अचलपुरापासून जवळच १० मैलांवर वाहते. हीं दोन वर्णनें एकत्र केलीं असतां अचलपुरानजीक पूर्णा नदीच्या काठीं कलचुरींच्या सैन्याची मदत असलेला बद्दिग-अमोघवर्ष आणि चौथ्या गोविंदाच्या पक्षाचे कर्कर आदिकरून इतर सामन्त यांच्यामध्ये भयंकर लढाई होऊन तींत अमोघवर्षाचा विजय झाला, असें स्पष्ट दिसतें. या विजयोत्सवाच्या प्रसंगीं त्रिपुरी येथे कलचुरिनृपति युवराजदेव याच्या आश्रयाखाली राजशेखराचें विद्धशालभंजिका नाटक प्रथम रंगभूमीवर आलें, असें दिसतें.

नाटिकेंतील कथानकाचें महत्त्व

याप्रमाणे या नाटकावरून कलचुरि व राष्ट्रकूट या दोन राजघराण्यांच्या प्राचीन इतिहासांतील एका घटनेवर बराच महत्त्वाचा प्रकाश पडत आहे; व यांतच त्या नाटकाचें महत्त्व आहे.

Abbreviations

The following abbreviations have been used in the attached list of journals. The figures in the brackets indicate the year of publication. The first number following the name of a periodical denotes the volume, and the second the intial page.

A. B. N. U. H. S.—Annual Bulletin of the Nagpur University Historical Society.

A. B. O. R. I.—Annals of the Bhandarkar Oriental Research Institute.

E. I.—Epigraphia Indica.

H. A. S.—Hyderabad Archaeological Series.

I. A.—Indian Antiquary.

I. H. Q.—Indian Historical Quarterly.

J. G. J. R. I.—Journal of the Ganganath Jha Research Institute.

J. K. H. R. R. S.—Journal of the Kalinga Historical Research Society.

J. M. S. G. U.—Journal of the Maharaja Sayajirao Gaikwad University.

J. N. S. I.—Journal of the Numismatic Society of India.

J. O. H. R. S.—Journal of the Orissa Historical Research Society.

N. I. A.—New Indian Antiquary.

N. U. J.—Nagpur University Journal.

P. I. H. C.—Proceedings of the Indian History Congress.

P. T. A. I. O. C.—Proceedings and Transactions of the All-India Oriental Conference.

परिशिष्ट

प्रा. वा. वि. मिराशी यांचे संशोधनपर ग्रंथ व लेख

इंग्रजी

Work

Inscriptions of the Kalachuri-Chedi Era (Corpus Inscriptionum Indicarum, Vol. IV) (In the Press)

Articles

1 The Traditional Author of the Vedānta Sūtras—Bādarāyaṇa or Kṛishṇa Dvaipāyana? (1923), *P. T. A. I. O. C.*, 463 f.*

2 Yuvarājadeva I of Tripurī, (1930), *A. B. O. R. I.*, XI, 361 f.

3 Two Inscriptions from Berar, (1931), *E. I.*, XXI, 127 f.

4 Notes on the Bilhari Stone Inscription of the Rulers of Chedi, (1932), *Mahākoshal Historical Society's Papers*, Vol. I, 11, f.

5 Did Tailapa II defeat a Chedi King?, (1933), *I. H. Q.*, IX, 132 f.

6 Hfstorical Data in Rājaśekhara's Viddhaśālabhañjikā, (1933), *I. A.*, LXII, 35 f.

7 Historical Data in Padmagupta's Navasāhasāṅka-charita, (1933), *I. A.*, LXXII, 101 f.

8 Further Light on Rāmagupta, (1933), *I.A.*, LXII, 201 f.

---

* For explanation of abbeviations see the preceding page.

9 Thakurdiya Plates of Mahā-Pravararāja, (1933), *E. I.*, XXII, 15

10 Khamkhed Plates of the Time of Pratāpaśīla, (1933), *E. I.*, XXII, 93 f.

11 Chandragupta II–Vikramāditya and Govinda IV, (1934), *I. H. Q.*, X, 48 f.

12 The Chronological Order of Rājaśekhara's Works, (1934), *K. B. Pathak Commemoration Volume*, 359 f.

13 Sarkhon Plates of Ratnadeva II, (1934), *E. I.*, XXII, 159 f.

14 Tirodi Plates of Pravarasena II, (1934), *E. I.*, XXII, 167 f.

15 An Unfinished Vākāṭaka Plate from Drug, (1934), *E. I.*, XXII, 207 f.

16 The Birth-Place of Bhavabhūti, (1935), *I. H. Q.*, XI, 287, f.

17 Epigraphic Notes I, (1935), *N. U. J.*, I, 1 f.

18 Pendrabandh Plates of Pratāpmalla, (1935), *E. I.*, XXIII, 1 f.

19 Anjanavati Plates of Govinda III* (1935), *E. I.*, XXIII, 8 f.

20 Pattan Plates of Pravarasena II, (1935), *E. I.*, XXIII, 81 f.

21 Mallar Plates of Mahāśivagupta,† (1935), *E. I.*, XXIII, 113 f.

22 Epigraphic Notes II, (1936), *N. U. J.*, II, 48 f.

23 A Note on the Dates of Uchchakalpa Kings, (1936), *E. I.*, XXIII, 171 f.

24 Two Copper-plate Inscriptions from Berar, (1936), *E. I.*, XXIII, 204 f.

---

* In collaboration with Mr. L. R. Kulkarni.

† In collaboration with Pandit L. P. Pandeya.

25 Karitalai Stone Inscription of Lakshmaṇarāja, (1936), *E. I.*, XXIII, 255 f.

26 A Further Note on the Date of the Manne Plates of Stambha, (1936), *E. I.*, XXIII, 295 f.

27 Pauni Stone Inscription of the Bhāra King Bhagadatta, (1937) *E. I*, XXIV, 11 f.

28 The Date of Tīvaradeva, (1937), *Ganganath Jha Volume*, 223 f.

29 An Odd Copper-plate of Pravarasena II, (1937), *N. U. J.*, III, 20 f.

30 Epigraphic Notes III, (1937), *N. U. J.*, III, 29 f.

31 New Light on Deotek Inscriptions, (1938), *P. T. A. I. O. C.*, VIII, 613 f.

32 Rewah Stone Inscription of the Time of Karṇa, (1938), *E. I.*, XXIV, 101 f.

33 Epoch of the Kalachuri-Chedi Era, (1938), *E. I.*, XXIV, 116 f.

34 A Note on the Prince of Wales Museum Plates of Jayabhaṭa, (1939), *E. I.*, XXIV, 176 f.

35 Two Incomplete Grants of Pravarasena II, (1939), *E. I.*, XXIV, 260 f.

36 Kaman Stone Inscription, (1939), *E. I.*, XXIV, 329.

37 Vāmadeva, An Early Kalachuri King, (1939), *F. W. Thomas Volume*, 152 f.

38 Gold Coins of Three Kings of the Nala Dynasty, (1939), *J. N. S. I*, I, 29 f.

39 An Ancient Dynasty of Mahākosala, (1939), *P. I. H. C.*, III, 319 f.

40 An Incomplete Grant of Sinda Ādityavarman,* (1940), *E. I.*, XXV, 164.

* In collaboration with Dr. M. G. Dikshit.

41 New Light on the Mediaeval History of Gujarat, (1940), *D. R. Bhandarkar Volume*, 58 f.

42 Tarhala Hoard of Sātavāhana Coins, (1940), *J. N. S. I.*, II, 83 f.

43 Ramtek Stone Inscription of the Time of Rāmachandra,* (1940) *E. I.*, XXV, 7 f.

44 Purushottampuri Plates of Rāmachandra, (1940), *E.I.*, XXV, 199 f.

45 A Note on the India Office Plate of Devasena, (1940), *N. I. A.*, II, 721 f.

46 Some Kalachuri Dates, (1940), Woolner Commemoration Volume, 165 f.

47 The Capitals of the Vākāṭakas, (1940), *P.T.A.I.O.C.*, X, 455 f.

48 Bargaon Temple Inscription of Śabara, (1940), *E. I.*, XXV, 278.

49 Jubbulpur Stone Inscription of Vimalaśiva, (1940), *E. I.* XXV, 309 f.

50 Vatsagulma Branch of the Vākāṭaka Dynasty,† (1940), *P. I. H. C.*, IV, 79 f.

51 Rajim Stone Inscription of Vilāsatuṅga, (1941), *E. I.*, XXVI, 49 f.

52 Ratanpur Stone Inscription of Pṛithvīdeva II, (1941), *E. I*, XXVI, 255 f.

53 Kothūraka Grant of Pravarasena II, (1941), *E. I.*, XXVI, 155 f.

54 Dongargaon Stone Inscription of Jagaddeva, (1941), *E. I.*, 177 f.

55 The Coins of the Kalachuris, (1941) *J. N.S.* I., III, 21 f.

---

* In collaboration with Mr. L. R. Kulkarni.

† In collaboration with Mr. D. B. Mahajan.

56 A Ship-type Coin of Yajña Sātakarṇi, (1941), *J. N. S. I*, III, 43

57 Was Berar the Home Province of the Sātavāhanas? (1941), *J. N. S. I.*, III, 37 f.; 88 f.

58 "Tritasaurya" (1941), Kane Festschrift, 290 f.

59 A Gold Coin of Prāṇanārāyaṇa, (1941), *J. N. S. I.*, III, 93 f.

60 Some Seal-stamps from the Central Provinces, (1941), *J. N. S. I.*, III, 99 f.

61 Vākāṭaka Inscription in Ajanta Cave XVI, (1941), *H. A. S.*, XIV, 1 ff.

62 Gāṅgeyadeva of Tīrabhukti, (1942) *A. B. O. R. I.*, Silver Jubilee Volume, 291, f.

63 Some Old Coins re-discussed, (1942) *I. H. Q.*, XVIII, 71 f.

64 Presidential Address, Archaeology Section, Eleventh All-India Oriental Conference, Hyderabad, (1941). *P. T. A. I. O. C.* XI.

65 Date of the Mathura Pedestal Inscription of Kanishka, (1942), *E. I.*, XXVI, 293 f.

66 Basim Plates of Vindhyaśakti*, (1942), *E. I.*, XXVI, 139 f.

67 A Copper-plate Grant of Chhadvaidеva† (1942), *E. I.*, XXVI, 282 f.

68 Dates of some Early Kings of Kauśāmbī, (1942), *E. I.*, XXVI, 297 f.

69 Epoch of the Gāṅga Era, (1942), *E. I.*, XXVI, 327 f.

70 Gunji Rock Inscription of Kumāravaradatta, (1943), *E. I.*, XXVII, 48 f.

* In collaboration with Mr. D. B. Mahajan.
† In collaboration with Dr. M. G. Dikshit.

71 Wadgaon Plates of Pravarasena II, (1943), *E. I.*, XXVII, 74 f.

72 Saugor Stone Inscription of Śaṅkaragaṇa, (1943), *E. I.*, XXVII, 163 f.

73 Chhoti Deori Stone Pillar Inscription of Śaṅkaragaṇa, (194 3), *E. I.*, XXVII, 170 f.

74 Koni Stone Inscription of Pṛithvīdeva II, (1943), *E. I.*, XXVII, 276 f.

75 Location of Rāmagiri, (1943), *N. U. J.*, IX, 9 f.

76 A Note on the Māṅkaṇi Plate of Taralasvāmin (1943), *J. G. J. R. I.*, I, 3879.

77 The Legend on Valabhī Coins, (1944), *J. N. S. I.*, VI, 14 f.

78 A Coin of King Dimabhāga, (1944), *J.N.S.I.*, VI, 9 f.

79 The Rāshṭrakūṭas of Mānapura, (1944), *A.B.O.R.I.*, XXV, 25 f.

80 A Note on 'pādānudhyāta', (1944), *I.H.Q.*, XX, 288 f.

81 An Ancient Dynasty of Khaṇdesh, (1944), *A. B. O. R. I.*, XXV, 36 f.

82 A Note on Vajraṭa, (1944), *I. H. Q.*, XX, 353 f.

83 A Note on Kumāragadyāṇaka, (1944), *J. N. S. I.*, VI, 20 f.

84 Did Vākāṭaka rule become extinct after Vindhyaśakti? (1945), *Indian Culture*, XI, 232 f.

85 Mahoba Stone Inscription of Paramardin, (1945), *Bhārata Kaumudī*, I, 433 f.

86 The Varuṇaśarmaka Grant of Chāmuṇḍarāja, (1945), *Bhāratīya Vidyā*, May 1945, 90 f.

87 The Age of the Bagh Caves, (1945), *I.H.Q.*, XXI, 79 f.

88 Some Royal Poets of the Vākāṭaka Age, (1945), *I. H. Q.*, XXI, 193 f.

89 Historical Data in Daṇḍin's Daśakumāracharita, (1945), *A. B. O. R. I.*, XXVI, 20 f.

90 A Coin of King Sebaka, (1945), *J. N. S. I.*, VII, 94.

91 A Coin of King Sātavāhana, (1945), *J N. S. I.* VII, 1 f.

92 An Ancient Śaka Dynasty of Māhishmatī, (1945), *I. H. Q.*, XXII, 34 f.

93 Presidential Address of Ancient Indian History, Section II, (1944), *P. I. H. C.*, VII, 153 f.

94 The Kalachuri-Chedi Era, (1946), *A. B. O. R. I.*, XXVII, 1 f.

95 The Date of the Dadhimatī Mātā Inscription, (1946), *J. G. J. R. I.*, III, 109 f.

96 The Vākāṭaka Dynasty of the Central Provinces and Berar, (1946), *A. B. N. U. H. S.*, I, 8 f.

97 A New Coin of Sātakarṇi, (1946), *J. N. S. I.*, VIII, 18 f.

98 The Seal-stamp of of Brahmadeva (1946) *J. N. S. I.*, VIII, 79 f.

99 A New Sātavāhana Coin (1946), *J. N. S. I.*, VIII, 22 f.

100 A Coin of Prakāśaśiva Sebaka (1946), *J. N. S. I.*, VIII, 107 f.

101 A Coin of Kauśikīputra Sātakarṇi, (1946), *J. N. S. I.*, VIII, 116.

102 Were the Vākāṭakas the rulers of Aśmaka ? (1946), *I, H. Q.*, XXII, 308 f.

103 Were the Mahārājas of Khandesh the feudatories of the Guptas ? (1946), *I. H. Q.* XXII, 156 f.

104 Identification of Kuntala and Aśmaka Countries, (1946), *I. H. Q.*, XXII, 321 f.

105 Vidarbha and Mahākośala (1947), *J. K. H. R. S.*, II, 1 f.

106 The Date of the Gāthāsaptaśatī, (1948), *I. H. Q.*, *XXIII*, 300 f.

107 Three Ancient Dynasties of Mahākośala, *Bulletin of the Deccan College Research Institute*, VIII, 47 f.

108 Vākāṭaka Chronology, (1948), *I. H. Q.*, *XXIV* 148 f.

109 Nandgaon Stone Inscription of Yādava Kṛishṇa, (1948), *E. I.*, XXVII, 9 f.

110 A Further Note on the Epoch of the Gāṅga Era, (1948), *E. I.*, XXVII, 112 f.

111 Koni Stone Inscription of Pṛithvīdeva II, (1948), *E. I.*, XXVII, 276 f.

112 New Light on the Ancient History of Mahārāshṭra, (1948) *P. I. H. C.*, XI, 49 f.

113 Kālidāsa as seen in his Works,* (1948), *Vikrama Volume*, 303 f.

114 Khanapur Plates of Mādhavavarman,† (1949), *E. I.*, XXVII, 312 f.

115 Some More Coins of the Mahisha Dynasty, (1949), *J. N. S. I.*, XI, 1 f.

116 A Lead Coin of Sātavāhana, (1949), *J. N. S. I.*, XI, 5 f.

117 A Lead Coin from Kondapur, (1949), *J. N. S. I.*, XI, 86 f.

118 A Note on the Khairtal Hoard of the Coins of Mahendrāditya, (1949), *J. N. S. I.*, XI, 108 f.

119 New Light on the Epoch of the Kalachuri Era, (1949), *I. H. Q.*, XXV, 81 f.

120 A Note on the Tivarkhed Plates of Nannarāja, (1949), *I. H. Q.*, XXV, 139 f.

---

* In collaboration with Prof. N. R. Navalekar.

† In collaboration with Mr. Y. R. Gupte.

121 Inscription in Cave XVII at Ajanta, (1949), *H.A.S.*, XV.
122 Nagardhan Plates of Svāmirāja, (1950), *E. I.*, XXVIII, 1 f.
123 A Coin of Māna Chuṭuka, (1950) *J.N.S.I.*, XII, 87 f.
124 The Apratigha Coins, (1950), *J.N.S.I.*, XII, 68 f.
125 Some More Coins from Kondapur, (1950), *J.N.S.I.*, XII, 90.
126 The Spread of the *Ś*aka Era in South India, (I), (1950), *I. H. Q.*, XXVI, 216 f.
127 Pravarapura, the Ancient Capital of the Vākāṭakas, (1950), *B. N. U. H. S.*, IV, 7 f.
128 Epigraphic Notes, (1950), *J. G. J. R. I.*, VIII, 77 f.
129 The Date of the Ellora Plates of Dantidurga, (1950), *J. B. B. R. A. S.*, XXVI, 163.
130 A Note on the Ponnuturu Plates of Sāmantavarman, (1950), *E. I.*, XXVIII, 171 f.
131 A Note on the Kesaribeda Plates of Arthapati, (1950), *I. H. Q.*, XXVI, 142 f.
132 The *Ś*aiva Āchāryas of the Mattamay*ū*ra Clan (1950), *I. H. Q.*, XXVI, 1 f.
133 Some Ancient Prakrit Poets, (1950), *Bharatīya Vidyā*, X (K. M. Munshi Volume, II) 42 f.
134 Dantidurga, the Founder of the Rāshtrak*ū*ṭa Imperial Power, (1951), *J. M. S. G. U.*, I 31 f.
135 The Spread of the *Ś*aka Era in South India (II), (1951), *I. H. Q.*, XXVII, 341 f.
136 Presidential Address, Numismatic Society of India, (1951), *J. N. S. I.*, XIII, 113 f.
137 Some More Coins from Hyderabad, (1951), *J.N.S.I.*, XIII, 131 f.

138 Eran Stone Pillar Inscription of Śrīdharavarman, (1951) *P. I. H. C.*, XIV, 23.

139 The Home of the Vākāṭakas, (1951), *A. B. O. R. I.*, XXXII, 1 f.

140 Himālaya as described by Kālidāsa, (1952), *Himalaya*, I, 80.

141 The Ghaṭotkacha Cave Inscription, (1952), *H.A.S.*, XVI.

142 A Note on the Lodhia Plates of Mahāśivagupta, (1952), *J. O. H. R. S.*, I, 63 f.

143 Mundakhede Plates of Jayaśakti, (1952), (to be published in *E. I.*)

144 Identification of Kings Sātavāhana and Sātakarṇi of the Coins, (1952), *J.N.S.I.*, XIV, 26 f.

145 The Harsha and Bhāṭika Eras, (1953), *I. H. Q.*, XXIX, 191 f.

146 Two More Coins from Kondapur, (1953), *J. N. S. I.*, XV, 115 f.

147 Coins of Sivala Mahisha, (1953), *J.N.S.I.*, XV, 120.

148 The Coins of the Kalachuris of South Kosala, (1953), *J. N. S. I.*, XV, 208 f.

149 Musunika Grant of Devendravarman, (1953), (to be published in *E. I.*)

150 Dhulev Plate of Mahārāja Bhetti (1953), (to be published in *E. I.*).

151 The Pāṇḍava Dynasty of Mekalā, (1954), *Indica*, 268 f.

म रा ठी

ग्रंथ

कालिदास (नवभारत ग्रंथमाला, नागपूर) (१९३४*).

लेख

§१ कालिदास आणि विदर्भ, (डॉ. केतकर यांस उत्तर) (लेखांक १-६). 'महाराष्ट्र', (डिसेंबर १९२८ ते जानेवारी १९२९).

२ कालिदास आणि विदर्भ, (डॉ. केतकर यांस प्रत्युत्तर) 'महाराष्ट्र', (३१-३-१९२९).

३ डॉ. केतकर आणि भवभूतीचें उपनांव, 'महाराष्ट्र' (२४-२-१९२९).

§४ रामगुप्ताच्या चरित्रावर नवीन प्रकाश, (१९३३) 'शारदाश्रम वार्षिक', २१.

५ धाराधीश सिन्धुराजाच्या चरित्रांतील एक प्रसंग, (१९३३) भा. इ. स. मं. त्रै.;† पु. १३, पृ. ३३.

६ वाकाटकांचा अंतिम काळ (लेखांक १-२), (१९३३) 'वागीश्वरी', पु. ४, पृ. ४०७ व ४८६.

७ वाकाटकांचा द्रुग येथील अपूर्ण ताम्रपट, (१९३४) द. म. इ. सा.‡ भा. ३, पृ. १४.

८ कालिदास व ऋतुसंहार, (श्री. दु. आ. तिवारी यांस उत्तर), 'विहंगम' (फेब्रुवारी-मार्च, १९३४).

---

* यासारखे कंसांतील अंक प्रकाशनवर्षाचे आहेत.

§ या चिन्हाने अंकित लेख प्रस्तुत पुस्तकांत घेतले आहेत.

† भा. इ. सं. मं. त्रै. = भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक.

‡ द. म. इ. सा. = दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें.

९ कालिदास व ऋतुसंहार, (श्री. दु. आ. तिवारी यांस प्रत्युत्तर), 'विहंगम' (आक्टोबर, १९३४).

१० शाकुन्तल नाटकांतील एक प्रसंग, 'फुलोर', (शारदामंडळ, नागपूर), (१९३५), पृ. ३.

§११ भवभूतीचें जन्मस्थान, 'सह्याद्रि' (मे १९३५).

१२ कर्ण डहारिया व त्याच्या दरबारचे कवि, (लेखांक २) 'विश्ववाणी' (१९३६).

१३ सेंद्रक जयशक्तीच्या मुंदखेडे ताम्रपटांतील गावांचा शोध (१९३६), भा. इ. सं. मं. त्रै., पु. १७, पृ. ५२.

१४ दक्षिण कोसलची प्राचीन राजधानी, 'विहंगम' (आक्टोबर, १९३७).

१५ रामटेक येथील रामदेवराव यादवाच्या काळचा शिलालेख,* (१९३८), 'सरदेसाई स्मारक ग्रंथ', पृ. ११५.

१६ कलचुरींच्या आभोणे व वडनेर येथील ताम्रपटांतील गावांचा शोध, (१९३८), भा. इ. सं. मं. त्रै., पु. १९.

१७ महाकोशलांतील एक प्राचीन राजवंश (१९३९), भा. इ. सं. मं. त्रै., पु. २०, पृ. ९.

१८ वाक्पतिराज मुंजाचे दिग्विजय, (१९३९) 'मालव साहित्य', इंदूर विशेषांक.

१९ त्रिपुरीचा कलचुरिनृपति वामदेव, (१९४०), महाराष्ट्र मंडळ ज्युबिली ग्रंथ, जबलपूर.

२० रामदेवराव यादवाच्या पैठण येथील ताम्रपटांतील गावांचा शोध (१९४०), भा. इ. सं. मं. त्रै., पु. २१, पृ. १२.

२१ प्रभावतीगुप्तेच्या पुणें येथील ताम्रपटांतील गावांचा शोध (१९४१), भा. इ. सं. मं. त्रै., पु. २२, पृ. १.

२२ वाकाटकनृपति द्वितीय प्रवरसेनाचा जांब येथील ताम्रपट (१९४२), भा. इ. सं. मं. त्रै., पु. २३, पृ. ११.

* श्री. ल. रा. कुळकर्णी यांच्या साहाय्याने.

§२३ मेघदूतांतील रामगिरि, 'सह्याद्रि' (एप्रील, १९४४).

२४ राष्ट्रकूट महाराष्ट्रीय होते (१९४५), 'तरुण भारत', नागपूर (वर्षारंभ अंक).

§२५ कालिदासाचें कुन्तलेश्वरदौत्य, 'सह्याद्रि', (जुलै, १९४५).

२६ महाराष्ट्र हीच सातवाहनांची जन्मभूमि (१९४६), 'तरुण भारत वर्षारंभ विशेषांक.

२७ विक्रमादित्याची परंपरा (१९४६), 'विक्रमस्मृति', पृ. ७४.

§२८ गाथासप्तशतीचा काळ, 'युगवाणी', (मार्च, १९४६).

२९ वाकाटक साम्राज्याचा ऱ्हास, 'युगवाणी', (मे, १९४६).

३० भारतीय इतिहास व पुराणवस्तुसंशोधन (१९४७), 'दत्तोपंत आपटे स्मारक ग्रंथ', पृ. १२०.

३१ गाथासप्तशतीचा काळ (म. म. कृष्णशास्त्री घुले यांस उत्तर), 'युगवाणी' (एप्रील, १९४७).

३२ मानपुरचे राष्ट्रकूट (१९४७), भा. इ. सं. मं. त्रै., पु. २८, पृ. १.

३३ नांदगांव येथील कृष्णदेव यादवाच्या काळचा शिलालेख (१९४७), भा. इ. सं. मं. त्रै., पु. २८, पृ. ८.

३४ शिलाहार छद्वैदेव याचा ताम्रपट* (१९४७), 'महाराष्ट्रांतील कांही प्राचीन ताम्रपट व शिलालेख' (भा. इ. सं. मं. त्रै.) पृ. ९.

§३५ एक प्राचीन कविमंडळ (१९४७), 'तरुण भारत', वर्षारंभ विशेषांक.

§३६ भवभूतीच्या नाटकांतील कालप्रियनाथ (१९४७), 'युगवाणी', (नोव्हेंबर–डिसेंबर, १९४७)

३७ खानदेशांतील एक प्राचीन राजवंश, 'पराग', (डिसेंबर १९४७).

३८ प्राचीन महाराष्ट्र व त्याच्या राजधान्या, 'नवभारत' (आगष्ट, १९४७).

३९ भवभूतीचें पद्मपुर, 'युगवाणी', (मार्च १९४८).

---

* डॉ. मो. गं. दीक्षित यांच्या साहाय्याने.

§४० वाकाटकनृपति सर्वसेन याचें 'हरिविजय काव्य', 'नवभारत,' (जून, १९४७).

४१ रामगिरि हा रामटेकच (श्री. शिवदासपंत बारलिंगे यांस उत्तर) 'तरुण भारत', (२०-११-१९४८).

§४२ गुणाढ्याचें जन्मस्थान, (१९४८), भा. इ. सं. मं. त्रै., पु. २९, पृ. ६७.

४३ महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासावर नवीन प्रकाश, (१९४८), भा. इ. सं. मं. त्रै., पु. २९, पृ. १५.

४४ रामगिरि हा रामटेकच (श्री. शिवदासपंत बारलिंगे यांस प्रत्युत्तर), 'तरुण भारत', (१-१-१९४९).

§४५ कालिदास आणि अश्वघोष (श्री. अ. ज. करंदीकर यांस उत्तर), 'सह्याद्रि', (मार्च, १९४९).

४६ कालिदासाचा रामगिरि कोणता ? (म. म. कृष्णशास्त्री घुले यांस उत्तर) 'महाराष्ट्र', (२५-७-१९४९).

४७ हेमाद्रीचा अंतकाल, 'नवभारत', (नोव्हेंबर, १९४९).

४८ विदर्भातील प्राचीन राष्ट्रकूट वंश, (१९४९), 'तरुण भारत' दिवाळी अंक.

४९ स्वामिराजाचा नगरधन येथील ताम्रपट : कलचुरि संवत् ३२२, (१९४९), द. म. इ. सा., भा. ३, पृ. १०९.

§५० कालिदास आणि अश्वघोष (प्रा. क. मा. शेंबवणेकर यांस उत्तर), 'प्रसाद', (जुलै, १९५०).

५१ 'सुश्लोक मेघ' (ग्रंथपरीक्षण), 'युगवाणी' (आगष्ट, १९५०).

§५२ विद्धशालभंजिकेंतील राजकारणाचें प्रतिबिंब, (१९५०), 'तरुण भारत', दिवाळी अंक.

§५३ पवनार येथील प्राचीन अवशेष, (१९५०), 'पोतदार सन्मान ग्रंथ', पृ. १.

५४ विदर्भाचे राष्ट्रकूट, 'युगवाणी', दिवाळी अंक, १९५०.

§५५ शालिवाहन शकाची पूर्वपीठिका, 'नवभारत', (जानेवारी, १९५१).

५६ वत्सगुल्मचे वाकाटक, 'मधुवन', चांदा, (एप्रिल, १९५१).

५७ घटोत्कच लेण्यांतील वाकाटककालीन लेख, (१९५१), भा. इ. सं. मं. त्रै., पु. ३१, पृ. १.

५८ महाराज माधववर्मा याचा खानापूर ताम्रपट,* (१९५१), भा. इ. सं. मं. त्रै., पु. ३१, पृ. १४.

५९ प्राचीन भारतांतील पांडववंश, (१९५१), भा. इ. सं. मं. त्रै., पु. ३१, पृ. १४.

६० कालिदासाचा काळ (श्री. अ. ज. करंदीकर यांस उत्तर), (१९५१), 'ज्ञानेश्वर', पु. ४, पृ. ७.

§६१ शकनृपति श्रीधरवर्म्याचा एरण येथील स्तंभलेख (१९५२), भा. इ. सं. मं. त्रै., पु. ३३, पृ. ३२.

६२ गुप्तसम्राट् समुद्रगुप्त याचें कृष्णचरित काव्य, (१९५२), 'तरुण भारत', दिवाळी अंक.

६३ सातवाहनांच्या आरंभकालावर नवीन प्रकाश, (१९५२), 'स्वामी केवलानन्द गौरव ग्रंथ', पृ. ३०

६४ सातवाहनराज्ञी नागनिका, (१९५२), 'तरुण भारत' दिवाळी अंक.

६५ 'यज्ञफल' नाटकाची समस्या, 'नवभारत', (जानेवारी, १९५२).

६६ गोंड राजांचीं नाणीं, (१९५२) 'मधुवन', चांदा, दिवाळी अंक.

६७ मध्यप्रदेशांतील प्राचीन-इतिहास-संशोधन-कार्य, 'तरुण भारत', १२-४-१९५३.

६८ महाराष्ट्रांतील प्राचीन शक राजवंश, (१९५३) 'तरुण भारत', दिवाळी अंक.

§६९ 'मऱ्हाटी संस्कृति--कांही समस्या' (ग्रंथपरीक्षण), नवभारत, (डिसेंबर १९५३).

७० वाकाटकांच्या राजधान्या, 'युगवाणी', (जानेवारी, १९५४).

---

* श्री. य. रा. गुप्ते यांच्या साहाय्याने.

सूची